विदार्यमाणो यास्यामि तद्विष्णोः परमं पदम् ।
जानामि राघवं विष्णुं लक्ष्मीं जानामि जानकीम् ।
ज्ञात्वैव जानकी सीता मयानीता वनाद्बलात् ॥ ५७ ॥

रामेण निधनं प्राप्य यास्यामीति परं पदम् ।
विमुच्य त्वां तु संसारादगमिष्यामि सह प्रिये ॥ ५८ ॥

परानन्दमयी शुद्धा सेव्यते या मुमुक्षुभिः ।
तां गतिं तु गमिष्यामि हतो रामेण संयुगे ॥ ५९ ॥

प्रक्षाल्य कल्मषाणीह मुक्तिं यास्यामि दुर्लभाम् ॥ ६० ॥

क्लेशादिपञ्चकतरङ्गयुतं भ्रमाढ्यं
दारात्मजाप्तधनबन्धुझषाभियुक्तम् ।
और्वानलाभनिजरोषमनङ्गजालं
संसारसागरमतीत्य हरिं व्रजामि ॥ ६१ ॥

मिळाल्यावर मी परम पदाला जाईन, असा विचार करून मी सीतेला वनातून बळजबरीने हरण करून आणले होते. हे प्रिये , आता तुला सोडून मी अन्य राक्षसांसह या संसारातून निघून जाईन. (५५-५८)

मुमुक्षु लोक परमानंदमय आणि शुद्ध अशा गतीचे सेवन करतात, तीच गती युद्धात रामांनी ठार केल्यावर मला मिळेल. (५९)

आपली पापे धुऊन टाकून मी दुर्लभ अशा मुक्तीला पोहोचेन. (६०)

ज्यामध्ये अविद्या, अस्मिता, राग, द्वेष आणि अभिनिवेश हे पाच क्लेशरूपी तरंग उठत आहेत, जो भ्रमरूपी भोवऱ्यांनी भरलेला आहे, ज्यात पत्नी, पुत्र, आप्त, धन, बंधू हेच मत्स्य इत्यादी जलचर आहेत, ज्यामध्ये स्वतःचा क्रोध हाच वडवानल आहे आणि ज्यात मदनरूपी जाळे पसरलेले आहे, असा संसारसागर ओलांडून मी हरीकडे जाईन." (६१)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे युद्धकाण्डे दशमः सर्गः ॥ १० ॥

एकादश सर्ग

राम- रावण- संग्राम आणि रावणाचा वध

श्रीमहादेव उवाच

इत्युक्त्वा वचनं प्रेम्णा राज्ञीं मन्दोदरीं तदा ।
रावणः प्रययौ योद्धुं रामेण सह संयुगे ॥ १ ॥

दृढं स्यन्दनमास्थाय वृतो घोरैर्निशाचरैः ।
चक्रैः षोडशभिर्युक्तं सवरूथं सकूबरम् ॥ २ ॥

पिशाचवदनैर्घोरैः खरैर्युक्तं भयावहम् ।
सर्वास्त्रशस्त्रसहितं सर्वोपस्करसंयुतम् ॥ ३ ॥

निश्चक्रामाथ सहसा रावणो भीषणाकृतिः ।
आयान्तं रावणं दृष्ट्वा भीषणं रणकर्कशम् ॥ ४ ॥

श्रीमहादेव म्हणाले– हे पार्वती, अशा प्रकारे त्या वेळी महाराणी मंदोदरीला प्रेमपूर्वक सांगून, रावण रामांबरोबर युद्ध करण्यास रणभूमीकडे निघून गेला. (१)

भयंकर राक्षसांनी वेढलेला तो रावण एका बळकट रथावर चढला. सोळा चाकांनी युक्त असणाऱ्या त्या रथाला वरूथ* आणि कूबर** होते; पिशाचांसारखी तोंडे असणारी भयानक गाढवे त्याला जोडली होती, तो रथ भय निर्माण करणारा होता; तो सर्व प्रकारच्या अस्त्रांनी आणि शस्त्रांनी सुसज्ज होता; तसेच अन्य प्रकारच्या सर्व युद्धसामग्रीने भरलेला होता. अशा रथात आरोहण करून भयानक रूप असणारा रावण त्वेषाने लंकेतून बाहेर पडला. रणांगणात कठोर असणारा भयानक रावण येत

*रथाच्या रक्षणासाठी बनविलेले लोखंड इत्यादींचे आच्छादन वा छप्पर. ** ज्याला जू बांधले जाते तो रथाचा भाग.

सन्त्रस्ताभूत्तदा सेना वानरी रामपालिता ॥ ५ ॥

हनूमानथ चोत्प्लुत्य रावणं योद्धुमाययौ ।
आगत्य हनुमान् रक्षोवक्षस्यतुलविक्रमः ॥ ६ ॥

मुष्टिबन्धं दृढं बद्ध्वा ताडयामास वेगतः ।
तेन मुष्टिप्रहारेण जानुभ्यामपतद्रथे ॥ ७ ॥

मूर्च्छितोऽथ मुहूर्तेन रावणः पुनरुत्थितः ।
उवाच च हनूमन्तं शूरोऽसि मम सम्मतः ॥ ८ ॥

हनूमानाह तं धिङ्मां यस्त्वं जीवसि रावण ।
त्वं तावन्मुष्टिना वक्षो मम ताडय रावण ॥ ९ ॥

पश्चान्मया हतः प्राणान्मोक्ष्यसे नात्र संशयः ।
तथेति मुष्टिना वक्षो रावणेनापि ताडितः ॥ १० ॥

विघूर्णमाननयनः किञ्चित्कश्मलमाययौ ।
संज्ञामवाप्य कपिराड् रावणं हन्तुमुद्यतः ॥ ११ ॥

ततोऽन्यत्र गतो भीत्या रावणो राक्षसाधिपः ।
हनूमानङ्गदश्चैव नलो नीलस्तथैव च ॥ १२ ॥

चत्वारः समवेत्याग्रे दृष्ट्वा राक्षसपुङ्गवान् ।
अग्निवर्णं तथा सर्परोमाणं खड्गरोमकम् ॥ १३ ॥

तथा वृश्चिकरोमाणं निर्जघ्नुः क्रमशोऽसुरान् ।
चत्वारश्चतुरो हत्वा राक्षसान् भीमविक्रमान् ।
सिंहनादं पृथक् कृत्वा रामपार्श्वमुपागताः ॥ १४ ॥

ततः क्रुद्धो दशग्रीवः सन्दश्य दशनच्छदम् ॥ १५ ॥

विवृत्य नयने क्रूरो राममेवान्वधावत ।
दशग्रीवो रथस्थस्तु रामं वज्रोपमैः शरैः ॥ १६ ॥

आजघान महाधारैर्धाराभिरिव तोयदः ।
रामस्य पुरतः सर्वान्वानरानपि विव्यधे ॥ १७ ॥

आहे, हे पाहून रामांनी रक्षिलेली ती वानरसेना तेव्हा अतिशय भयभीत झाली. (२-५)

त्या वेळी हनुमान उडी मारून रावणाशी युद्ध करण्यास आला. आल्याबरोबर अतुलनीय पराक्रम असणाऱ्या हनुमानाने हाताची मूठ घट्ट आवळून वेगाने रावणाच्या वक्षःस्थळावर प्रहार केला. त्या मुष्टीच्या प्रहाराने रावण रथातच गुडघ्यांवर पडला. (६-७)

नंतर मूर्च्छित झालेला रावण थोड्या वेळाने पुनः सावध होऊन उठला आणि हनुमंताला म्हणाला, "तू शूर आहेस, हे मला मान्य आहे." (८)

तेव्हा हनुमान त्याला म्हणाला, "अरे रावणा, माझा धिक्कार असो. कारण माझा मुष्टि-प्रहार लागूनही तू जिवंत राहिला आहेस. आता हे रावणा, तू तुझ्या मुठीने माझ्या वक्षःस्थळावर प्रहार कर. (९)

त्यानंतर मी पुनः प्रहार केल्यावर तू प्राण सोडशील यात संशय नाही." "ठीक आहे," असे म्हणून रावणानेसुद्धा (हनुमानाच्या) छातीवर मुष्टीचा प्रहार केला. (१०)

रावणाचा ठोसा लागताच मारुतीचे डोळे गरगरू लागले आणि तो काही काळ बेशुद्ध पडला. नंतर शुद्धीवर आल्यावर हनुमान रावणाला मारण्यास सिद्ध झाला. (११)

तेव्हा राक्षसराज रावण भीतीने दुसरीकडे निघून गेला. तितक्यात हनुमान, अंगद, नल तसेच नील हे चौघेजण एकत्र आले. त्यांना आपल्यापुढे उभे असलेले अग्निवर्ण, सर्परोमा, खड्गरोमा तसेच वृश्चिकरोमा असे चार राक्षसश्रेष्ठ दिसले. तेव्हा त्या चार वानरवीरांनी महापराक्रमी असणाऱ्या त्या चार राक्षसांना क्रमाने ठार केले, आणि वेगवेगळे सिंहनाद करीत ते चौघे रामांजवळ आले. (१२-१४)

नंतर क्रूर रावण रागावला, आणि दात-ओठ खात डोळे वटारून तो रामांकडेच धावला. मेघ ज्या प्रमाणे महाभयंकर पाण्याच्या धारांनी तडाखे देतो, त्या प्रमाणे रथस्थ रावणाने वज्राप्रमाणे असणाऱ्या बाणांनी रामांवर प्रहार केले, आणि रामांच्यापुढे उभे असणाऱ्या सर्व वानरांनासुद्धा त्याने विद्ध केले. (१५-१७)

ततः पावकसङ्काशैः शरैः काञ्चनभूषणैः ।
अभ्यवर्षद्रणे रामो दशग्रीवं समाहितः ॥ १८ ॥

तेव्हा रामांनी अग्नीप्रमाणे तेजस्वी आणि सोन्याने भूषित अशा बाणांनी रावणावर वर्षाव केला. (१८)

रथस्थं रावणं दृष्ट्वा भूमिष्ठं रघुनन्दनम् ।
आहूय मातलिं शक्रो वचनं चेदमब्रवीत् ॥ १९ ॥

रावण रथात बसलेला आहे आणि राम जमिनीवर उभे आहेत, हे पाहून इकडे स्वर्गात इंद्राने मातली नावाच्या सारथ्याला बोलावून घेऊन सांगितले. (१९)

रथेन मम भूमिष्ठं शीघ्रं याहि रघूत्तमम् ।
त्वरितं भूतलं गत्वा कुरु कार्यं ममानघ ॥ २० ॥

"हे मातले, माझा रथ घेऊन तू ताबडतोब जमिनीवर उभ्या असणाऱ्या रघूत्तमाकडे जा. झट्दिशी पृथ्वीतलावर जाऊन तू माझे हे काम कर." (२०)

एवमुक्तोऽथ तं नत्वा मातलिर्देवसारथिः ।
ततो हयैश्च संयोज्य हरितैः स्यन्दनोत्तमम् ॥ २१ ॥

इंद्राने असे सांगितल्यानंतर, त्याला नमस्कार करून, देवसारथी मातलीने आपल्या उत्तम रथाला हिरव्या रंगाचे घोडे जोडले आणि रामांच्या जयासाठी तो स्वर्गातून निघून रामांजवळ आला आणि श्रीरामापुढे हात जोडून उभे राहून तो म्हणाला, "हे रघूत्तमा, देवराज इंद्राने मला तुमच्याकडे पाठविले आहे. (२१-२२)

स्वर्गाजियार्थं रामस्य ह्युपचक्राम मातलिः ।
प्राञ्जलिर्देवराजेन प्रेषितोऽस्मि रघूत्तम ॥ २२ ॥

रथोऽयं देवराजस्य विजयाय तव प्रभो ।
प्रेषितश्च महाराज धनुरेन्द्रं च भूषितम् ॥ २३ ॥

हे प्रभो, हा देवराज इंद्राचा रथ तुम्हांला विजय मिळावा म्हणून पाठविला आहे. तसेच हे महाराज, अतिशय शोभिवंत असे ऐंद्र धनुष्य, अभेद्य कवच, खड्ग आणि दिव्य भात्यांची जोडी हेही इंद्राने पाठविले आहेत. तेव्हा हे रामा, मी सारथी असताना ज्या प्रमाणे इंद्राने वृत्रासुराला ठार केले, त्या प्रमाणे तुम्ही या रथावर आरूढ होऊन राक्षस रावणाचा वध करा." मातलीने असे म्हटल्यावर, त्या उत्तम रथाला प्रदक्षिणा घालून व त्याला नमस्कार करून, लोकांना आनंद देत, राम त्या रथावर आरूढ झाले. त्यानंतर महात्मा राघव आणि बुद्धिमान् रावण यांच्यामध्ये अतिशय भीषण व रोमांचकारी महायुद्ध सुरू झाले. त्या श्रेष्ठ अस्त्रवेत्त्या राघवाने रावणाच्या आग्नेयास्त्राला आग्नेयास्त्राने आणि दैवास्त्राला दैवास्त्राने तोडून टाकले. तेव्हा अतिशय क्रोधाने पछाडलेल्या त्या अस्त्रवेत्त्या रावणाने रामांवर एक भयानक राक्षस -अस्त्र सोडले. (२३-२८)

अभेद्यं कवचं खड्गं दिव्यतूणीयुगं तथा ।
आरुह्य च रथं राम रावणं जहि राक्षसम् ॥ २४ ॥

मया सारथिना देव वृत्रं देवपतिर्यथा ।
इत्युक्तस्तं परिक्रम्य नमस्कृत्य रथोत्तमम् ॥ २५ ॥

आरुरोह रथं रामो लोकाँल्लक्ष्म्या नियोजयन् ।
ततोऽभवन्महायुद्धं भैरवं रोमहर्षणम् ॥ २६ ॥

महात्मनो राघवस्य रावणस्य च धीमतः ।
आग्नेयेन च आग्नेयं दैवं दैवेन राघवः ॥ २७ ॥

अस्त्रं राक्षसराजस्य जघान परमास्त्रवित् ।
ततस्तु ससृजे घोरं राक्षसं चास्त्रमस्त्रवित् ।
क्रोधेन महताविष्टो रामस्योपरि रावणः ॥ २८ ॥

ज्यांचे पुंख (मागील भाग) सोन्याप्रमाणे चमकत होते, असे रावणाच्या धनुष्यातून सुटलेले बाण भयंकर विष असणारे साप होऊन, रामांच्या सर्व बाजूंना पडू लागले. (२९)

रावणस्य धनुर्मुक्ताः सर्पा भूत्वा महाविषाः ।
शराः काञ्चनपुङ्खाभा राघवं परितोऽपतन् ॥ २९ ॥

तैः शरैः सर्पवदनैर्वमद्भिरनलं मुखैः ।
दिशश्च विदिशश्चैव व्याप्तास्तत्र तदाभवन् ॥ ३० ॥

त्या वेळी तोंडातून आग ओकणाऱ्या त्या सर्पमुखी बाणांनी तेथे सर्व दिशा- उपदिशा व्यापून गेल्या. (३०)

रामः सर्पांस्ततो दृष्ट्वा समन्तात्परिपूरितान् ।
सौपर्णमस्त्रं तद्घोरं पुरः प्रावर्तयद्रणे ॥ ३१ ॥

रामेण मुक्तास्ते बाणा भूत्वा गरुडरूपिणः ।
चिच्छिदुः सर्पबाणांस्तान्सर्वतः सर्पशत्रवः ॥ ३२ ॥

अस्त्रे प्रतिहते युद्धे रामेण दशकन्धरः ।
अभ्यवर्षत्ततो रामं घोराभिः शरवृष्टिभिः ॥ ३३ ॥

ततः पुनः शरानीकै राममक्लिष्टकारिणम् ।
अर्दयित्वा तु घोरेण मातलिं प्रत्यविध्यत ॥ ३४ ॥

मातयित्वा रथोपस्थे रथकेतुं च काञ्चनम् ।
इन्द्रानश्वानभ्यहनद्रावणः क्रोधमूर्च्छितः ॥ ३५ ॥

ऋषेदुर्देवगन्धर्वाश्चारणाः पितरस्तथा ।
मार्त्ताकारं हरिं दृष्ट्वा व्यथिताश्च महर्षयः ॥ ३६ ॥

व्यथिता वानरेन्द्राश्च बभूवुः सविभीषणाः ।
शास्त्रो विंशतिभुजः प्रगृहीतशरासनः ॥ ३७ ॥

ददृशे रावणस्तत्र मैनाक इव पर्वतः ।
समस्तु भ्रुकुटिं बद्ध्वा क्रोधसंरक्तलोचनः ॥ ३८ ॥

रोषं चकार सदृशं निर्दहन्निव राक्षसम् ।
धनुरादाय देवेन्द्रधनुराकारमद्भुतम् ॥ ३९ ॥

क्षीत्वा पाणिना बाणं कालानलसमप्रभम् ।
निर्दहन्निव चक्षुर्भ्यां ददृशे रिपुमन्तिके ॥ ४० ॥

पराक्रमं दर्शयितुं तेजसा प्रज्वलन्निव ।
व्यक्रमे कालरूपी सर्वलोकस्य पश्यतः ॥ ४१ ॥

कृष्य चापं रामस्तु रावणं प्रतिविध्य च ।
त्रियन्वानरानीकं कालान्तक इवाबभौ ॥ ४२ ॥

तेव्हा सर्व बाजू या सापांनी भरून गेल्या आहेत, हे पाहिल्यावर रामांनी रणांगणावर पुढील बाजूस भयानक गरुड अस्त्र सोडले. (३१)

रामांनी सोडलेले आणि सापांचे शत्रू असणारे ते बाण गरुड रूप धारण करून सर्वत्र भरून गेलेल्या त्या सर्पबाणांना तोडून टाकू लागले. (३२)

अशा प्रकारे युद्धामध्ये आपले अस्त्र रामांकडून निरुपयोगी झालेले पाहिल्यानंतर रावणाने रामांवर भयानक शरवृष्टी केली. (३३)

त्या शरवृष्टीचा विनासायास प्रतिकार करणाऱ्या रामांना नंतर पुन्हा शरांच्या समूहांनी पीडा देऊन रावणाने मातलीला घायाळ केले. (३४)

तसेच क्रोधाने बेभान झालेल्या रावणाने रामांच्या रथावरील सुवर्ण- ध्वज तोडून टाकून तो रथाच्या मागील बाजूस पाडला आणि इंद्राच्या घोड्यांना जर्जर केले. (३५)

रामांना व्यथित झालेले पाहून देव, गंधर्व, चारण तसेच पितर आणि महर्षी दुःखी झाले. (३६)

तसेच बिभीषणासकट सर्व वानरश्रेष्ठ व्यथित झाले. त्या वेळी दहा तोंडे, वीस बाहू असणारा आणि हातात धनुष्य बाण घेऊन बसलेला रावण तेथे मैनाक पर्वताप्रमाणे दिसत होता. रागाने डोळे लाल झालेल्या रामांनी आपल्या भुवया चढविल्या आणि राक्षस रावणाला जणू जाळून टाकेल असा क्रोध धारण केला. नंतर इंद्राच्या धनुष्याच्या आकाराचे दुसरे एक अद्भुत धनुष्य घेऊन आणि कालाग्निप्रमाणे प्रभा असणारा एक बाण हातात घेऊन, जवळ असणाऱ्या शत्रूला जणू डोळ्यांनीच जाळीत रामांनी रावणाकडे पाहिले. (३७-४०)

त्यानंतर सर्व लोकांच्या देखत तेजाने जणू प्रज्वलित झालेल्या अशा त्या कालरूपी रामांनी आपला पराक्रम दाखविण्यास प्रारंभ केला. (४१)

धनुष्याची दोरी खेचून रामांनी रावणाला विद्ध केले. त्या वेळी वानरसैन्याला आनंदित करणारे श्रीराम कालांतकासारखे शोभू लागले. (४२)

क्रुद्धं रामस्य वदनं दृष्ट्वा शत्रुं प्रबाधतः ।
तत्रसुः सर्वभूतानि चचाल च वसुन्धरा ॥ ४३ ॥

रामं दृष्ट्वा महारौद्रमुत्पातांश्च सुदारुणान् ।
त्रस्तानि सर्वभूतानि रावणं चाविशद्भयम् ॥ ४४ ॥

विमानस्थाः सुरगणाः सिद्धगन्धर्वकिन्नराः ।
ददृशुः सुमहायुद्धं लोकसंवर्तकोपमम् ।
ऐन्द्रमस्त्रं समादाय रावणस्य शिरोऽच्छिनत् ॥ ४५ ॥

मूर्धानो रावणस्याथ बहवो रुधिरोक्षिताः ।
गगनात्प्रपतन्ति स्म तालादिव फलानि हि ॥ ४६ ॥

न दिनं न च वै रात्रिर्न सन्ध्या न दिशोऽपि वा ।
प्रकाशन्ते न तद्रूपं दृश्यते तत्र सङ्गरे ॥ ४७ ॥

ततो रामो बभूवाथ विस्मयाविष्टमानसः ।
शतमेकोत्तरं छिन्नं शिरसां चैकवर्चसाम् ॥ ४८ ॥

न चैव रावणः शान्तो दृश्यते जीवितक्षयात् ।
ततः सर्वास्त्रविद्धीरः कौसल्यानन्दवर्धनः ॥ ४९ ॥

अस्त्रैश्च बहुभिर्युक्तश्चिन्तयामास राघवः ।
यैर्यैर्बाणैर्हता दैत्या महासत्त्वपराक्रमाः ॥ ५० ॥

त एते निष्फलं याता रावणस्य निपातने ।
इति चिन्ताकुले रामे समीपस्थो बिभीषणः ॥ ५१ ॥

उवाच राघवं वाक्यं ब्रह्मदत्तवरो ह्यसौ ।
विच्छिन्ना बाहवोऽप्यस्य विच्छिन्नानि शिरांसिच ॥ ५२ ॥

उत्पत्स्यन्ति पुनः शीघ्रमित्याह भगवानजः ।
नाभिदेशेऽमृतं तस्य कुण्डलाकारसंस्थितम् ॥ ५३ ॥

तच्छोषयानलास्त्रेण तस्य मृत्युस्ततो भवेत् ।
बिभीषणवचः श्रुत्वा रामः शीघ्रपराक्रमः ॥ ५४ ॥

शत्रूवर चाल करून जाणाऱ्या रामांचे रागावलेले मुख पाहून सर्व प्राणी भयाने त्रस्त झाले आणि पृथ्वी कंप पावू लागली. (४३)

अती रौद्ररूप धारण केलेल्या रामांना पाहून तसेच त्या वेळी होणारे अतिशय दारुण उत्पात पाहून सर्व प्राणी त्रस्त झाले आणि रावणाचे मन भयभीत झाले. (४४)

त्या वेळी विमानांत बसून देवांचे समूह, सिद्ध, गंधर्व, किन्नर हे जगाच्या प्रलयासारखे ते राम-रावणांचे फार प्रचंड युद्ध पांहात होते. रामांनी ऐंद्र अस्त्र सोडून रावणाचे शिर तोडून टाकले. (४५)

तेव्हा ज्या प्रमाणे एखाद्या तालवृक्षावरून फळे खाली पडावीत त्या प्रमाणे रक्ताने बरबटलेली रावणाची मस्तके आकाशातून खाली पडली. (४६)

त्या वेळी ना दिवस, ना रात्र, ना संध्याकाळ, ना दिशा काहीच कळेनासे झाले. रणांगणावर त्या रावणाचे रूपही नीट दिसेनासे झाले. (असे कित्येक दिवस चालू राहिले.) (४७)

तेव्हा मात्र रामांचे मन विस्मयाने भरून गेले. ते स्वत:शी म्हणाले, 'समान तेज असणारी रावणाची एकशे एक शिरे मी तोडून टाकली. (४८)

तरीसुद्धा प्राणनाश होऊन हा रावण मृत झालेला दिसत नाही.' त्या वेळी सर्व अस्त्रे जाणणारे, धीर कौसल्यानंदन राम पुष्कळ अस्त्रांनी युक्त असूनही विचार करू लागले की, ज्या ज्या माझ्या बाणांनी प्रचंड सामर्थ्य व पराक्रम असणारे दैत्य मारले गेले होते, ते सर्व बाण रावणाचा वध करण्यास कसे निष्फळ ठरले ? अशा प्रकारे राम चिंताकुल झाले असताना जवळच असणारा बिभीषण रामांना म्हणाला की, "ब्रह्मदेवाने या रावणाला एक वर दिला आहे: जरी याचे बाहू तोडले गेले आणि जरी याची मस्तके तोडली गेली तरी तीच चट्दिशी पुन: उत्पन्न होतील, त्याचे कारण असे की त्या रावणाच्या नाभिप्रदेशात अमृत-कलश ठेवलेला आहे. (४९-५३)

आग्नेय अस्त्राने ते अमृत तुम्ही शुष्क करा. तरच त्याचा मृत्यू होईल." बिभीषणाचे वचन ऐकल्यावर, शीघ्र पराक्रमी रामांनी आपल्या धनुष्यावर अग्नी-अस्त्राची योजना करून त्या राक्षसाची नाभी विद्ध केली आणि

पावकास्त्रेण संयोज्य नाभिं विव्याध रक्षसः ।
अनन्तरं च चिच्छेद शिरांसि च महाबलः ॥ ५५ ॥

बाहूनपि च संरब्धो रावणस्य रघूत्तमः ।
ततो घोरां महाशक्तिमादाय दशकन्धरः ॥ ५६ ॥

बिभीषणवधार्थाय चिक्षेप क्रोधविह्वलः ।
चिच्छेद राघवो बाणैस्तां शितैर्हेमभूषितैः ॥ ५७ ॥

दशग्रीवशिरश्छेदात्तदा तेजो विनिर्गतम् ।
म्लानरूपो बभूवाथ छिन्नैः शीर्षैर्भयङ्करैः ॥ ५८ ॥

एकेन मुख्यशिरसा बाहुभ्यां रावणो बभौ ।
रावणस्तु पुनः क्रुद्धो नानाशस्त्रास्त्रवृष्टिभिः ॥ ५९ ॥

ववर्ष रामं तं रामस्तथा बाणैर्ववर्ष च ।
ततो युद्धमभूद्घोरं तुमुलं लोमहर्षणम् ॥ ६० ॥

अथ संस्मारयामास मातली राघवं तदा ।
विसृजास्त्रं वधायास्य ब्राह्मं शीघ्रं रघूत्तमम् ॥ ६१ ॥

विनाशकालः प्रथितो यः सुरैः सोऽद्य वर्तते ।
उत्तमाङ्गं न चैतस्य छेत्तव्यं राघव त्वया ॥ ६२ ॥

नैव शीर्ष्णि प्रभो वध्यो वध्य एव हि मर्मणि ।
ततः संस्मारितो रामस्तेन वाक्येन मातलेः ॥ ६३ ॥

जग्राह स शरं दीप्तं निःश्वसन्तमिवोरगम् ।
यस्य पार्श्वे तु पवनः फले भास्करपावकौ ॥ ६४ ॥

शरीरमाकाशमयं गौरवे मेरुमन्दरौ ।
पर्वस्वपि च विन्यस्ता लोकपाला महौजसः ॥ ६५ ॥

जाज्वल्यमानं वपुषा भातं भास्करवर्चसा ।
तमुग्रमस्त्रं लोकानां भयनाशनमद्भुतम् ॥ ६६ ॥

अभिमन्त्र्य ततो रामस्तं महेषुं महाभुजः ।
वेदप्रोक्तेन विधिना सन्दधे कार्मुके बली ॥ ६७ ॥

त्यानंतर क्षुब्ध झालेल्या महाबलवान रघूत्तमांनी रावणाची शिरे तोडली. तसेच बाहूसुद्धा तोडून टाकले. (तरी रावणाचे एक मुख शिल्लक राहिले होते.) तेव्हा क्रोधाने संतप्त झालेल्या रावणाने एक महाभयंकर महाशक्ती घेतली आणि बिभीषणाचा वध करण्यास ती फेकली. तेव्हा राघवांनी सुवर्णमंडित तीक्ष्ण बाणांनी ती शक्ती तोडून टाकली. (५४-५७)

त्या वेळी रावणाची मस्तके तुटून गेल्यामुळे त्याचे तेज निघून गेले होते आणि त्यामुळे ती शिरे तुटल्यामुळे तो विद्रूप झाला होता. (५८)

तेव्हा रावणाचे एक मुख्य मस्तक आणि दोन बाहू राहिले. त्यानंतर पुनः रागावून रावणाने नाना प्रकारच्या शस्त्र आणि अस्त्र यांचा रामांवर वर्षाव केला. रामांनीसुद्धा त्या प्रमाणेच रावणावर बाणांचा वर्षाव केला. अशा प्रकारे त्यानंतर पुनः त्या दोघांचे तुंबळ रोमांचकारी युद्ध सुरु झाले. (५९-६०)

त्या वेळी मातलीने राघवांना स्मरण करुन दिले. तो म्हणाला, "हे रघूत्तमा, या रावणाच्या वधासाठी शीघ्र ब्रह्मास्त्र सोडा. (६१)

या रावणाच्या विनाशाचा जो काळ देवांनी निश्चित केला आहे, तो आज आत्ता आलेला आहे. हे राघवा, या रावणाचे मस्तक तुम्ही तोडू नका; कारण, हे प्रभो, मस्तक तोडल्याने हा मरणार नाही, तर याच्या मर्मावर आघात केल्यामुळे हा मरणार आहे." अशा प्रकारे मातलीच्या वाक्याने स्मरण करुन दिल्यावर रामांनी फुत्कार टाकणाऱ्या सापाप्रमाणे असणारा एक तेजस्वी बाण घेतला. त्या बाणाच्या पार्श्वभागी वायू होता, त्याच्या फाळावर (पुढील भागी) सूर्य आणि अग्नी होते; जडपणात तो मेरू व मंदार होता; त्याच्या पर्व-भागावर महातेजस्वी लोकपाल ठेवलेले होते, त्याचे शरीर आकाशमय होते; त्याचे शरीर देदीप्यमान असून तो सूर्याप्रमाणे तेजस्वी होता आणि मग लोकांची भीती नष्ट करणारे ते भयंकर अस्त्र महाबाहू रामांनी वेदोक्त विधीने अभिमंत्रित करुन धनुष्याला जोडले. (६२-६७)

तस्मिन्सन्धीयमाने तु राघवेण शरोत्तमे ।
सर्वभूतानि विव्रेसुश्चचाल च वसुन्धरा ॥ ६८ ॥

स रावणाय सङ्क्रुद्धो भृशमानम्य कार्मुकम् ।
चिक्षेप परमायत्तस्तमस्त्रं मर्मघातिनम् ॥ ६९ ॥

स वज्र इव दुर्द्धर्षो वज्रपाणिविसर्जितः ।
कृतान्त इव घोरास्यो न्यपतद्रावणोरसि ॥ ७० ॥

स निमग्नो महाघोरः शरीरान्तकरः परः ।
बिभेद हृदयं तूर्णं रावणस्य महात्मनः ॥ ७१ ॥

रावणस्याहरत्प्राणान्विवेश धरणीतले ।
स शरो रावणं हत्वा रामतूणीरमाविशत् ॥ ७२ ॥

तस्य हस्तात्पपाताशु सशरं कार्मुकं महत् ।
गतासुर्भ्रमिवेगेन राक्षसेन्द्रोऽपतद्भुवि ॥ ७३ ॥

तं दृष्ट्वा पतितं भूमौ हतशेषाश्च राक्षसाः ।
हतनाथा भयत्रस्ता दुद्रुवुः सर्वतोदिशम् ॥ ७४ ॥

दशग्रीवस्य निधनं विजयं राघवस्य च ।
ततो विनेदुः संहृष्टा वानरा जितकाशिनः ॥ ७५ ॥

वदन्तो रामविजयं रावणस्य च तद्वधम् ।
अथान्तरिक्षे व्यनदत्सौम्यस्त्रिदशदुन्दुभिः ॥ ७६ ॥

पपात पुष्पवृष्टिश्च समन्ताद्राघवोपरि ।
तुष्टुवुर्मुनयः सिद्धाश्चारणाश्च दिवौकसः ॥ ७७ ॥

अथान्तरिक्षे ननृतुः सर्वतोऽप्सरसो मुदा ।
रावणस्य च देहोत्थं ज्योतिरादित्यवत्स्फुरत् ॥ ७८ ॥

प्रविवेश रघुश्रेष्ठं देवानां पश्यतां सताम् ।
देवा ऊचुरहो भाग्यं रावणस्य महात्मनः ॥ ७९ ॥

वयं तु सात्त्विका देवा विष्णोः कारुण्यभाजनाः ।
भयदुःखादिभिर्व्याप्ताः संसारे परिवर्तिनः ॥ ८० ॥

जेव्हा राम तो उत्तम बाण जोडत होते, तेव्हा सर्व प्राणी संत्रस्त झाले आणि पृथ्वी कंप पावू लागली. (६८)

त्यानंतर रागावलेल्या रामांनी आपले धनुष्य खूप वाकविले आणि अतिशय काळजीपूर्वक मर्माचा घात करणारे ते अस्त्र रावणावर सोडले. (६९)

आणि इंद्राने सोडलेल्या वज्राप्रमाणे अतिशय असह्य असणारा आणि कृतांतकालाप्रमाणे भयंकर मुख असणारा तो बाण रावणाच्या वक्षःस्थळावर पडला. (७०)

शरीराचा नाश करणारा, अतिशय महाभयंकर असा तो बाण रावणाच्या हृदयात घुसला आणि त्याने तत्काळ महासमर्थ रावणाचे हृदय फाडून टाकले. (७१)

त्या बाणाने रावणाचे प्राण हरण केले आणि तो पृथ्वीतलात घुसला. नंतर रावणाचा वध करून तो बाण पुनः परत रामांच्या भात्यात येऊन स्थिर झाला. (७२)

(रामांचा बाण लागल्यानंतर) रावणाच्या हातातून बाणासकट भलेमोठे धनुष्य लगेच खाली पडले आणि तो भोवळ येऊन वेगाने गतप्राण होऊन जमिनीवर पडला.(७३)

त्याला जमिनीवर पडलेला पाहून, उरलेले राक्षस स्वामी मेल्याने अनाथ होऊन भयभीत झाले आणि सर्व दिशांना पळून गेले. (७४)

तेव्हा आनंदित झालेले जयशाली वानर 'रामांचा विजय झाला आणि रावणाचा वध झाला' असे शब्द उच्चारीत मोठा घोष करू लागले. तितक्यात अंतरिक्षामध्ये देवांच्या दुंदुभीचा गंभीर नाद होऊ लागला. (७५-७६)

सर्व बाजूंनी राघवांवर पुष्पांची वृष्टी होऊ लागली. मुनी, सिद्ध, चारण आणि स्वर्गात राहाणारे देव रामांची स्तुती करू लागले. (७७)

त्याच वेळी आकाशात सर्वत्र अप्सरा आनंदाने नाचू लागल्या. इकडे सूर्याप्रमाणे चमकणारी एक तेजस्वी ज्योत रावणाच्या देहातून बाहेर पडून ती सर्व देवाच्या देखत श्रीरामांत प्रविष्ट झाली. ते पाहून देव म्हणू लागले, "या महात्म्या रावणाचे काय मोठे भाग्य आहे हो ! विष्णूच्या दयेला पात्र असणारे आम्ही सात्त्विक देव भय, दुःख इत्यादींनी व्याप्त होऊन, या संसारात फिरत असतो. या उलट हा रावण राक्षस, क्रूर, ब्रह्मघाती, अतिशय तामस स्वभावाचा,

अयं तु राक्षसः क्रूरो ब्रह्महातीव तामसः ।
परदाररतो विष्णुद्वेषी तापसहिंसकः ॥ ८१ ॥

पश्यत्सु सर्वभूतेषु राममेव प्रविष्टवान् ।
एवं ब्रुवत्सु देवेषु नारदः प्राह सुस्मितः ॥ ८२ ॥

शृणुतात्र सुरा यूयं धर्मतत्त्वविचक्षणाः ।
रावणो राघवद्वेषादनिशं हृदि भावयन् ॥ ८३ ॥

भृत्यैः सह सदा रामचरितं द्वेषसंयुतः ।
श्रुत्वा रामात्स्वनिधनं भयात्सर्वत्र राघवम् ॥ ८४ ॥

पश्यन्ननुदिनं स्वप्ने राममेवानुपश्यति ।
क्रोधोऽपि रावणस्याशु गुरुबोधाधिकोऽभवत् ॥ ८५ ॥

रामेण निहतश्चान्ते निर्धूताशेषकल्मषः ।
रामसायुज्यमेवाप रावणो मुक्तबन्धनः ॥ ८६ ॥

पापिष्ठो वा दुरात्मा परधनपर-
दारेषु सक्तो यदि स्या-
न्नित्यं स्नेहाद्भयाद्वा रघुकुलतिलकं
भावयन्सम्परेतः ।
भूत्वा शुद्धान्तरङ्गो भवशतजनिता-
नेकदोषैर्विमुक्तः
सद्यो रामस्य विष्णोः सुरवरविनुतं
याति वैकुण्ठमाद्यम् ॥ ८७ ॥

हत्वा युद्धे दशास्यं त्रिभुवनविषमं
वामहस्तेन चापं
भूमौ विष्टभ्य तिष्ठन्नितरकरधृतं
भ्रामयन्बाणमेकम् ।
आरक्तोपान्तनेत्रः शरदलितवपुः
सूर्यकोटिप्रकाशो
वीरश्रीबन्धुराङ्गस्त्रिदशपतिनुतः
पातु मां वीररामः ॥ ८८ ॥

परस्त्रीच्या ठिकाणी रत, विष्णूंचा द्वेष करणारा, आणि तापसांची हिंसा करणारा होता. (७८-८१)

असे असूनही, सर्व प्राण्यांच्या देखत तो रामांमध्ये प्रविष्ट झाला." देव अशा प्रकारे बोलत असताना, हसत हसत नारद म्हणाले. (८२)

" हे देवांनो, तुम्ही धर्माचे तत्त्व जाणणारे आहात. तर ऐका. द्वेषामुळे हा रावण रात्रंदिवस आपल्या मनात रामांचे चिंतन करीत असे. द्वेषाने युक्त असणारा तो सतत सेवकांकडून रामांचे चरित्र ऐकत असे. रामांचे हातून आपले मरण आहे हे ऐकल्यावर, भीतीमुळे सर्वत्र आणि स्वप्नातसुद्धा दररोज रामांनाच पाहात असे. अशा प्रकारे रावणाचा द्वेषसुद्धा त्याला गुरूच्या उपदेशापेक्षा अधिक उपयोगी पडला. (८३-८५)

शेवटी रावण हा रामांकडून ठार मारला गेला. त्याची सर्व पापे धुऊन गेली. तो बंधनातून सुटला आणि त्याला रामांच्या ठिकाणी सायुज्य मुक्तीच प्राप्त झाली.(८६)

एखादा माणूस जरी जास्तीत जास्त पापी, दुष्ट मनाचा, परधन आणि परस्त्री यांचे ठिकाणी रत असूनही, जर तो प्रेमाने किंवा भयाने नित्य रामांचे चिंतन करीत मरण पावला तर तो शुद्ध अंतःकरणाचा होऊन, पूर्वीच्या शेकडो जन्मात उत्पन्न झालेल्या अनेक दोषांतून मुक्त होतो आणि तो तत्काळ देवश्रेष्ठांनी स्तुती केलेल्या अशा विष्णुरूपी रामांच्या वैकुंठ नावाच्या आद्यस्थानी जाऊन पोचतो. (८७)

तिन्ही जगांना कंटकभूत अशा रावणाचा युद्धात वध केल्यावर जे श्रीराम डाव्या हाताने धरलेले धनुष्य जमिनीवर टेकवून उभे आहेत आणि उजव्या हातात धरलेला एक बाण फिरवीत आहेत, ज्यांच्या डोळ्यांच्या कडा लाल आहेत, ज्यांचे शरीर बाणांनी जखमी झाले आहे, ज्यांची अंगकांती ही कोटी सूर्याप्रमाणे देदीप्यमान आहे, ज्यांचे शरीर वीरश्रीमुळे सुंदर दिसत आहे आणि जे इंद्रादी देवतांकडून स्तविले जात आहेत, असे ते वीर राम माझे रक्षण करोत." (८८)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे युद्धकाण्डे एकादशः सर्गः ॥ ११ ॥

द्वादश सर्ग

बिभीषणाचा राज्याभिषेक आणि सीतेची अग्निपरीक्षा

श्रीमहादेव उवाच

रामो बिभीषणं दृष्ट्वा हनूमन्तं तथाङ्गदम् ।
लक्ष्मणं कपिराजं च जाम्बवन्तं तथा परान् ॥ १ ॥

परितुष्टेन मनसा सर्वानेवाब्रवीद्वचः ।
भवतां बाहुवीर्येण निहतो रावणो मया ॥ २ ॥

कीर्तिः स्थास्यति वः पुण्या यावच्चन्द्रदिवाकरौ ।
कीर्तयिष्यन्ति भवतां कथां त्रैलोक्यपावनीम् ॥ ३ ॥

मयोपेतां * कलिहरां यास्यन्ति परमां गतिम् ।
एतस्मिन्नन्तरे दृष्ट्वा रावणं पतितं भुवि ॥ ४ ॥

मन्दोदरीमुखाः सर्वाः स्त्रियो रावणपालिताः ।
पतिता रावणस्याग्रे शोचन्त्यः पर्यदेवयन् ॥ ५ ॥

बिभीषणः शुशोचार्तः शोकेन महतावृतः ।
पतितो रावणस्याग्रे बहुधा पर्यदेवयत् ॥ ६ ॥

रामस्तु लक्ष्मणं प्राह बोधयस्व बिभीषणम् ।
करोतु भ्रातृसंस्कारं किं विलम्बेन मानद ॥ ७ ॥

स्त्रियो मन्दोदरीमुख्याः पतिता विलपन्ति च ।
निवारयतु ताः सर्वा राक्षसी रावणप्रियाः ॥ ८ ॥

एवमुक्तोऽथ रामेण लक्ष्मणोऽगाद्बिभीषणम् ।
उवाच मृतकोपान्ते पतितं मृतकोपमम् ॥ ९ ॥

शोकेन महताविष्टं सौमित्रिरिदमब्रवीत् ।
यं शोचसि त्वं दुःखेन कोऽयं तव बिभीषण ॥ १० ॥

श्रीमहादेव म्हणाले– हे पार्वती, बिभीषण, हनुमंत तसेच अंगद, लक्ष्मण, कपिराज सुग्रीव, जांबवान तसेच इतरही वानरवीर यांचेकडे पाहून, संतुष्ट मनाने राम त्या सर्वांना म्हणाले, "तुमच्या बाहूंच्या सामर्थ्यामुळे माझ्याकडून रावण मारला गेला आहे. (१-२)

जोपर्यंत चंद्र आणि सूर्य आहेत तोपर्यंत तुमची पुण्यपावन कीर्ती जगात टिकून राहील. जे कोणी माझ्यासहित त्रैलोक्याला पावन करणाऱ्या आणि कलीतील दोषांचे हरण करणाऱ्या तुमच्या कथेचे कीर्तन करतील, ते परम गतीला जातील." दरम्यानच्या काळात, रावण जमिनीवर मृत होऊन पडलेला आहे असे पाहून, रावणाने ज्यांचे पालन केले होते अशा मंदोदरी इत्यादी रावणाच्या सर्व स्त्रिया रावणाच्या पुढे पडून शोक करू लागल्या. (३-५)

त्या वेळी बिभीषणसुद्धा अतिशय दुःखाने व्याकूळ होऊन रावणाच्या पुढे पडून नाना प्रकारांनी विलाप करू लागला. (६)

तेव्हा राम लक्ष्मणाला म्हणाले, "हे लक्ष्मणा, बिभीषणाला सांग की आता त्याने भावाचे और्ध्वदेहिक संस्कार करावेत. कारण आता विलंब का ? (७)

रावणाच्या मंदोदरी इत्यादी स्त्रिया रावणापुढे पडून विलाप करीत आहेत. त्यांचे तू निवारण कर." (८)

रामांनी असे सांगितल्यावर लक्ष्मण बिभीषणाकडे गेला आणि मृत रावणाजवळ मृतवत पडलेल्या बिभीषणाला सांगू लागला. (९)

अतिशय शोकमग्न झालेल्या बिभीषणाला लक्ष्मण म्हणाला, "अरे बिभीषणा, ज्याच्यासाठी तू दुःखाने शोक करीत आहेस, तो तुझा कोण आहे?(१०)

---

* या श्लोकात **मयोपेताम्** या पाठाऐवजी **जयोपेताम्** हा जो पाठ भेद आहे, तो अधिक चांगला वाटतो. **जयोपेताम्** हा शब्द **कथाम्** शब्दाचे विशेषण आहे. जयोपेता म्हणजे जयाने, विजयाने युक्त असा अर्थ आहे.

त्वं वास्य कतमः सृष्टेः पुरेदानीमतः परम् ।
यद्वत्तोयौघपतिताः सिकता यान्ति तद्वशाः ॥ ११ ॥

संयुज्यन्ते वियुज्यन्ते तथा कालेन देहिनः ।
यथा धानासु वै धाना भवन्ति न भवन्ति च ॥ १२ ॥

एवं भूतेषु भूतानि प्रेरितानीशमायया ।
त्वं चेमे वयमन्ये च तुल्याः कालवशोद्भवाः ॥ १३ ॥

जन्ममृत्यू यदा यस्मात्तदा तस्माद्भविष्यतः ।
ईश्वरः सर्वभूतानि भूतैः सृजति हन्त्यजः ॥ १४ ॥

आत्मसृष्टैरस्वतन्त्रैर्निरपेक्षोऽपि बालवत् ।
देहेन देहिनो जीवा देहाद्देहोऽभिजायते ॥ १५ ॥

बीजादेव यथा बीजं देहान्य इव शाश्वतः ।
देहिदेहविभागोऽयमविवेककृतः पुरा ॥ १६ ॥

नानात्वं जन्म नाशश्च क्षयो वृद्धिः क्रिया फलम् ।
द्रष्टुराभान्त्यतद्धर्मा यथाग्नेर्दारुविक्रियाः ॥ १७ ॥

त इमे देहसंयोगादात्मना भान्त्यसद्ग्रहात् ।
यथा यथा तथा चान्यद्ध्यायतोऽसत्सदाग्रहात् ॥ १८ ॥

प्रसुप्तस्यानहम्भावात्तदा भाति न संसृतिः ।
जीवतोऽपि तथा तद्वद्विमुक्तस्यानहङ्कृतेः ॥ १९ ॥

जन्म होण्यापूर्वी तू याचा कोण होतास ? आत्ता कोण आहेस ? आणि यानंतरही तू याचा कोण असणार ? ज्या प्रमाणे पाण्याच्या प्रवाहात पडलेले वाळूचे कण हे त्या पाण्याबरोबर एकत्र येतात व पुन्हा वेगळे होतात, त्या प्रमाणे काळाच्या ओघात देहधारी प्राणी एकत्र येतात आणि वियुक्त होतात. ज्या प्रमाणे धान्याच्या बीजापासून धान्याची अन्य बीजे उत्पन्न होतात आणि नष्ट होऊन जातात, त्या प्रमाणे ईश्वराच्या मायेने प्रेरित झालेले प्राणी अन्य प्राण्यांपासून निर्माण होतात आणि नष्ट होऊन जातात. तू, हे, आम्ही आणि इतर लोकसुद्धा समानपणे काळाला वश होऊन उत्पन्न होत असतात. (११-१३)

जेव्हा आणि ज्यापासून हे जन्म आणि मृत्यू होणार असतात तेव्हा आणि त्यापासूनच ते होत राहातात. जन्मरहित असा ईश्वर हा मात्र कशाचीही इच्छा नसतानासुद्धा, एखाद्या बालकाप्रमाणे कोणतीही अपेक्षा न धरता स्वतःच निर्माण केलेल्या व स्वतंत्र नसणाऱ्या अशा प्राण्यांचेकडून सर्व प्राणी उत्पन्न करतो, तसेच नष्टही करतो. देहाच्या योगानेच जीव हे देहधारी होतात. ज्या प्रमाणे बीजापासून दुसरे बीज निर्माण होते, त्या प्रमाणे माता-पित्यांच्या देहापासून देह हा उत्पन्न होत असतो. या उलट जीव हा देहापेक्षा वेगळा असून तो नित्य - शाश्वत- आहे. खरे सांगायचे तर देहधारी जीव आणि देह असा विभागसुद्धा अज्ञानाचा नाश होत नाही, तोपर्यंत अविवेकाने केला गेला आहे. (१४-१६)

ज्या प्रमाणे लाकडाचे (लांबी, रुंदी, इत्यादी) गुणधर्म हे मुळात अग्नीचे नसतानाही ते अग्नीमध्ये पाहाणाऱ्या माणसाला अग्नीच्या ठिकाणी भासू लागतात, त्या प्रमाणे देहाचे वेगळेपण, जन्म, नाश, क्षय, वृद्धी, कर्म आणि कर्माचे फळ हे गुणधर्म मुळात जीवाचे नसतानाही ते द्रष्ट्या जीवाचे आहेत, असे भासू लागते. (१७)

ज्या प्रमाणे देहाशी जीवात्म्याचा संयोग झाला असताना, ते देहाचे गुणधर्म चुकीच्या समजुतीमुळे जीवाचे आहेत असे भासू लागते, त्या प्रमाणे सत्य अशा आत्म्याचे ज्ञान झाल्यावर, त्याचे ध्यान करीत राहणाऱ्या माणसाला हे कळून येते की ते देहाचे गुण असत् आहेत. (म्हणजे ते जीवाचे गुण नाहीत, ते जीवापेक्षा वेगळे आहेत.) (१८)

झोपेत अहंकाराचा अभाव होत असल्यामुळे झोपलेल्या माणसाला तेव्हा संसार भासत नाही; त्या प्रमाणे अहंकाररहित मुक्त पुरुष हा जरी जिवंत असला तरी त्याला प्रपंचाचे भान होत नाही. (१९)

तस्मान्मायामनोधर्मं जह्यहम्ममताभ्रमम् ।
रामभद्रे भगवति मनो धेह्यात्मनीश्वरे ॥ २० ॥

सर्वभूतात्मनि परे मायामानुषरूपिणि ।
बाह्येन्द्रियार्थसम्बन्धात्त्याजयित्वा मनः शनैः ॥ २१ ॥

तत्र दोषान्दर्शयित्वा रामानन्दे नियोजय ।
देहबुद्ध्या भवेद्भ्राता पिता माता सुहृत्प्रियः ॥ २२ ॥

विलक्षणं यदा देहाज्जानात्यात्मानमात्मना ।
तदा कः कस्य वा बन्धुर्भ्राता माता पिता सुहृत् ॥ २३ ॥

मिथ्याज्ञानवशाज्जाता दारागारादयः सदा ।
शब्दादयश्च विषया विविधाश्चैव सम्पदः ॥ २४ ॥

बलं कोशो भृत्यवर्गो राज्यं भूमिः सुतादयः ।
अज्ञानजत्वात्सर्वे ते क्षणसङ्गमभङ्गुराः ॥ २५ ॥

अथोत्तिष्ठ हृदा रामं भावयन् भक्तिभावितम् ।
अनुवर्तस्व राज्यादि भुञ्जन्प्रारब्धमन्वहम् ॥ २६ ॥

भूतं भविष्यदभजन्वर्तमानमथाचरन् ।
विहरस्व यथान्यायं भवदोषैर्न लिप्यसे ॥ २७ ॥

आज्ञापयति रामस्त्वां यद्भ्रातुः साम्परायिकम् ।
तत्कुरुष्व यथाशास्त्रं रुदतीश्चापि योषितः ॥ २८ ॥

निवारय महाबुद्धे लङ्कां गच्छन्तु मा चिरम् ।
श्रुत्वा यथावद्वचनं लक्ष्मणस्य बिभीषणः ॥ २९ ॥

त्यक्त्वा शोकं च मोहं च रामपार्श्वमुपागमत् ।
विमृश्य बुद्ध्या धर्मज्ञो धर्मार्थसहितं वचः ॥ ३० ॥

रामस्यैवानुवृत्त्यर्थमुत्तरं पर्यभाषत ।
नृशंसमनृतं क्रूरं त्यक्तधर्मव्रतं प्रभो ॥ ३१ ॥

म्हणून, हे बिभीषणा, तू अहंता आणि ममता या स्वरूपाचा भ्रम आणि मायेमुळे निर्माण होणारे मनाचे गुणधर्म टाकून दे. बाह्य पदार्थ आणि बाह्य इंद्रिये यांच्याशी असणारा मनाचा संबंध तू हळू हळू सोडून दे आणि स्वत:चा आत्मा सर्वांतर्यामी असे जे परमेश्वर म्हणजेच मायेने मनुष्यरूप धारण केलेले भगवान रामभद्र आहेत, त्यांच्या ठिकाणी तू तुझे मन हळू हळू स्थिर कर. (२०-२१)

बाह्य विषयांत दोष आहेत, हे मनाला दाखवून देऊन, ते मन तू रामांच्या स्वरूपभूत अशा आनंदात मग्न कर. मी म्हणजे आत्मा हा देह आहे या बुद्धीमुळेच माणसाच्या बाबतीत भाऊ, बाप, आई, मित्र किंवा प्रिय माणूस अशी ही नाती निर्माण होतात. (२२)

देहापेक्षा आत्मा वेगळा आहे, असे जेव्हा एखादा मनुष्य मनाने जाणतो, तेव्हा कोण कुणाचा भाऊ, आई, बाप अथवा मित्र असू शकेल ? (२३)

मिथ्या ज्ञानामुळे माणसाच्या बाबतीत पत्नी, घर, शब्द इत्यादी विषय आणि नानाप्रकारची वैभवे ही सदा उत्पन्न होतात. (२४)

सैन्य, खजिना, सेवकवर्ग, राज्य, भूमी, पुत्र इत्यादी हे सर्व अज्ञानापासूनच उत्पन्न होत असल्याने, त्यांच्याशी होणारा संयोग हा क्षणभर टिकणारा असतो आणि ते सर्व नाशवंत आहेत. (२५)

म्हणून आता तू ऊठ. भक्तीने मनात चिंतन केलेल्या रामांचे ध्यान करीत आणि नेहमी प्रारब्धाचा भोग घेत, राज्य इत्यादींचे पालन कर. (२६)

भूत आणि भविष्य यांची चिंता न करता, केवळ वर्तमानकाळाचा विचार करून वाग. असे केल्याने तू संसारातील दोषांनी लिप्त होणार नाहीस. (२७)

श्रीराम तुला आज्ञा करीत आहेत की भावाचे जे काही और्ध्वदेहिक कार्य करावयाचे आहे, ते तू यथाशास्त्र कर. अतिशय विलाप करणाऱ्या (राक्षस) स्त्रियांचे सांत्वन कर. हे महाबुद्धिमंता, त्यांना लंकेत परत जाऊ दे. उशीर करू नको." लक्ष्मणाचे हे यथार्थ वचन ऐकल्यावर बिभीषणाने शोक आणि मोह टाकून दिले आणि तो रामांजवळ गेला. धर्म जाणणाऱ्या बिभीषणाने धर्म आणि अर्थ यांनी युक्त असणाऱ्या रामांच्या वचनाचा स्वत:च्या बुद्धीने नीट विचार केला आणि त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वागण्यासाठी त्याने धर्म व अर्थ यांनी युक्त असे उत्तर दिले, "हे प्रभो, दुष्ट, खोटारडा, क्रूर, धर्माचरणाचा त्याग करणारा आणि परस्त्रीचे ठिकाणी आसक्त असणारा असा

नार्होऽस्मि देव संस्कर्तुं परदाराभिमर्शिनम् ।
श्रुत्वा तद्वचनं प्रीतो रामो वचनमब्रवीत् ॥ ३२ ॥

मरणान्तानि वैराणि निवृत्तं नः प्रयोजनम् ।
क्रियतामस्य संस्कारो ममाप्येष यथा तव ॥ ३३ ॥

रामाज्ञां शिरसा धृत्वा शीघ्रमेव बिभीषणः ।
सान्त्ववाक्यैर्महाबुद्धिं राज्ञीं मन्दोदरीं तदा ॥ ३४ ॥

सान्त्वयामास धर्मात्मा धर्मबुद्धिर्बिभीषणः ।
त्वरयामास धर्मज्ञः संस्कारार्थं स्वबान्धवान् ॥ ३५ ॥

चित्यां निवेश्य विधिवत्पितृमेधविधानतः ।
आहिताग्नेर्यथा कार्यं रावणस्य बिभीषणः ॥ ३६ ॥

तथैव सर्वमकरोद्बन्धुभिः सह मन्त्रिभिः ।
ददौ च पावकं तस्य विधियुक्तं बिभीषणः ॥ ३७ ॥

स्नात्वा चैवार्द्रवस्त्रेण तिलान्दर्भाभिमिश्रितान् ।
उदकेन च सम्मिश्रान्प्रदाय विधिपूर्वकम् ॥ ३८ ॥

प्रदाय चोदकं तस्मै मूर्ध्ना चैनं प्रणम्य च ।
ताः स्त्रियोऽनुनयामास सान्त्वमुक्त्वा पुनः पुनः ॥ ३९ ॥

गम्यतामिति ताः सर्वा विविशुर्नगरं तदा ।
प्रविष्टासु च सर्वासु राक्षसीषु बिभीषणः ॥ ४० ॥

रामपार्श्वमुपागत्य तदातिष्ठद्विनीतवत् ।
रामोऽपि सह सैन्येन ससुग्रीवः सलक्ष्मणः ॥ ४१ ॥

हर्षं लेभे रिपून्हत्वा यथा वृत्रं शतक्रतुः ।
मातलिश्च तदा रामं परिक्रम्याभिवन्द्य च ॥ ४२ ॥

अनुज्ञातश्च रामेण ययौ स्वर्गं विहायसा ।
ततो हृष्टमना रामो लक्ष्मणं चेदमब्रवीत् ॥ ४३ ॥

बिभीषणाय मे लङ्काराज्यं दत्तं पुरैव हि ।
इदानीमपि गत्वा त्वं लङ्कामध्ये बिभीषणम् ॥ ४४ ॥

रावण होता. हे देवा, मी त्याचे और्ध्वदेहिक संस्कार करणे हे योग्य नाही." त्याचे वचन ऐकल्यावर, प्रसन्न राम असे म्हणाले. (२८-३२)

"वैर हे मरणापर्यंतच असते. आपले प्रयोजन तर आता पुरे झाले आहे. जसा हा रावण तुझा होता, तसाच तो माझाही होता. तेव्हा याचा और्ध्वदेहिक संस्कार तू कर." (३३)

रामांची आज्ञा शिरोधार्य मानून, बिभीषणाने ताबडतोब त्या वेळी महाबुद्धिमान् अशा राणी मंदोदरीचे सांत्वन केले. नंतर धर्मात्मा, धर्म-बुद्धी आणि धर्मज्ञ अशा बिभीषणाने रावणाचे और्ध्वदेहिक संस्कार करण्यासाठी आपल्या बांधवांना त्वरा करण्यास सांगितले. (३४-३५)

पितृयज्ञाच्या विधीला अनुसरून विधिपूर्वक रावणाचे प्रेत चितेवर ठेवून आहिताग्नी- पुरुषाप्रमाणेच रावणाचे सर्व संस्कार बिभीषणाने आपले नातेवाईक व मंत्री यांच्यासह पार पाडले. त्यानंतर बिभीषणाने विधिवत रावणाच्या शवाला अग्नी दिला. (३६-३७)

नंतर स्नान करून, ओल्या वस्त्राने, बिभीषणाने दर्भमिश्रित तिळ पाण्यात मिसळून ते विधिपूर्वक रावणाला दिले. (३८)

आणि त्याला नमस्कार केला. त्यानंतर पुनः पुनः सांत्वनपर शब्दांनी स्त्रियांचे समाधान केले. (३९)

तो म्हणाला, "आता तुम्ही जा." तेव्हा त्या सर्व स्त्रिया लंकेत गेल्या. नंतर बिभीषण रामांजवळ येऊन नम्रपणाने उभा राहिला. वृत्रासुराचा वध केल्यावर इंद्राला ज्या प्रमाणे आनंद झाला होता, त्या प्रमाणे शत्रूंचा वध केल्यावर वानर सैन्य, सुग्रीव आणि लक्ष्मण यांच्यासह रामांनासुद्धा हर्ष झाला. त्यानंतर प्रदक्षिणा व त्यांना अभिवादन करून आणि त्यांची अनुज्ञा घेऊन, मातली आकाशमार्गाने स्वर्गाला परत गेला. नंतर आनंदित मनाने राम लक्ष्मणाला म्हणाले. (४०-४३)

"मी अगोदरच लंकेचे राज्य बिभीषणाला दिले आहे. तरी आता तू लंकेमध्ये जाऊन, ब्राह्मणांचे द्वारा मंत्रपूर्वक विधिवत बिभीषणावर अभिषेक करवून घे."

अभिषेचय विप्रैश्च मन्त्रवद्विधिपूर्वकम् ।
इत्युक्तो लक्ष्मणस्तूर्णं जगाम सह वानरैः ॥ ४५ ॥

लङ्कां सुवर्णकलशैः समुद्रजलसंयुतैः ।
अभिषेकं शुभं चक्रे राक्षसेन्द्रस्य धीमतः ॥ ४६ ॥

रामांनी असे म्हटल्यावर, लक्ष्मण लगेच वानरांसह लंकापुरीत गेला आणि समुद्राच्या पाण्यांनी भरलेल्या सुवर्ण कलशांनी त्याने बुद्धिमान राक्षसश्रेष्ठ अशा बिभीषणाला मंगलमय अभिषेक केला. (४४-४६)

ततः पौरजनैः सार्धं नानोपायनपाणिभिः ।
बिभीषणः ससौमित्रिरुपायनपुरस्कृतः ॥ ४७ ॥

दण्डप्रणाममकरोद्रामस्याक्लिष्टकर्मणः ।
रामो बिभीषणं दृष्ट्वा प्राप्तराज्यं मुदान्वितः ॥ ४८ ॥

त्यानंतर नाना प्रकारचे नजराणे घेतलेल्या नगरवासी लोकांसह, अनेक भेट-वस्तू घेऊन, लक्ष्मणासह बिभीषण रामांजवळ आला आणि त्याने विनासायास कर्म करणाऱ्या रामांना दंडवत प्रणाम केला. बिभीषणाला राज्य प्राप्त झाले हे पाहून राम आनंदित झाले आणि लक्ष्मणासह ते स्वत:ला कृतकृत्य मानू लागले. त्यानंतर सुग्रीवाला आलिंगन देऊन राम त्याला म्हणाले. (४७-४९)

कृतकृत्यमिवात्मानममन्यत सहानुजः ।
सुग्रीवं च समालिङ्ग्य रामो वाक्यमथाब्रवीत् ॥ ४९ ॥

सहायेन त्वया वीर जितो मे रावणो महान् ।
बिभीषणोऽपि लङ्कायामभिषिक्तो मयानघ ॥ ५० ॥

"हे वीरा, तुझ्या साहाय्याने मी महान रावणाला जिंकले आहे, आणि हे निष्पापा, मी बिभीषणालासुद्धा लंकेच्या राज्यावर अभिषिक्त केले आहे." (५०)

ततः प्राह हनूमन्तं पार्श्वस्थं विनयान्वितम् ।
बिभीषणस्यानुमतेर्गच्छ त्वं रावणालयम् ॥ ५१ ॥

त्यानंतर विनयपूर्वक जवळच उभ्या असणाऱ्या हनुमंताला राम म्हणाले, "बिभीषणाची अनुमती घेऊन तू आता रावणाच्या प्रासादात जा. (५१)

जानक्यै सर्वमाख्याहि रावणस्य वधादिकम् ।
जानक्याः प्रतिवाक्यं मे शीघ्रमेव निवेदय ॥ ५२ ॥

आणि रावणाचा वध झाला इत्यादी सर्व वृत्तांत जानकीला निवेदन कर. मग जानकी जे प्रत्युत्तर देईल ते तू लौकरच परत येऊन मला सांग." (५२)

एवमाज्ञापितो धीमान् रामेण पवनात्मजः ।
प्रविवेश पुरीं लङ्कां पूज्यमानो निशाचरैः ॥ ५३ ॥

अशा प्रकारे रामांकडून आज्ञा मिळाल्यावर बुद्धिमान हनुमान राक्षसांकडून सन्मानित होत लंकापुरीत प्रविष्ट झाला. (५३)

प्रविश्य रावणगृहं शिंशपामूलमाश्रिताम् ।
ददर्श जानकीं तत्र कृशां दीनामनिन्दिताम् ॥ ५४ ॥

राक्षसीभिः परिवृतां ध्यायन्तीं राममेव हि ।
विनयावनतो भूत्वा प्रणम्य पवनात्मजः ॥ ५५ ॥

मग रावणाच्या प्रासादात प्रवेश केल्यावर, अशोक वृक्षाच्या मुळाचा आश्रय घेतलेली, कृश, दीन, स्तुत्य, राक्षस स्त्रियांनी वेढलेली आणि रामाचेच ध्यान करीत असणारी जानकी त्याला दिसली. विनयाने नम्र होऊन, पवनसुताने तिला प्रणाम केला. नम्र होऊन व भक्तीने हात जोडून तो तिच्यापुढे उभा राहिला. त्याला पाहिल्यावर, जानकी काही काळ गप्प बसली आणि नंतर तिला पूर्वीची आठवण झाली. (५४-५६)

कृताञ्जलिपुटो भूत्वा प्रह्वो भक्त्याग्रतः स्थितः ।
तं दृष्ट्वा जानकीं तूष्णीं स्थित्वा पूर्वस्मृतिं ययौ ॥ ५६ ॥

ज्ञात्वा तं रामदूतं सा हर्षात्सौम्यमुखी बभौ ।
स तां सौम्यमुखीं दृष्ट्वा तस्यै पवननन्दनः ।
रामस्य भाषितं सर्वमाख्यातुमुपचक्रमे ॥ ५७ ॥

देवि रामः ससुग्रीवो बिभीषणसहायवान् ।
कुशली वानराणां च सैन्यैश्च सहलक्ष्मणः ॥ ५८ ॥

रावणं ससुतं हत्वा सबलं सह मन्त्रिभिः ।
त्वामाह कुशलं रामो राज्ये कृत्वा बिभीषणम् ॥ ५९ ॥

श्रुत्वा भर्तुः प्रियं वाक्यं हर्षगद्गदया गिरा ।
किं ते प्रियं करोम्यद्य न पश्यामि जगत्त्रये ॥ ६० ॥

समं ते प्रियवाक्यस्य रत्नान्याभरणानि च ।
एवमुक्तस्य वैदेह्या प्रत्युवाच प्लवङ्गमः ॥ ६१ ॥

रत्नौघाद्विविधाद्वापि देवराज्याद्विशिष्यते ।
हतशत्रुं विजयिनं रामं पश्यामि सुस्थिरम् ॥ ६२ ॥

तस्य तद्वचनं श्रुत्वा मैथिली प्राह मारुतिम् ।
सर्वे सौम्या गुणाःसौम्य त्वय्येव परिनिष्ठिताः ॥ ६३ ॥

रामं द्रक्ष्यामि शीघ्रं मामाज्ञापयतु राघवः ।
तथेति तां नमस्कृत्य ययौ द्रष्टुं रघूत्तमम् ॥ ६४ ॥

जानक्या भाषितं सर्वं रामस्याग्रे न्यवेदयत् ।
यन्निमित्तोऽयमारम्भः कर्मणां च फलोदयः ॥ ६५ ॥

तां देवीं शोकसन्तप्तां द्रष्टुमर्हसि मैथिलीम् ।
एवमुक्तो हनुमता रामो ज्ञानवतां वरः ॥ ६६ ॥

मायासीतां परित्यक्तुं जानकीमनले स्थिताम् ।
आदातुं मनसा ध्यात्वा रामः प्राह बिभीषणम् ॥ ६७ ॥

गच्छ राजन् जनकजामानयाशु ममान्तिकम् ।
स्नातां विरजवस्त्राढ्यां सर्वाभरणभूषिताम् ॥ ६८ ॥

तो रामांचा दूत आहे हे लक्षात आल्यावर, ती आनंदाने प्रसन्नमुखाने शोभू लागली. तिचे मुख प्रसन्न झाले आहे हे पाहून, पवनसुत रामाचा निरोप तिला सांगू लागला. (५७)

मारुती म्हणाला- "हे देवी, सुग्रीव, बिभीषण आणि लक्ष्मण यांच्या आणि वानरांच्या सैन्यासह श्रीराम कुशल आहेत. (५८)

पुत्र, सेना आणि मंत्री यांच्यासह रावणाचा वध करून आणि बिभीषणाला लंकेच्या राज्यावर बसवून, रामांनी तुला आता आपली खुशाली सांगितली आहे." (५९)

आपल्या पतीचा हा प्रिय निरोप ऐकल्यावर, आनंदाने सद्गदित झालेल्या वाणीने सीता म्हणाली, "अरे वत्सा, मी तुझे कोणते प्रिय करू ? तुझ्या गोड शब्दांच्या सारखी या तिन्ही लोकांत कोणतीही रत्ने, आभूषणे मला आज दिसत नाहीत." असे वैदेहीने म्हटल्यावर हनुमान तिला म्हणाला. (६०-६१)

"माते, विजयाने प्रसन्न झालेल्या श्रीरामांना पाहणे, हे मला नाना प्रकारच्या रत्नराशींपेक्षा आणि देवांच्या राज्यापेक्षा महत्त्वाचे वाटते." (६२)

त्याचे ते वचन ऐकल्यावर मैथिली मारुतीला म्हणाली, "हे वत्सा, सर्व उत्तम गुण तुझ्याच ठिकाणी एकवटून राहिले आहेत. (६३)

आता मला रामांना लवकर पाहावयाचे आहे. रामांनी मला तत्काळ तशी आज्ञा द्यावी." "ठीक आहे", असे म्हणून व तिला नमस्कार करून मारुती हा रघूत्तमांना भेटण्यास परत गेला. (६४)

जानकीचे सर्व भाषण त्याने रामांपुढे निवेदन केले. तो म्हणाला, "हे भगवन् , जिच्यासाठी युद्ध इत्यादीचा आटपिटा केला होता आणि जी या सर्व कर्मांची फलस्वरूप आहे, त्या शोकसंतप्त देवी मैथिलीला आता तुम्ही भेटणे योग्य होईल." हनुमानाने असे म्हटल्यावर, मायासीतेचा त्याग करण्याचा आणि अग्नीत स्थित असणाऱ्या खऱ्या जानकीचा स्वीकार करण्याचा, ज्ञानी पुरुषांतील श्रेष्ठ अशा रामांनी मनात विचार केला आणि मग ते बिभीषणाला म्हणाले. (६५-६७)

"हे राजा बिभीषणा, तू आता जा, आणि स्नान घालून, निर्मल वस्त्रे परिधान केलेल्या आणि सर्व अलंकारांनी विभूषित अशा जानकीला त्वरित माझ्याजवळ घेऊन ये." (६८)

बिभीषणोऽपि तच्छ्रुत्वा जगाम सहमारुतिः ।
राक्षसीभिःसुवृद्धाभिः स्नापयित्वा तु मैथिलीम् ॥ ६९ ॥

सर्वाभरणसम्पन्नामारोप्य शिबिकोत्तमे ।
याष्टीकैर्बहुभिर्गुप्तां कञ्चुकोष्णीषिभिः शुभाम् ॥ ७० ॥

तां द्रष्टुमागताः सर्वे वानरा जनकात्मजाम् ।
तान्वारयन्तो बहवः सर्वतो वेत्रपाणयः ॥ ७१ ॥

कोलाहलं प्रकुर्वन्तो रामपार्श्वमुपाययुः ।
दृष्ट्वा तां शिबिकारूढां दूरादथ रघूत्तमः ॥ ७२ ॥

बिभीषण किमर्थं ते वानरान्वारयन्ति हि ।
पश्यन्तु वानराः सर्वे मैथिलीं मातरं यथा ॥ ७३ ॥

पादचारेण सायातु जानकी मम सन्निधिम् ।
श्रुत्वा तद्रामवचनं शिबिकादवरुह्य सा ॥ ७४ ॥

पादचारेण शनकैरागता रामसन्निधिम् ।
रामोऽपि दृष्ट्वा तां मायासीतां कार्यार्थनिर्मिताम् ॥ ७५ ॥

अवाच्यवादान्बहुशः प्राह तां रघुनन्दनः ।
अमृष्यमाणा सा सीता वचनं राघवोदितम् ॥ ७६ ॥

लक्ष्मणं प्राह मे शीघ्रं प्रज्वालय हुताशनम् ।
विश्वासार्थं हि रामस्य लोकानां प्रत्ययाय च ॥ ७७ ॥

राघवस्य मतं ज्ञात्वा लक्ष्मणोऽपि तदैव हि ।
महाकाष्ठचयं कृत्वा ज्वालयित्वा हुताशनम् ॥ ७८ ॥

रामपार्श्वमुपागम्य तस्थौ तूष्णीमरिन्दमः ।
ततः सीता परिक्रम्य राघवं भक्तिसंयुता ॥ ७९ ॥

पश्यतां सर्वलोकानां देवराक्षसयोषिताम् ।
प्रणम्य देवताभ्यश्च ब्राह्मणेभ्यश्च मैथिली ॥ ८० ॥

बद्धाञ्जलिपुटा चेदमुवाचाग्निसमीपगा ।
यथा मे हृदयं नित्यं नापसर्पति राघवात् ॥ ८१ ॥

ते रामांचे वचन ऐकल्यावर, बिभीषण मारुतीसह गेला. मग वृद्ध अशा राक्षस स्त्रियांकडून मैथिलीला स्नान घालून आणि तिला वस्त्रालंकारांनी विभूषित करून, एका उत्तम पालखीत बसविण्यात आले. अंगरखे आणि मंदिल घातलेले पुष्कळ चोपदार, भालदार त्या पवित्र सीतेचे रक्षण करीत होते. (६९-७०)

त्या वेळी जनककन्येला पाहाण्यास सर्व वानर एकत्र जमले. त्यांना सर्व बाजूंनी रोखत आणि 'बाजूला व्हा, बाजूला व्हा' असा कोलाहल करीत ते अनेक वेत्रधारी भालदार रामांजवळ आले. मग पालखीत बसलेल्या सीतेला दूरूनच पाहून रघूत्तम बिभीषणाला म्हणाले, " बिभीषणा, हे वेत्रधारी भालदार वानरांना का बरे बाजूला करीत आहेत ? आईप्रमाणे असणाऱ्या मैथिलीला सर्व वानरांना पाहू दे. (७१-७३)

आणि जानकी पायी चालत माझ्याजवळ येऊ दे." ते रामांचे वचन ऐकल्यावर, ती पालखीतून खाली उतरून सावकाशपणे पायी चालत रामांजवळ आली. मग विशिष्ट कार्यासाठी निर्मिलेल्या त्या मायासीतेला पाहून, तिच्याविषयी बोलू नयेत असे अनेक शब्द रघुनंदन बोलू लागले. राघवांनी उच्चारलेले ते शब्द सहन न होऊन, सीता लक्ष्मणाला म्हणाली, "रामांचा विश्वास बसावा आणि लोकांची खात्री पटावी यासाठी तू माझ्याकरिता अग्नी प्रज्वलित कर (म्हणजे मी अग्निदिव्य करून माझे पावित्र्य सिद्ध करीन.)" (७४-७७)

सीतेच्या या बोलण्याला राघवांची संमती आहे हे पाहून शत्रूचे दमन करणाऱ्या लक्ष्मणाने तत्काळ लाकडांची मोठी रास रचली आणि तेथे अग्नी प्रज्वलित करून, तो रामांजवळ जाऊन उभा राहिला. तेव्हा भक्तीने युक्त असणाऱ्या सीतेने राघवांना प्रदक्षिणा घातल्या. नंतर सर्व लोक, देव, आणि राक्षस स्त्रिया पाहात असतानाच देवतांना आणि ब्राह्मणांना नमस्कार करून, सीता अग्नीजवळ गेली आणि हात जोडून म्हणाली, "जर माझे मन राघवांना सोडून कधीही अन्यत्र कुठे गेले नसेल तर लोकांचा साक्षी असणारा अग्नी माझे सर्वप्रकारे रक्षण

तथा लोकस्य साक्षी मां सर्वतः पातु पावकः ।
एवमुक्त्वा तदा सीता परिक्रम्य हुताशनम् ॥ ८२ ॥

विवेश ज्वलनं दीप्तं निर्भयेन हृदा सती ॥ ८३ ॥

करो." असे बोलून सीतेने अग्नीला प्रदक्षिणा घातली आणि निर्भय चित्ताने पतिव्रता सीतेने त्या प्रज्वलित अग्नीमध्ये प्रवेश केला. (७८-८३)

दृष्ट्वा ततो भूतगणाः ससिद्धाः
सीतां महावह्निगतां भृशार्ताः ।
परस्परं प्राहुरहो स सीतां
रामः श्रियं स्वां कथमत्यजज्ञः ॥ ८४ ॥

त्या पेटलेल्या प्रचंड अग्नीत सीता प्रविष्ट झाली आहे, हे पाहून सिद्धांसह भूतगण दुःखाने अतिशय व्याकूळ झाले. ते एकमेकांना म्हणू लागले, "अहो, राम इतके ज्ञानी असूनही स्वतःची लक्ष्मी असलेल्या सीतेचा त्याग त्यांनी का बरे केला असेल ?" (८४)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे युद्धकाण्डे द्वादशः सर्गः ॥ १२ ॥

त्रयोदश सर्ग

देव भगवान रामांची स्तुती करतात, सीतेसह अग्निदेव प्रगट होतो आणि अयोध्येकडे प्रस्थान होते.

श्रीमहादेव उवाच

ततः शक्रः सहस्राक्षो यमश्च वरुणस्तथा ।
कुबेरश्च महातेजाः पिनाकी वृषवाहनः ॥ १ ॥

ब्रह्मा ब्रह्मविदां श्रेष्ठो मुनिभिः सिद्धचारणैः ।
ऋषयः पितरः साध्या गन्धर्वाप्सरसोगाः ॥ २ ॥

एते चान्ये विमानाग्र्यैराजग्मुर्यत्र राघवः ।
अब्रुवन्परमात्मानं रामं प्राञ्जलयश्च ते ॥ ३ ॥

कर्ता त्वं सर्वलोकानां साक्षी विज्ञानविग्रहः ।
वसूनामष्टमोऽसि त्वं रुद्राणां शङ्करो भवान् ॥ ४ ॥

आदिकर्तासि लोकानां ब्रह्मा त्वं चतुराननः ।
अश्विनौ घ्राणभूतौ ते चक्षुषी चन्द्रभास्करौ ॥ ५ ॥

लोकानामादिरन्तोऽसि नित्य एकः सदोदितः ।
सदा शुद्धः सदा बुद्धः सदा मुक्तोऽगुणोऽद्वयः ॥ ६ ॥

त्वन्मायासंवृतानां त्वं भासि मानुषविग्रहः ।
त्वन्नाम स्मरतां राम सदा भासि चिदात्मकः ॥ ७ ॥

श्रीमहादेव म्हणाले– हे पार्वती, त्यानंतर सहस्रनयन इंद्र, यम, वरुण, कुबेर, वृषभवाहन महातेजस्वी शंकर, मुनी, सिद्ध व चारण यांच्यासह ब्रह्मवेत्त्यांमध्ये श्रेष्ठ असणारे ब्रह्मदेव, पितर, ऋषी, साध्य, गंधर्व, अप्सरा आणि नाग हे सर्व आणि इतर पुष्कळ जण हे उत्कृष्ट विमानांत बसून आले व हात जोडून परमात्म्या रामांची स्तुती करू लागले. (१-३)

"हे रामा, तुम्ही सर्व लोकांचे कर्ता, सर्वांचे साक्षी, केवळ विज्ञानस्वरूप आहात. वसूंमधील आठवे वसू आणि रुद्रांमधील भगवान शंकर आहात. (४)

तुम्हीच सर्व लोकांचे आदिकर्ता चतुर्मुख ब्रह्मदेव आहात. दोन अश्विनीकुमार हे तुमच्या नाकपुड्या आहेत आणि सूर्य व चंद्र हे तुमचे दोन नेत्र आहेत. (५)

सर्व लोकांचे आदी (उत्पत्तिस्थान) आणि अंत (लयस्थान) तुम्ही आहात. तुम्ही नित्य, एकमेव आणि सदोदित (म्हणजे आविर्भाव व तिरोभाव यांनी रहित नित्य प्रकाशस्वरूप), नित्य शुद्ध, नित्य बुद्ध, नित्यमुक्त, निर्गुण आणि द्वैतरहित आहात. (६)

हे रामा, जे लोक तुमच्या मायेने आच्छादित झालेले असतात, त्यांना तुम्ही मनुष्यरूप वाटता. याउलट जे लोक सदा तुमचे नामस्मरण करतात त्यांना तुम्ही सदा चैतन्यस्वरूप भासता. (७)

रावणेन हृतं स्थानमस्माकं तेजसा सह ।
त्वयाद्य निहतो दुष्टः पुनः प्राप्तं पदं स्वकम् ॥ ८ ॥

आमच्या तेजासह आमचे स्थान रावणाने हरण केले होते. तो दुष्ट रावण आज तुमच्याकडून मारला गेला आहे. त्यामुळे आमचे स्थान आम्हांला पुनः प्राप्त झाले आहे." (८)

एवं स्तुवत्सु देवेषु ब्रह्मा साक्षात्पितामहः ।
अब्रवीत्प्रणतो भूत्वा रामं सत्यपथे स्थितम् ॥ ९ ॥

अशा प्रकारे देव स्तुती करीत असताना, प्रत्यक्ष पितामह ब्रह्मदेव नम्र होऊन, सत्याच्या मार्गावर राहाणाऱ्या रामांना म्हणाले. (९)

ब्रह्मोवाच

वन्दे देवं विष्णुमशेषस्थितिहेतुं
त्वामध्यात्मज्ञानिभिरन्तर्हृदि भाव्यम् ।
हेयाहेयद्वन्द्वविहीनं परमेकं
सत्तामात्रं सर्वहृदिस्थं दृशिरूपम् ॥ १० ॥

ब्रह्मदेव म्हणाले– "हे रामा, चराचराच्या स्थितीचे कारण, अध्यात्मज्ञानी लोकांकडून नेहमी हृदयांत ध्यान केले जाणारे, त्याज्य व ग्राह्य या द्वंद्वांनी रहित, सर्वांच्या पलीकडे असणारे, एकमेव, अद्वितीय, अस्तित्वरूप, सर्वांच्या हृदयांत असणारे आणि साक्षिस्वरूप असे तुम्ही विष्णू देव आहात. तुम्हांला मी वंदन करतो. (१०)

प्राणापानौ निश्चयबुद्ध्या हृदि रुद्ध्वा
छित्त्वा सर्वं संशयबन्धं विषयौघान् ।
पश्यन्तीशं यं गतमोहा यतयस्तं
वन्दे रामं रत्नकिरीटं रविभासम् ॥ ११ ॥

निश्चयात्मक बुद्धीने प्राण आणि अपान यांचा हृदयामध्ये निरोध करून, आणि संशयाचे सर्व बंध आणि विषय वासनांचा समूह तोडून टाकून, जे मोहरहित संन्यासी लोक ज्या ईश्वराला पाहातात, अशा त्या रत्न-किरीट-धारी आणि सूर्याप्रमाणे तेजस्वी अशा रामा, तुम्हांला मी वंदन करतो. मायेच्या अतीत, लक्ष्मीचे पती, सर्वांचे आदिकारण, जे जगाचे उत्पत्तिस्थान, प्रमाणांच्या पलीकडचे, मोहाचा नाश करणारे, मुनींना वंदनीय, योगी लोकांच्या ध्यानाचे ध्येय, योग-मार्गाचे प्रवर्तक, परिपूर्ण, लोकांना आनंदित करणारे, आणि जे सुंदर आहेत, अशा रामांना मी वंदन करतो. जे भाव म्हणजे अस्तिरूप आणि अभाव म्हणजे नास्तिरूप अशा दोन्ही प्रकारच्या प्रतीतींनी रहित आहेत, शंकर इत्यादी योगपरायण लोक ज्यांच्या पदकमल-युगलाचे पूजन करतात, जे नित्य, शुद्ध, बुद्ध व अनंत आहेत, ज्यांना ॐकार हे नाव दिले जाते आणि जे सर्व असुरांना दावानलाप्रमाणे आहेत, अशा वीर रामांना मी वंदन करतो. हे रामा, तुम्ही माझे स्वामी आहात. माझ्या प्रार्थनेप्रमाणे सर्व कार्ये करणारे आहात. तुम्ही देशकाल इत्यादी परिमाणांनी रहित आहात. तुम्ही लक्ष्मीपती माधवस्वरूप आहात. सर्व विश्वाला धारण करणारे तुम्ही आहात. तुम्ही भक्तीने प्राप्त होणारे आहात. तुमच्या रूपाचे ध्यान केले असता तुम्ही संसाराचा नाश करता आणि योगाच्या अभ्यासाने शुद्ध झालेल्या चित्तात तुम्ही विहार करता. लोकसमूहांचे तुम्ही आदी (उत्पत्तिस्थान) आणि अंत (लयस्थान) आहात. तुम्ही सर्व

भावाभावप्रत्ययहीनं भवमुख्यै-
र्योगासक्तैरर्चितपादाम्बुजयुग्मम् ।
नित्यं शुद्धं बुद्धमनन्तं प्रणवाख्यं
वन्दे रामं वीरमशेषासुरदावम् ॥ १३ ॥

त्वं मे नाथो नाथितकार्याखिलकारी
मानातीतो माधवरूपोऽखिलधारी ।
भक्त्या गम्यो भावितरूपो भवहारी
योगाभ्यासैर्भावितचेतःसहचारी ॥ १४ ॥

त्वामाद्यन्तं लोकततीनां परमीशं
लोकानां नो लौकिकमानैरधिगम्यम् ।
भक्तिश्रद्धाभावसमेतैर्भजनीयं
वन्दे रामं सुन्दरमिन्दीवरनीलम् ॥ १५ ॥

को वा ज्ञातुं त्वामतिमानं गतमानं
मायासक्तो माधव शक्तो मुनिमान्यम् ।
वृन्दारण्ये वन्दितवृन्दारकवृन्दं
वन्दे रामं भवमुखवन्द्यं सुखकन्दम् ॥ १६ ॥

नानाशास्त्रैर्वेदकदम्बैः प्रतिपाद्यं
नित्यानन्दं निर्विषयज्ञानमनादिम् ।
मत्सेवार्थं मानुषभावं प्रतिपन्नं
वन्दे रामं मरकतवर्णं मथुरेशम् ॥ १७ ॥

श्रद्धायुक्तो यः पठतीमं स्तवमाद्यं
ब्राह्मं ब्रह्मज्ञानविधानं भुवि मर्त्यः ।
रामं श्यामं कामितकामप्रदमीशं
ध्यात्वा ध्याता पातकजालैर्विगतः स्यात् ॥ १८ ॥

श्रुत्वा स्तुतिं लोकगुरोर्विभावसुः
स्वाङ्के समादाय विदेहपुत्रिकाम् ।
विभ्राजमानां विमलारुणद्युतिं
रक्ताम्बरां दिव्यविभूषणान्विताम् ॥ १९ ॥

प्रोवाच साक्षी जगतां रघूत्तमं
प्रपन्नसर्वार्तिहरं हुताशनः ।
गृहाण देवीं रघुनाथ जानकीं
पुरा त्वया मय्यवरोपितां वने ॥ २० ॥

विधाय मायाजनकात्मजां हरे
दशाननप्राणविनाशनाय च ।
हतो दशास्यः सह पुत्रबान्धवै-
र्निराकृतोऽनेन भरो भुवः प्रभो ॥ २१ ॥

लोकांचे परम ईश्वर आहात. लौकिक प्रमाणांनी तुम्ही कळून येणारे नाहीत. भक्ती, श्रद्धा आणि भाव यांनी युक्त असणाऱ्या माणसाकडूनच तुम्ही भजन करण्यास योग्य आहात. तुम्ही नीलकमलाप्रमाणे श्यामवर्णी आहात; अशा तुम्हाला, सुंदर रामांना मी वंदन करतो. (११-१५)

हे लक्ष्मीपते, तुम्ही प्रत्यक्ष इत्यादी प्रमाणांच्या पलीकडचे व मानरहित आहात. मायेत आसक्त असणारा कोणता पुरुष तुम्हांला जाणण्यास समर्थ होईल? तुम्ही मुनी लोकांना पूज्य आहात. कृष्ण-अवताराच्या वेळी वृंदावनात तुम्ही सर्व देवसमूहाला वंदन केले होते. तरी शंकर इत्यादी देवांना तुम्ही वंदनीय आहात. तुम्ही सुखाचा कंद आहात. अशा रामा, तुम्हांला मी वंदन करतो. (१६)

नाना प्रकारची शास्त्रे आणि वेद यांचे समूह ज्याचे प्रतिपादन करतात, जो नित्य आनंदस्वरूप आहे, जो निर्विषय ज्ञानस्वरूप आणि अनादी आहे, असे तुम्ही आहात. माझे कार्य करण्यासाठी तुम्ही मनुष्यरूप धारण केले आहे. पाचूप्रमाणे श्यामल वर्ण असणाऱ्या आणि मथुरेचा स्वामी* असणाऱ्या रामांना मी वंदन करतो." (१७)

भक्तांच्या इच्छित कामना पूर्ण करणारे, ब्रह्मज्ञानपूर्ण असे ब्रह्मदेवांनी केलेले हे आदिस्तोत्र जो कोणी श्रद्धासंपन्न माणूस या पृथ्वीवर पठण करतो आणि श्यामवर्ण राम या ईश्वराचे ध्यान करतो, तो ध्यान करणारा सर्व पातकांतून मुक्त होऊन जातो. (१८)

लोकगुरू अशा ब्रह्मदेवांनी केलेली ही स्तुती ऐकल्यावर, जानकीला घेऊन, साक्षात अग्नी प्रकट झाला. ती सीता तेजःपुंज होती. तिची कांती निर्मळ आणि अरुणाप्रमाणे तांबूस होती. तिने लाल रंगाचे वस्त्र परिधान केले होते आणि ती दिव्य अलंकारांनी विभूषित झालेली होती. (१९)

सर्व जगांचा साक्षी असणारा अग्निदेव शरणागताची सर्व दुःखे हरण करणाऱ्या रघूत्तमांना म्हणाला, "हे रघुनाथा, पूर्वी तुम्ही तपोवनात माझ्या स्वाधीन केलेल्या या देवी जानकीचा आता स्वीकार करा. (२०)

हे हरी, रावणाचा विनाश करण्यासाठी तुम्ही मायामय सीता निर्माण करून, रावणाला त्याच्या पुत्र-बांधवांसह ठार केले आणि अशा प्रकारे, हे प्रभो, या योगाने तुम्ही भूमीचा भार दूर केला. (२१)

* येथे रामाला मथुरानाथ असे म्हणून श्रीराम व श्रीकृष्ण यांचे अभिन्नत्व प्रकट केलेलेआहे.

तिरोहिता सा प्रतिबिम्बरूपिणी
कृता यदर्थं कृतकृत्यतां गता ।
ततोऽतिहृष्टां परिगृह्य जानकीं
रामः प्रहृष्टः प्रतिपूज्य पावकम् ॥ २२ ॥

स्वाङ्के समावेश्य सदानपायिनीं
श्रियं त्रिलोकीजननीं श्रियः पतिः ।
दृष्ट्वाथ रामं जनकात्मजायुतं
श्रिया स्फुरन्तं सुरनायको मुदा ।
भक्त्या गिरा गद्गदया समेत्य
कृताञ्जलिः स्तोतुमथोपचक्रमे ॥ २३ ॥

इन्द्र उवाच

भजेऽहं सदा राममिन्दीवराभं
भवारण्यदावानलाभाभिधानम् ।
भवानीहृदा भावितानन्दरूपं
भवाभावहेतुं भवादिप्रपन्नम् ॥ २४ ॥

सुरानीकदुःखौघनाशैकहेतुं
नराकारदेहं निराकारमीड्यम् ।
परेशं परानन्दरूपं वरेण्यं
हरिं राममीशं भजे भारनाशम् ॥ २५ ॥

प्रपन्नाखिलानन्ददोहं प्रपन्नं
प्रपन्नार्तिनिःशेषनाशाभिधानम् ।
तपोयोगयोगीशभावाभिभाव्यं
कपीशादिमित्रं भजे राममित्रम् ॥ २६ ॥

सदा भोगभाजां सुदूरे विभान्तं
सदा योगभाजामदूरे विभान्तम् ।
चिदानन्दकन्दं सदा राघवेशं
विदेहात्मजानन्दरूपं प्रपद्ये ॥ २७ ॥

महायोगमायाविशेषानुयुक्तो
विभासीश लीलानराकारवृत्तिः ।
त्वदानन्दलीलाकथापूर्णकर्णाः
सदानन्दरूपा भवन्तीह लोके ॥ २८ ॥

ज्या कार्यासाठी ती प्रतिबिंबरूपी सीता निर्माण केली गेली होती, ते कार्य पूर्ण करून व कृतकृत्य होऊन ती आता अंतर्धान पावली आहे." अग्नीचे हे भाषण ऐकल्यानंतर अतिशय आनंदित झालेल्या रामांनी अग्नीची पूजा करून, प्रसन्न झालेल्या सीतेचा स्वीकार केला. (२२)

आपल्यापासून कधीही वियुक्त न होणाऱ्या, त्रैलोक्य जननी अशा लक्ष्मीला -सीतेला- लक्ष्मीपती रामांनी आपल्या मांडीवर बसविले. त्यानंतर आपल्या तेजाने शोभणाऱ्या आणि सीतेसह असणाऱ्या रामांना पाहिल्यावर, इंद्र हा त्यांच्याजवळ आला, त्याने हात जोडले, आणि आनंदपूर्वक भक्तीने गद्गद झालेल्या वाणीने त्याने स्तुती करण्यास प्रारंभ केला. (२३)

इंद्र म्हणाला – "ज्यांची प्रभा नीलकमलाप्रमाणे आहे, ज्यांचे नाव हे संसाररूपी अरण्याला दावानलाप्रमाणे जाळून टाकणारे आहे, ज्यांच्या आनंदस्वरूपाचे ध्यान पार्वती आपल्या हृदयात करते, जे संसारातून सोडविणारे आहेत आणि शंकर इत्यादी देव ज्यांना शरण येतात, अशा श्रीरामांचे मी भजन करतो. (२४)

देवांच्या असंख्य दुःखांचा नाश करण्याचे जे एकमेव कारण आहेत, ज्यांनी मानवदेह धारण केला आहे, जे निराकार आहेत, जे स्तुती करण्यास योग्य आहेत, जे परमेश्वर आहेत, जे परमानंद स्वरूप आहेत, जे श्रेष्ठ आहेत, आणि ज्यांनी भूमीचा भार नष्ट केला आहे अशा विष्णुरूप ईश्वर श्रीरामांना मी भजतो. (२५)

जे शरण आलेल्यांना सर्व प्रकारचा आनंद देणारे आहेत व त्यांना आधार असणारे आहेत, ज्यांचे नाव हे शरण आलेल्यांच्या संपूर्ण दुःखाचा नाश करते, तप, योग तसेच योगीश्वरांच्या भावना यांच्याद्वारा ज्यांचे चिंतन केले जाते, जे सुग्रीव इत्यादींचा मित्र आहेत, अशा सूर्यसदृश रामांना मी भजतो. भोग भोगणाऱ्या लोकांपासून जे नेहमी अतिशय दूरच असतात, योगाचा अभ्यास करणाऱ्यांच्या अगदी जवळ जे प्रकाशित असतात, जे चैतन्य व आनंद यांचा कंद आहेत, जे रघुकुळातील लोकांत श्रेष्ठ आहेत आणि विदेह कन्येला- सीतेला- जे सदा आनंद देतात, अशा रामांना मी शरण जातो. हे ईश्वर रामा, तुम्ही आपल्या महान योग मायेच्या गुणधर्मांनी युक्त होऊन, लीलेने मानवरूप धारण करून, माणसाप्रमाणे आचरण करता, असे दिसते. तुमच्या आनंदमय लीलांच्या कथांनी ज्यांचे कान पूर्ण भरून गेले आहेत, ते लोक या जगात नित्य आनंदरूप होऊन जातात. (२८)

अहं मानपानाभिमत्तप्रमत्तो
न वेदाखिलेशाभिमानाभिमानः ।
इदानीं भवत्पादपद्मप्रसादात्
त्रिलोकाधिपत्याभिमानो विनष्टः ॥ २९ ॥

स्फुरद्रत्नकेयूरहाराभिरामं
धराभारभूतासुरानीकदावम् ।
शरच्चन्द्रवक्त्रं लसत्पद्मनेत्रं
दुरावारपारं भजे राघवेशम् ॥ ३० ॥

सुराधीशनीलाभ्रनीलाङ्गकान्तिं
विराधादिरक्षोवधाह्लोकशान्तिम् ।
किरीटादिशोभं पुरारातिलाभं
भजे रामचन्द्रं रघूणामधीशम् ॥ ३१ ॥

लसच्चन्द्रकोटिप्रकाशादिपीठे
समासीनमङ्के समाधाय सीताम् ।
स्फुरद्धेमवर्णां तडित्पुञ्जभासं
भजे रामचन्द्रं निवृत्तार्तितन्द्रम् ॥ ३२ ॥

ततः प्रोवाच भगवान्भवान्या सहितो भवः ।
रामं कमलपत्राक्षं विमानस्थो नभःस्थले ॥ ३३ ॥

आगमिष्याम्ययोध्यायां द्रष्टुं त्वां राज्यसत्कृतम् ।
इदानीं पश्य पितरमस्य देहस्य राघव ॥ ३४ ॥

ततोऽपश्यद्विमानस्थं रामो दशरथं पुरः ।
ननाम शिरसा पादौ मुदा भक्त्या सहानुजः ॥ ३५ ॥

आलिङ्ग्य मूर्ध्न्यवघ्राय रामं दशरथोऽब्रवीत् ।
तारितोऽस्मि त्वया वत्स संसाराद्दुःखसागरात् ॥ ३६ ॥

इत्युक्त्वा पुनरालिङ्ग्य ययौ रामेण पूजितः ।
रामोऽ पि देवराजं तं दृष्ट्वा प्राह कृताञ्जलिम् ॥ ३७ ॥

मत्कृते निहतान्सङ्ख्ये वानरान्पतितान् भुवि ।
जीवयाशु सुधावृष्ट्या सहस्राक्ष ममाज्ञया ॥ ३८ ॥

हे ईश्वरा, आजपर्यंत मी वैभवाचा अभिमान, सोमपान यांच्या योगाने धुंद झालो होतो आणि मीच सर्वांचा स्वामी आहे, या अभिमानाने गर्विष्ठ झालो होतो. म्हणून मी तुम्हांला व अन्य कुणालाही मानत नव्हतो. परंतु आता मात्र तुमच्या चरणकमळांच्या प्रसादामुळे मी तिन्ही लोकांचा अधिपती आहे, हा माझा अभिमान नष्ट झाला आहे. (२९)

चमकणाऱ्या रत्नांनी जडित अशी बाहुभूषणे व हार यांनी जे सुशोभित आहेत, भूमीला भारभूत झालेल्या असुरांच्या सैन्याला जे दावानलाप्रमाणे वाटत आहेत, शरद ऋतूतील चंद्राप्रमाणे ज्यांचे मुख आहे, ज्यांचे नेत्रकमल मनोहर आहेत, ज्यांचा आदी व अंत यांचा थांग लागणे हे अत्यंत कठीण आहे, अशा राघवेंद्रांना मी भजतो. (३०)

इंद्रनील मण्याप्रमाणे किंवा नीलवर्ण मेघाप्रमाणे ज्यांची अंगकांती श्याम आहे, विराध इत्यादी राक्षसांचा वध केल्यामुळे ज्यांनी लोकांमध्ये निर्भयता स्थापन केली आहे, ज्यांना किरीट इत्यादींनी शोभा आली आहे आणि शंकरांना जे परमधन वाटतात, व जे रघुकुळाचे अधीश्वर आहेत, अशा रामचंद्रांना मी भजतो. (३१)

चमकणाऱ्या कोटि-चंद्राप्रमाणे प्रकाशमान असणाऱ्या सिंहासनावर, तेजोमय सुवर्णाप्रमाणे वर्ण असणाऱ्या, विजेच्या पुंजाप्रमाणे देदीप्यमान असणाऱ्या अशा सीतेला मांडीवर घेऊन जे समाधानाने बसले आहेत, अशा आनंदस्वरूप रामचंद्रांचे मी भजन करतो. (३२)

आकाशातील विमानात पार्वतीसहित बसलेल्या भगवान शंकरांनी कमलनेत्र रामांना म्हटले. (३३)

"हे राघवा, अयोध्येमध्ये तुमच्यावर राज्याभिषेक सोहळा होत असताना तो पाहाण्यास मी येईन. तत्पूर्वी आत्ता तुम्ही तुमच्या या देहाचे जनक जे दशरथ आहेत, त्यांचे तुम्ही दर्शन घ्या." तेव्हा रामांनी आपल्यापुढे विमानात बसलेल्या दशरथांना पाहिले. तेव्हा लक्ष्मण व रामांनी आनंदपूर्वक त्यांना भक्तीने शिरसाष्टांग नमस्कार केला. त्या वेळी रामांना आलिंगन देऊन व त्यांच्या मस्तकाचे अवघ्राण करून दशरथ रामांना म्हणाले, "हे बाळा रामा, संसाररूपी दुःखसागरातून तू मला तारून नेले आहेस." असे बोलून दशरथांनी रामांना पुनः आलिंगन दिले. त्यानंतर रामांनी पूजा केल्यावर ते निघून गेले. इकडे, हात जोडून उभ्या असणाऱ्या त्या देवराज इंद्राला पाहून रामांनीसुद्धा म्हटले. "हे इंद्रा, माझ्या आज्ञेवरून तू माझ्यासाठी युद्धात येथे जमिनीवर मरून पडलेल्या वानरांना अमृताची वृष्टी करून ताबडतोब जिवंत कर." (३४-३८)

तथेत्यमृतवृष्ट्या तान् जीवयामास वानरान् ।
ये ये मृता मृधे पूर्वं ते ते सुप्तोत्थिता इव ।
पूर्ववद्बलिनो हृष्टा रामपार्श्वमुपाययुः ॥ ३९ ॥

"ठीक आहे", असे बोलून इंद्राने अमृताचा वर्षाव करून त्या वानरांना जिवंत केले. पूर्वी युद्धात जे वानर मेले होते ते झोपेतून जागे व्हावे, त्या प्रमाणे पूर्वीप्रमाणेच बलवान् दिसत होते; ते आनंदित होऊन रामांजवळ आले. (३९)

नोत्थिता राक्षसास्तत्र पीयूषस्पर्शनादपि ।
बिभीषणस्तु साष्टाङ्गं प्रणिपत्याब्रवीद्वचः ॥ ४० ॥

तथापि अमृताचा स्पर्श होऊनसुद्धा तेथे रणभूमीवर मरून पडलेले राक्षस मात्र जिवंत होऊन उठले नाहीत.* मग बिभीषण रामांना साष्टांग प्रणिपात करून म्हणाला. (४०)

देव मामनुगृह्णीष्व मयि भक्तिर्यदा तव ।
मङ्गलस्नानमद्य त्वं कुरु सीतासमन्वितः ॥ ४१ ॥

"हे देवा, माझ्यावर अनुग्रह करा. ज्या अर्थी तुमची माझ्यावर प्रीती आहे, त्या अर्थी तुम्ही आज सीतेसह मंगल स्नान करावे, अशी माझी इच्छा आहे. (४१)

अलङ्कृत्य सह भ्राता श्वो गमिष्यामहे वयम् ।
बिभीषणवचः श्रुत्वा प्रत्युवाच रघूत्तमः ॥ ४२ ॥

मग उद्या लक्ष्मणासह अलंकृत होऊन सर्वजण अयोध्येकडे जाऊया." बिभीषणाचे वचन ऐकल्यावर, रघुनाथांनी त्याला प्रत्युत्तर दिले. (४२)

सुकुमारोऽतिभक्तो मे भरतो मामवेक्षते ।
जटावल्कलधारी स शब्दब्रह्मसमाहितः ॥ ४३ ॥

"माझा भाऊ भरत हा अतिशय सुकुमार आहे आणि माझा परम भक्त आहे. जटा आणि वल्कले धारण करून, शब्दब्रह्मात ध्यान लावून तो माझी वाट पाहात आहे. (४३)

कथं तेन विना स्नानमलङ्कारादिकं मम ।
अतः सुग्रीवमुख्यांस्त्वं पूजयाशु विशेषतः ॥ ४४ ॥

तेव्हा त्याला भेटल्याशिवाय मी कसे बरे अभ्यंग स्नान करून अलंकार इत्यादी धारण करू ? म्हणून तू आता प्रथम सुग्रीव इत्यादी मुख्य वानरांचा विशेषे करून लवकर सत्कार कर. (४४)

पूजितेषु कपीन्द्रेषु पूजितोऽहं न संशयः ।
इत्युक्तो राघवेणाशु स्वर्णरत्नाम्बराणि च ॥ ४५ ॥

या वानरांचा सत्कार केला असता, तो माझाच सत्कार होईल यात संशय नाही." असे राघवांनी सांगितल्यावर, बिभीषणाने तत्काळ त्या वानरांच्या इच्छेप्रमाणे आणि आवडीप्रमाणे त्यांच्यावर सोने, रत्ने आणि वस्त्रे यांचा वर्षाव केला. वानरांचे समूहनायक हे त्याप्रमाणे रत्ने इत्यादींनी सन्मानिले गेले आहेत, हे पाहिल्यावर रामांनी त्यांचे यथायोग्य अभिनंदन केले आणि त्या वानरश्रेष्ठांना जाण्यासाठी रीतसर निरोप दिला. त्यानंतर बिभीषणाने आणलेल्या आणि सूर्याप्रमाणे तेजस्वी असणाऱ्या त्या अत्युत्तम पुष्पक नावाच्या विमानात राम चढले. लाजणाऱ्या आणि यशस्विनी वैदेहीला त्यांनी आपल्या मांडीवर घेतले. महापराक्रमी आणि धनुष्य धारण करणारा लक्ष्मण हासुद्धा त्यांच्या बरोबर विमानात होता.

वव्रषे राक्षसश्रेष्ठो यथाकामं यथारुचि ।
ततस्तान्पूजितान्दृष्ट्वा रामो रत्नैश्च यूथपान् ॥ ४६ ॥

अभिनन्द्य यथान्यायं विससर्ज हरीश्वरान् ।
बिभीषणसमानीतं पुष्पकं सूर्यवर्चसम् ॥ ४७ ॥

आरुरोह ततो रामस्तद्विमानमनुत्तमम् ।
अङ्के निधाय वैदेहीं लज्जमानां यशस्विनीम् ॥ ४८ ॥

लक्ष्मणेन सह भ्रात्रा विक्रान्तेन धनुष्मता ।
अब्रवीच्च विमानस्थः श्रीरामः सर्ववानरान् ॥ ४९ ॥

* जीवदान देणे हा अमृताचा स्वाभाविक गुण आहे. म्हणून अमृताचा स्पर्श होऊनही राक्षस जिवंत न होणे यात स्वभाव विपर्यय हा दोष येतो. परंतु भगवंतांच्या इच्छेचा प्रभाव इतका प्रबळ आहे की त्यांच्यापुढे काहीही असंभवनीय नाही. भगवंतांची इच्छा नसल्याने अमृताचा प्रभावसुद्धा बाधित झाला. याखेरीज दुसरे कारण असेही असू शकते की साक्षात रामांकडून ठार मारले गेले असल्यामुळे ते राक्षस मुक्त होऊन गेले होते. त्यामुळे अमृताचा स्पर्शसुद्धा त्या राक्षसांना पुनः जिवंत करू शकला नाही.

सुग्रीवं हरिराजं च अङ्गदं च बिभीषणम् ।
मित्रकार्यं कृतं सर्वं भवद्भिः सह वानरैः ॥ ५० ॥

अनुज्ञाता मया सर्वे यथेष्टं गन्तुमर्हथ ।
सुग्रीव प्रतियाह्याशु किष्किन्धां सर्वसैनिकैः ॥ ५१ ॥

स्वराज्ये वस लङ्कायां मम भक्तो बिभीषण ।
न त्वां धर्षयितुं शक्ताः सेन्द्रा अपि दिवौकसः ॥ ५२ ॥

अयोध्यां गन्तुमिच्छामि राजधानीं पितुर्मम ।
एवमुक्तास्तु रामेण वानरास्ते महाबलाः ॥ ५३ ॥

ऊचुः प्राञ्जलयः सर्वे राक्षसश्च बिभीषणः ।
अयोध्यां गन्तुमिच्छामस्त्वया सह रघूत्तम ॥ ५४ ॥

दृष्ट्वा त्वामभिषिक्तं तु कौसल्यामभिवाद्य च ।
पश्चाद्वृणीमहे राज्यमनुज्ञां देहि नः प्रभो ॥ ५५ ॥

रामस्तथेति सुग्रीवं वानरैः सबिभीषणः ।
पुष्पकं सहनूमांश्च शीघ्रमारोह साम्प्रतम् ॥ ५६ ॥

ततस्तु पुष्पकं दिव्यं सुग्रीवः सह सेनया ।
बिभीषणश्च सामात्यः सर्वे चारुरुहुर्द्रुतम् ॥ ५७ ॥

तेष्वारूढेषु सर्वेषु कौबेरं परमासनम् ।
राघवेणाभ्यनुज्ञातमुत्पपात विहायसा ॥ ५८ ॥

बभौ तेन विमानेन हंसयुक्तेन भास्वता ।
प्रहृष्टश्च तदा रामश्चतुर्मुख इवापरः ॥ ५९ ॥

ततो बभौ भास्करबिम्बतुल्यं
कुबेरयानं तपसानुलब्धम् ।
रामेण शोभां नितरां प्रपेदे
सीतासमेतेन सहानुजेन ॥ ६० ॥

विमानात बसलेले श्रीराम सर्व वानर, वानरराज सुग्रीव अंगद आणि बिभीषण यांना म्हणाले, "वानरांसह तुम्ही सर्वांनी उत्तमप्रकारे मित्रकार्य केले आहे. (४५-५०)

आता माझ्या अनुज्ञेने तुम्ही सर्वजणांनी आपापल्या इष्टस्थानी जावे. अरे सुग्रीवा, तू सर्व वानर-सैनिकांसह त्वरित किष्किंधा नगरीला परत जा. (५१)

हे बिभीषणा, तू माझा भक्त आहेस. तू लंकेमध्ये स्वतःच्या राज्यात राहा. इंद्रासकट सारे देवसुद्धा तुझ्यावर आक्रमण करण्यास समर्थ होणार नाहीत. (५२)

आता मी माझ्या पित्याच्या अयोध्या राजधानीप्रत जाऊ इच्छित आहे." रामांनी त्यांना असे सांगितल्यावर, ते सर्व महाबलवान वानर आणि राक्षसराज बिभीषण हे सर्व हात जोडून रामांना म्हणाले, "हे रघूत्तमा, तुमच्याबरोबर आम्हीसुद्धा अयोध्या नगरीस येऊ इच्छितो. (५३-५४)

हे प्रभो, तुमच्यावर राज्याभिषेक झालेला पाहून आणि कौसल्येला वंदन करून, नंतर आम्ही आपापल्या राज्यात जाऊ. कृपया तुम्ही अनुज्ञा द्या." (५५)

"ठीक आहे", असे सांगून रामांनी म्हटले, "अरे सुग्रीवा, सर्व वानर, बिभीषण आणि हनुमान यांना बरोबर घेऊन, तू आता लगेच या पुष्पक विमानात आरोहण कर." (५६)

तेव्हा वानरसेनेसह सुग्रीव आणि अमात्यांसह बिभीषण असे ते सर्व जण झटपट त्या दिव्य विमानात चढून बसले. (५७)

ते सर्व आरूढ झाल्यावर आणि रामांनी अनुज्ञा दिल्यावर, ते कुबेराचे उत्तम विमान उड्डाण करून आकाश मार्गाने निघाले. (५८)

त्या तेजस्वी विमानामध्ये आनंदपूर्वक बसलेले राम हंसावरून जाणाऱ्या ब्रह्मदेवाप्रमाणे शोभू लागले. (५९)

त्यानंतर तपश्चर्येच्या योगाने प्राप्त झालेले आणि सूर्यबिंबाप्रमाणे देदीप्यमान असणारे ते कुबेराचे विमान अगोदरच शोभून दिसत होते. त्यातच लक्ष्मण आणि सीता बरोबर असणाऱ्या रामांमुळे ते अधिकच शोभू लागले. (६०)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे युद्धकाण्डे त्रयोदशः सर्गः ॥ १३ ॥

चतुर्दश सर्ग

अयोध्या-यात्रा, भरद्वाज मुनींचे आतिथ्य आणि भरत भेट

श्रीमहादेव उवाच

पातयित्वा ततश्चक्षुः सर्वतो रघुनन्दनः ।
अब्रवीन्मैथिलीं सीतां रामः शशिनिभाननाम् ॥ १ ॥

त्रिकूटशिखराग्रस्थां पश्य लङ्कां महाप्रभाम् ।
एतां रणभुवं पश्य मांसकर्दमपङ्किलाम् ॥ २ ॥

असुराणां प्लवङ्गानामत्र वैशसनं महत् ।
अत्र मे निहतः शेते रावणो राक्षसेश्वरः ॥ ३ ॥

कुम्भकर्णेन्द्रजिन्मुख्याः सर्वे चात्र निपातिताः ।
एष सेतुर्मया बद्धः सागरे सलिलाशये ॥ ४ ॥

एतच्च दृश्यते तीर्थं सागरस्य महात्मनः ।
सेतुबन्धमिति ख्यातं त्रैलोक्येन च पूजितम् ॥ ५ ॥

एतत्पवित्रं परमं दर्शनात्पातकापहम् ।
अत्र रामेश्वरो देवो मया शम्भुः प्रतिष्ठितः ॥ ६ ॥

अत्र मां शरणं प्राप्तो मन्त्रिभिश्च बिभीषणः ।
एषा सुग्रीवनगरी किष्किन्धा चित्रकानना ॥ ७ ॥

तत्र रामाज्ञया ताराप्रमुखा हरियोषितः ।
आनयामास सुग्रीवः सीतायाः प्रियकाम्यया ॥ ८ ॥

ताभिः सहोत्थितं शीघ्रं विमानं प्रेक्ष्य राघवः ।
प्राह चाद्रिमृष्यमूकं पश्य वाल्यत्र मे हतः ॥ ९ ॥

एषा पञ्चवटी नाम राक्षसा यत्र मे हताः ।
अगस्त्यस्य सुतीक्ष्णस्य पश्याश्रमपदे शुभे ॥ १० ॥

एते ते तापसाः सर्वे दृश्यन्ते वरवर्णिनि ।
असौ शैलवरो देवि चित्रकूटः प्रकाशते ॥ ११ ॥

अत्र मां कैकयीपुत्रः प्रसादयितुमागतः ।
भरद्वाजाश्रमं पश्य दृश्यते यमुनातटे ॥ १२ ॥

श्रीमहादेव म्हणाले– हे पार्वती, त्यानंतर सर्व बाजूंकडे दृष्टिक्षेप करून, रघुनंदन राम चंद्रानना सीतेला म्हणाले. (१)

"हे सीते, त्रिकूट पर्वताच्या शिखरावर असलेली आणि अतिशय प्रभा असणारी ही लंका बघ. तसेच मांसाच्या चिखलाने भरून गेलेली ही रणभूमी बघ. (२)

येथे राक्षस आणि वानर यांचा फार मोठा संहार झाला. मी मारलेला राक्षसराज रावण येथे पडला होता.(३)

कुंभकर्ण, इंद्रजित इत्यादी सर्व राक्षस येथेच पडले होते. सागरावर हा सेतू मी बांधला. (४)

या महात्म्या विशाल सागराचे सेतुबंध नावाने प्रख्यात असणारे आणि तिन्ही लोकांकडून पूजिले जाणारे हे तीर्थ दिसून येत आहे. (५)

हे अतिशय पवित्र असून, केवळ त्याच्या दर्शनानेच ते पातकांचे हरण करते. येथे रामेश्वर महादेवांची मी स्थापना केली आहे. (६)

मंत्र्यांसह बिभीषण मला येथे शरण आला होता. विचित्र उपवनांनी युक्त असणारी ही सुग्रीवाची नगरी किष्किंधा आहे. " (७)

तेथे सीतेला प्रसन्न करण्यासाठी, रामांच्या आज्ञेने तारा इत्यादी वानरस्त्रिया सुग्रीवाने आणवल्या. (८)

त्या स्त्रियांना बरोबर घेऊन त्यांच्यासह चट्दिशी उड्डाण करणारे ते विमान पाहून, राघव सीतेला म्हणाले, " सीते, हा ऋष्यमूक पर्वत पाहा. येथे मी वालीचा वध केला होता. (९)

जेथे मी खर, दूषण इत्यादी राक्षसांचा वध केला होता, ती ही पंचवटी नावाची जागा आहे. हे कल्याणी, अगस्त्य आणि सुतीक्ष्ण या ऋषींचीही आश्रमस्थाने तू पाहा. (१०)

हे कांतिमती सीते, हे सर्व तापस येथे दिसत आहेत. हे देवी, हा तो सर्वश्रेष्ठ चित्रकूट पर्वत स्पष्टपणे दिसत आहे. (११)

येथेच कैकयीपुत्र भरत मला प्रसन्न करण्यास आला होता. यमुनेच्या तीरावरील हा भरद्वाज ऋषींचा आश्रम पाहा. (१२)

एषा भागीरथी गङ्गा दृश्यते लोकपावनी ।
एषा सा दृश्यते सीते सरयूर्यूपमालिनी ॥ १३ ॥

एषा सा दृश्यतेऽयोध्या प्रणामं कुरु भामिनि ।
एवं क्रमेण सम्प्राप्तो भरद्वाजाश्रमं हरिः ॥ १४ ॥

पूर्णे चतुर्दशे वर्षे पञ्चम्यां रघुनन्दनः ।
भरद्वाजं मुनिं दृष्ट्वा ववन्दे सानुजः प्रभुः ॥ १५ ॥

पप्रच्छ मुनिमासीनं विनयेन रघूत्तमः ।
शृणोषि कच्चिद्भरतः कुशल्यास्ते सहानुजः ॥ १६ ॥

सुभिक्षा वर्ततेऽयोध्या जीवन्ति च हि मातरः ।
श्रुत्वा रामस्य वचनं भरद्वाजः प्रहृष्टधीः ॥ १७ ॥

प्राह सर्वे कुशलिनो भरतस्तु महामनाः ।
फलमूलकृताहारो जटावल्कलधारकः ॥ १८ ॥

पादुके सकलं न्यस्य राज्यं त्वां सुप्रतीक्षते ।
यद्यत्कृतं त्वया कर्म दण्डके रघुनन्दन ॥ १९ ॥

राक्षसानां विनाशं च सीताहरणपूर्वकम् ।
सर्वं ज्ञातं मया राम तपसा ते प्रसादतः ॥ २० ॥

त्वं ब्रह्म परमं साक्षादादिमध्यान्तवर्जितः ।
त्वमग्रे सलिलं सृष्ट्वा तत्र सुप्तोऽसि भूतकृत् ॥ २१ ॥

नारायणोऽसि विश्वात्मन्नराणामन्तरात्मकः ।
त्वन्नाभिकमलोत्पन्नो ब्रह्मा लोकपितामहः ॥ २२ ॥

अतस्त्वं जगतामीशः सर्वलोकनमस्कृतः ।
त्वं विष्णुर्जानकी लक्ष्मीः शेषोऽयं लक्ष्मणाभिधः ॥ २३ ॥

आत्मना सृजसीदं त्वमात्मन्येवात्ममायया ।
न सज्जसे नभोवत्त्वं चिच्छक्त्या सर्वसाक्षिकः ॥ २४ ॥

सर्व लोकांना पावन करणारी ही भागीरथी येथे दिसत आहे. हे सीते, सूर्यवंशी राजांनी केलेल्या यज्ञांच्या स्तूपांच्या समूहांनी युक्त अशी ही सरयू नदी येथे दिसत आहेत. ही अयोध्या दिसते आहे. हे सुंदरी, तिला प्रणाम कर. " अशा प्रकारे क्रमाने जाता जाता राम भरद्वाजांच्या आश्रमात पोचले. (१३-१४)

चौदा वर्ष पूर्ण झाल्यावर, पंचमी तिथीला, रघुनंदनांनी भरद्वाज मुनींना पाहिले आणि लक्ष्मणासह प्रभू रामांनी त्यांना वंदन केले. (१५)

आश्रमात बसलेल्या मुनींना रघूत्तमांनी विनयपूर्वक विचारले, "भरताविषयी तुम्ही काही ऐकले आहे काय ? शत्रुघ्न व भरत कुशल आहेत ना? (१६)

अयोध्येत सुबत्ता आहे ना ? माझ्या माता सुखरूप आहेत ना ?" रामांचे बोलणे ऐकून आनंदित झालेल्या भरद्वाजांनी उत्तर दिले, "रामा, सर्वजण कुशल आहेत. उदार मनाचा भरत हा फळे व मुळे यांचा आहार घेतो. त्याने जटा आणि वल्कले धारण केली आहे. (१७-१८)

राज्याचा संपूर्ण कारभार तुमच्या पादुकांवर सोपवून तो तुमचीच प्रतीक्षा करीत आहे. हे रघुनंदना, दंडकारण्यात तुम्ही जी कृत्ये केलीत, आणि सीतेचे हरण झाल्यावर तुम्ही जो राक्षसांचा विनाश केलात, हे रामा, ते सर्व तुमच्या कृपा-प्रसादामुळे मी तपोबळाने जाणलेले आहे. (१९-२०)

हे रामा आदी, मध्य आणि अंत यांनी रहित असे साक्षात परब्रह्म तुम्हीच आहात. सर्व भूतांना निर्माण करणारे तुम्ही आहात. प्रथम पाणी निर्माण करून नंतर तुम्ही तेथे निद्रा करता. म्हणून तुम्ही नारायण (नार म्हणजे पाणी हे ज्याचे अयन म्हणजे आश्रय आहे तो नारायण) आहात. हे विश्वात्मन, तुम्ही सर्व माणसांचे अंतरात्मा आहात. तुमच्या नाभिकमळातून उत्पन्न झालेले ब्रह्मदेव हे सर्व लोकांचे पितामह आहेत . (२१- २२)

म्हणून तुम्ही सर्व जगांचे ईश्वर आहात. तुम्ही सर्व लोकांकडून वंदिले जाता. तुम्ही साक्षात विष्णू आहात. सीता ही लक्ष्मी आहे आणि लक्ष्मण हा शेष नाग आहे. (२३)

स्वत:च्या मायेने तुम्ही स्वत:च्या ठिकाणी स्वत:च हे संपूर्ण विश्व उत्पन्न करता. परंतु आकाशाप्रमाणे तुम्ही कशानेही लिप्त होत नाही. स्वत:च्या चित्- ज्ञान- शक्तीच्या द्वारा तुम्ही सर्वांचे साक्षी असता. (२४)

बहिरन्तश्च भूतानां त्वमेव रघुनन्दन ।
पूर्णोऽपि मूढदृष्टीनां विच्छिन्न इव लक्ष्यसे ॥ २५ ॥

हे रघुनंदना, सर्व प्राण्यांच्या आत- बाहेर तुम्हीच आहात. आणि जरी तुम्ही पूर्ण म्हणजे अखंड आहात तरी लोकांना तुम्ही मर्यादित असल्यासारखे भासता. (२५)

जगत्त्वं जगदाधारस्त्वमेव परिपालकः ।
त्वमेव सर्वभूतानां भोक्ता भोज्यं जगत्पते ॥ २६ ॥

हे जगताच्या स्वामी रामा, तुम्हीच जग आहात. तुम्हीच जगाचा आधार आहात आणि तुम्हीच जगाचे पालनकर्ते आहात आणि तुम्हीच सर्व भूतांमध्ये भोक्ते आणि अन्नरूपाने भोज्य आहात. (२६)

दृश्यते श्रूयते यद्यत्स्मर्यते वा रघूत्तम ।
त्वमेव सर्वमखिलं त्वद्विनान्यन्न किञ्चन ॥ २७ ॥

हे रघूत्तमा, जे जे काही दिसून येते, ऐकले जाते किंवा स्मरले जाते ते ते सर्व काही तुम्हीच आहात. तुमच्याशिवाय कुठेही काहीही वेगळे असे नाही. (२७)

माया सृजति लोकांश्च स्वगुणैरहमादिभिः ।
त्वच्छक्तिप्रेरिता राम तस्मात्त्वय्युपचर्यते ॥ २८ ॥

हे रामा, तुमच्याच शक्तीने प्रेरणा मिळालेली माया हीच अहंकार इत्यादी स्वतःच्या गुणांनी सर्व लोक उत्पन्न करते. म्हणून सर्व काही करण्याचे कर्तृत्व हे तुमच्यावर आरोपिले जाते. (२८)

यथा चुम्बकसान्निध्याच्चलन्त्येवायसादयः ।
जडास्तथा त्वया दृष्टा माया सृजति वै जगत् ॥ २९ ॥

ज्या प्रमाणे चुंबकाच्या सान्निध्याने लोखंड इत्यादी जड- अचेतन- पदार्थ हलू लागतात, त्या प्रमाणे तुमची दृष्टी पडताच माया ही संपूर्ण जग निर्माण करते. (२९)

देहद्वयमदेहस्य तव विश्वं रिरक्षिषोः ।
विराट् स्थूलं शरीरं ते सूत्रं सूक्ष्ममुदाहृतम् ॥ ३० ॥

तुम्ही स्वतः देहरहित असूनसुद्धा तुम्ही विश्वाचे रक्षण करण्याच्या इच्छेने दोन देह धारण करता. विराट हे तुमचे स्थूल शरीर आहे तर तुमचे सूक्ष्म शरीर हे सूत्र (हिरण्य गर्भ)आहे, असे म्हटले जाते. (३०)

विराजः सम्भवन्त्येते अवतारः सहस्रशः ।
कार्यान्ते प्रविशन्त्येव विराजं रघुनन्दन ॥ ३१ ॥

हे रघुनन्दना, तुमच्या विराट शरीरापासून तुमचे हजारो अवतार उत्पन्न होतात आणि आपले कार्य पूर्ण झाल्यावर ते पुनः तुमच्या विराट शरीरातच प्रवेश करतात. (३१)

अवतारकथां लोके ये गायन्ति गृणन्ति च ।
अनन्यमनसो मुक्तिस्तेषामेव रघूत्तम ॥ ३२ ॥

हे रघूत्तमा, या जगात जे लोक अनन्य चित्त होऊन तुमच्या अवतारांच्या कथा गातात आणि वर्णन करतात त्यांनाच मुक्ती प्राप्त होते. (३२)

त्वं ब्रह्मणा पुरा भूमेर्भारहाराय राघव ।
प्रार्थितस्तपसा तुष्टस्त्वं जातोऽसि रघोः कुले ॥ ३३ ॥

हे राघवा, पूर्वी भूमीचा भार हरण करण्यास ब्रह्मदेवाने तुमची प्रार्थना केली होती. त्यांच्या तपस्येने संतुष्ट होऊन तुम्ही रघूच्या कुळात अवतार घेतला. (३३)

देवकार्यमशेषेण कृतं ते राम दुष्करम् ।
बहुवर्षसहस्राणि मानुषं देहमाश्रितः ॥ ३४ ॥

हे रामा, आता तुम्ही देवांचे ते दुष्कर कार्य पूर्णपणे पार पाडले आहे. आता अनेक सहस्र वर्षे या मनुष्य देहात राहूनच, दोन्ही लोकांच्या कल्याणासाठी, तुम्ही अनेक कठीण आणि पापहारक कार्ये करून, स्वतःच्या कीर्तीने हे संपूर्ण विश्व भरून टाकाल. (३४-३५)

कुर्वन्दुष्करकर्माणि लोकद्वयहिताय च ।
पापहारीणि भुवनं यशसा पूरयिष्यसि ॥ ३५ ॥

प्रार्थयामि जगन्नाथ पवित्रं कुरु मे गृहम् ।
स्थित्वाद्य भुक्त्वा सबलः श्वो गमिष्यसि पत्तनम् ॥ ३६ ॥

हे जगन्नाथा, आज माझे घर तुम्ही पवित्र करा, अशी माझी तुम्हांला प्रार्थना आहे. आज येथे सैन्यासह राहून, भोजन करून, मग उद्या स्वतःच्या नगरीला जा." (३६)

तथेति राघवोऽतिष्ठत्तस्मिन्नाश्रम उत्तमे ।
ससैन्यः पूजितस्तेन सीतया लक्ष्मणेन च ॥ ३७ ॥

ततो रामश्चिन्तयित्वा मुहूर्तं प्राह मारुतिम् ।
इतो गच्छ हनूमंस्त्वमयोध्यां प्रति सत्वरः ॥ ३८ ॥

जानीहि कुशली कश्चिज्जनो नृपतिमन्दिरे ।
शृङ्गवेरपुरं गत्वा ब्रूहि मित्रं गुहं मम ॥ ३९ ॥

जानकीलक्ष्मणोपेतमागतं मां निवेदय ।
नन्दिग्रामं ततो गत्वा भ्रातरं भरतं मम ॥ ४० ॥

दृष्ट्वा ब्रूहि सभार्यस्य सभ्रातुः कुशलं मम ।
सीतापहरणादीनि रावणस्य वधादिकम् ॥ ४१ ॥

ब्रूहि क्रमेण मे भ्रातुः सर्वं तत्र विचेष्टितम् ।
हत्वा शत्रुगणान्सर्वान्सभार्यः सहलक्ष्मणः ॥ ४२ ॥

उपयाति समृद्धार्थः सह ऋक्षहरीश्वरैः ।
इत्युक्त्वा तत्र वृत्तान्तं भरतस्य विचेष्टितम् ॥ ४३ ॥

सर्वं ज्ञात्वा पुनः शीघ्रमागच्छ मम सन्निधिम् ।
तथेति हनुमांस्तत्र मानुषं वपुरास्थितः ॥ ४४ ॥

नन्दिग्रामं ययौ तूर्णं वायुवेगेन मारुतिः ।
गरुत्मानिव वेगेन जिघृक्षन् भुजगोत्तमम् ॥ ४५ ॥

शृङ्गवेरपुरं प्राप्य गुहमासाद्य मारुतिः ।
उवाच मधुरं वाक्यं प्रहृष्टेनान्तरात्मना ॥ ४६ ॥

रामो दाशरथिः श्रीमान्सखा ते सह सीतया ।
सलक्ष्मणस्त्वां धर्मात्मा क्षेमी कुशलमब्रवीत् ॥ ४७ ॥

अनुज्ञातोऽद्य मुनिना भरद्वाजेन राघवः ।
आगमिष्यति तं देवं द्रक्ष्यसि त्वं रघूत्तमम् ॥ ४८ ॥

एवमुक्त्वा महातेजाः सम्प्रहृष्टतनूरुहम् ।
उत्पपात महावेगो वायुवेगेन मारुतिः ॥ ४९ ॥

"ठीक आहे" असे म्हणून राघव त्या उत्तम आश्रमात राहिले. त्या वेळी सीता, लक्ष्मण व सैन्य यांच्यासह त्यांचा भरद्वाजांनी सत्कार केला. (३७)

नंतर क्षणभर विचार करून राम मारुतीला म्हणाले, "हे हनुमंता, आता येथून तू सत्वर अयोध्येकडे जा. (३८)

तेथे राजमंदिरातील सर्व लोक कुशल आहेत ना, हे जाणून घे. तसेच शृंगवेरपुरात जाऊन तू गुह या माझ्या मित्राशी बोल. (३९)

जानकी आणि लक्ष्मण यांच्यासह मी परत आलो आहे, असे तू त्याला निवेदन कर. त्यानंतर नंदिग्रामात जाऊन, माझ्या भरताला भेटून, पत्नी व भाऊ यांच्यासह माझे कुशल आहे, असे सांग. त्यानंतर सीतेचे अपहरण झाल्यापासून रावणाचा वध इत्यादी माझी सर्व हकीगत तू तेथे क्रमाने त्याला सांग आणि सर्व शत्रु- समूहाचा वध करून, कृतकृत्य होऊन, राम पत्नी व लक्ष्मण यांचेसह तसेच श्रेष्ठ अस्वले आणि वानर यांना बरोबर घेऊन येत आहेत, असे तू सांग. हा सर्व वृत्तांत तेथे सांगून, भरताचा समाचार घेऊन, पुनः सत्वर माझ्याजवळ ये." "ठीक आहे" असे म्हणून हनुमंताने तेथेच मानवी शरीर धारण केले आणि नंतर ज्या प्रमाणे गरुड सर्पाला पकडण्याच्या इच्छेने वेगाने जातो त्याप्रमाणे तो लगेच वायुवेगाने नंदिग्रामाकडे निघाला. (४०-४५)

प्रथम शृंगवेरपुरात पोचल्यावर, गुहाजवळ जाऊन, आनंदित मनाने मारुतीने असे गोड शब्दांत म्हटले. (४६)

"श्रीमान् धर्मात्मा, तुझे मित्र दशरथपुत्र रामांनी सीता व लक्ष्मण यांसह मी कुशल आहे, अशी आपली कुशल वार्ता तुला सांगितली आहे. (४७)

मुनि भरद्वाजांनी अनुज्ञा दिल्यावर, आजच राघव तुझ्याकडे येतील, त्या वेळी तू रघूत्तम देवांना भेटशील." (४८)

आनंदाने गुहाच्या अंगावर रोमांच आले होते. त्याला असे सांगून, महातेजस्वी आणि प्रचंड वेग असणारा मारुती वायुवेगाने आकाशात उडाला. (४९)

सोऽपश्यद्रामतीर्थं च सरयूं च महानदीम् ।
तामतिक्रम्य हनुमान्नन्दिग्रामं ययौ मुदा ॥ ५० ॥

क्रोशमात्रे त्वयोध्यायाश्चीरकृष्णाजिनाम्बरम् ।
ददर्श भरतं दीनं कृशमाश्रमवासिनम् ॥ ५१ ॥

मलपङ्कविदिग्धाङ्गं जटिलं वल्कलाम्बरम् ।
फलमूलकृताहारं रामचिन्तापरायणम् ॥ ५२ ॥

पादुके ते पुरस्कृत्य शासयन्तं वसुन्धराम् ।
मन्त्रिभिः पौरमुख्यैश्च काषायाम्बरधारिभिः ॥ ५३ ॥

वृतदेहं मूर्तिमन्तं साक्षाद्धर्ममिव स्थितम् ।
उवाच प्राञ्जलिर्वाक्यं हनूमान्मारुतात्मजः ॥ ५४ ॥

यं त्वं चिन्तयसे रामं तापसं दण्डके स्थितम् ।
अनुशोचसि काकुत्स्थः स त्वां कुशलमब्रवीत् ॥ ५५ ॥

प्रियमाख्यामि ते देव शोकं त्यज सुदारुणम् ।
अस्मिन्मुहूर्ते भ्रात्रा त्वं रामेण सह सङ्गतः ॥ ५६ ॥

समरे रावणं हत्वा रामः सीतामवाप्य च ।
उपयाति समृद्धार्थः ससीतः सहलक्ष्मणः ॥ ५७ ॥

एवमुक्तो महातेजा भरतो हर्षमूर्च्छितः ।
पपात भुवि चास्वस्थः कैकयीप्रियनन्दनः ॥ ५८ ॥

आलिङ्ग्य भरतः शीघ्रं मारुतिं प्रियवादिनम् ।
आनन्दजैरश्रुजलैः सिषेच भरतः कपिम् ॥ ५९ ॥

देवो वा मानुषो वा त्वमनुक्रोशादिहागतः ।
प्रियाख्यानस्य ते सौम्य ददामि ब्रुवतः प्रियम् ॥ ६० ॥

गवां शतसहस्रं च ग्रामाणां च शतं वरम् ।
सर्वाभरणसम्पन्ना मुग्धाः कन्यास्तु षोडश ॥ ६१ ॥

एवमुक्त्वा पुनः प्राह भरतो मारुतात्मजम् ।
बहूनीमानि वर्षाणि गतस्य सुमहद्वनम् ॥ ६२ ॥

पुढे वाटेत त्याने रामतीर्थ व महानदी सरयू पाहिली. ती नदी ओलांडून हनुमान आनंदाने नंदीग्रामात शिरला. (५०)

अयोध्येपासून एक कोस अंतरावर असणाऱ्या नंदीग्रामात वल्कले व कृष्णाजिन वापरणारा, आश्रमात राहाणारा, कृश, दीन असा भरत त्याला दिसला. (५१)

भरताचे अंग अभ्यंगादी संस्कार न झाल्यामुळे मळकट झाले होते. त्याच्या डोक्यावर जटा होत्या. त्याने वल्कल वस्त्र धारण केले होते. फळे व मुळे यांचा आहार घेऊन, तो रामांचे ध्यान करण्यात मग्न होता. रामांच्या पादुका पुढे ठेवून तो पृथ्वीचे राज्य करीत होता. काषाय वस्त्र परिधान करणारे मंत्री आणि मुख्य नागरिक त्यांच्यासमवेत तो साक्षात् मूर्तिमंत धर्माप्रमाणे दिसत होता. अशा त्या भरतापुढे पवनपुत्र हनुमानाने हात जोडले आणि म्हटले. (५२-५४)

" हे भरता, दंडकारण्यात राहाणाऱ्या ज्या तपस्वी रामांचे तू चिंतन करीत आहेस आणि ज्यांच्याविषयी तू शोक करीत आहेस, त्या काकुस्त्थ रामांनी तुला आपले कुशल कळविण्यास सांगितले आहे. (५५)

हे देवा, मी आता तुम्हांला प्रिय वार्ता सांगतो. तुम्ही आता आपला दारुण शोक टाकून द्या. याच मुहूर्तावर तुम्ही तुमच्या बंधू रामांना भेटाल. (५६)

युद्धामध्ये रावणाचा वध करून आणि सीतेला प्राप्त करून घेऊन, मनोरथ सफल झालेले राम हे सीता व लक्ष्मण यांचेसह जवळ येत आहेत. " (५७)

मारुतीने असे सांगितल्यावर, महातेजस्वी भरत तळमळीने व आनंदातिरेकाने मूर्च्छित होऊन जमिनीवर पडला. (५८)

शुद्धीवर आल्यावर, गोड बोलणाऱ्या मारुतीला भरताने लगेच आलिंगन दिले आणि आनंदाश्रूंनी त्याला न्हाऊ घातले. (५९)

(मग भरत हनुमानाला म्हणाला,) "अरे तू देव आहेस की माणूस आहेस ? माझ्यावरील दयेमुळे तू येथे आला आहेस. हे साधो, प्रिय वार्ता सांगणाऱ्या तुला मी एक लक्ष गाई, उत्तम सुंदर अशी शंभर गावे, आणि सर्व अलंकारांनी युक्त अशा सोळा सुंदर कन्या देत आहे." (६०-६१)

असे सांगून भरत हनुमानाला पुनः म्हणाला, "माझे स्वामी राम हे घोर अरण्यात गेल्याला अनेक वर्षे

श्रृणोम्यहं प्रीतिकरं मम नाथस्य कीर्तनम् ।
कल्याणी बत गाथेयं लौकिकी प्रतिभाति मे ॥ ६३ ॥

एति जीवन्तमानन्दो नरं वर्षशतादपि ।
राघवस्य हरीणां च कथमासीत्समागमः ॥ ६४ ॥

तत्त्वमाख्याहि भद्रं ते विश्वसेयं वचस्तव ।
एवमुक्तोऽथ हनुमान् भरतेन महात्मना ॥ ६५ ॥

आचचक्षेऽथ रामस्य चरितं कृत्स्नशः क्रमात् ।
श्रुत्वा तु परमानन्दं भरतो मारुतात्मजात् ॥ ६६ ॥

आज्ञापयच्छत्रुहणं मुदा युक्तं मुदान्वितः ।
दैवतानि च यावन्ति नगरे रघुनन्दन ॥ ६७ ॥

नानोपहारबलिभिः पूजयन्तु महाधियः ।
सूता वैतालिकाश्चैव बन्दिनः स्तुतिपाठकाः ॥ ६८ ॥

वारमुख्याश्च शतशो निर्यान्त्वद्यैव सङ्घशः ।
राजदारास्तथामात्याः सेना हस्त्यश्वपत्तयः ॥ ६९ ॥

ब्राह्मणाश्च तथा पौरा राजानो ये समागताः ।
निर्यान्तु राघवस्याद्य द्रष्टुं शशिनिभाननम् ॥ ७० ॥

भरतस्य वचः श्रुत्वा शत्रुघ्नपरिचोदिताः ।
अलञ्चक्रुश्च नगरीं मुक्तारत्नमयोज्ज्वलैः ॥ ७१ ॥

तोरणैश्च पताकाभिर्विचित्राभिरनेकधा ।
अलङ्कुर्वन्ति वेश्मानि नानाबलिविचक्षणाः ॥ ७२ ॥

निर्यान्ति वृन्दशः सर्वे रामदर्शनलालसाः ।
हयानां शतसाहस्रं गजानामयुतं तथा ॥ ७३ ॥

स्थानां दशसाहस्रं स्वर्णसूत्रविभूषितम् ।
पारमेष्ठीन्युपादाय द्रव्याण्युच्चावचानि च ॥ ७४ ॥

ततस्तु शिबिकारूढा निर्ययू राजयोषितः ।
भरतः पादुके न्यस्य शिरस्येव कृताञ्जलिः ॥ ७५ ॥

झाली आणि आज मी त्यांची आनंददायक वार्ता ऐकत आहे. आज मला एक कल्याणकारी लौकिक उक्ती अगदी सार्थ आहे असे वाटत आहे : माणूस जर जिवंत राहिला तर शंभर वर्षांनी का होईना, त्याला आनंद प्राप्त होतो. तुझे कल्याण होवो. आता तू मला सांग की राघव आणि वानर यांची भेट कशी काय झाली बरे ? तू मला खरे खरे सांग. मी तुझ्या बोलण्यावर विश्वास ठेवीन." महात्म्या भरताने असे म्हटल्यावर, हनुमानाने त्याला रामांचे संपूर्ण चरित्र क्रमाने सांगितले. पवनपुत्राकडून ते ऐकल्यावर, भरताला परमानंद झाला. (६२-६६)

तेव्हा आनंदित झालेल्या भरताने आनंदित झालेल्या शत्रुघ्नाला आज्ञा केली, "हे रघुनंदना शत्रुघ्ना, या नगरीत जितकी दैवते आहेत त्या सर्वांची नाना प्रकारच्या पूजासामग्रींनी पूजा करा. सूत, वैतालिक, बंदीजन, स्तुतिपाठक आणि मुख्य मुख्य वारांगना यांचे शेकडो समुदाय आजच नगराच्या बाहेर पडू देत. खेरीज राजस्त्रिया तसेच अमात्य, हत्ती , घोडे आणि पायदळ यांनी युक्त सेना, ब्राह्मण, नागरिक आणि येथे एकत्र आलेले सर्व राजे लोक हे सर्व जण राघवांचा मुखचंद्र पाहाण्यास आजच अयोध्येच्या बाहेर पडू देत." (६७-७०)

भरताचे वचन ऐकल्यावर, शत्रुघ्नाने आज्ञा दिली. त्या आज्ञेमुळे नाना प्रकारच्या कलांमध्ये कुशल असणाऱ्या नागरिकांनी आपापली घरे सुशोभित केली. तसेच उज्ज्वल मोती व रत्ने यांनी युक्त अशी नाना प्रकारची तोरणे, नाना प्रकारच्या चित्र-विचित्र पताका यांच्या द्वारे त्यांनी अयोध्या नगरी सुशोभित केली. (७१-७२)

त्या वेळी रामांच्या दर्शनाची लालसा असणारे लोक गटागटाने नगराच्या बाहेर पडले. त्यांनी आपल्याबरोबर एक लक्ष घोडे, दहा हजार हत्ती, सोन्याच्या तारांनी सुशोभित केलेले दहा हजार रथ आणि ईश्वराला अर्पण करण्यास योग्य अशा ऐश्वर्यसंपन्न लहान मोठ्या वस्तू घेतल्या होत्या. (७३-७४)

त्यानंतर पालखीत आरूढ होऊन राजस्त्रिया बाहेर पडल्या आणि रामांना भेटण्यास, शत्रुघ्नाला बरोबर घेऊन, भरत हा रामांच्या पादुका मस्तकावर धारण करून

शत्रुघ्नसहितो रामं पादचारेण निर्ययौ ।
तदैव दृश्यते दूराद्विमानं चन्द्रसन्निभम् ॥ ७६ ॥

पुष्पकं सूर्यसङ्काशं मनसा ब्रह्मनिर्मितम् ।
एतस्मिन् भ्रातरौ वीरौ वैदेह्या रामलक्ष्मणौ ॥ ७७ ॥

सुग्रीवश्च कपिश्रेष्ठो मन्त्रिभिश्च बिभीषणः ।
दृश्यते पश्यत जना इत्याह पवनात्मजः ॥ ७८ ॥

ततो हर्षसमुद्भूतो निःस्वनो दिवमस्पृशत् ।
स्त्रीबालयुववृद्धानां रामोऽयमिति कीर्तनात् ॥ ७९ ॥

रथकुञ्जरवाजिस्था अवतीर्य महीं गताः ।
ददृशुस्ते विमानस्थं जनाः सोममिवाम्बरे ॥ ८० ॥

प्राञ्जलिर्भरतो भूत्वा प्रहृष्टो राघवोन्मुखः ।
ततो विमानाग्रगतं भरतो राघवं मुदा ॥ ८१ ॥

ववन्दे प्रणतो रामं मेरुस्थमिव भास्करम् ।
ततो रामाभ्यनुज्ञातं विमानमपतद्भुवि ॥ ८२ ॥

आरोपितो विमानं तद्भरतः सानुजस्तदा ।
राममासाद्य मुदितः पुनरेवाभ्यवादयत् ॥ ८३ ॥

समुत्थाप्य चिराद्दृष्टं भरतं रघुनन्दनः ।
भ्रातरं स्वाङ्कमारोप्य मुदा तं परिषस्वजे ॥ ८४ ॥

ततो लक्ष्मणमासाद्य वैदेहीं नाम कीर्तयन् ।
अभ्यवादयत प्रीतो भरतः प्रेमविह्वलः ॥ ८५ ॥

सुग्रीवं जाम्बवन्तं च युवराजं तथाङ्गदम् ।
मैन्दद्विविदनीलांश्च ऋषभं चैव सस्वजे ॥ ८६ ॥

सुषेणं च नलं चैव गवाक्षं गन्धमादनम् ।
शरभं पनसं चैव भरतः परिषस्वजे ॥ ८७ ॥

सर्वे ते मानुषं रूपं कृत्वा भरतमाहृताः ।
पप्रच्छुः कुशलं सौम्याः प्रहृष्टाश्च प्लवङ्गमाः ॥ ८८ ॥

आणि हात जोडून पायी पायी निघाला. तितक्यातच ब्रह्मदेवांनी मनाने निर्माण केलेले, सूर्याप्रमाणे तेजस्वी, चंद्राची कांती असणारे पुष्पक विमान सर्वांना दुरूनच दिसून आले. त्या वेळी हनुमान म्हणाला, "लोकहो, बघा. या विमानात वैदेहीसहित राम व लक्ष्मण हे वीर बंधू, कपिश्रेष्ठ सुग्रीव आणि मंत्र्यांसहित बिभीषण बसलेले दिसून येत आहेत." (७५-७८)

त्या वेळी स्त्रिया, बालके, तरुण आणि वृद्ध यांच्या तोंडून आनंदामुळे निर्माण झालेला "हे राम आले, हे राम आले" असा हा ध्वनी स्वर्गाला जाऊन भिडला. (७९)

रथ, हत्ती, घोडे यांवर बसून आलेले लोक खाली उतरून जमिनीवर उभे राहिले. विमानात बसलेले राम त्या लोकांना आकाशातील चंद्राप्रमाणे दिसले. (८०)

त्यानंतर अतिशय आनंदित झालेल्या भरताने आपले हात जोडून रामांकडे तोंड करून वर पाहिले. तेव्हा विमानाच्या अग्रभागी बसलेले राघव भरताला मेरु पर्वतावरील सूर्याप्रमाणे दिसले. आनंदपूर्वक नम्र होऊन भरताने श्रीरामांना वंदन केले. त्यानंतर रामांच्या अनुज्ञेने ते विमान जमिनीवर खाली उतरले. (८१-८२)

त्यानंतर धाकटा भाऊ शत्रुघ्नासह भरताला रामांनी त्या विमानात घेतले. रामांजवळ गेल्यावर आनंदित झालेल्या भरताने रामांना पुनः वंदन केले. (८३)

बऱ्याच काळानंतर भेटलेल्या भरताला रघुनंदनांनी स्वतःच्याजवळ बसवून त्याला आनंदाने आलिंगन दिले. (८४)

त्यानंतर प्रेमाने विव्हल झालेल्या भरताने लक्ष्मणाची भेट घेतली आणि स्वतःचे नाव उच्चारित आनंदित झालेल्या भरताने जानकीला अभिवादन केले. (८५)

नंतर सुग्रीव, जांबवंत, युवराज अंगद, तसेच मैंद, द्विविद, नील आणि ऋषभ यांनाही भरताने आलिंगन दिले. (८६)

तसेच सुषेण, नल, गवाक्ष, गंधमादन, शरभ आणि पनस यांनाही भरताने आलिंगन दिले. (८७)

अशा प्रकारे भरताकडून आदर दाखविल्या गेलेल्या त्या सौम्य व आनंदित झालेल्या वानरांनी मनुष्य रूप धारण करून भरताला त्याचे कुशल विचारले. (८८)

ततः सुग्रीवमालिङ्ग्य भरतः प्राह भक्तितः ।
त्वत्सहायेन रामस्य जयोऽभूद्रावणो हतः ॥ ८९ ॥

त्वमस्माकं चतुर्णां तु भ्राता सुग्रीव पञ्चमः ।
शत्रुघ्नश्च तदा राममभिवाद्य सलक्ष्मणम् ॥ ९० ॥

सीतायाश्चरणौ पश्चाद्ववन्दे विनयान्वितः ।
रामो मातरमासाद्य विवर्णां शोकविह्वलाम् ॥ ९१ ॥

जग्राह प्रणतः पादौ मनो मातुः प्रसादयन् ।
कैकेयीं च सुमित्रां च ननामेतरमातरौ ॥ ९२ ॥

भरतः पादुके ते तु राघवस्य सुपूजिते ।
योजयामास रामस्य पादयोर्भक्तिसंयुतः ॥ ९३ ॥

राज्यमेतन्न्यासभूतं मया निर्यातितं तव ।
अद्य मे सफलं जन्म फलितो मे मनोरथः ॥ ९४ ॥

यत्पश्यामि समायातमयोध्यां त्वामहं प्रभो ।
कोष्ठागारं बलं कोशं कृतं दशगुणं मया ॥ ९५ ॥

त्वत्तेजसा जगन्नाथ पालयस्व पुरं स्वकम् ।
इति ब्रुवाणं भरतं दृष्ट्वा सर्वे कपीश्वराः ॥ ९६ ॥

मुमुचुर्नेत्रजं तोयं प्रशशंसुर्मुदान्विताः ।
ततो रामः प्रहृष्टात्मा भरतं स्वाङ्गगं मुदा ॥ ९७ ॥

ययौ तेन विमानेन भरतस्याश्रमं तदा ।
अवरुह्य तदा रामो विमानाग्र्यान्महीतलम् ॥ ९८ ॥

अब्रवीत्पुष्पकं देवो गच्छ वैश्रवणं वह ।
अनुगच्छानुजानामि कुबेरं धनपालकम् ॥ ९९ ॥

रामो वसिष्ठस्य गुरोः पदाम्बुजं
नत्वा यथा देवगुरोः शतक्रतुः ।
दत्त्वा महार्हासनमुत्तमं गुरो-
रुपाविवेशाथ गुरोः समीपतः ॥ १०० ॥

त्यानंतर सुग्रीवाला आलिंगन देऊन, भरताने प्रेमपूर्वक म्हटले, " हे सुग्रीवा, तुझ्या सहाय्यामुळे रामांचा जय झाला आणि रावण मारला गेला. म्हणून हे सुग्रीवा, आम्हा चौघा भावांचा तू पाचवा भाऊ झाला आहेस." मग शत्रुघ्नाने विनयपूर्वक लक्ष्मणासह रामांना वंदन केले आणि त्यानंतर त्याने सीतेच्या चरणांना वंदन केले. शोकाने विव्हल आणि निस्तेज व कृश झालेल्या कौसल्या मातेजवळ जाऊन, रामांनी अतिशय नम्रपणाने तिच्या पायांना वंदन करून तिचे मन प्रसन्न केले. नंतर कैकेयी आणि सुमित्रा या इतर मातांना त्यांनी नमस्कार केला. (८९-९२)

इतका काळ आदरपूर्वक व चांगल्या प्रकारे पूजिलेल्या रामांच्या त्या पादुका भरताने भक्तिपूर्वक रामांच्या पायांत घातल्या. (९३)

(आणि मग भरत रामांना म्हणाला,) " हे रामा, माझ्याजवळ इतके दिवस ठेव म्हणून असलेले हे राज्य आज मी तुम्हांला परत करीत आहे. हे प्रभो, अयोध्येत परत आलेल्या तुम्हाला मी आज पाहात आहे; यामुळे आज माझा जन्म सफल झाला आहे आणि माझे मनोरथ आज पूर्ण झाले आहेत, हे जगन्नाथा, तुमच्या प्रतापामुळे या राज्याची कोठारे, सैन्य, कोश हे माझ्याकडून दहापट केले गेले आहेत. आता तुम्ही स्वतःच या तुमच्या नगरीचे व राज्याचे पालन करा." अशा प्रकारे बोलणाऱ्या भरताला पाहून सर्व वानर श्रेष्ठांनी डोळ्यांतून आनंदाचे अश्रू ढाळले आणि आनंदित मनाने त्यांनी भरताची प्रशंसा केली. त्यानंतर प्रसन्न चित्ताने रामांनी भरताला पुनः आपल्याजवळ घेतले आणि त्याच विमानाने राम आनंदपूर्वक भरताच्या आश्रमाकडे गेले. तेथे त्या उत्तम विमानातून राम जमिनीवर उतरले आणि पुष्पक विमानास म्हणाले की, "जा, मी तुला आज्ञा देतो. आता यानंतर तू धनपालक कुबेराची सेवा कर आणि त्याला वाहून नेत जा." (९४-९९)

त्यानंतर इंद्र ज्या प्रमाणे देवगुरू बृहस्पतीला वंदन करतो, त्या प्रमाणे रामांनी वसिष्ठ गुरूंच्या चरणकमळांना नमन केले आणि त्यांना एक अतिशय उत्तम बहुमूल्य आसन देऊन, नंतर राम स्वतः गुरूंच्याजवळ बसले. (१००)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे युद्धकाण्डे चतुर्दशः सर्गः ॥ १४ ॥

पञ्चदश सर्ग

श्रीरामांचा राज्याभिषेक

श्रीमहादेव उवाच

ततस्तु कैकयीपुत्रो भरतो भक्तिसंयुतः ।
शिरस्यञ्जलिमाधाय ज्येष्ठं भ्रातरमब्रवीत् ॥ १ ॥

माता मे सत्कृता राम दत्तं राज्यं त्वया मम ।
ददामि तत्ते च पुनर्यथा त्वमददा मम ॥ २ ॥

इत्युक्त्वा पादयोर्भक्त्या साष्टाङ्गं प्रणिपत्य च ।
बहुधा प्रार्थयामास कैकेय्या गुरुणा सह ॥ ३ ॥

तथेति प्रतिजग्राह भरताद्राज्यमीश्वरः ।
मायामाश्रित्य सकलां नरचेष्टामुपागतः ॥ ४ ॥

स्वाराज्यानुभवो यस्य सुखज्ञानैकरूपिणः ।
निरस्तातिशयानन्दरूपिणः परमात्मनः ॥ ५ ॥

मानुषेण तु राज्येन किं तस्य जगदीशितुः ।
यस्य भ्रूभङ्गमात्रेण त्रिलोकी नश्यति क्षणात् ॥ ६ ॥

यस्यानुग्रहमात्रेण भवन्त्याखण्डलश्रियः ।
लीलासृष्टमहासृष्टेः कियदेतद्रमापतेः ॥ ७ ॥

तथापि भजतां नित्यं कामपूरविधित्सया ।
लीलामानुषदेहेन सर्वमप्यनुवर्तते ॥ ८ ॥

ततः शत्रुघ्नवचनान्निपुणः श्मश्रुकृन्तकः ।
सम्भाराश्चाभिषेकार्थमानीता राघवस्य हि ॥ ९ ॥

पूर्वं तु भरते स्नाते लक्ष्मणे च महात्मनि ।
सुग्रीवे वानरेन्द्रे च राक्षसेन्द्रे बिभीषणे ॥ १० ॥

विशोधितजटः स्नातश्चित्रमाल्यानुलेपनः ।
महार्हवसनोपेतस्तस्थौ तत्र श्रिया ज्वलन् ॥ ११ ॥

श्रीमहादेव म्हणाले– हे पार्वती, त्यानंतर भक्तिसंपन्न अशा कैकेयीपुत्र भरताने आपल्या मस्तकावर हात जोडून रामांना म्हटले. (१)

"हे रामा, तुम्ही मला राज्य दिले आणि त्यामुळे माझ्या मातेचे म्हणणे खरे झाले. जे तुम्ही माझ्या स्वाधीन केले होते ते राज्य मी तुम्हांला पुनः परत देत आहे." (२)

असे बोलून, रामांच्या पायांना भक्तीने साष्टांग प्रणिपात करून, त्याने कैकेयी आणि गुरू वसिष्ठ यांच्या सह राज्य स्वीकारण्यासाठी रामांना नाना प्रकारे प्रार्थना केली. (३)

तेव्हा आपल्या मायेचा आश्रय घेऊन सर्व प्रकारच्या मानवी क्रिया करण्यास प्रवृत्त झालेल्या रामांनी "ठीक आहे" असे म्हणून, भरताकडून राज्य परत घेतले. (४)

ज्या परमात्म्या रामांना स्वाराज्याचा (स्वात्मसुखाचा) सतत अनुभव होता, सुख, ज्ञान आणि निरतिशय आनंद हेच ज्यांचे स्वरूप आहे, अशा त्या जगाच्या ईश्वराला मानवी राज्याचा काय उपयोग होता ? ज्यांच्या केवळ भ्रूभंगाने एका क्षणात त्रैलोक्य नष्ट होते, केवळ लीलेने ही प्रचंड सृष्टी उत्पन्न होते, ज्यांच्या केवळ अनुग्रहामुळे इंद्राला राज्य-लक्ष्मीची ऐश्वर्ये प्राप्त होतात, त्या लक्ष्मीपती रामांना हे अयोध्येचे मानवी राज्य किती महत्त्वाचे असणार ? तथापि आपली भक्ती करणाऱ्यांच्या कामना सदैव पूर्ण करण्याच्या इच्छेने राम लीलेने धारण केलेल्या मनुष्य देहाचे द्वारा नेहमी सर्व प्रकारचा अभिनय करीत असतात. (८)

त्यानंतर शत्रुघ्नाच्या आज्ञेवरून कुशल न्हावी आणण्यात आला. तसेच राघवांच्या राज्याभिषेकासाठी आवश्यक ती सामग्री एकत्र केली गेली. (९)

प्रथम भरताने, नंतर महात्म्या लक्ष्मणाने, त्यानंतर वानरराज सुग्रीव आणि राक्षसराज बिभीषण यांनी स्नान केले. (१०)

रामांच्या जटा कापण्यात आल्या. नंतर त्यांनी स्नान केले. रंगीबेरंगी माळा धारण करणारे, उटी लावलेले, आणि अतिशय मौल्यवान वस्त्रे परिधान केलेले राम आपल्या कांतीने देदीप्यमान होऊन विराजमान झाले. (११)

प्रतिकर्म च रामस्य लक्ष्मणश्च महामतिः ।
कारयामास भरतः सीताया राजयोषितः ॥ १२ ॥

महार्हवस्त्राभरणैरलञ्चक्रुः सुमध्यमाम् ।
ततो वानरपत्नीनां सर्वासामेव शोभना ॥ १३ ॥

अकारयत कौसल्या प्रहृष्टा पुत्रवत्सला ।
ततः स्यन्दनमादाय शत्रुघ्नवचनात्सुधीः ॥ १४ ॥

सुमन्त्रः सूर्यसङ्काशं योजयित्वाग्रतः स्थितः ।
आरुरोह रथं रामः सत्यधर्मपरायणः ॥ १५ ॥

सुग्रीवो युवराजश्च हनुमांश्च बिभीषणः ।
स्नात्वा दिव्याम्बरधरा दिव्याभरणभूषिताः ॥ १६ ॥

राममन्वीयुरग्रे च रथाश्वगजवाहनाः ।
सुग्रीवपत्न्यः सीता च ययुर्यानैः पुरं महत् ॥ १७ ॥

वज्रपाणिर्यथा देवैर्हरिताश्वरथे स्थितः ।
प्रययौ रथमास्थाय तथा रामो महत्पुरम् ॥ १८ ॥

सारथ्यं भरतश्चक्रे रत्नदण्डं महाद्युतिः ।
श्वेतातपत्रं शत्रुघ्नो लक्ष्मणो व्यजनं दधे ॥ १९ ॥

चामरं च समीपस्थो न्यवीजयदरिन्दमः ।
शशिप्रकाशं त्वपरं जग्राहासुरनायकः ॥ २० ॥

दिविजैः सिद्धसङ्घैश्च ऋषिभिर्दिव्यदर्शनैः ।
स्तूयमानस्य रामस्य शुश्रुवे मधुरध्वनिः ॥ २१ ॥

मानुषं रूपमास्थाय वानरा गजवाहनाः ।
भेरीशङ्खनिनादैश्च मृदङ्गपणवानकैः ॥ २२ ॥

प्रययौ राघवश्रेष्ठस्तां पुरीं समलङ्कृताम् ।
ददृशुस्ते समायान्तं राघवं पुरवासिनः ॥ २३ ॥

त्यानंतर महाबुद्धिमान लक्ष्मण व भरत यांनी रामांना विभूषित केले. तसेच राजस्त्रियांनी सीतेला अतिशय मौल्यवान् वस्त्रे आणि अलंकार यांनी विभूषित केले. पुत्रवत्सल व शोभायमान अशा कौसल्येने आनंदपूर्वक सर्व वानरांच्या पत्नींचाही साज- शृंगार करवून घेतला. त्यानंतर शत्रुघ्नाच्या आज्ञेनुसार बुद्धिमान सुमंत्राने सूर्याप्रमाणे देदीप्यमान असा रथ सज्ज करून समोर आणला. तेव्हा सत्य धर्मपरायण राम त्या रथात चढले. (१२-१५)

त्या वेळी सुग्रीव, अंगद, हनुमान, बिभीषण स्नान करून दिव्य वस्त्रालंकारांनी विभूषित झाले. नंतर रथ, घोडे, हत्ती या वाहनांवर आरोहण करून ते रामांच्या मागे-पुढे चालू लागले,आणि पालख्यांत बसून सीता आणि सुग्रीवाच्या भार्या या त्या महान अयोध्या नगरीकडे निघाल्या. (१६-१७)

हिरवे घोडे जोडलेल्या रथात बसून ज्या प्रमाणे वज्रपाणी इंद्र देवांसह गमन करतो, त्या प्रमाणे राम हे रथात आरोहण करून मग महानगरीकडे निघाले. (१८)

महातेजस्वी भरताने रामांच्या सारथ्याचे काम स्वीकारले होते. रत्नजडित दांडा असणारे श्वेतछत्र शत्रुघ्नाने धरले होते, तर लक्ष्मणाने पंखा घेतला होता. (१९)

रामांजवळ उभे राहून शत्रुदमन सुग्रीव हा चंद्राप्रमाणे कांती असणारी एक चवरी ढाळीत होता, तर दुसऱ्या बाजूला उभे असणाऱ्या राक्षसराज बिभीषणाने तशीच चवरी धारण केली होती. (२०)

त्या वेळी रामांची स्तुती करणाऱ्या, दिव्य दर्शन असणाऱ्या, देव व सिद्धांचे समूह आणि ऋषी यांचा मधुर ध्वनी सर्वत्र ऐकू येत होता. (२१)

मनुष्यरूप धारण करून वानर हत्तींवर आरूढ झाले होते. अशा प्रकारे भेरी, शंख, मृदंग, पणव, आनक या वाद्यांच्या निनादात राघवश्रेष्ठ राम उत्तमप्रकारे शृंगारलेल्या त्या अयोध्यानगरीत गेले. तेव्हा त्या नगरवासी लोकांनी येणाऱ्या रामांना पाहिले. (२२-२३)

दूर्वादलश्यामतनुं महार्ह-
किरीटरत्नाभरणाञ्चिताङ्गम् ।
आरक्तकञ्जायतलोचनान्तं
दृष्ट्वा ययुर्मोदमतीव पुण्याः ॥ २४ ॥
विचित्ररत्नाञ्चितसूत्रनद्ध-
पीताम्बरं पीनभुजान्तरालम् ।
अनर्घ्यमुक्ताफलदिव्यहारै-
र्विरोचमानं रघुनन्दनं प्रजाः ॥ २५ ॥
सुग्रीवमुख्यैर्हरिभिः प्रशान्तै-
र्निषेव्यमाणं रवितुल्यभासम् ।
कस्तूरिकाचन्दनलिप्तगात्रं
निवीतकल्पद्रुमपुष्पमालम् ॥ २६ ॥
श्रुत्वा स्त्रियो राममुपागतं मुदा
प्रहर्षवेगोत्कलिताननश्रियः ।
अपास्य सर्वं गृहकार्यमाहितं
हर्म्याणि चैवारुरुहुः स्वलङ्कृताः ॥ २७ ॥
दृष्ट्वा हरिं सर्वहृत्सवाकृतिं
पुष्पैः किरन्त्यः स्मितशोभिताननाः ।
दृग्भिः पुनर्नेत्रमनोरसायनं
स्वानन्दमूर्तिं मनसाभिरेभिरे ॥ २८ ॥
रामः स्मितस्निग्धदृशा प्रजास्तथा
पश्यन्प्रजानाथ इवापरः प्रभुः ।
शनैर्जगामाथ पितुः स्वलङ्कृतं
गृहं महेन्द्रालयसन्निभं हरिः ॥ २९ ॥
प्रविश्य वेश्मान्तरसंस्थितो मुदा
रामो ववन्दे चरणौ स्वमातुः ।
क्रमेण सर्वाः पितृयोषितः प्रभु-
र्ननाम भक्त्या रघुवंशकेतुः ॥ ३० ॥

ततो भरतमाहेदं रामः सत्यपराक्रमः ।
सर्वसम्पत्समायुक्तं रामः मन्दिरमुत्तमम् ॥ ३१ ॥

मित्राय वानरेन्द्राय सुग्रीवाय प्रदीयताम् ।
सर्वेभ्यः सुखवासार्थं मन्दिराणि प्रकल्पय ॥ ३२ ॥

ज्यांचे शरीर दूर्वादलाप्रमाणे श्याम होते, अतिशय मौल्यवान अशा किरीट आणि रत्नजडित अलंकार यांनी ज्यांचे शरीर विभूषित झाले होते, ज्यांच्या डोळ्यांच्या कडा आरक्त कमळाप्रमाणे होत्या, रंगीबेरंगी रत्नांनी जडित असा सोन्याचा कंबरपट्टा ज्यांच्या पीतांबरावर बांधला होता, ज्यांचे वक्षःस्थळ विशाल व पुष्ट होते, मौल्यवान मोत्यांच्या दिव्य हारांनी जे शोभायमान झाले होते, अत्यंत शांत अशा सुग्रीव प्रमुख असणाऱ्या वानरांकडून ज्यांची सेवा केली जात होती, जे सूर्याप्रमाणे प्रकाशत होते, ज्यांच्या सर्वांगावर कस्तुरी व चंदन यांचा लेप लावलेला होता, ज्यांच्या कंठात कल्पवृक्षाच्या फुलांची माळ घातलेली होती, अशा त्या रघुनंदन रामांना पाहून पुण्यवान प्रजानन अतिशय आनंदित झाले. (२४-२६)

श्रीराम जवळ आले आहेत हे ऐकल्यावर, आनंदामुळे स्त्रियांच्या मुखाची कांती उज्ज्वल झाली आणि ज्या स्त्रिया घरकाम करण्यात गुंग होत्या, त्या सर्व कामे बाजूला सारून आणि स्वतः नटून-थटून रामांना पाहण्यासाठी आपल्या घरांच्या गच्च्यांवर चढून बसल्या. (२७)

सर्वांच्या डोळ्यांना आनंद देणारी अशी ज्यांची मूर्ती होती अशा त्या रामांना पाहिल्यावर, ज्यांच्या मुखावर स्मित झळकत होते, अशा त्या स्त्रियांनी रामांवर फुलांचा वर्षाव केला आणि डोळे व मन यांना आनंद देणाऱ्या व स्वानंदाची मूर्ती असणाऱ्या रामांना नेत्रांनी हृदयात घेऊन, त्यांनी त्यांना मनाने आलिंगन दिले. (२८)

त्यानंतर जणू दुसरा प्रजापती असणारे प्रभू राम स्मितयुक्त मनोहर दृष्टीने प्रजाजनाकडे पाहात, सावकाशपणे व्यवस्थित सजविलेल्या, इंद्रभवनाप्रमाणे असणाऱ्या, आपल्या पित्याच्या राजभवनाकडे गेले. (२९)

राजभवनात प्रवेश केलेल्या रामांनी आनंदपूर्वक आपल्या मातेच्या चरणांना वंदन केले; त्यानंतर रघुवंश-केतू प्रभू रामांनी भक्तिपूर्वक आपल्या अन्य मातांना क्रमाने नमस्कार केला. (३०)

मग सत्यपराक्रमी राम भरताला म्हणाले, "सर्व प्रकारच्या संपदांनी युक्त असा माझा उत्कृष्ट महाल माझा मित्र जो वानरराज सुग्रीव याला दे. तसेच इतर सर्वांनाही सुखाने राहाता यावे म्हणून चांगले महाल देण्याची व्यवस्था कर." (३१-३२)

रामेणैवं समादिष्टो भरतश्च तथाकरोत् ।
उवाच च महातेजाः सुग्रीवं राघवानुजः ॥ ३३ ॥

राघवस्याभिषेकार्थं चतुःसिन्धुजलं शुभम् ।
आनेतुं प्रेषयस्वाशु दूतांस्त्वरितविक्रमान् ॥ ३४ ॥

प्रेषयामास सुग्रीवो जाम्बवन्तं मरुत्सुतम् ।
अङ्गदं च सुषेणं च ते गत्वा वायुवेगतः ॥ ३५ ॥

जलपूर्णान् शातकुम्भकलशांश्च समानयन् ।
आनीतं तीर्थसलिलं शत्रुघ्नो मन्त्रिभिः सह ॥ ३६ ॥

राघवस्याभिषेकार्थं वसिष्ठाय न्यवेदयत् ।
ततस्तु प्रयतो वृद्धो वसिष्ठो ब्राह्मणैः सह ॥ ३७ ॥

रामं रत्नमये पीठे ससीतं संन्यवेशयत् ।
वसिष्ठो वामदेवश्च जाबालिर्गौतमस्तथा ॥ ३८ ॥

वाल्मीकिश्च तथा चक्रुः सर्वे रामाभिषेचनम् ।
कुशाग्रतुलसीयुक्तपुण्यगन्धजलैर्मुदा ॥ ३९ ॥

अभ्यषिञ्चन् रघुश्रेष्ठं वासवं वसवो यथा ।
ऋत्विग्भिर्ब्राह्मणैः श्रेष्ठैः कन्याभिः सह मन्त्रिभिः ॥ ४० ॥

सर्वौषधिरसैश्चैव दैवतैर्नभसि स्थितैः ।
चतुर्भिर्लोकपालैश्च स्तुवद्भिः सगणैस्तथा ॥ ४१ ॥

छत्रं च तस्य जग्राह शत्रुघ्नः पाण्डुरं शुभम् ।
सुग्रीवराक्षसेन्द्रौ तौ दधतुः श्वेतचामरे ॥ ४२ ॥

मालां च काञ्चनीं वायुर्ददौ वासवचोदितः ।
सर्वरत्नसमायुक्तं मणिकाञ्चनभूषितम् ॥ ४३ ॥

ददौ हारं नरेन्द्राय स्वयं शक्रस्तु भक्तितः ।
प्रजगुर्देवगन्धर्वा ननृतुश्चाप्सरोगणाः ॥ ४४ ॥

देवदुन्दुभयो नेदुः पुष्पवृष्टिः पपात खात् ।
नवदूर्वादलश्यामं पद्मपत्रायतेक्षणम् ॥ ४५ ॥

रामांनी अशी आज्ञा दिल्यावर भरताने तशी व्यवस्था केली. नंतर महातेजस्वी भरताने सुग्रीवाला म्हटले. (३३)

"राघवांच्या अभिषेकासाठी चार समुद्रांतून पवित्र पाणी आणण्यासाठी शीघ्रगामी दूतांना तू त्वरित पाठवून दे." (३४)

तेव्हा सुग्रीवाने जांबवंत, हनुमान, अंगद आणि सुषेण यांना पाठवून दिले. ते वायुवेगाने गेले आणि सुवर्णकलश पाण्याने भरून घेऊन आले. त्यांनी आणलेले तीर्थ-जल मंत्र्यांसह शत्रुघ्नाने राघवांच्या राज्याभिषेकासाठी वसिष्ठाजवळ नेले. त्यानंतर ब्राह्मणांना बरोबर घेऊन, वयोवृद्ध इंद्रियजयी अशा वसिष्ठांनी सीतेसह रामांना रत्नमय सिंहासनावर बसविले. नंतर वसिष्ठ, वामदेव, जाबाली, गौतम तसेच वाल्मीकी या सर्वांनी आनंदपूर्वक दर्भ आणि तुळशीपत्रे यांनी युक्त अशा पावन व सुगंधी जलांनी रामांवर अभिषेक केला. (३५-३९)

वसूनावाच्या देवांनी ज्या प्रमाणे इंद्रावर अभिषेक केला होता, त्या प्रमाणे ऋत्विज, श्रेष्ठ ब्राह्मण, कन्या आणि मंत्री यांच्यासह त्या वसिष्ठ इत्यादी महर्षींनी आकाशात असणारे देव आणि चार लोकपाल आपापल्या गणांसह रामांची स्तुती करीत असताना, सर्व औषधींच्या रसांनी रघुश्रेष्ठ रामांवर अभिषेक केला. (४०-४१)

त्या वेळी शत्रुघ्नाने श्रीरामांच्या मस्तकावर पवित्र व सुंदर असे श्वेत छत्र धरले होते. तर सुग्रीव व राक्षसराज बिभीषण या दोघांनी पांढऱ्या चवऱ्या धरल्या होत्या. (४२)

इंद्राच्या प्रेरणेमुळे वायूने रामांना सोन्याची माला दिली. स्वतः इंद्रानेसुद्धा भक्तिपूर्वक महाराज रामांना सर्व प्रकारच्या रत्नांनी युक्त आणि मणी व सुवर्ण यांनी सुशोभित असा हार दिला. देव आणि गंधर्व गायन करू लागले. अप्सरांचे समूह नृत्य करू लगाले. (४३-४४)

देवांच्या दुंदुभी वाजू लागल्या. आकाशातून रामांवर पुष्पवृष्टी झाली. नवीन दूर्वादलाप्रमाणे

रविकोटिप्रभायुक्तकिरीटेन विराजितम् ।
कोटिकन्दर्पलावण्यं पीताम्बरसमावृतम् ॥ ४६ ॥

दिव्याभरणसम्पन्नं दिव्यचन्दनलेपनम् ।
अयुतादित्यसङ्काशं द्विभुजं रघुनन्दनम् ॥ ४७ ॥

वामभागे समासीनां सीतां काञ्चनसन्निभाम् ।
सर्वाभरणसम्पन्नां वामाङ्के समुपस्थिताम् ॥ ४८ ॥

रक्तोत्पलकराम्भोजां वामेनालिङ्ग्य संस्थितम् ।
सर्वातिशयशोभाढ्यं दृष्ट्वा भक्तिसमन्वितः ॥ ४९ ॥

उमया सहितो देवः शङ्करो रघुनन्दनम् ।
सर्वदेवगणैर्युक्तः स्तोतुं समुपचक्रमे ॥ ५० ॥

श्रीमहादेव उवाच

नमोऽस्तु रामाय सशक्तिकाय
नीलोत्पलश्यामलकोमलाय ।
किरीटहाराङ्गदभूषणाय
सिंहासनस्थाय महाप्रभाय ॥ ५१ ॥

त्वमादिमध्यान्तविहीन एकः
सृजस्यवस्यत्सि च लोकजातम् ।
स्वमायया तेन न लिप्यसे त्वं
यत्स्वे सुखेऽजस्रतोऽनवद्यः ॥ ५२ ॥

लीलां विधत्से गुणसंवृतस्त्वं
प्रपन्नभक्तानुविधानहेतोः ।
नानावतारैः सुरमानुषाद्यैः
प्रतीयसे ज्ञानिभिरेव नित्यम् ॥ ५३ ॥

स्वांशेन लोकं सकलं विधाय तं
बिभर्षि च त्वं तदधः फणीश्वरः ।
उपर्यथो भान्वनिलोडुपौषधि-
प्रवर्षरूपोऽवसि नैकधा जगत् ॥ ५४ ॥

श्यामवर्ण; कमल-पत्राप्रमाणे दीर्घ नयन असणारे, कोट्यवधी सूर्याप्रमाणे प्रकाशमान असणाऱ्या किरीटाने सुशोभित, कोट्यवधी मदनाप्रमाणे लावण्य- सौंदर्य-असणारे, पीतांबर परिधान केलेले, दिव्य अलंकारांनी सजलेले, दिव्य चंदनाची उटी लावलेले, हजारो सूर्याप्रमाणे तेजस्वी, सुंदर बाहू असणारे असे ते रघुनंदन राम होते. त्यांच्या डाव्या बाजूला सुवर्णवर्ण सीता बसलेली होती. सर्व अलंकारांनी युक्त असणाऱ्या तसेच आपल्या करकमलात रक्तकमल धारण करणाऱ्या आणि डाव्या मांडीवर बसलेल्या सीतेला रामांनी डाव्या हाताने धरलेले होते. अशा उत्कृष्ट शोभेने संपन्नअसणाऱ्या रघुनंदनांना पाहिल्यावर, देवांनी शंकर व पार्वतीसह भक्तिपूर्वक रामांची स्तुती करण्यास प्रारंभ केला. (४५-५०)

श्रीमहादेव म्हणाले– "नील कमलाप्रमाणे श्यामल व कोमल शरीर असणाऱ्या, किरीट, हार व बाहु-भूषणे हे अलंकार धारण करणाऱ्या आणि आपल्या सीता या शक्तीसह सिंहासनावर बसलेल्या महातेजस्वी रामांना नमस्कार असो. (५१)

हे रामा, तुम्ही आदी, मध्य आणि अंत यांनी रहित आहात. तुम्ही अद्वितीय आहात. स्वतःच्या मायेच्या योगाने तुम्ही सर्व लोकांची उत्पत्ती, रक्षण आणि नाश करता; तथापि त्या कर्मांनी तुम्ही लिप्त होत नाही. कारण तुम्ही निर्दोष असून नेहमी स्वतःच्या आनंदात मग्न असता. (५२)

शरण आलेल्या भक्तांना मार्ग दाखविण्याच्या हेतूने तुम्ही आपल्या मायेच्या गुणांनी आवृत होऊन, देव, मानव इत्यादी नाना अवतार धारण करून अनेक लीला करता. तरी त्या त्या वेळी तुमचे स्वरूप हे नेहमी ज्ञानी लोकांच्या प्रत्ययाला येत असते. (५३)

स्वतःच्या अंशाने हे सर्व जग निर्माण करून, तुम्हीच शेष नाग होऊन हे जग खालच्या बाजूने धारण करता. तसेच सूर्य, वायू, चंद्र, औषधी आणि पर्जन्य यांची रूपे धारण करून, त्याचे पालन करता. तुम्ही वरून आणि खालून या जगाचे नाना प्रकारांनी रक्षण करता. (५४)

त्वमिह देहभृतां शिखिरूपः
पचसि भुक्तमशेषमजस्रम् ।
पवनपञ्चकरूपसहायो
जगदखण्डमनेन बिभर्षि ॥ ५५ ॥

या जगात देहधारी प्राण्यांमध्ये जठरातील अग्निरूप होऊन, प्राण, अपान इत्यादी पाच प्राणांच्या सहाय्याने तुम्ही प्राण्यांनी खाल्लेले संपूर्ण अन्न सतत पचवीत असता. अशा प्रकारे तुम्ही सर्वदा संपूर्ण जगाचे धारण करता. (५५)

चन्द्रसूर्यशिखिमध्यगतं यत्
तेज ईश चिदशेषतनूनाम् ।
प्राभवत्तनुभृतामिव धैर्यं
शौर्यमायुरखिलं तव सत्त्वम् ॥ ५६ ॥

हे ईश्वरा, चंद्र, सूर्य आणि अग्नी यांच्या ठिकाणी जे तेज आहे, प्राण्यांच्या सर्व शरीरात जे चैतन्य आहे, त्याचप्रमाणे देहधारी प्राण्यांच्या ठिकाणी जे धैर्य, शौर्य, आयुष्य आहे, ते सर्व म्हणजे तुमच्या अस्तित्वाचा प्रभाव आहे. (५६)

त्वं विरिञ्चिशिवविष्णुविभेदात्
कालकर्मशशिसूर्यविभागात् ।
वादिनां पृथगिवेश विभासि
ब्रह्म निश्चितमनन्यदिहैकम् ॥ ५७ ॥

हे ईश्वरा, तुम्ही ब्रह्मदेव, शिव आणि विष्णू या भेदांनी तसेच काल, कर्म, चंद्र व सूर्य या विभागांमुळे जणू वेगळे आहात असे तुमच्या स्वरूपाविषयी वादविवाद करणाऱ्या लोकांना भासते. तरी एकमेव अद्वितीय ब्रह्म हे तुमच्यापेक्षा वेगळे नाही ही गोष्ट निश्चित. (५७)

मत्स्यादिरूपेण यथा त्वमेकः
श्रुतौ पुराणेषु च लोकसिद्धः ।
तथैव सर्वं सदसद्विभाग-
स्त्वमेव नान्यद्भवतो विभाति ॥ ५८ ॥

तुम्ही एकट्यानेच मत्स्य इत्यादी अवतारांच्या रूपांत अवतार घेतला होता, ही गोष्ट ज्या प्रमाणे श्रुती, पुराणे आणि जग यांमध्ये प्रसिद्ध आहे, त्या प्रमाणेच सर्व सत् आणि असत् हा विभाग तुम्हीच आहात. तुमच्यापेक्षा वेगळे असे काहीही व कुठेही दिसून येत नाही. (५८)

यद्यत्समुत्पन्नमनन्तसृष्टा-
वुत्पत्स्यते यच्च भवच्च यच्च ।
न दृश्यते स्थावरजङ्गमादौ
त्वया विनातः परतः परस्त्वम् ॥ ५९ ॥

या स्थावर जंगमात्मक अनंत सृष्टीमध्ये जे जे काही (भूतकाळात) उत्पन्न झाले आहे, जे जे काही (भविष्यकाळी) उत्पन्न होणार आहे, तसेच जे जे आत्ता उत्पन्न होत आहे, ते ते सर्व तुमच्याखेरीज अन्य काही आहे, असे दिसून येत नाही. म्हणून तुम्ही परापेक्षा म्हणजे प्रकृती इत्यादीपेक्षा पर म्हणजे श्रेष्ठ आहात. (५९)

तत्त्वं न जानन्ति परात्मनस्ते
जनाः समस्तास्तव माययातः ।
त्वद्भक्तसेवामलमानसानां
विभाति तत्त्वं परमेकमेशम् ॥ ६० ॥

तुमच्या मायेमुळे मोहित झालेले समस्त जन हे तुमचे- परमात्म्याचे- खरे स्वरूप जाणत नाहीत. म्हणून तुमच्या भक्तांची सेवा केल्यामुळे ज्यांचे मन शुद्ध झाले आहे, अशा लोकांनाच तुमचे एकमेव, अद्वितीय, श्रेष्ठ, खरे ईश्वरी स्वरूप समजून येते. (६०)

ब्रह्मादयस्ते न विदुः स्वरूपं
चिदात्मतत्त्वं बहिरर्थभावाः ।
ततो बुधस्त्वामिदमेव रूपं
भक्त्या भजन्मुक्तिमुपैत्यदुःखः ॥ ६१ ॥

बाह्य विषयांवर ज्यांचे प्रेम आहे अशा ब्रह्मदेव इत्यादी देवांना हे तुमचे चिदात्म- स्वरूपाचे ज्ञान नाही, (मग इतर लोकांबद्दल काय सांगावे?) म्हणून बुद्धिमान लोक तुमच्या याच सगुण श्यामसुंदर स्वरूपाचे भक्तिपूर्वक भजन करून, दुःखरहित होऊन, अनायास मुक्ती प्राप्त करून घेतात. (६१)

अहं भवन्नाम गृणन्कृतार्थो
वसामि काश्यामनिशं भवान्या ।
मुमूर्षमाणस्य विमुक्तयेऽहं
दिशामि मन्त्रं तव राम नाम ॥ ६२ ॥

इमं स्तवं नित्यमनन्यभक्त्या
शृण्वन्ति गायन्ति लिखन्ति ये वै ।
ते सर्वसौख्यं परमं च लब्ध्वा
भवत्पदं यान्तु भवत्प्रसादात् ॥ ६३ ॥

इन्द्र उवाच

रक्षोऽधिपेनाखिलदेवसौख्यं
हृतं च मे ब्रह्मवरेण देव ।
पुनश्च सर्वं भवतः प्रसादात्
प्राप्तं हतो राक्षसदुष्टशत्रुः ॥ ६४ ॥

देवा ऊचुः

हृता यज्ञभागा धरादेवदत्ता
मुरारे खलेनादिदैत्येन विष्णो ।
हतोऽद्य त्वया नो वितानेषु भागाः
पुरावद्भविष्यन्ति युष्मत्प्रसादात् ॥ ६५ ॥

पितर ऊचुः

हतोऽद्य त्वया दुष्टदैत्यो महात्मन्
गयादौ नरैर्दत्तपिण्डादिकान्नः ।
बलादत्ति हत्वा गृहीत्वा समस्ता-
निदानीं पुनर्लब्धसत्त्वा भवामः ॥ ६६ ॥

यक्षा ऊचुः

सदा विधिकर्मण्यनेनाभियुक्ता
वहामो दशास्यं बलाद्दुःखयुक्ताः ।
दुरात्मा हतो रावणो राघवेश
त्वया ते वयं दुःखजाताद्विमुक्ताः ॥ ६७ ॥

गन्धर्वा ऊचुः

वयं सङ्गीतनिपुणा गायन्तस्ते कथामृतम् ।
आनन्दामृतसन्दोहयुक्ताः पूर्णाः स्थिताः पुरा ॥ ६८ ॥

तुमच्या नावाचा उच्चार केल्यामुळे मी कृतार्थ होऊन पार्वतीसहित काशीमध्ये रात्रंदिवस राहात असतो आणि हे रामा, मरणोन्मुख माणसांना मुक्ती मिळावी म्हणून मी त्यांना तुमच्या 'राम' या तारक मंत्राचा उपदेश करीत असतो. (६२)

(आता तुम्हाला माझी प्रार्थना आहे की) ही मी केलेली तुमची स्तुती जे लोक अनन्य भक्तीने नित्य ऐकतील, गातील अथवा लिहितील, ते तुमच्या कृपाप्रसादामुळे संपूर्ण परमानंद प्राप्त करून घेऊन, अंती तुमच्या पदाप्रत जावोत." (६३)

इंद्र म्हणाला– "हे देवा, ब्रह्मदेवांकडून वर मिळाल्यामुळे राक्षसराज रावणाने माझे संपूर्ण देवोचित सौख्य हरण करून घेतले होते. आता तो दुष्ट शत्रू रावण ठार झाला आहे. तुमच्या कृपाप्रसादामुळे ते सर्व सुख मला पुनः प्राप्त झाले आहे." (६४)

देव म्हणाले– "हे मुरारे, विष्णो, पृथ्वीवरील ब्राह्मणांनी आम्हाला दिलेले यज्ञातील भाग तो दुष्ट दैत्य रावण हरण करून नेत असे. तो आता तुमच्याकडून मारला गेला आहे. तेव्हा तुमच्या कृपाप्रसादामुळे आता ते यज्ञांतील भाग आम्हांला पूर्वीप्रमाणे मिळू लागतील." (६५)

पितर म्हणाले– "हे महात्मन्, गया इत्यादी ठिकाणी माणसांनी आमच्यासाठी दिलेले पिंड इत्यादी अन्न बळजबरीने घेऊन आणि आम्हा सर्वांना मारून, तो दुष्ट दैत्य रावण खात असे. आता तो तुमच्याकडून मारला गेला आहे. आता आमचा भाग आम्हांला मिळाल्यावर आम्ही पुनः आमचे सामर्थ्य प्राप्त करून घेऊ." (६६)

यक्ष म्हणाले– "आम्ही नेहमी या रावणाकडून बळजबरीने वेठीला धरले जात होतो. तसेच आम्हांला त्याच्या पालखी इत्यादीस जुंपल्यामुळे आम्ही मोठ्या दुःखाने त्याला वाहून नेत होतो. हे राघवेशा, आता तो दुरात्मा रावण तुमच्याकडून मारला गेला आहे. म्हणून आम्ही सर्व दुःखांतून मुक्त झालो आहोत." (६७)

गंधर्व म्हणाले– "संगीतात निपुण असे आम्ही पूर्वी तुमच्या कथामृताचे गायन करीत आनंदरूपी अमृताच्या डोहात बुडवून मग्न होऊन राहात होतो. (६८)

पश्चाद्दुरात्मना राम रावणेनाभिविद्रुताः ।
तमेव गायमानाश्च तदाराधनतत्पराः ॥ ६९ ॥

स्थितास्त्वया परित्राता हतोऽयं दुष्टराक्षसः ।
एवं महोरगाः सिद्धाः किन्नरा मरुतस्तथा ॥ ७० ॥

वसवो मुनयो गावो गुह्यकाश्च पतत्त्रिणः ।
सप्रजापतयश्चैते तथा चाप्सरसां गणाः ॥ ७१ ॥

सर्वे रामं समासाद्य दृष्ट्वा नेत्रमहोत्सवम् ।
स्तुत्वा पृथक् पृथक् सर्वे राघवेणाभिवन्दिताः ॥ ७२ ॥

ययुः स्वं स्वं पदं सर्वे ब्रह्मरुद्रादयस्तथा ।
प्रशंसन्तो मुदा रामं गायन्तस्तस्य चेष्टितम् ॥ ७३ ॥

ध्यायन्तस्त्वभिषेकार्द्रं सीतालक्ष्मणसंयुतम् ।
सिंहासनस्थं राजेन्द्रं ययुः सर्वे हृदि स्थितम् ॥ ७४ ॥

खे वाद्येषु ध्वनत्सु प्रमुदितहृदयै-
र्देववृन्दैः स्तुवद्भि-
र्वर्षद्भिः पुष्पवृष्टिं दिवि मुनिनिकरै-
रीड्यमानः समन्तात् ।
रामः श्यामः प्रसन्नस्मितरुचिरमुखः
सूर्यकोटिप्रकाशः
सीतासौमित्रिवातात्मजमुनिहरिभिः
सेव्यमानो विभाति ॥ ७५ ॥

त्यानंतर हे रामा, त्या दुरात्म्या रावणाने आम्हांला जिंकून घेतले म्हणून आम्ही त्याचेच गुणगान करीत, त्याच्याच आराधनेत तत्पर होऊन राहिलो. आता तो दुष्ट राक्षस तुमच्याकडून मारला गेल्यामुळे तुम्हीच आमचे रक्षण केले आहे." अशाच प्रकारे प्रजापतिसह मोठे नाग, सिद्ध, किन्नर, मरुत, वसू, मुनी, गाई, गुह्यक, पक्षी आणि अप्सरांचे समूह हे सर्वजण रामांजवळ आले आणि डोळ्यांना आनंद देणाऱ्या रामांना पाहून ते त्यांची निरनिराळ्या प्रकारे स्तुती करू लागले. त्यानंतर राघवांकडून वंदन केले गेलेले ते सर्वजण आपापल्या स्थानी निघून गेले. मग ब्रह्मदेव आणि महादेव इत्यादींनी आनंदाने रामांची प्रशंसा करीत, त्यांच्या लीलांचे गायन करीत-करीत आणि सिंहासनावर बसलेल्या, अभिषेकाने आर्द्र अशा राजराजेश्वर श्रीरामचंद्रांचे आणि सीता व लक्ष्मण यांच्यासह हृदयात विराजमान असणाऱ्या राजश्रेष्ठ रामांचे ध्यान करीत ते सर्वजण निघून गेले. (६९-७४)

त्या वेळी आकाशात वाद्ये वाजविली जात होती. आनंदित मनाने स्तुती करणारे स्वर्गातील देवांचे समूह पुष्पवृष्टी करीत होते. सर्व बाजूंनी मुनींचे समुदाय रामाची स्तुती करीत होते. कोटिसूर्याप्रमाणे प्रकाशमान असणारा आणि प्रसन्न स्मिताने मनोहर मुख असणारा श्यामवर्णी, आणि सीता, लक्ष्मण, हनुमान्, मुनी आणि वानर यांच्याकडून सेविले जाणारे श्रीराम हे अतिशय शोभून दिसत होते. (७५)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे युद्धकाण्डे पंचदशः सर्गः ॥ १५ ॥

षोडश सर्ग

वानरांना निरोप आणि ग्रंथाची प्रशंसा

श्रीमहादेव उवाच

रामेऽभिषिक्ते राजेन्द्रे सर्वलोकसुखावहे ।
वसुधा सस्यसम्पन्ना फलवन्तो महीरुहाः ॥ १ ॥

गन्धहीनानि पुष्पाणि गन्धवन्ति चकाशिरे ।
सहस्रशतमश्वानां धेनूनां च गवां तथा ॥ २ ॥

श्रीमहादेव म्हणाले– हे पार्वती, सर्व लोकांना सुख देणाऱ्या राजश्रेष्ठ श्रीरामांचा राज्याभिषेक झाल्यावर, पृथ्वी ही धान्याने संपन्न झाली आणि वृक्ष फलयुक्त झाले. (१)

जी फुले गंधरहित होती, ती सुगंधी होऊन शोभून दिसू लागली. राज्याभिषेकानंतर सर्व प्रथम रघुनंदनांनी एक लक्ष घोडे, एक लक्ष धेनू आणि शेकडो बैल ब्राह्मणांना दान

ददौ शतवृषान्पूर्वं द्विजेभ्यो रघुनन्दनः ।
त्रिंशत्कोटी सुवर्णस्य ब्राह्मणेभ्यो ददौ पुनः ॥ ३ ॥

वस्त्राभरणरत्नानि ब्राह्मणेभ्यो मुदा तथा ।
सूर्यकान्तिसमप्रख्यां सर्वरत्नमयीं स्रजम् ॥ ४ ॥

सुग्रीवाय ददौ प्रीत्या राघवो भक्तवत्सलः ।
अङ्गदाय ददौ दिव्ये ह्यङ्गदे रघुनन्दनः ॥ ५ ॥

चन्द्रकोटिप्रतीकाशं मणिरत्नविभूषितम् ।
सीतायै प्रददौ हारं प्रीत्या रघुकुलोत्तमः ॥ ६ ॥

अवमुच्यात्मनः कण्ठाद्धारं जनकनन्दिनी ।
अवैक्षत हरीन्सर्वान् भर्तारं च मुहुर्मुहुः ॥ ७ ॥

रामस्तामाह वैदेहीमिङ्गितज्ञो विलोकयन् ।
वैदेहि यस्य तुष्टासि देहि तस्मै वरानने ॥ ८ ॥

हनूमते ददौ हारं पश्यतो राघवस्य च ।
तेन हारेण शुशुभे मारुतिर्गौरवेण च ॥ ९ ॥

रामोऽपि मारुतिं दृष्ट्वा कृताञ्जलिमुपस्थितम् ।
भक्त्या परमया तुष्ट इदं वचनमब्रवीत् ॥ १० ॥

हनूमंस्ते प्रसन्नोऽस्मि वरं वरय काङ्क्षितम् ।
दास्यामि देवैरपि यदुर्लभं भुवनत्रये ॥ ११ ॥

हनूमानपि तं प्राह नत्वा रामं प्रहृष्टधीः ।
त्वन्नाम स्मरतो राम न तृप्यति मनो मम ॥ १२ ॥

अतस्त्वन्नाम सततं स्मरन् स्थास्यामि भूतले ।
यावत्स्थास्यति ते नाम लोके तावत्कलेवरम् ॥ १३ ॥

मम तिष्ठतु राजेन्द्र वरोऽयं मेऽभिकाङ्क्षितः ।
रामस्तथेति तं प्राह मुक्तस्तिष्ठ यथासुखम् ॥ १४ ॥

कल्पान्ते मम सायुज्यं प्राप्स्यसे नात्र संशयः ।
तमाह जानकी प्रीता यत्र कुत्रापि मारुते ॥ १५ ॥

म्हणून दिले. तसेच पुनः त्यांनी त्यांना तीस कोटी सुवर्ण मुद्रा दिल्या. (२-३)

तसेच रामांनी ब्राह्मणांना आनंदपूर्वक वस्त्रे, अलंकार आणि रत्ने दिली. त्यानंतर सूर्याच्या कांतीप्रमाणे तेजस्वी, सर्व रत्नांनी गुंफलेली एक माळ भक्तवत्सल राघवांनी प्रेमपूर्वक सुग्रीवाला दिली. तसेच रघुनंदनांनी दोन दिव्य बाहूभूषणे अंगदाला दिली. (४-५)

नंतर कोटिचंद्राप्रमाणे तेज असणारा आणि मणी व रत्ने यांनी विभूषित असा एक हार रघुकुलश्रेष्ठांनी प्रीतिपूर्वक सीतेला दिला. (६)

स्वतःच्या गळ्यातील तो हार उतरवून जनकनंदिनी सीता आपले पती आणि सर्व वानर यांच्याकडे वारंवार पाहू लागली. (७)

तिच्या मनातील भाव ओळखून जानकीकडे पाहात श्रीराम तिला म्हणाले, "हे सुंदरमुखी वैदेही, तू ज्याच्यावर संतुष्ट असशील, त्याला तू हा हार दे." (८)

त्या वेळी राघवांच्या देखतच, सीतेने तो हार हनुमंताला दिला. त्या हारामुळे आणि झालेल्या गौरवाने मारुती शोभून दिसू लागला. (९)

हात जोडून जवळच उभ्या असणाऱ्या मारुतीकडे पाहून, त्याच्या सर्वश्रेष्ठ भक्तीने संतुष्ट झालेले श्रीरामसुद्धा त्याला म्हणाले. (१०)

"हे हनुमाना, मी तुझ्यावर प्रसन्न आहे. तू इच्छित वर मागून घे. त्रैलोक्यात देवांनासुद्धा जे दुर्लभ असेल ते मी तुला देईन." (११)

अतिशय आनंदित झालेल्या हनुमानानेसुद्धा रामांना नमस्कार करून म्हटले, "हे रामा, तुमच्या नामाचे स्मरण करताना माझे मन तृप्तच होत नाही. (१२)

म्हणून तुमच्या नावाचे सतत स्मरण करीत मी या भूतलावर राहावे, अशी माझी इच्छा आहे. जोपर्यंत या जगात तुमचे नाव टिकून राहील, तोपर्यंत माझे शरीर टिकून राहो. हे राजेंद्रा, हा माझा इच्छित वर आहे." "ठीक आहे." असे म्हणून रामांनी त्याला सांगितले. "जीवन्मुक्त स्थितीत तू या जगात तुझ्या इच्छेप्रमाणे सुखाने राहा. (१३-१४)

नंतर कल्पाच्या शेवटी तुला माझे सायुज्य प्राप्त होईल, यात संशय नाही." त्यानंतर जानकी प्रीतिपूर्वक त्याला म्हणाली, "हे मारुती, तू जेथे कोठेही असशील तेथे सर्व भोग हे माझ्या आज्ञेने तुला प्राप्त होतील." त्या दोन्हीही

स्थितं त्वामनुयास्यन्ति भोगाः सर्वे ममाज्ञया ।
इत्युक्तो मारुतिस्ताभ्यामीश्वराभ्यां प्रहृष्टधीः ॥ १६ ॥

आनन्दाश्रुपरीताक्षो भूयो भूयः प्रणम्य तौ ।
कृच्छ्राद्ययौ तपस्तप्तुं हिमवन्तं महामतिः ॥ १७ ॥

ततो गुहं समासाद्य रामः प्राञ्जलिमब्रवीत् ।
सखे गच्छ पुरं रम्यं शृङ्गवेरमनुत्तमम् ॥ १८ ॥

मामेव चिन्तयन्नित्यं भुङ्क्ष्व भोगान्निजार्जितान् ।
अन्ते ममैव सारूप्यं प्राप्स्यसे त्वं न संशयः ॥ १९ ॥

इत्युक्त्वा प्रददौ तस्मै दिव्यान्याभरणानि च ।
राज्यं च विपुलं दत्त्वा विज्ञानं च ददौ विभुः ॥ २० ॥

रामेणालिङ्गितो हृष्टो ययौ स्वभवनं गुहः ।
ये चान्ये वानराः श्रेष्ठा अयोध्यां समुपागताः ॥ २१ ॥

अमूल्याभरणैर्वस्त्रैः पूजयामास राघवः ।
सुग्रीवप्रमुखाः सर्वे वानराः सविभीषणाः ॥ २२ ॥

यथार्हं पूजितास्तेन रामेण परमात्मना ।
प्रहृष्टमनसः सर्वे जग्मुरेव यथागतम् ॥ २३ ॥

सुग्रीवप्रमुखाः सर्वे किष्किन्धां प्रययुर्मुदा ।
बिभीषणस्तु सम्प्राप्य राज्यं निहतकण्टकम् ॥ २४ ॥

रामेण पूजितः प्रीत्या ययौ लङ्कामनिन्दितः ।
राघवो राज्यमखिलं शशासाखिलवत्सलः ॥ २५ ॥

अनिच्छन्नपि रामेण यौवराज्येऽभिषेचितः ।
लक्ष्मणः परया भक्त्या रामसेवापरोऽभवत् ॥ २६ ॥

रामस्तु परमात्मापि कर्माध्यक्षोऽपि निर्मलः ।
कर्तृत्वादिविहीनोऽपि निर्विकारोऽपि सर्वदा ॥ २७ ॥

ईश्वरांनी असे सांगितल्यावर, मारुतीचे मन अतिशय आनंदित झाले. (१५-१६)

त्याच्या डोळ्यांत आनंदाश्रू भरून आले होते. मारुतीने त्या दोघांना वारंवार प्रणाम केला आणि मग मोठ्या कष्टाने तो महाबुद्धिमान तपश्चर्या करण्यासाठी हिमालय पर्वताकडे निघून गेला. (१७)

त्यानंतर हात जोडून उभे असणाऱ्या गुहाजवळ जाऊन राम त्याला म्हणाले, "अरे मित्रा, तू अतिशय उत्तम आणि रम्य अशा तुझ्या शृंगवेर नगराकडे परत जा. (१८)

आणि तेथे माझे चिंतन करीत, तू स्वतःच संपादन केलेले भोग भोगत राहा. शेवटी तुला माझेच सारूप्य प्राप्त होणार, यात संशय नाही." (१९)

असे सांगून रामांनी त्याला दिव्य अलंकार दिले. त्याला विशाल राज्य देऊन, सामर्थ्यसंपन्न अशा रामांनी आत्मज्ञानाचा उपदेशही केला. (२०)

त्यानंतर रामांनी त्याला आलिंगन दिले. गुह आनंदित झाला आणि तो घरी परत गेला. त्यानंतर जे इतर श्रेष्ठ वानर अयोध्येत आले होते, त्यांना अमूल्य अलंकार आणि वस्त्रे देऊन राघवांनी त्यांचा सत्कार केला. बिभीषणासकट, सुग्रीवादी वानरांचा त्यांच्या योग्यतेनुसार परमात्म्या रामांनी सत्कार केला, तेव्हा आनंदित मनाने ते सर्वजण आपापल्या स्थानी परत गेले. (२१-२३)

सुग्रीवादी सर्व वानर आनंदाने किष्किंधेकडे गेले. निष्कंटक राज्य प्राप्त करून घेऊन, आणि रामांकडून आदर सत्कार घेऊन, पुण्यशील बिभीषण आनंदाने लंकेकडे निघून गेला. इकडे सर्वांवर वात्सल्य करणारे राघव आपल्या संपूर्ण राज्याचे पालन करू लागले. (२४-२५)

नंतर लक्ष्मणाची इच्छा नसतानाही रामांनी त्याला यौवराज्यपदावर अभिषेक केला. अतिशय भक्तीने लक्ष्मण रामांची सेवा करण्यात तत्पर झाला. (२६)

जरी राम परमात्मा, कार्यांचे अध्यक्ष, निर्मळ स्वरूप, कर्तृत्व इत्यादींनी रहित, सर्वदा निर्विकार, आणि स्वतःच्या आनंदात संतुष्ट होते, तरीसुद्धा लोकांना उपदेश

स्वानन्देनापि तुष्टः सन् लोकानामुपदेशकृत् ।
अश्वमेधादियज्ञैश्च सर्वैर्विपुलदक्षिणैः ॥ २८ ॥

अयजत्परमानन्दो मानुषं वपुराश्रितः ।
न पर्यदेवन्विधवा न च व्यालकृतं भयम् ॥ २९ ॥

न व्याधिजं भयं चासीद्रामे राज्यं प्रशासति ।
लोके दस्युभयं नासीदनर्थो नास्ति कश्चन ॥ ३० ॥

वृद्धेषु सत्सु बालानां नासीन्मृत्युभयं तथा ।
रामपूजापराः सर्वे सर्वे राघवचिन्तकाः ॥ ३१ ॥

ववर्षुर्जलदास्तोयं यथाकालं यथारुचि ।
प्रजाः स्वधर्मनिरता वर्णाश्रमगुणान्विताः ॥ ३२ ॥

औरसानिव रामोऽपि जुगोप पितृवत्प्रजाः ।
सर्वलक्षणसंयुक्तः सर्वधर्मपरायणः ॥ ३३ ॥

दर्शवर्षसहस्राणि रामो राज्यमुपास्त सः ॥ ३४ ॥
इदं रहस्यं धनधान्यऋद्धिम-
दीर्घायुरारोग्यकरं सुपुण्यदम् ।
पवित्रमाध्यात्मिकसंज्ञितं पुरा
रामायणं भाषितमादिशम्भुना ॥ ३५ ॥
शृणोति भक्त्या मनुजः समाहितो
भक्त्या पठेद्वा परितुष्टमानसः ।
सर्वाः समाप्नोति मनोगताशिषो
विमुच्यते पातककोटिभिः क्षणात् ॥ ३६ ॥
रामाभिषेकं प्रयतः शृणोति यो
धनाभिलाषी लभते महद्धनम् ।
पुत्राभिलाषी सुतमार्यसम्मतं
प्राप्नोति रामायणमादितः पठन् ॥ ३७ ॥
शृणोति योऽध्यात्मिकरामसंहितां
प्राप्नोति राजा भुवमृद्धसम्पदम् ।
शत्रून्विजित्यारिभिरप्रधर्षितो
व्यपेतदुःखो विजयी भवेन्नृपः ॥ ३८ ॥

करण्यासाठी, परमानंदस्वरूप अशा रामांनी मानवी शरीराचा आश्रय घेऊन, विपुल दक्षिणांनी युक्त असे सर्व अश्वमेध इत्यादी यज्ञ केले. राम आपले राज्य चालवीत असताना, कधी विधवा स्त्रियांचे क्रंदन ऐकू आले नाही. सापामुळे होणारे भय नव्हते, रोगांपासून निर्माण होणारी भीती नव्हती, लोकांना लुटारूंचे भय नव्हते, कोणताही अनर्थ येत नव्हता, तसेच वृद्ध माणसे जिवंत असताना लहान बालकांना मृत्यूचे भय नव्हते. सर्व लोक रामांच्या पूजेत तत्पर होते. सर्व लोक राघवांचे चिंतन करीत होते. योग्यकाळी आणि लोकांच्या इच्छेप्रमाणे मेघ पाण्याची वृष्टी करीत होते. स्वतःचा वर्ण आणि आश्रम यांच्या गुणांनी युक्त असणारी प्रजा स्वतःच्या धर्मात मग्न होती. (२७-३२)

स्वतः श्रीरामसुद्धा आपल्या प्रजेचे पित्याप्रमाणे पालन करीत असत. सर्व शुभ लक्षणांनी युक्त आणि सर्व धर्मात परायण अशा श्रीरामांनी दहा हजार वर्षे राज्य केले. (३३-३४)

धन, धान्य आणि वैभव देणारे, दीर्घ आयुष्य आणि आरोग्य देणारे, चांगले पुण्य देणारे, पवित्र, अध्यात्म हे नाव असणारे हे रहस्ययुक्त रामायण पूर्वी शंकरांनी पार्वतीला सांगितले होते. (३५)

जो मनुष्य एकाग्र मनाने भक्तिपूर्वक हे अध्यात्म रामायण ऐकतो किंवा संतुष्ट मनाने भक्तिपूर्वक वाचतो, तो मनातील सर्व इच्छांची पूर्ती करून घेतो आणि तो एका क्षणात कोट्यवधी पातकांतून मुक्त होऊन जातो. (३६)

द्रव्याची इच्छा करणारा जो माणूस एकाग्रतेने रामांच्या अभिषेकाचे वर्णन ऐकतो त्याला पुष्कळ धन प्राप्त होते. पुत्र- प्राप्तीची इच्छा करणाऱ्या माणसाने हे रामायण प्रारंभापासून वाचले, तर त्याला सज्जनांकडून मान्यता मिळणारा पुत्र प्राप्त होतो. (३७)

जो राजा ही आध्यात्मिक रामसंहिता (अध्यात्म -रामायण) ऐकतो त्याला धन- धान्य- ऐश्वर्य - संपन्न अशा पृथ्वीचे राज्य प्राप्त होते. शत्रूंना जिंकून आणि शत्रूंचा हल्ला न होता, तो राजा दुःखरहित होऊन विजयी होतो. (३८)

स्त्रियोऽपि शृण्वन्त्यधिरामसंहितां
भवन्ति ता जीविसुताश्च पूजिताः ।
वन्ध्यापि पुत्रं लभते सुरूपिणं
कथामिमां भक्तियुता शृणोति या ॥ ३९ ॥

श्रद्धान्वितो यः शृणुयात्पठेन्नरो
विजित्य कोपं च तथा विमत्सरः ।
दुर्गाणि सर्वाणि विजित्य निर्भयो
भवेत्सुखी राघवभक्तिसंयुतः ॥ ४० ॥

सुराः समस्ता अपि यान्ति तुष्टतां
विघ्नाः समस्ता अपयान्ति शृण्वताम् ।
अध्यात्मरामायणमादितो नृणां
भवन्ति सर्वा अपि सम्पदः पराः ॥ ४१ ॥

रजस्वला वा यदि रामतत्परा
शृणोति रामायणमेतदादितः ।
पुत्रं प्रसूते ऋषभं चिरायुषं
पतिव्रता लोकसुपूजिता भवेत् ॥ ४२ ॥

पूजयित्वा तु ये भक्त्या नमस्कुर्वन्ति नित्यशः ।
सर्वैः पापैर्विनिर्मुक्ता विष्णोर्यान्ति परं पदम् ॥ ४३ ॥

अध्यात्मरामचरितं कृत्स्नं शृण्वन्ति भक्तितः ।
पठन्ति वा स्वयं वक्त्रात्तेषां रामः प्रसीदति ॥ ४४ ॥

राम एव परं ब्रह्म तस्मिंस्तुष्टेऽखिलात्मनि ।
धर्मार्थकाममोक्षाणां यद्यदिच्छति तद्भवेत् ॥ ४५ ॥

श्रोतव्यं नियमेनैतद्रामायणमखण्डितम् ।
आयुष्यमारोग्यकरं कल्पकोट्यघनाशनम् ॥ ४६ ॥

देवाश्च सर्वे तुष्यन्ति ग्रहाः सर्वे महर्षयः ।
रामायणस्य श्रवणे तृप्यन्ति पितरस्तथा ॥ ४७ ॥

ज्या स्त्रियांसुद्धा आध्यात्मिक रामसंहिता म्हणजे हे अध्यात्म रामायण ऐकतात, त्यांची मुले चिरकाल जगतात, आणि त्यांचा मानसन्मान होतो आणि जी वंध्या स्त्री भक्तीने युक्त होऊन ही अध्यात्म रामायणातील कथा ऐकते, तिला सुंदर पुत्र प्राप्त होतो. (३९)

क्रोधाला जिंकून आणि मत्सररहित होऊन तसेच श्रद्धायुक्त होऊन जो माणूस हे अध्यात्म रामायण ऐकतो किंवा वाचतो, तो सर्व संकटांवर मात करून, भयरहित, सुखी आणि श्रीरामांवरील भक्तीने संपन्न होतो. (४०)

जी माणसे हे अध्यात्मरामायण प्रारंभापासून ऐकतात त्यांच्यावर सर्व देव संतुष्ट होऊन जातात, त्यांची सर्व विघ्ने दूर पळून जातात आणि त्यांना सर्वश्रेष्ठ संपदा प्राप्त होतात. (४१)

रामांच्या ठिकाणी मन जडवून जर एखाद्या रजस्वला स्त्रीने शुद्धीनंतर पाचव्या दिवसापासून सोळाव्या दिवसापर्यंत हे अध्यात्मरामायण पहिल्यापासून ऐकले, तर ती दीर्घायुषी उत्तम पुत्राला जन्म देते आणि लोकांकडून पतिव्रता म्हणून तिचा सम्मान होतो. (४२)

जे कोणी लोक दररोज भक्तीने अध्यात्म-रामायणाची पूजा करून त्याला नमस्कार करतात, ते लोक सर्व पातकांतून मुक्त होऊन विष्णूच्या श्रेष्ठ पदी जातात. (४३)

जे पुरुष भक्तीने हे अध्यात्मरामचरित संपूर्णपणे ऐकतात किंवा स्वतःच्या मुखाने त्याचे पठण करतात, त्यांच्यावर राम प्रसन्न होतात. (४४)

राम हेच परब्रह्म आहेत. ते सर्वात्मा राम संतुष्ट झाले असताना, धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांतील जी जी इच्छा एखाद्या माणसाला होईल, ती ती इच्छा फलद्रूप होईल. (४५)

आयुष्य आणि आरोग्य देणारे आणि कोट्यवधी कल्पातील पापांचा नाश करणारे हे अध्यात्म रामायण नियमाने खंड न पाडता ऐकत राहावे. (४६)

अध्यात्म रामायणाच्या श्रवणामुळे सर्व देव, सर्व ग्रह आणि सर्व महर्षी संतुष्ट होतात, तसेच सर्व पितरही तृप्त होतात. (४७)

अध्यात्मरामायणमेतदद्भुतं
वैराग्यविज्ञानयुतं पुरातनम् ।
पठन्ति शृण्वन्ति लिखन्ति ये नरा-
स्तेषां भवेऽस्मिन्न पुनर्भवो भवेत् ॥ ४८ ॥

वैराग्य आणि विज्ञान यांनी युक्त असे हे प्राचीन, अद्‌भुत अध्यात्म रामायण जे पुरुष वाचतात अथवा ऐकतात किंवा लिहून काढतात, त्यांना या संसारात पुनर्जन्म प्राप्त होत नाही. (४८)

आलोड्याखिलवेदराशिमसकृ-
द्यत्तारकं ब्रह्म तद्-
रामो विष्णुरहस्यमूर्तिरिति यो
विज्ञाय भूतेश्वरः ।
उद्धृत्याखिलसारसङ्ग्रहमिदं
संक्षेपतः प्रस्फुटं
श्रीरामस्य निगूढतत्त्वमखिलं
प्राह प्रियायै भवः ॥ ४९ ॥

संपूर्ण वेद- राशींचे वारंवार मंथन करून, भूतनाथ अशा शंकरांनी 'जे तारक ब्रह्म आहे, ते रामच आहे,' 'राम हाच विष्णूची गुप्त मूर्ती आहे ' असे जाणून घेतले, आणि नंतर सर्व वेदांचे सार संग्रहरूपाने एकत्र करून, शंकरांनी या ग्रंथाद्वारे श्रीरामांचे संपूर्ण गूढ तत्त्व स्पष्टपणाने पार्वतीला संक्षेपाने सांगितले. (४९)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे युद्धकाण्डे षोडशः सर्गः ॥ १६ ॥

युद्धकाण्ड समाप्त

ॐ

अध्यात्मरामायण

उत्तरकाण्ड

प्रथम सर्ग

भगवान रामांकडे अगस्ती इत्यादी मुनीश्वर येतात आणि रावण इत्यादी राक्षसांचे पूर्वचरित्र ऐकवतात

जयति रघुवंशतिलकः कौसल्याहृदयनन्दनो रामः ।
दशवदननिधनकारी दाशरथिः पुण्डरीकाक्षः ॥ १ ॥

पार्वत्युवाच

अथ रामः किमकरोत्कौसल्यानन्दवर्धनः ।
हत्वा मृधे रावणादीन् राक्षसान्भीमविक्रमः ॥ २ ॥

अभिषिक्तस्त्वयोध्यायां सीतया सह राघवः ।
मायामानुषतां प्राप्य कति वर्षाणि भूतले ॥ ३ ॥

स्थितवान् लीलया देवः परमात्मा सनातनः ।
अत्यजन्मानुषं लोकं कथमन्ते रघूद्वहः ॥ ४ ॥

एतदाख्याहि भगवन् श्रद्दधत्या मम प्रभो ।
कथापीयूषमास्वाद्य तृष्णा मेऽतीव वर्धते ।
रामचन्द्रस्य भगवन् ब्रूहि विस्तरशः कथाम् ॥ ५ ॥

श्रीमहादेव उवाच

राक्षसानां वधं कृत्वा राज्ये राम उपस्थिते ।
आययुर्मुनयः सर्वे श्रीराममभिवन्दितुम् ॥ ६ ॥

विश्वामित्रोऽसितः कण्वो दुर्वासा भृगुरङ्गिराः ।
कश्यपो वामदेवोऽत्रिस्तथा सप्तर्षयोऽमलाः ॥ ७ ॥

अगस्त्यः सह शिष्यैश्च मुनिभिः सहितोऽभ्यगात् ।
द्वारमासाद्य रामस्य द्वारपालमथाब्रवीत् ॥ ८ ॥

ब्रूहि रामाय मुनयः समागत्य बहिःस्थिताः ।
अगस्त्यप्रमुखाः सर्वे आशीर्भिरभिनन्दितुम् ॥ ९ ॥

कौसल्येच्या हृदयाला आनंद देणारे, रावणाचा वध करणारे, कमळाप्रमाणे डोळे असणारे, रघुवंशाचे तिलक असणारे दशरथपुत्र श्रीराम यांचा विजय असो. (१)

पार्वती म्हणाली – कौसल्येचा आनंद वाढविणाऱ्या, महापराक्रमी श्रीरामांनी युद्धामध्ये रावण इत्यादी राक्षसांचा वध केला; नंतर सीतेसह रामांवर अयोध्या नगरीत राज्याभिषेक झाला. त्यानंतर त्यांनी कोणते कार्य केले ? सनातन परमात्मा देव श्रीराम लीलेने मायेचे द्वारा मनुष्य-रूप धारण करून किती वर्षे या भूतलावर राहिले? तसेच शेवटी त्या रघूत्तमांनीं मनुष्य-लोक कोणत्या प्रकारे सोडला ? (२-४)

हे प्रभो, श्रद्धायुक्त असणाऱ्या मला तुम्ही हे सर्व सांगा. हे भगवन, श्रीरामांच्या कथामृताचा आस्वाद घेतल्यामुळे ती कथा पुढे ऐकण्याची माझी इच्छा अतिशय वाढत आहे. म्हणून ती कथा तुम्ही मला विस्ताराने कथन करा. (५)

श्रीमहादेव म्हणाले– राक्षसांचा वध केल्यानंतर, श्रीराम हे राज्यावर विराजमान झाले तेव्हा, सर्व मुनी श्रीरामांना अभिवादन करण्यास तेथे आले. (६)

विश्वामित्र, असित, कण्व, दुर्वास, भृगू, अंगिरा, कश्यप, वामदेव, अत्री तसेच निर्मळ स्वभावाचे सप्तर्षी, आणि आपले शिष्य व इतर मुनी यांच्यासह अगस्त्य मुनी तेथे आले. राजवाड्याच्या द्वाराजवळ आल्यावर अगस्त्य, रामांच्या द्वारपालाला म्हणाले. (७-८)

"अगस्त्य इत्यादी सर्व मुनी हे आशीर्वाद देऊन श्रीरामांचे अभिनंदन करण्यासाठी आले असून, ते बाहेर उभे आहेत, असे तू त्यांना सांग." (९)

प्रतीहारस्ततो राममगस्त्यवचनाद् द्रुतम् ।
नमस्कृत्याब्रवीद्वाक्यं विनयावनतः प्रभुम् ॥ १० ॥

कृताञ्जलिरुवाचेदमगस्त्यो मुनिभिः सह ।
देव त्वद्दर्शनार्थाय प्राप्तो बहिरुपस्थितः ॥ ११ ॥

तमुवाच द्वारपालं प्रवेशय यथासुखम् ।
पूजिता विविशुर्वेश्म नानारत्नविभूषितम् ॥ १२ ॥

दृष्ट्वा रामो मुनीन् शीघ्रं प्रत्युत्थाय कृताञ्जलिः ।
पाद्यार्घ्यादिभिरापूज्य गां निवेद्य यथाविधि ॥ १३ ॥

नत्वा तेभ्यो ददौ दिव्यान्यासनानि यथार्हतः ।
उपविष्टाः प्रहृष्टाश्च मुनयो रामपूजिताः ॥ १४ ॥

सम्पृष्टकुशलाः सर्वे रामं कुशलमब्रुवन् ।
कुशलं ते महाबाहो सर्वत्र रघुनन्दन ॥ १५ ॥

दिष्ट्येदानीं प्रपश्यामो हतशत्रुमरिन्दम ।
न हि भारः स ते राम रावणो राक्षसेश्वरः ॥ १६ ॥

सधनुस्त्वं हि लोकांस्त्रीन् विजेतुं शक्त एव हि ।
दिष्ट्या त्वया हताः सर्वे राक्षसा रावणादयः ॥ १७ ॥

सह्यमेतन्महाबाहो रावणस्य निबर्हणम् ।
असह्यमेतत्सम्प्राप्तं रावणेर्यन्निषूदनम् ॥ १८ ॥

अन्तकप्रतिमाः सर्वे कुम्भकर्णादयो मृधे ।
अन्तकप्रतिमैर्बाणैर्हतास्ते रघुसत्तम ॥ १९ ॥

दत्ता चेयं त्वयास्माकं पुरा ह्यभयदक्षिणा ।
हत्वा रक्षोगणान्सङ्ख्ये कृतकृत्योऽद्य जीवसि ॥ २० ॥

श्रुत्वा तु भाषितं तेषां मुनीनां भावितात्मनाम् ।
विस्मयं परमं गत्वा रामः प्राञ्जलिरब्रवीत् ॥ २१ ॥

तेव्हा अगस्त्यांचे वचन ऐकून द्वारपाल ताबडतोब रामांकडे गेला आणि त्यांना नमस्कार करून व नम्र होऊन म्हणाला. (१०)

"महाराज, तुमचे दर्शन घेण्यासाठी अनेक मुनींसह अगस्त्य ऋषी आले आहेत व ते बाहेर उभे आहेत." (११)

तेव्हा राम त्या द्वारपालाला म्हणाले, "त्यांना सन्मानाने आत घेऊन ये." नंतर सन्मानित झालेले ते मुनी नाना रत्नांनी विभूषित असणाऱ्या श्रीरामांच्या महालात प्रविष्ट झाले. (१२)

मुनींना पाहाताच राम हात जोडून चट्दिशी उठून उभे राहिले आणि पाद्य, अर्घ्य इत्यादींनी पूजा-सत्कार करून, त्यांनी यथाशास्त्र प्रत्येकाला एकेक गाय दान दिली. (१३)

तसेच त्यांनी नमस्कार करून, मुनींच्या योग्यतेप्रमाणे त्यांना दिव्य आसने दिली. श्रीरामांकडून सत्कार झाल्यावर ते मोठ्या आनंदाने त्या आसनांवर बसले. (१४)

श्रीरामांनी विचारल्यावर त्या सर्वांनी आपापले कुशल सांगितले. नंतर ते श्रीरामांना म्हणाले, "हे महाबाहो रघुनन्दना, सर्वत्र तुमचे कुशल आहे ना ? (१५)

हे शत्रुदमना, ही आनंदाची व भाग्याची गोष्ट आहे की तुम्हांला शत्रुरहित झालेले आम्ही पाहात आहोत. खरे सांगायचे झाले तर हे रामा, राक्षसराज रावण तुम्हांला फार भारी होता, असे मुळीच नव्हते. (१६)

कारण धनुष्य धारण करणारे तुम्ही तिन्ही लोक जिंकण्यास समर्थ आहातच. रावण इत्यादी सर्व राक्षसांचा तुमच्याकडून वध झाला, ही आनंदाची गोष्ट आहे. (१७)

हे महाबाहो, रावणाचा वध करणे ही गोष्ट तुलनेने तुम्हांला फार सोपी होती. परंतु रावणपुत्र मेघनादाचा वध करणे ही गोष्ट फारच कठीण होती. (१८)

कुंभकर्ण इत्यादी सर्व राक्षस युद्धामध्ये प्रत्यक्ष मृत्यूप्रमाणेच होते. हे रघुश्रेष्ठा, तुमच्या मृत्युतुल्य बाणांनी ते ठार मारले गेले. (१९)

तुम्ही आम्हांला अगोदरच ही अभयरूपी दक्षिणा दिलेली होती. शिवाय युद्धामध्ये राक्षसांच्या समुदायांना ठार मारून तुम्ही कृतकृत्य झाला आहात." (२०)

शुद्धचित्त अशा त्या मुनींचे ते भाषण ऐकल्यावर, राम अतिशय आश्चर्यचकित झाले आणि हात जोडून ते त्यांना म्हणाले. (२१)

रावणादीनतिक्रम्य कुम्भकर्णादिराक्षसान् ।
त्रिलोकजयिनो हित्वा किं प्रशंसथ रावणिम् ॥ २२ ॥

ततस्तद्वचनं श्रुत्वा राघवस्य महात्मनः ।
कुम्भयोनिर्महातेजा रामं प्रीत्या वचोऽब्रवीत् ॥ २३ ॥

शृणु राम यथा वृत्तं रावणे रावणस्य च ।
जन्म कर्म वरादानं सङ्क्षेपाद्वदतो मम ॥ २४ ॥

पुरा कृतयुगे राम पुलस्त्यो ब्रह्मणः सुतः ।
तपस्तप्तुं गतो विद्वान्मेरोः पार्श्वं महामतिः ॥ २५ ॥

तृणबिन्दोराश्रमेऽसौ न्यवसन्मुनिपुङ्गवः ।
तपस्तेपे महातेजाः स्वाध्यायनिरतः सदा ॥ २६ ॥

तत्राश्रमे महारम्ये देवगन्धर्वकन्यकाः ।
गायन्त्यो ननृतुस्तत्र हसन्त्यो वादयन्ति च ॥ २७ ॥

पुलस्त्यस्य तपोविघ्नं चक्रुः सर्वा अनिन्दिताः ।
ततः क्रुद्धो महातेजा व्याजहार वचो महत् ॥ २८ ॥

या मे दृष्टिपथं गच्छेत्सा गर्भं धारयिष्यति ।
ताः सर्वाः शापसंविग्ना न तं देशं प्रचक्रमुः ॥ २९ ॥

तृणबिन्दोस्तु राजर्षेः कन्या तत्राशृणोद्वचः ।
विचचार मुनेस्तस्य निर्भया तं प्रपश्यती ॥ ३० ॥

बभूव पाण्डुरतनुर्व्यञ्जितान्तःशरीरजा ।
दृष्ट्वा सा देहवैवर्ण्यं भीता पितरमन्वगात् ॥ ३१ ॥

तृणबिन्दुश्च तां दृष्ट्वा राजर्षिरमितद्युतिः ।
ध्यात्वा मुनिकृतं सर्वमवैद्विज्ञानचक्षुषा ॥ ३२ ॥

तां कन्यां मुनिवर्याय पुलस्त्याय ददौ पिता ।
तां प्रगृह्याब्रवीत्कन्यां बाढमित्येव स द्विजः ॥ ३३ ॥

शुश्रूषणपरां दृष्ट्वा मुनिः प्रीतोऽब्रवीद्वचः ।
दास्यामि पुत्रमेकं ते उभयोर्वंशवर्धनम् ॥ ३४ ॥

"त्रैलोक्याला जिंकणाऱ्या रावण इत्यादींना सोडून तसेच कुंभकर्ण इत्यादी राक्षसांना सोडून, तुम्ही रावण- पुत्र मेघनादाची प्रशंसा का बरे करीत आहात ?" (२२)

महात्म्या राघवांचे ते वचन ऐकल्यानंतर, महा-तेजस्वी अगस्त्य प्रेमपूर्वक रामांना म्हणाले. (२३)

"रामा, रावण आणि रावणपुत्र मेघनाद यांचा जन्म, कर्म तसेच त्यांना झालेली वरांची प्राप्ती ही सर्व हकीगत मी तुम्हांला संक्षेपाने सांगतो, ऐका. (२४)

हे रामा, पूर्वी कृतयुगात ब्रह्मदेवाचा पुत्र, महाबुद्धिमान विद्वान पुलस्त्य हा तपश्चर्या करण्यासाठी मेरू पर्वताच्या आसमंतात गेला. (२५)

तेथे तो मुनिश्रेष्ठ तृणबिंदूंच्या आश्रमात राहू लागला. आणि तो महातेजस्वी नेहमी स्वाध्यायात रत होऊन तप करू लागला. (२६)

तेथे त्या अतिशय रम्य आश्रमात देव आणि गंधर्व यांच्या कन्या एकदा गात, हसत व वाद्य वाजवीत नृत्य करू लागल्या. (२७)

त्या सर्व सुंदर कन्यांनी पुलस्त्याच्या तपात विघ्न निर्माण केले. तेव्हा तो महातेजस्वी पुलस्त्य रागावला आणि तो अतिशय कठोरपणे म्हणाला. (२८)

"जी कोणी कन्या माझ्या दृष्टिपथात येईल ती गर्भवती होईल." तेव्हा शापाने भ्यालेल्या त्या सर्व जणी त्या प्रदेशात पुन्हा आल्या नाहीत. (२९)

परंतु राजर्षी तृणबिंदूच्या कन्येने पुलस्त्याचे वचन ऐकले नव्हते. म्हणून ती एकदा निर्भयपणे त्यांच्याकडे पाहात त्याच्या समोरून फिरत होती. (३०)

तोच तिच्या शरीरात गर्भ राहिल्याची चिन्हे प्रकट होऊन तिच्या शरीरावर पांढरेपणा आला. आपल्या शरीराचा पांढरेपणा पाहून ती भीत भीत आपल्या पित्याकडे गेली. (३१)

तिला पाहून महातेजस्वी अशा राजर्षी तृणबिंदूने ध्यान केले आणि मग त्याला आपल्या ज्ञानदृष्टीने मुनींचे सर्व कृत्य कळून आले. (३२)

तेव्हा राजर्षींनी ती कन्या मुनिश्रेष्ठ पुलस्त्याला दिली. तेव्हा 'ठीक आहे' असे म्हणून त्या पुलस्त्य ब्राह्मणाने त्या कन्येचा स्वीकार केला. (३३)

आपली सेवा करण्यात ती तत्पर आहे हे पाहून प्रसन्न झालेला मुनी तिला म्हणाला, "आईकडील आणि पित्याकडील अशा दोन्ही वंशाची वृद्धी करणारा एक पुत्र मी तुला देईन. (३४)

ततः प्रासूत सा पुत्रं पुलस्त्याल्लोकविश्रुतम् ।
विश्रवा इति विख्यातःपौलस्त्यो ब्रह्मविन्मुनिः ॥ ३५ ॥

तस्य शीलादिकं दृष्ट्वा भरद्वाजो महामुनिः ।
भार्यार्थं स्वां दुहितरं ददौ विश्रवसे मुदा ॥ ३६ ॥

तस्यां तु पुत्रः सञ्जज्ञे पौलस्त्याल्लोकसम्मतः ।
पितृतुल्यो वैश्रवणो ब्रह्मणा चानुमोदितः ॥ ३७ ॥

ददौ तत्तपसा तुष्टो ब्रह्मा तस्मै वरं शुभम् ।
मनोऽभिलषितं तस्य धनेशत्वमखण्डितम् ॥ ३८ ॥

ततो लब्धवरः सोऽपि पितरं द्रष्टुमागतः ।
पुष्पकेण धनाध्यक्षो ब्रह्मदत्तेन भास्वता ॥ ३९ ॥

नमस्कृत्याथ पितरं निवेद्य तपसः फलम् ।
प्राह मे भगवान् ब्रह्मा दत्त्वा वरमनिन्दितम् ॥ ४० ॥

निवासाय न मे स्थानं दत्तवान्परमेश्वरः ।
ब्रूहि मे नियतं स्थानं हिंसा यत्र न कस्यचित् ॥ ४१ ॥

विश्रवा अपि तं प्राह लङ्का नाम पुरी शुभा ।
राक्षसानां निवासाय निर्मिता विश्वकर्मणा ॥ ४२ ॥

त्यक्त्वा विष्णुभयाद्दैत्या विविशुस्ते रसातलम् ।
सा पुरी दुष्प्रधर्षान्यैर्मध्येसागरमास्थिता ॥ ४३ ॥

तत्र वासाय गच्छ त्वं नान्यैः साधिष्ठिता पुरा ।
पित्रादिष्टस्त्वसौ गत्वा तां पुरीं धनदोऽविशत् ॥ ४४ ॥

स तत्र सुचिरं कालमुवास पितृसम्मतः ।
कस्यचित्त्वथ कालस्य सुमाली नाम राक्षसः ॥ ४५ ॥

रसातलान्मर्त्यलोकं चचार पिशिताशनः ।
गृहीत्वा तनयां कन्यां साक्षाद्देवीमिव श्रियम् ॥४६ ॥

त्यानंतर तिने पुलस्त्याचे द्वारा त्रिलोकविख्यात पुत्राला जन्म दिला. तो पौलस्त्य ब्रह्मवेत्ता आणि मुनी असून, तो विश्रवा या नावाने विख्यात झाला. (३५)

त्या विश्रव्याचे शील, स्वभाव इत्यादी पाहून महामुनी भरद्वाजांनी आनंदपूर्वक आपली मुलगी त्याला दिली. (३६)

पुलस्त्यपुत्र विश्रव्यापासून तिला लोकप्रसिद्ध असा एक पुत्र उत्पन्न झाला. तो वैश्रवण- विश्रव्याचा पुत्र- हा आपल्या पित्यासमान होता, ब्रह्मदेवांनाही तो प्रिय होता. त्याच्या तपाने संतुष्ट झालेल्या ब्रह्मदेवांनी त्याला एक उत्तम मनोवांछित वर दिला. त्यामुळे त्याला अखंड धनेश्वरत्व प्राप्त झाले. (३७-३८)

ब्रह्मदेवांकडून वर मिळालेला तो कुबेर धनाध्यक्ष झाला आणि ब्रह्मदेवानींच दिलेल्या तेजस्वी अशा पुष्पक नावाच्या विमानात बसून तो आपल्या पित्याला भेटण्यास आला. (३९)

पित्याला नमस्कार करुन आणि त्यांना आपल्या तपाचे फळ अर्पण करून तो म्हणाला, "तात, भगवान ब्रह्मदेवांनी मला अतिशय उत्तम वर दिलेला आहे. (४०)

परंतु त्यांनी मला राहाण्यासाठी कोणतेही स्थान दिलेले नाही. तेव्हा तुम्ही मला एखादे निश्चित स्थान सांगा की जेथे राहिल्यामुळे कुणाचीही हिंसा होणार नाही." (४१)

तेव्हा विश्रवा त्याला म्हणाला, "विश्वकर्म्याने राक्षसांना राहाण्यासाठी लंका नावाची सुंदर नगरी निर्माण केलेली आहे. (४२)

परंतु विष्णूच्या भीतीमुळे राक्षस ती नगरी सोडून रसातळात गेले आहेत. ती नगरी सागराच्या मध्ये वसलेली असल्यामुळे ती कुणाकडूनही आक्रांत केली जाणे फार कठीण आहे. (४३)

तू तेथे राहाण्यासाठी जा. या पूर्वी त्या नगरीवर कुणाचाही अधिकार नव्हता." पित्याने आज्ञा केल्यावर धनद कुबेर तेथे गेला आणि त्याने त्या नगरीत प्रवेश केला. (४४)

आपल्या पित्याच्या संमतीने तो तेथे बराच काळ राहिला. नंतर काही काळ गेल्यावर मांसभक्षक सुमाली नावाचा राक्षस साक्षात लक्ष्मी देवीप्रमाणे सुंदर असणाऱ्या आपल्या मुलीला घेऊन रसातळातून वर येऊन, मर्त्य लोकात संचार करू लागला. (४५-४६)

अपश्यद्धनदं देवं चरन्तं पुष्पकेण सः ।
हिताय चिन्तयामास राक्षसानां महामनाः ॥ ४७ ॥

उवाच तनयां तत्र कैकसीं नाम नामतः ।
वत्से विवाहकालस्ते यौवनं चातिवर्तते ॥ ४८ ॥

प्रत्याख्यानाच्च भीतैस्त्वं न वैरैर्गृह्यसे शुभे ।
सा त्वं वरय भद्रं ते मुनिं ब्रह्मकुलोद्भवम् ॥ ४९ ॥

स्वयमेव ततः पुत्रा भविष्यन्ति महाबलाः ।
ईदृशाः सर्वशोभाढ्या धनदेन समाः शुभे ॥ ५० ॥

तथेति साश्रमं गत्वा मुनेरग्रे व्यवस्थिता ।
लिखन्ती भुवमग्रेण पादेनाधोमुखी स्थिता ॥ ५१ ॥

तामपृच्छन्मुनिः का त्वं कन्यासि वरवर्णिनि ।
साब्रवीत्प्राञ्जलिर्ब्रह्मन् ध्यानेन ज्ञातुमर्हसि ॥ ५२ ॥

ततो ध्यात्वा मुनिः सर्वं ज्ञात्वा तां प्रत्यभाषत ।
ज्ञातं तवाभिलषितं मत्तः पुत्रानभीप्ससि ॥ ५३ ॥

दारुणायां तु वेलायामागतासि सुमध्यमे ।
अतस्ते दारुणौ पुत्रौ राक्षसौ सम्भविष्यतः ॥ ५४ ॥

साब्रवीन्मुनिशार्दूल त्वत्तोऽप्येवंविधौ सुतौ ।
तामाह पश्चिमो यस्ते भविष्यति महामतिः ॥ ५५ ॥

महाभागवतः श्रीमान् रामभक्त्येकतत्परः ।
इत्युक्ता सा तथा काले सुषुवे दशकन्धरम् ॥ ५६ ॥

रावणं विंशतिभुजं दशशीर्षं सुदारुणम् ।
तद्रक्षोजातमात्रेण चचाल च वसुन्धरा ॥ ५७ ॥

बभूवुर्नाशहेतूनि निमित्तान्यखिलान्यपि ।
कुम्भकर्णस्ततो जातो महापर्वतसन्निभः ॥ ५८ ॥

ततः शूर्पणखा नाम जाता रावणसोदरी ।
ततो बिभीषणो जातः शान्तात्मा सौम्यदर्शनः ॥ ५९ ॥

स्वाध्यायी नियताहारो नित्यकर्मपरायणः ।
कुम्भकर्णस्तु दुष्टात्मा द्विजान् सन्तुष्टचेतसः ॥ ६० ॥

कुबेर हा पुष्पक विमानातून फिरत आहे असे त्या सुमालीने एकदा पाहिले. तेव्हा त्या बुद्धिमान सुमालीने राक्षसांच्या हितासाठी विचार केला. (४७)

तो आपल्या कैकसी नावाच्या कन्येला म्हणाला, "मुली, तुझ्या विवाहाचा काळ आणि तारुण्याचा काळ व्यतीत होत आहे. हे कल्याणी, तू नकार देशील, यामुळे भ्यालेले वर तुला मागणी घालीत नाहीत. तेव्हा तू स्वतःच ब्रह्मदेवाच्या कुळात जन्मलेल्या विश्रवा मुनींना निवड. तुझे कल्याण होवो. (४८-४९)

हे शुभ लक्षणी मुली, त्यामुळे तुला अनायासेच महाबलवान् पुत्र होतील. ते पुत्र कुबेरासमान, सर्व शोभेने संपन्न असतील." "ठीक आहे" असे म्हणून विश्रवा मुनींच्या आश्रमात जाऊन, मुनींच्या पुढे उभी राहिली. त्यावेळी पायाच्या नखाग्राने जमिनीवर रेघा काढीत ती खाली तोंड करुन उभी राहिली. (५०-५१)

मुनींनी तिला विचारले, "हे सुंदरी, तू कोण आहेस आणि तू अविवाहित आहेस का ?" तेव्हा ती हात जोडून म्हणाली, "हे ब्रह्मन, आपण आपल्या ध्यानाच्या योगानेच माझ्याबद्दल जाणू शकाल." (५२)

तेव्हा ध्यान करून सर्व काही जाणून घेतल्यावर, त्या मुनींनी तिला प्रत्युत्तर दिले की, "तुझी अभिलाषा मला कळली आहे. माझ्याकडून तुला पुत्र व्हावेत, अशी तुझी इच्छा आहे. (५३)

परंतु हे सुंदरी, तू अगदी कुवेळी माझ्याकडे आली आहेस. म्हणून तुला क्रूर असे दोन राक्षसपुत्र होतील."(५४)

तेव्हा ती म्हणाली, "अहो मुनिश्रेष्ठ, तुमच्यापासून होणारे पुत्रसुद्धा क्रूर असतील काय ?" त्यावर मुनी तिला म्हणाले, "त्या दोघांच्या नंतर जो पुत्र तुला होईल तो मात्र महाबुद्धिमान, परम भगवद्भक्त, ऐश्वर्य संपन्न आणि फक्त रामाची भक्ती करण्यात तत्पर असेल." मुनींनी तिला असे सांगितल्यावर तिने योग्यवेळी दहा शिरे असणाऱ्या रावणाला जन्म दिला. त्याला वीस बाहू होते, दहा मस्तके होती, तो अतिशय भयंकर होता. तो जन्माला येताच पृथ्वी चळचळा कापली, आणि सर्वप्रकारचे नाश सुचविणारे अपशकुनसुद्धा त्या वेळी झाले. त्यानंतर प्रचंड पर्वताप्रमाणे असणारा कुंभकर्ण जन्माला आला. (५५-५८)

त्यानंतर शूर्पणखा नावाची रावणाची सख्खी बहीण जन्मली. पुढे विभीषण जन्माला आला. तो शांतचित्त असणारा, सौम्य दर्शनाचा, स्वाध्याय करणारा, नियत आहार घेणारा आणि नित्य कर्मांमध्ये तत्पर असा होता.

भक्षयन्नृषिसङ्घांश्च विचचारातिदारुणः ।
रावणोऽपि महासत्त्वो लोकानां भयदायकः ।
ववृधे लोकनाशाय ह्यामयो देहिनामिव ॥ ६१ ॥

राम त्वं सकलान्तरस्थमभितो
जानासि विज्ञानदृक्
साक्षी सर्वहृदि स्थितो हि परमो
नित्योदितो निर्मलः ।
त्वं लीलामनुजाकृतिः स्वमहिमन्
मायागुणैर्नाज्यसे
लीलार्थं प्रतिचोदितोऽद्य भवता
वक्ष्यामि रक्षोद्भवम् ॥ ६२ ॥

जानामि केवलमनन्तमचिन्त्यशक्तिं
चिन्मात्रमक्षरमजं विदितात्मतत्त्वम् ।
त्वां राम गूढनिजरूपमनुप्रवृत्तो
मूढोऽप्यहं भवदनुग्रहतश्चरामि ॥ ६३ ॥

एवं वदन्तमिनवंशपवित्रकीर्तिः
कुम्भोद्भवं रघुपतिः प्रहसन्बभाषे ।
मायाश्रितं सकलमेतदनन्यकत्वा-
न्मत्कीर्तनं जगति पापहरं निबोध ॥ ६४ ॥

दुष्ट मनाचा आणि अतिशय भयंकर असा कुंभकर्ण संतुष्ट चित्त असणाऱ्या ब्राह्मणांना आणि ऋषिसमूहांना खाऊन टाकीत पृथ्वीवर फिरत असे. तर लोकांना भयभीत करणारा महापराक्रमी रावण देहधारी प्राण्यांचा नाश करणाऱ्या रोगाप्रमाणे लोकांच्या नाशासाठी वाढू लागला. (५९-६१)

हे रामा, तुम्ही सर्व लोकांच्या अंतःकरणात स्थित आहात. सर्वांच्या हृदयात असणारे तुम्ही साक्षी-रूपाने आपल्या ज्ञानदृष्टीद्वारा सर्वांच्या हृदयातील सर्व काही जाणत असता. आपल्या महिम्यामध्ये स्थित असणाऱ्या हे परमेश्वरा, तुम्ही लीलेनेच हे मनुष्य रूप धारण केले आहे. तुम्ही मायेच्या गुणांनी लिप्त होत नाही. तुम्ही लीलेनेच मला प्रश्न केला म्हणून मी तुम्हांला राक्षसांच्या जन्माचा वृतांत सांगणार आहे. (६२)

हे रामा, तुम्ही केवळ एक मात्र, अनंत आहात. तुमची शक्ती कल्पनातीत आहे. तुम्ही केवळ चैतन्यरूप, अक्षर, अजन्मा आणि आत्मतत्व जाणणारे आहात, हे मला माहीत आहे. मायेच्याद्वारा जरी तुम्ही आपले रूप गूढ ठेवले आहे आणि जरी मी मूर्ख असलो तरीसुद्धा तुमच्या भजनाच्या मार्गाचे अनुसरण करून, तुमच्या कृपानुग्रहामुळे मी या जगात संचार करीत आहे." (६३)

अशा प्रकारे बोलणाऱ्या अगस्त्यांना, सूर्यवंशात पवित्र कीर्ती असणारे रघुपती हसत म्हणाले, "हे सर्व जग मायेच्या आश्रयाने असते. कारण ते माझ्याहून वेगळे नाहीच. माझ्या गुणांचे कीर्तन या जगात सर्व पापे हरण करणारे आहे, असे तुम्ही समजा." (६४)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे उत्तरकाण्डे प्रथमः सर्गः ॥ १ ॥

द्वितीय सर्ग

राक्षसांच्या राज्यस्थापनेचे विवरण

श्रीमहादेव उवाच

श्रीरामवचनं श्रुत्वा परमानन्दनिर्भरः ।
मुनिः प्रोवाच सदसि सर्वेषां तत्र शृण्वताम् ॥ १ ॥

अथ वित्तेश्वरो देवस्तत्र कालेन केनचित् ।
आययौ पुष्पकारूढः पितरं द्रष्टुमञ्जसा ॥ २ ॥

दृष्ट्वा तं कैकसी तत्र भ्राजमानं महौजसम् ।
राक्षसी पुत्रसामीप्यं गत्वा रावणमब्रवीत् ॥ ३ ॥

श्रीमहादेव म्हणाले— हे पार्वती, श्रीरामांचे वचन ऐकल्यावर, अगस्त्य मुनी अतिशय आनंदित झाले आणि तेथे त्या राजसभेमध्ये सर्व सभासदांसमोर ते सांगू लागले. (१)

"पुढे काही काळ गेल्यावर, वित्तेश्वर कुबेर हा पुष्पक विमानात बसून अकस्मात पित्याला भेटण्यास आला. (२)

महातेजस्वी आणि महासामर्थ्यसंपन्न अशा कुबेराला पाहून कैकसी राक्षसी आपल्या रावण या पुत्राजवळ जाऊन म्हणाली. (३)

पुत्र पश्य धनाध्यक्षं ज्वलन्तं स्वेन तेजसा ।
त्वमप्येवं यथा भूयास्तथा यत्नं कुरु प्रभो ॥ ४ ॥

तच्छ्रुत्वा रावणो रोषात् प्रतिज्ञामकरोद्द्रुतम् ।
धनदेन समो वापि ह्यधिको वाचिरेण तु ॥ ५ ॥

भविष्याम्यम्ब मां पश्य सन्तापं त्यज सुव्रते ।
इत्युक्त्वा दुष्करं कर्तुं तपः स दशकन्धरः ॥ ६ ॥

अगमत्फलसिद्ध्यर्थं गोकर्णं तु सहानुजः ।
स्वं स्वं नियममास्थाय भ्रातरस्ते तपो महत् ॥ ७ ॥

आस्थिता दुष्करं घोरं सर्वलोकैकतापनम् ।
दशवर्षसहस्राणि कुम्भकर्णोऽकरोत्तपः ॥ ८ ॥

विभीषणोपि धर्मात्मा सत्यधर्मपरायणः ।
पञ्चवर्षसहस्राणि पादेनैकेन तस्थिवान् ॥ ९ ॥

दिव्यवर्षसहस्रं तु निराहारो दशाननः ।
पूर्णे वर्षसहस्रे तु शीर्षमग्नौ जुहाव सः ।
एवं वर्षसहस्राणि नव तस्यातिचक्रमुः ॥ १० ॥

अथ वर्षसहस्रं तु दशमे दशमं शिरः ।
छेत्तुकामस्य धर्मात्मा प्राप्तश्चाथ प्रजापतिः ।
वत्स वत्स दशग्रीव प्रीतोऽस्मीत्यभ्यभाषत ॥ ११ ॥

वरं वरय दास्यामि यत्ते मनसि काङ्क्षितम् ।
दशग्रीवोऽपि तच्छ्रुत्वा प्रहृष्टेनान्तरात्मना ॥ १२ ॥

अमरत्वं वृणोमीश वरदो यदि मे भवान् ।
सुपर्णनागयक्षाणां देवतानां तथासुरैः ।
अवध्यत्वं तु मे देहि तृणभूता हि मानुषाः ॥ १३ ॥

तथास्त्विति प्रजाध्यक्षः पुनराह दशाननम् ।
अग्नौ हुतानि शीर्षाणि यानि तेऽसुरपुङ्गव ॥ १४ ॥

भविष्यन्ति यथापूर्वमक्षयाणि च सत्तम ॥ १५ ॥

एवमुक्त्वा ततो राम दशग्रीवं प्रजापतिः ।
बिभीषणमुवाचेदं प्रणतं भक्तवत्सलः ॥ १६ ॥

"बाळा, आपल्या तेजाने तळपणाऱ्या या धनपती कुबेराला पाहा. अरे समर्थ पुत्रा, ज्या योगे तूसुद्धा असा होशील, असा काहीतरी प्रयत्न कर." (४)

ते ऐकून, रावणाने रागाने तत्काळ प्रतिज्ञा केली की, "माते, तू खेद सोड. मी लौकरच धनद कुबेरासारखा किंवा त्याहूनही अधिक मोठा ऐश्वर्यसंपन्न होईन. तू माझ्यावर कृपा-दृष्टी ठेव." असे सांगून तो इष्टफळ प्राप्त करून घेण्यासाठी आपल्या लहान भावासह दुष्कर तप करण्यास गोकर्ण क्षेत्री गेला. तेथे आपापली व्रते पाळून, सर्व लोकांना केवळ ताप देणारे असे भयंकर व दुष्कर तप ते भाऊ करू लागले. दहा हजार वर्षपर्यंत कुंभकर्णाने तप केले. (५-८)

सत्य धर्मात परायण असणारा, धर्मात्मा, बिभीषणसुद्धा पाच हजार वर्षे एका पायावर उभा राहून तप करू लागला. (९)

एक हजार दिव्य वर्षे दशानन रावण निराहार राहिला. एक हजार वर्षे पूर्ण झाल्यावर त्याने आपले एक मस्तक तोडून त्याचे अग्नीत हवन केले. अशा प्रकारे एकेक मस्तकाचे अग्नीत हवन करताना त्याची नऊ हजार वर्षे निघून गेली. (१०)

नंतर दहावे सहस्र वर्ष संपल्यावर जेव्हा रावण आपले दहावे मस्तक तोडू लागला तेव्हा धर्मात्मा ब्रह्मदेव तेथे उपस्थित झाले आणि त्याला म्हणाले, "बाळा रावणा, मी तुझ्या तपामुळे प्रसन्न झालो आहे. तू वर माग. तुझ्या मनात जी इच्छा असेल ती मी पूर्ण करीन." ते ऐकल्यावर रावणसुद्धा मनात अतिशय संतुष्ट झाला व म्हणाला. (११-१२)

"हे ईश्वरा, जर तू मला वर देणार असशील तर मी अमर होण्याचा वर मागत आहे. गरुड, साप, यक्ष, देव यांपैकी कोणाकडूनही मला मरण येऊ नये, असा मला वर द्या. मानव हे तर माझ्या दृष्टीने तृणवत आहेत." (१३)

'तथास्तु' असे म्हणून प्रजाध्यक्ष ब्रह्मदेव पुनः रावणाला म्हणाले, "हे असुरश्रेष्ठा, जी मस्तके तू अग्नीमध्ये हवन केली होतीस, ती हे साधुश्रेष्ठा, तुला पूर्वीप्रमाणे प्राप्त होतील आणि ती अक्षय होतील." (१४-१५)

हे श्रीरामा, रावणाला असे सांगून, नंतर ते भक्तवत्सल प्रजापती नम्र झालेल्या बिभीषणाला म्हणाले. (१६)

बिभीषण त्वया वत्स कृतं धर्मार्थमुत्तमम् ।
तपस्ततो वरं वत्स वृणीष्वाभिमतं हितम् ॥ १७ ॥

बिभीषणोऽपि तं नत्वा प्राञ्जलिर्वाक्यमब्रवीत् ।
देव मे सर्वदा बुद्धिर्धर्मे तिष्ठतु शाश्वती ।
मा गेचयत्वधर्मं मे बुद्धिः सर्वत्र सर्वदा ॥ १८ ॥

ततः प्रजापतिः प्रीतो बिभीषणमथाब्रवीत् ।
वत्स त्वं धर्मशीलोऽसि तथैव च भविष्यसि ॥ १९ ॥

अयाचितोऽपि ते दास्ये ह्यमरत्वं बिभीषण ।
कुम्भकर्णमथोवाच वरं वरय सुव्रत ॥ २० ॥

वाण्या व्याप्तोऽथ तं प्राह कुम्भकर्णः पितामहम् ।
स्वप्स्यामि देव षण्मासान्दिनमेकं तु भोजनम् ॥ २१ ॥

एवमस्त्विति तं प्राह ब्रह्मा दृष्ट्वा दिवौकसः ।
सरस्वती च तद्वक्त्रान्निर्गता प्रययौ दिवम् ॥ २२ ॥

कुम्भकर्णस्तु दुष्टात्मा चिन्तयामास दुःखितः ।
अनभिप्रेतमेवास्यात्किं निर्गतमहो विधिः ॥ २३ ॥

सुमाली वरलब्धांस्तान् ज्ञात्वा पौत्रान् निशाचरान् ।
पातालान्निर्भयः प्रायात् प्रहस्तादिभिरन्वितः ॥ २४ ॥

दशग्रीवं परिष्वज्य वचनं चेदमब्रवीत् ।
दिष्ट्या ते पुत्र संवृत्तो वाञ्छितो मे मनोरथः ॥ २५ ॥

यद्भयाच्च वयं लङ्कां त्यक्त्वा याता रसातलम् ।
तद्गतं नो महाबाहो महद्विष्णुकृतं भयम् ॥ २६ ॥

अस्माभिः पूर्वमुषिता लङ्केयं धनदेन ते ।
भ्रात्राक्रान्तामिदानीं त्वं प्रत्यानेतुमिहार्हसि ॥ २७ ॥

साम्ना वाथ बलेनापि राज्ञां बन्धुः कुत सुहृत् ।
इत्युक्तो रावणः प्राह नार्हस्येवं प्रभाषितुम् ॥ २८ ॥

"हे वत्सा, बिभीषणा, धर्म संपादन करण्यासाठी तू उत्तम तप केले आहेस. म्हणून हे वत्सा, तुला जो हितकर आणि इष्ट वाटत असेल असा वर माग." (१७)

तेव्हा ब्रह्मदेवांना नमस्कार करून, हात जोडून बिभीषण म्हणाला, " हे देवा, माझी बुद्धी सर्वदा धर्माचे ठिकाणीच अढळ असो. माझ्या बुद्धीला सर्वदा सर्वत्र कोणत्याही अवस्थेत अधर्माचे ठिकाणी आवड उत्पन्न होऊ नये." (१८)

तेव्हा प्रसन्न झालेले प्रजापती बिभीषणाला म्हणाले, "बाळा, तू धर्मशील आहेस. तू यापुढेही तसाच राहशील. (१९)

आणि अरे बिभीषणा, जरी तू मागितलेले नाहीस, तरी मी तुला अमरत्व देत आहे." त्यानंतर प्रजापती कुंभकर्णाला म्हणाले, "अरे सुव्रता, तू वर माग." (२०)

तेव्हा (देवांनी प्रेरणा केल्यामुळे) सरस्वती देवीने त्याच्या वाणीवर अधिष्ठान ठेवून कुंभकर्णाला मोहित केले, तो पितामहांना म्हणाला- "हे देवा, मला सहा महिने झोपायला मिळावे आणि एक दिवस भोजनासाठी जागे व्हायला मिळावे." (२१)

तेव्हा देवांकडे पाहात 'असे होईल' असे ब्रह्मदेव त्याला म्हणाले. त्यानंतर कुंभकर्णाच्या मुखातून सरस्वती बाहेर पडली व स्वर्गलोकी गेली. (२२)

दुष्ट मन असणाऱ्या कुंभकर्णाने मग दुःखित होऊन विचार केला, "अरेरे, जे मला अभिप्रेत नव्हते, तेच माझ्या मुखातून का बरे बाहेर पडले ? अरेरे ! नशीब माझे !" (२३)

आपल्या तीन राक्षस नातवंडांना वर मिळालेले आहेत, हे कळल्यावर प्रहस्तादी राक्षसांना बरोबर घेऊन, सुमाली निर्भयपणे पातळातून पृथ्वीवर आला. (२४)

रावणाला आलिंगन देऊन तो म्हणाला, "मी ज्यांची इच्छा करीत होतो, तुझे तेच मनोरथ पूर्ण झाले, ही आनंदाची गोष्ट आहे. (२५)

हे महाबाहो, ज्याच्या भयामुळे लंका सोडून आम्ही रसातळाला गेलो होतो, ते आमचे विष्णूपासूनचे भय आता दूर झाले आहे. (२६)

ज्या लंकेत आम्ही पूर्वी राहात होतो, ती आता तुझ्या कुबेर या भावाने बळकावली आहे, आता ती लंका तू साम- नीतीने किंवा बलपूर्वक परत प्राप्त करून घ्यावयास हवीस. कुबेर हा भाऊ आहे याचा विचार तू करू नकोस. कारण राजे लोकांना बंधू किंवा हितचिंतक कुठून असणार?" सुमालीने असे म्हटल्यावर रावण त्याला म्हणाला, "आजोबा, असे बोलणे तुम्हांला शोभत नाही. (२७-२८)

वित्तेशो गुरुरस्माकमेवं श्रुत्वा तमब्रवीत् ।
प्रहस्तः प्रश्रितं वाक्यं रावणं दशकन्धरम् ॥ २९ ॥

शृणु रावण यत्नेन नैवं त्वं वक्तुमर्हसि ।
नाधीता राजधर्मास्ते नीतिशास्त्रं तथैव च ॥ ३० ॥

शूराणां नहि सौभ्रात्रं शृणु मे वदतः प्रभो ।
कश्यपस्य सुता देवा राक्षसाश्च महाबलाः ॥ ३१ ॥

परस्परमयुध्यन्त त्यक्त्वा सौहृदमायुधैः ।
नैवेदानीन्तनं राजन् वैरं देवैरनुष्ठितम् ॥ ३२ ॥

प्रहस्तस्य वचः श्रुत्वा दशग्रीवो दुरात्मनः ।
तथेति क्रोधताम्राक्षस्त्रिकूटाचलमन्वगात् ॥ ३३ ॥

दूतं प्रहस्तं सम्प्रेष्य निष्कास्य धनदेश्वरम् ।
लङ्कामाक्रम्य सचिवैः राक्षसैः सुखमास्थितः ॥ ३४ ॥

धनदः पितृवाक्येन त्यक्त्वा लङ्कां महायशाः ।
गत्वा कैलासशिखरं तपसातोषयच्छिवम् ॥ ३५ ॥

तेन सख्यमनुप्राप्य तेनैव परिपालितः ।
अलकां नगरीं तत्र निर्ममे विश्वकर्मणा ॥ ३६ ॥

दिक्पालत्वं चकारात्र शिवेन परिपालितः ।
रावणो राक्षसैः सार्धमभिषिक्तः सहानुजैः ॥ ३७ ॥

राज्यं चकारासुराणां त्रिलोकीं बाधयन् खलः ।
भगिनीं कालखञ्जाय ददौ विकटरूपिणीम् ॥ ३८ ॥

विद्युज्जिह्वाय नाम्नासौ महामायी निशाचरः ।
ततो मयो विश्वकर्मा राक्षसानां दितेः सुतः ॥ ३९ ॥

सुतां मन्दोदरीं नाम्ना ददौ लोकैकसुन्दरीम् ।
रावणाय पुनः शक्तिममोघां प्रीतमानसः ॥ ४० ॥

वैरोचनस्य दौहित्रीं वृत्रज्वालेति विश्रुताम् ।
स्वयंदत्तामुदवहत्कुम्भकर्णाय रावणः ॥ ४१ ॥

वित्तेश कुबेर हा आमचा वडीलबंधू आहे." हे ऐकल्यावर प्रहस्त रावणाला म्हणाला. (२९)

"रावणा, माझे बोलणे नीट ऐक. असे बोलणे तुला शोभत नाही. राजधर्म तुला माहीत नाहीत. तसेच तू नीतिशास्त्राचे अध्ययनही केलेले नाहीस. (३०)

वीरांचे ठायी बंधुप्रेम असत नाही. हे समर्था, मी आता जे सांगेन ते तू ऐक. कश्यपाचे पुत्र असणारे देव आणि राक्षस हे महाबलवान शूर होते. पण बंधुप्रेम सोडून देऊन त्यांनी एकमेकांबरोबर शस्त्रांनी युद्ध केले. राजा, देवांबरोबरचे हे आपले वैर काही आजच सुरू झालेले नाही." (३१-३२)

दुरात्म्या प्रहस्ताचे हे वचन ऐकल्यावर 'ठीक आहे' असे रावण म्हणाला. त्याचे डोळे क्रोधाने लाल झाले आणि तो लगेच त्रिकूट पर्वतावर गेला. (३३)

प्रथम त्याने प्रहस्ताला दूत म्हणून पाठविले. नंतर लंकेवर आक्रमण करून, कुबेराला बाहेर हाकलून तो आपल्या राक्षस मंत्र्यांसह तेथे सुखाने राहू लागला. (३४)

लंका सोडून दिल्यावर पित्याच्या सांगण्यावरून महायशस्वी कुबेर कैलास पर्वताच्या शिखरावर गेला आणि तेथे त्याने तपश्चर्येने शंकराला प्रसन्न करून घेतले. (३५)

शंकरांशी सख्य केल्यामुळे त्याला सुरक्षितता मिळाली. त्याने विश्वकर्म्याकडून कैलासावर अलका नावाची नगरी निर्माण करून घेतली. नंतर शिवांच्या संरक्षणाखाली तो दिकपालाचे, कार्य करू लागला. इकडे राक्षसांकडून अभिषिक्त झालेला दुष्ट रावण तिन्ही लोकांना पीडा देत, आपल्या धाकट्या भावांसह राक्षसांचे राज्य करू लागला. (योग्यवेळी) त्या महामायावी रावणाने आपली विक्राळ स्वरूप असणारी बहीण कालखंज वंशातील विद्युज्जिव्ह नावाच्या राक्षसाला दिली. त्यानंतर राक्षसांचा विश्वकर्मा व दितीचा पुत्र जो मय त्याने सर्व लोकांत एकमेव सुंदर असणारी मंदोदरी नावाची आपली कन्या रावणाला दिली. तसेच प्रसन्न मनाने मयाने रावणाला एक अमोघ शक्ती दिली. (३६-४०)

वैरोचनाच्या मुलीची मुलगी ही वृत्रज्वाला या नावाने विख्यात होती. नंतर रावणाने तिला आणून तिच्याशी कुंभकर्णाचे लग्न लावून दिले. (४१)

गन्धर्वराजस्य सुतां शैलूषस्य महात्मनः ।
बिभीषणस्य भार्यार्थे धर्मज्ञां समुदावहत् ॥ ४२ ॥

सरमां नाम सुभगां सर्वलक्षणसंयुताम् ।
ततो मन्दोदरी पुत्रं मेघनादमजीजनत् ॥ ४३ ॥

महात्मा गंधर्वराज शैलूष याची सरमा नावाची कन्या ही धर्मज्ञ, सौभाग्यसंपन्न आणि सर्व शुभ लक्षणांनी युक्त होती. रावणाने तिचा बिभीषणाशी विवाह करून दिला. त्यानंतर मंदोदरीने मेघनाद नावाच्या पुत्राला जन्म दिला . (४२-४३)

जातमात्रस्तु यो नादं मेघवत्प्रमुमोच ह ।
ततः सर्वेऽब्रुवन्मेघनादोऽयमिति चासकृत् ॥ ४४ ॥

जन्माला येताक्षणीच याने मेघाप्रमाणे गर्जना केली. म्हणून हा मेघनाद आहे असे सर्वजण वारंवार म्हणू लागले. म्हणून त्या मुलाचे नाव मेघनाद असेच पडले. (४४)

कुम्भकर्णस्ततः प्राह निद्रा मां बाधते प्रभो ।
ततश्च कारयामास गुहां दीर्घां सुविस्तराम् ॥ ४५ ॥

त्यानंतर कुंभकर्ण एकदा रावणाला म्हणाला, "हे प्रभो, मला झोप सतावत आहे." तेव्हा रावणाने त्याच्यासाठी एक लांब-रूंद विस्तृत अशी गुहा तयार करवून घेतली. (४५)

तत्र सुष्वाप मूढात्मा कुम्भकर्णो विघूर्णितः ।
निद्रिते कुम्भकर्णे तु रावणो लोकरावणः ॥ ४६ ॥

तेथे मूढ बुद्धीचा कुंभकर्ण घोरत झोपून गेला. कुंभकर्ण झोपी गेल्यावर, सर्व लोकांना त्रास देणाऱ्या रावणाने ब्राह्मण, प्रमुख ऋषी, देव, दानव, किंन्नर, आणि प्रचंड सर्पांसह मानवगण यांना सतावण्यास सुरूवात केली व त्याने देवांची संपत्ती नष्ट केली. (४६-४७)

ब्राह्मणान् ऋषिमुख्यांश्च देवदानवकिन्नरान् ।
देवश्रियो मनुष्यांश्च निजघ्ने समहोरगान् ॥ ४७ ॥

धनदोऽपि ततः श्रुत्वा रावणस्याक्रमं प्रभुः ।
अधर्मं मा कुरुष्वेति दूतवाक्यैर्न्यवारयत् ॥ ४८ ॥

रावणाची कृत्ये ऐकल्यानंतर, प्रभू कुबेराने दूतांकडून 'अधर्म करू नकोस' असे सांगून रावणाला थोपविण्याचा प्रयत्न केला. (४८)

ततः क्रुद्धो दशग्रीवो जगाम धनदालयम् ।
विनिर्जित्य धनाध्यक्षं जहारोत्तमपुष्पकम् ॥ ४९ ॥

तेव्हा रावण रागावला आणि त्याने कुबेराच्या नगरावर चाल केली आणि त्याला जिंकून, त्याने त्याचे पुष्पक हे उत्तम विमान हरण करून नेले. (४९)

ततो यमं च वरुणं निर्जित्य समरेऽसुरः ।
स्वर्गलोकमगात्तूर्णं देवराजजिघांसया ॥ ५० ॥

त्यानंतर रावणाने यम आणि वरुण यांना युद्धात जिंकून घेतले, देवराज इंद्राचा वध करण्यासाठी तो त्वरेने स्वर्गलोकावर चालून गेला. (५०)

ततोऽभवन्महद्युद्धमिन्द्रेण सह दैवतैः ।
ततो रावणमभ्येत्य बबन्ध त्रिदशेश्वरः ॥ ५१ ॥

तेव्हा देवांसह इंद्राबरोबर रावणाचे प्रचंड युद्ध झाले. रावणाजवळ येऊन देवराज इंद्राने त्याला बंदिवान केले. (५१)

तच्छ्रुत्वा सहसागत्य मेघनादः प्रतापवान् ।
कृत्वा घोरं महद्युद्धं जित्वा त्रिदशपुङ्गवान् ॥ ५२ ॥

ती वार्ता ऐकल्यावर प्रतापी मेघनाद हा झटकन तेथे आला. त्याने देवांबरोबर भयंकर युद्ध केले; देवश्रेष्ठांना जिंकल्यावर त्याने इंद्राला पकडले व त्याला बांधून टाकले. नंतर महाबलवान मेघनादाने आपल्या पित्याला सोडविले आणि इंद्राला घेऊन तो लंका नगरीकडे निघून गेला. (५२-५३)

इन्द्रं गृहीत्वा बध्वासौ मेघनादो महाबलः ।
मोचयित्वा तु पितरं गृहीत्वेन्द्रं ययौ पुरम् ॥ ५३ ॥

ब्रह्मा तु मोचयामास देवेन्द्रं मेघनादतः ।
दत्त्वा वरान्बहूंस्तस्मै ब्रह्मा स्वभवनं ययौ ॥ ५४ ॥

तेव्हा ब्रह्मदेवांनी इंद्राला मेघनादाच्या ताब्यातून सोडवून घेतले. मेघनादाला पुष्कळ वर देऊन, ब्रह्मदेव परत गेले. (५४)

रावणो विजयी लोकान्सर्वान् जित्वा क्रमेण तु ।
कैलासं तोलयामास बाहुभिः परिघोपमैः ॥ ५५ ॥

क्रमाक्रमाने सर्व लोकांना जिंकून रावण विजयी झाला. नंतर परिघाप्रमाणे असलेल्या बाहूंनी त्याने कैलास पर्वत उचलला. (५५)

तत्र नन्दीश्वरेणैवं शप्तोऽयं राक्षसेश्वरः ।
वानरैर्मानुषैश्चैव नाशं गच्छेति कोपिना ॥ ५६ ॥

तेव्हा तेथे असणाऱ्या नंदीश्वरानेच राक्षसराज रावणाला क्रोधाने असा शाप दिला, "अरे रावणा, वानर आणि मानव यांच्या हातून तुझा वध होईल." (५६)

शप्तोऽप्यगणयन् वाक्यं ययौ हैहयपत्तनम् ।
तेन बद्धो दशग्रीवः पुलस्त्येन विमोचितः ॥ ५७ ॥

असा शाप मिळाला तरी त्या शापाकडे लक्ष न देता, तो रावण हैहय राजाच्या (सहस्रार्जुनाच्या) नगरावर चालून गेला. त्या सहस्रार्जुनाने दशानन रावणाला बंदिवान केले. त्यावेळी पुलस्त्याने येऊन त्याला सोडविले. (५७)

ततोऽतिबलमासाद्य जिघांसुर्हरिपुङ्गवम् ।
धृतस्तेनैव कक्षेण वालिना दशकन्धरः ॥ ५८ ॥

त्यानंतर रावण अतिबलवान वानरराज वालीला ठार करण्याच्या इच्छेने त्याच्यावर चालून गेला. त्या वेळी वालीनेच त्या रावणाला आपल्या कवेत दाबून धरले. (५८)

भ्रामयित्वा तु चतुरः समुद्रान् रावणं हरिः ।
विसर्जयामास ततस्तेन सख्यं चकार सः ॥ ५९ ॥

वालीने चारी समुद्रांवर त्याला गरागरा फिरवून सोडून दिले. तेव्हा रावणाने वालीशी सख्य केले. (५९)

रावणः परमप्रीत एवं लोकान्महाबलः ।
चकार स्ववशे राम बुभुजे स्वयमेव तान् ॥ ६० ॥

हे रामा, अशा प्रकारे अतिशय आनंदित झालेल्या महाबलवान रावणाने सर्व लोक आपल्या अधीन करून घेतले व तो स्वतःच त्यांचा उपभोग घेऊ लागला. (६०)

एवम्प्रभावो राजेन्द्र दशग्रीवः सहेन्द्रजित् ।
त्वया विनिहतः सङ्ख्ये रावणो लोकरावणः ॥ ६१ ॥

हे राजेंद्रा, इंद्रजितासह रावण अशा प्रकारे प्रभावशाली झाला होता. तो लोकांना रडवणारा रावण तुमच्याकडून युद्धात मारला गेला आणि महात्म्या लक्ष्मणाने मेघनादाचा वध केला. तसेच पर्वताप्रमाणे प्रचंड असणारा कुंभकर्ण हाही तुमच्याकडून मारला गेला. (६१-६२)

मेघनादश्च निहतो लक्ष्मणेन महात्मना ।
कुम्भकर्णश्च निहतस्त्वया पर्वतसन्निभः ॥ ६२ ॥

हे रामा, सर्व जगांचा आदिकर्ता असे साक्षात सर्व व्यापक नारायण तुम्हीच आहात. हे स्थावर जंगमात्मक सर्व विश्व हे तुमचेच स्वरूप आहे. (६३)

भवान्नारायणः साक्षाज्जगतामादिकृद्विभुः ।
त्वत्स्वरूपमिदं सर्वं जगत्स्थावरजङ्गमम् ॥ ६३ ॥

लोकांचा पितामह ब्रह्मदेव हा नाभिकमळातून उत्पन्न झाला आहे. हे रघूत्तमा, वाग्देवीसह अग्निदेव तुमच्या मुखातून निर्माण झाला आहे. (६४)

त्वन्नाभिकमलोत्पन्नो ब्रह्मा लोकपितामहः ।
अग्निस्ते मुखतो जातो वाचा सह रघूत्तम ॥ ६४ ॥

तुमच्या दोन बाहूंपासून लोकपालांचे समूह, डोळ्यांपासून सूर्य आणि चंद्र व कानांपासून सर्व दिशा आणि विदिशा उत्पन्न झालेल्या आहेत. (६५)

बाहुभ्यां लोकपालौघाश्चक्षुर्भ्यां चन्द्रभास्करौ ।
दिशश्च विदिशश्चैव कर्णाभ्यां ते समुत्थिताः ॥ ६५ ॥

तुमच्या घ्राणेंद्रियांपासून प्राण आणि देवश्रेष्ठ अश्विनीकुमार उद्भूत झाले आहेत. तसेच तुमच्या जंघा, जानू, उरू आणि जघन यांचेपासून भुवर्लोक इत्यादी निर्माण झालेले आहेत. (६६)

घ्राणात्प्राणः समुत्पन्नश्चाश्विनौ देवसत्तमौ ।
जङ्घाजानूरुजघनाद्भुवर्लोकादयोऽभवन् ॥ ६६ ॥

हे रामा, तुमच्या कुक्षिप्रदेशापासून चार समुद्र, दोन स्तनांपासून इंद्र आणि वरुण, तसेच तुमच्या वीर्यापासून बालखिल्य ऋषी उत्पन्न झालेले आहेत. (६७)

कुक्षिदेशात्समुत्पन्नाश्चत्वारः सागरा हरे ।
स्तनाभ्यामिन्द्रवरुणौ वालखिल्याश्च रेतसः ॥ ६७ ॥

मेढ्राद्यमो गुदान्मृत्युर्मन्यो रुद्रस्त्रिलोचनः ।
अस्थिभ्यः पर्वता जाताः केशेभ्यो मेघसंहतिः ॥ ६८ ॥

ओषध्यस्तव रोमभ्यो नखेभ्यश्च खरादयः ।
त्वं विश्वरूपः पुरुषो मायाशक्तिसमन्वितः ॥ ६९ ॥

नानारूप इवाभासि गुणव्यतिकरे सति ।
त्वामाश्रित्यैव विबुधाः पिबन्त्यमृतमध्वरे ॥ ७० ॥

त्वया सृष्टमिदं सर्वं विश्वं स्थावरजङ्गमम् ।
त्वामाश्रित्यैव जीवन्ति सर्वे स्थावरजङ्गमाः ॥ ७१ ॥

त्वद्युक्तमखिलं वस्तु व्यवहारेऽपि राघव ।
क्षीरमध्यगतं सर्पिर्यथा व्याप्याखिलं पयः ॥ ७२ ॥

त्वद्भासा भासतेऽर्कादि न त्वं तेनावभाससे ।
सर्वगं नित्यमेकं त्वां ज्ञानचक्षुर्विलोकयेत् ॥ ७३ ॥

नाज्ञानचक्षुस्त्वां पश्येदन्धद्दग् भास्करं यथा ।
योगिनस्त्वां विचिन्वन्ति स्वदेहे परमेश्वरम् ॥ ७४ ॥

अतन्निरसनमुखैर्वेदशीर्षैरहर्निशम् ।
त्वत्पादभक्तिलेशेन गृहीता यदि योगिनः ॥ ७५ ॥

विचिन्वतो हि पश्यन्ति चिन्मात्रं त्वां न चान्यथा ।
मया प्रलपितं किञ्चित्सर्वज्ञस्य तवाग्रतः ।
क्षन्तुमर्हसि देवेश तवानुग्रहभागहम् ॥ ७६ ॥

दिग्देशकालपरिहीनमनन्यमेकं
चिन्मात्रमक्षरमजं चलनादिहीनम् ।
सर्वज्ञमीश्वरमनन्तगुणं व्युदस्त-
मायं भजे रघुपतिं भजतामभिन्नम् ॥ ७७ ॥

तुमच्या उपस्थापासून यम, गुदापासून मृत्यू, क्रोधापासून त्रिलोचन रुद्र हे निर्माण झाले. तुमच्या अस्थींपासून पर्वत जन्माला आले आणि केसांपासून मेघांचे समुदाय निर्माण झाले. (६८)

तुमच्या रोमांपासून औषधी, नखांपासून गर्दभ इत्यादी प्राणी झाले आहेत. अशा प्रकारे आपल्या मायाशक्तीने युक्त असे तुम्ही विश्वरूप असणारे परम पुरुष आहात. (६९)

प्रकृतीच्या गुणांशी संयोग झाला असता, तुम्ही नाना रूपे असल्याप्रमाणे भासू लागता. तुमचाच आश्रय घेऊन, देवांचे समूह यज्ञांमध्ये अमृताचे पान करतात. (७०)

हे स्थावर-जंगमात्मक सर्व विश्व तुम्ही निर्माण केले आहे. तुमचाच आश्रय घेऊन सर्व स्थावर व जंगम जिवंत राहातात. (७१)

हे राघवा, ज्या प्रमाणे दुधामध्ये असणारे तूप हे सर्व दूध व्यापून असते, त्या प्रमाणे व्यवहारातसुद्धा सर्व वस्तू तुमच्याकडून व्यापल्या गेल्या आहेत. (७२)

सूर्य इत्यादी तुमच्या प्रकाशाने प्रकाशित होतात; परंतु तुम्ही मात्र त्यांच्या योगाने प्रकाशित होत नाही. सर्व व्यापक, नित्य आणि एकमेव अद्वितीय असलेल्या तुम्हांला ज्ञान- दृष्टी असणारा माणूस पाहू शकतो. (७३)

अंध माणूस ज्या प्रमाणे सूर्याला पाहू शकत नाही, त्या प्रमाणे ज्ञानदृष्टी नसणारा माणूस तुम्हाला पाहू शकत नाही. (नेति, नेति, असे म्हणून) अनात्म पदार्थांचे निरसन करणाऱ्या वेदांच्या शिरोभागी असणाऱ्या उपनिषदांच्या उपदेशाद्वारा, योगी लोक स्वतःच्या देहात तुम्हांला शोधीत असतात. परंतु जर त्या योगी लोकांवर तुमच्या चरणांठायी भक्तीचा लेशमात्रही प्रभाव झाला, तर शोध घेत घेत त्या योगी लोकांना चिन्मात्र असणाऱ्या तुमचे दर्शन होते, नाही तर नाही. हे देवेशा, सर्वज्ञ अशा तुमच्यापुढे मी काही तरी बडबड केली आहे, तुम्ही मला क्षमा करा. कारण मी तुमच्या कृपानुग्रहाला पात्र आहे. (७४-७६)

जे दिशा, देश आणि काल यांनी रहित आहेत, तसेच अनन्य , एक, चिन्मात्र, अविनाशी, अजन्मा आहेत, चलनादी क्रियांनी रहित आहेत, अशा सर्वज्ञ, सर्वेश्वर, अनंतगुणसंपन्न, मायाहीन व आपल्या भक्तांशी नित्य अभिन्न राहणाऱ्या श्रीरामांना मी भजतो." (७७)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे उत्तरकाण्डे द्वितीयः सर्गः ॥२॥

तृतीय सर्ग

वाली आणि सुग्रीव यांचे पूर्वचरित्र तसेच रावण व सनत्कुमार यांचा संवाद

श्रीराम उवाच

वालिसुग्रीवयोर्जन्म श्रोतुमिच्छामि तत्त्वतः ।
रवीन्द्रौ वानराकारौ जज्ञात इति नः श्रुतम् ॥ १ ॥

अगस्त्य उवाच

मेरोः स्वर्णमयस्याद्रेर्मध्यशृङ्गे मणिप्रभे ।
तस्मिन्सभास्ते विस्तीर्णा ब्रह्मणः शतयोजना ॥ २ ॥

तस्यां चतुर्मुखः साक्षात्कदाचिद्योगमास्थितः ।
नेत्राभ्यां पतितं दिव्यमानन्दसलिलं बहु ॥ ३ ॥

तद्गृहीत्वा करे ब्रह्मा ध्यात्वा किञ्चित्तदत्यजत् ।
भूमौ पतितमात्रेण तस्माज्जातो महाकपिः ॥ ४ ॥

तमाह द्रुहिणो वत्स किञ्चित्कालं वसात्र मे ।
समीपे सर्वशोभाढ्ये ततः श्रेयो भविष्यति ॥ ५ ॥

इत्युक्तो न्यवसत्तत्र ब्रह्मणा वानरोत्तमः ।
एवं बहुतिथे काले गते ऋक्षाधिपः सुधीः ॥ ६ ॥

कदाचित्पर्यटन्द्रौ फलमूलार्थमुद्यतः ।
अपश्यद्दिव्यसलिलां वापीं मणिशिलान्विताम् ॥ ७ ॥

पानीयं पातुमागच्छत्तत्रच्छायामयं कपिम् ।
दृष्ट्वा प्रतिकपिं मत्वा निपपात जलान्तरे ॥ ८ ॥

तत्रादृष्ट्वा हरिं शीघ्रं पुनरुत्प्लुत्य वानरः ।
अपश्यत्सुन्दरीं रामामात्मानं विस्मयं गतः ॥ ९ ॥

ततः सुरेशो देवेशं पूजयित्वा चतुर्मुखम् ।
गच्छन्मध्याह्नसमये दृष्ट्वा नारीं मनोरमाम् ॥ १० ॥

कन्दर्पशरविद्धाङ्गस्त्यक्तवान्वीर्यमुत्तमम् ।
तामप्राप्यैव तद्वीजं वालदेशेऽपतद्भुवि ॥ ११ ॥

श्रीराम म्हणाले– "हे अगस्त्य मुने, वाली आणि सुग्रीव यांच्या जन्माचा यथार्थ वृत्तांत मी ऐकू इच्छितो. सूर्य आणि इंद्र हे वानररूपाने जन्माला आले होते, असे ऐकले होते." (१)

अगस्त्य म्हणाले– "हे रामा, सुवर्णमय मेरू पर्वताच्या रत्नाप्रमाणे प्रकाशमान अशा मध्य शिखरावर शंभर योजने विस्तार असणारी ब्रह्मदेवांची सभा आहे. (२)

त्या सभेत एकदा साक्षात चतुर्मुख ब्रह्मदेव ध्यानस्थ होऊन बसले होते. त्या वेळी त्यांच्या दोन्ही डोळ्यांतून पुष्कळ दिव्य आनंदाश्रू पडले. (३)

ते अश्रुजल आपल्या हातात घेऊन, काही वेळ विचार करून, ब्रह्मदेवांनी ते खाली पृथ्वीवर टाकले. ते पृथ्वीवर पडताच त्यातून एक मोठा वानर जन्माला आला.(४)

त्याला ब्रह्मदेव म्हणाले, "हे वत्सा, तू काही काळ येथे माझ्याजवळ या सर्व शोभासंपन्न स्थानी राहा. त्यामुळे तुझे कल्याण होईल." (५)

ब्रह्मदेवांनी त्याला असे सांगितल्यावर, तो वानरश्रेष्ठ तेथे राहिला. अशा प्रकारे बराच काळ लोटल्यावर, एकदा फळे- मुळे गोळा करण्यास उद्युक्त झालेला तो महाबुद्धिमान ऋक्षाधिप नावाचा वानर त्या पर्वतावर भटकत असताना, त्याला रत्नशिलांच्या पायऱ्यांनी युक्त आणि दिव्य जलाने भरलेली एक पुष्करिणी दिसली. (६-७)

पाणी पिण्यास तो तेथे गेला. तेव्हा पाण्यात आपल्या प्रतिबिंबाच्या रूपात त्याला वानर दिसला. तो वानर आपला प्रतिस्पर्धी वानर आहे, असे समजून त्याने पाण्यामध्ये उडी मारली. (८)

परंतु तेथे दुसरा कोणी वानर नाही, हे पाहताच झट्दिशी उडी मारून पुनः तो पाण्याच्या बाहेर आला आणि आपण एक सुंदर रमणी झालो आहोत, हे दिसताच त्याला विस्मय वाटला. (९)

त्याच वेळी मध्यान्ह काळी देवश्रेष्ठ चतुर्मुख ब्रह्मदेवांचे पूजन करून देवराज इंद्र परत जात असताना, त्याला ती मनोरम स्त्री दिसली. (१०)

तिला पाहाताच मदनाच्या बाणांनी त्याचे शरीर विद्ध झाले. त्याचे उत्तम वीर्य स्खलित झाले आणि ते त्या स्त्रीच्या केसांना स्पर्श करून जमिनीवर पडले. (११)

वाली समभवत्तत्र शक्रतुल्यपराक्रमः ।
तस्य दत्त्वा सुरेशानः स्वर्णमालां दिवं गतः ॥ १२ ॥

भानुरप्यागतस्तत्र तदानीमेव भामिनीम् ।
दृष्ट्वा कामवशो भूत्वा ग्रीवादेशेऽसृजन्महत् ॥ १३ ॥

बीजं तस्यास्ततः सद्यो महाकायोऽभवद्धरिः ।
तस्य दत्त्वा हनूमन्तं सहायार्थं गतो रविः ॥ १४ ॥

पुत्रद्वयं समादाय गत्वा सा निद्रिता क्वचित् ।
प्रभातेऽपश्यदात्मानं पूर्ववद्वानराकृतिम् ॥ १५ ॥

फलमूलादिभिः सार्धं पुत्राभ्यां सहितः कपिः ।
नत्वा चतुर्मुखस्याग्रे ऋक्षराजः स्थितः सुधीः ॥ १६ ॥

ततोऽब्रवीत्समाश्वास्य ब्रहुशः कपिकुञ्जरम् ।
तत्रैकं देवतादूतमाहूयामरसन्निभम् ॥ १७ ॥

गच्छ दूत मयादिष्टो गृहीत्वा वानरोत्तमम् ।
किष्किन्धां दिव्यनगरीं निर्मितां विश्वकर्मणा ॥ १८ ॥

सर्वसौभाग्यवलितां देवैरपि दुरासदाम् ।
तस्यां सिंहासने वीरं राजानमभिषेचय ॥ १९ ॥

समद्वीपगता ये ये वानराः सन्ति दुर्जयाः ।
सर्वे ते ऋक्षराजस्य भविष्यन्ति वशेऽनुगाः ॥ २० ॥

यदा नारायणः साक्षाद्रामो भूत्वा सनातनः ।
भूभारासुरनाशाय सम्भविष्यति भूतले ॥ २१ ॥

तदा सर्वे सहायार्थे तस्य गच्छन्तु वानराः ।
इत्युक्तो ब्रह्मणा दूतो देवानां स महामतिः ॥ २२ ॥

यथाज्ञप्तस्तथा चक्रे ब्रह्मणा तं हरीश्वरम् ।
देवदूतस्ततो गत्वा ब्रह्मणे तन्न्यवेदयत् ॥ २३ ॥

तदादि वानराणां सा किष्किन्धाभून्नृपाश्रयः ॥ २४ ॥

सर्वेश्वरस्त्वमेवासीरिदानीं ब्रह्मणार्थितः ।
भूमेर्भारो हृतः कृत्स्नस्त्वया लीलानृदेहिना ।
सर्वभूतान्तरस्थस्य नित्यमुक्तस्यचिदात्मनः ॥ २५ ॥

तेव्हा त्या वीर्यापासून इंद्राप्रमाणे पराक्रमी असणारा वाली नावाचा वानर जन्माला आला. त्याला एक सुवर्णमाला देऊन देवराज इंद्र स्वर्गलोकी परत गेला. (१२)

त्याच वेळी सूर्यसुद्धा तेथे आला होता. त्या सुंदर स्त्रीला पाहून कामवश होऊन, त्याने तिच्या ग्रीवा प्रदेशावर आपले प्रभावी वीर्य सोडले. त्यापासून तत्काळ एक प्रचंड शरीर असणारा वानर निर्माण झाला. त्याच्या सहाय्याला हनुमानाला देऊन सूर्य तेथून निघून गेला. (१३-१४)

पुढे त्या दोन्ही पुत्रांना घेऊन ती स्त्री कुठे तरी जाऊन निद्राधीन झाली. दुसरे दिवशी प्रभातसमयी झोपेतून उठल्यावर आपल्याला पूर्वी प्रमाणे वानराचे रूप प्राप्त झाले आहे, असे तिला दिसले. (१५)

मग फळे- मुळे इत्यादी घेऊन, तो महाबुद्धिमान् ऋक्षराज वानर आपल्या दोन पुत्रांसह ब्रह्मदेवांकडे आला आणि त्यांना नमस्कार करून, पुढे उभा राहिला. (१६)

तेव्हा त्या कपिश्रेष्ठाला ब्रह्मदेवांनी अनेक प्रकारे समजावून सांगितले आणि नंतर तेथे असलेल्या एका देवदूताला बोलावून घेऊन ब्रह्मदेव त्याला म्हणाले. (१७)

"अरे दूता, माझ्या आज्ञेने या वानरश्रेष्ठाला घेऊन तू विश्वकर्म्याने निर्माण केलेल्या दिव्य अशा किष्किंधा नगरीला जा. (१८)

ती नगरी सर्व प्रकारच्या ऐश्वर्याने संपन्न आणि देवांना सुद्धा जिंकण्यास कठीण आहे. त्या नगरीत या वीराचा सिंहासनावर राजा म्हणून अभिषेक कर. (१९)

सात द्वीपांत असणारे जे जे अजिंक्य असे वानर आहेत. ते सर्व वानर या ऋक्षराजाला अंकित होऊन, ते त्याचे अनुयायी होतील. (२०)

नंतर पुढे जेव्हा सनातन असे साक्षात नारायण हे राम होऊन भूमीला भार झालेल्या असुरांच्या नाशासाठी पृथ्वीतलावर जन्माला येतील, त्या वेळी सर्व वानर त्या श्रीरामांच्या सहाय्यासाठी जातील." ब्रह्मदेवांकडून अशी आज्ञा झाल्यावर, त्या महान बुद्धिमान देवदूताने ब्रह्मदेवांनी जशी आज्ञा केली होती, त्या प्रमाणे वानरराजाची व्यवस्था केली. नंतर पुनः ब्रह्मदेवांकडे परत जाऊन देवदूताने सर्व वृत्तांत त्यांना निवेदन केला. तेव्हापासून किष्किंधा नगरी ही वानरांची राजधानी झाली. (२१-२४)

हे रामा, तुम्हीच सर्वांचे ईश्वर आहात. ब्रह्मदेवांनी तुमची प्रार्थना केल्यावर तुम्ही लीलेने माया- मानव- रूप धारण करून, पृथ्वीचा सर्व भार हरण केला आहे. जे सर्व

अखण्डानन्तरूपस्य कियानेष पराक्रमः ।
तथापि वर्ण्यते सद्भिर्लीलामानुषरूपिणः ॥ २६ ॥

यशस्ते सर्वलोकानां पापहत्यै सुखाय च ।
य इदं कीर्तयेन्मर्त्यो वालिसुग्रीवयोर्महत् ॥ २७ ॥

जन्म त्वदाश्रयत्वात्स मुच्यते सर्वपातकैः ॥ २८ ॥

अथान्यां सम्प्रवक्ष्यामि कथां राम त्वदाश्रयाम् ।
सीता हृता यदर्थं सा रावणेन दुरात्मना ॥ २९ ॥

पुरा कृतयुगे राम प्रजापतिसुतं विभुम् ।
सनत्कुमारमेकान्ते समासीनं दशाननः ।
विनयावनतो भूत्वा ह्यभिवाद्येदमब्रवीत् ॥ ३० ॥

को न्वस्मिन्प्रवरो लोके देवानां बलवत्तरः ।
देवाश्च यं समाश्रित्य युद्धे शत्रुं जयन्ति हि ॥ ३१ ॥

कं यजन्ति द्विजा नित्यं कं ध्यायन्ति च योगिनः ।
एतन्मे शंस भगवन् प्रश्नं प्रश्नविदांवर ॥ ३२ ॥

ज्ञात्वा तस्य हृदिस्थं यत्तदशेषेण योगदृक् ।
दशाननमुवाचेदं शृणु वक्ष्यामि पुत्रक ॥ ३३ ॥

भर्ता यो जगतां नित्यं यस्य जन्मादिकं न हि ।
सुरासुरैर्नुतो नित्यं हरिर्नारायणोऽव्ययः ॥ ३४ ॥

यन्नाभिपङ्कजाजातो ब्रह्मा विश्वसृजां पतिः ।
सृष्टं येनैव सकलं जगत्स्थावरजङ्गमम् ॥ ३५ ॥

तं समाश्रित्य विबुधा जयन्ति समरे रिपून् ।
योगिनो ध्यानयोगेन तमेवानुजपन्ति हि ॥ ३६ ॥

महर्षेर्वचनं श्रुत्वा प्रत्युवाच दशाननः ।
दैत्यदानवरक्षांसि विष्णुना निहतानि च ॥ ३७ ॥

भूतांच्या हृदयात असतात, जे नित्य मुक्त आणि चेतन स्वरूप आहेत आणि जे अखंड अनंतरूप आहेत, अशा तुम्हांला हा पराक्रम फार मोठा आहे काय ? तथापि सर्व लोकांच्या पापांचा नाश करण्यास आणि त्यांना सुख देण्यास, लीलेने मनुष्यरूप धारण करणाऱ्या तुमची कीर्ती सज्जन माणसे वर्णन करतात. जो मनुष्य वाली आणि सुग्रीव यांच्या महान जन्मकथेचे कीर्तन करतो, तो तुमचाच आश्रय घेतल्यामुळे सर्व पातकांतून मुक्त होऊन जातो. (२५-२८)

हे रामा, आता तुमच्याशी संबंधित असणारी आणखी एक कथा मी तुम्हांला सांगतो. तिच्यामुळेच त्या दुरात्म्या रावणाने सीतेचे हरण केले होते. (२९)

हे रामा, पूर्वी कृतयुगात एकांतात बसलेल्या सनत्कुमार या ब्रह्मदेवांच्या सामर्थ्यसंपन्न पुत्राला रावणाने नम्र होऊन अभिवादन केले आणि तो म्हणाला. (३०)

"देव ज्याचा आश्रय घेऊन युद्धामध्ये शत्रूला जिंकतात असा या लोकांत सर्व देवांमध्ये श्रेष्ठ आणि अधिक बलवान असा कोणता देव आहे बरे ? (३१)

ब्राह्मण नित्य कुणाची आराधना करतात ? योगी लोक नित्य कुणाचे ध्यान करतात ? हे भगवन, प्रश्नांचे उत्तर जाणणाऱ्यांत तुम्ही श्रेष्ठ आहात; म्हणून तुम्ही या माझ्या प्रश्नाचे उत्तर मला सांगा. (३२)

त्या रावणाच्या मनात जे काही होते ते संपूर्ण जाणून घेऊन, दिव्यदृष्टीचे सनत्कुमार दशाननाला म्हणाले, "पुत्रा, मी सांगतो, ऐक. (३३)

जे जगाचा नित्य पोषणकर्ता आहेत, ज्यांना जन्म इत्यादी काही नाही, देव व असुर ज्यांची नेहमी स्तुती करतात, जे नित्य व अविनाशी आहेत असे हरी, नारायण आहेत. (३४)

सृष्टिकर्त्यांचे स्वामी ब्रह्मदेव त्यांच्या नाभिकमळातून उत्पन्न झाला आहे. हे संपूर्ण स्थावर जंगमात्मक जग त्यांनीच निर्माण केले आहे. (३५)

त्यांचाच आश्रय घेऊन देव युद्धामध्ये शत्रूंना जिंकतात आणि योगी लोक ध्यानयोगाचे द्वारा सतत त्यांचे चिंतन करीत असतात." (३६)

महर्षींचे वचन ऐकल्यावर दशाननाने त्याला म्हटले, " अहो मुनिश्रेष्ठ, विष्णू हे दैत्य, दानव आणि राक्षस यांचा वध करतात. मरणोत्तर त्यांना कोणती गती मिळते?"

कां वा गतिं प्रपद्यन्ते प्रेत्य ते मुनिपुङ्गव ।
तमुवाच मुनिश्रेष्ठो रावणं राक्षसाधिपम् ॥ ३८ ॥

दैवतैर्निहता नित्यं गत्वा स्वर्गमनुत्तमम् ।
भोगक्षये पुनस्तस्माद्भ्रष्टा भूमौ भवन्ति ते ॥ ३९ ॥

पूर्वार्जितैः पुण्यपापैर्म्रियन्ते चोद्भवन्ति च ।
विष्णुना ये हतास्ते तु प्राप्नुवन्ति हरेर्गतिम् ॥ ४० ॥

श्रुत्वा मुनिमुखात्सर्वं रावणो हृष्टमानसः ।
योत्स्येऽहं हरिणा सार्धमिति चिन्तापरोऽभवत् ॥ ४१ ॥

मनःस्थितं परिज्ञाय रावणस्य महामुनिः ।
उवाच वत्स तेऽभीष्टं भविष्यति न संशयः ॥ ४२ ॥

कञ्चित्कालं प्रतीक्षस्व सुखी भव दशानन ।
एवमुक्त्वा महाबाहो मुनिः पुनरुवाच तम् ॥ ४३ ॥

तस्य स्वरूपं वक्ष्यामि ह्यरूपस्यापि मायिनः ।
स्थावरेषु च सर्वेषु नदेषु च नदीषु च ॥ ४४ ॥

ओङ्कारश्चैव सत्यं च सावित्री पृथिवी च सः ।
समस्तजगदाधारः शेषरूपधरो हि सः ॥ ४५ ॥

सर्वे देवाः समुद्राश्च कालः सूर्यश्च चन्द्रमाः ।
सूर्योदयो दिवारात्री यमश्चैव तथानिलः ॥ ४६ ॥

अग्निरिन्द्रस्तथा मृत्युः पर्जन्यो वसवस्तथा ।
ब्रह्मा रुद्रादयश्चैव ये चान्ये देवदानवाः ॥ ४७ ॥

विद्योतते ज्वलत्येष पाति चात्तीति विश्वकृत् ।
क्रीडां करोत्यव्ययात्मा सोऽयं विष्णुः सनातनः॥ ४८ ॥

तेन सर्वमिदं व्याप्तं त्रैलोक्यं सचराचरम् ।
नीलोत्पलदलश्यामो विद्युद्वर्णाम्बरावृतः ॥ ४९ ॥

शुद्धजाम्बूनदप्रख्यां श्रियं वामाङ्कसंस्थिताम् ।
सदानपायिनीं देवीं पश्यन्नालिङ्ग्य तिष्ठति ॥ ५० ॥

तेव्हा मुनिश्रेष्ठ सनत्कुमार त्या राक्षसराज रावणाला म्हणाले. (३७-३८)

"सामान्य देवतांकडून ठार झालेले ते दैत्य इत्यादी नेहमी अतिशय उत्तम स्वर्गलोकात जातात आणि नंतर भोगाचा क्षय- काल येताच, त्या स्वर्गातून स्थान भ्रष्ट होऊन, ते पुनः पृथ्वीवर जन्माला येतात. पूर्वजन्मी प्राप्त करून घेतलेल्या पाप- पुण्यानुसार ते पुनः पुनः मरतात आणि पुनः जन्माला येतात. परंतु जे विष्णूंकडून ठार केले जातात, ते मात्र विष्णूंचे स्थान प्राप्त करून घेतात." (३९-४०)

मुनींच्या मुखातून ते सर्व ऐकल्यावर, रावणाचे मन आनंदित झाले. 'मी विष्णूंबरोबर युद्ध करीन' असा विचार करण्यात तो मग्न झाला. (४१)

रावणाच्या मनात आलेली गोष्ट जाणून मुनिश्रेष्ठ म्हणाले, "वत्सा, तुझी इच्छा अवश्य सफळ होईल, यात संशय नाही. (४२)

हे दशानना, तू सुखाने राहा. आणि काही काळ तू वाट पाहा." हे महाबाहो रामा, असे सांगून ते मुनी पुनः त्याला म्हणाले. (४३)

"अरे रावणा, जरी ते रूपरहित आहेत तरी त्या मायावींचे मायेने धारण केलेले रूप मी तुला वर्णन करून सांगतो. ते सर्व स्थावर पदार्थांत तसेच सर्व नद आणि नद्या यांमध्ये व्याप्त आहे. (४४)

तेच ॐकार, सत्य, सावित्री आणि पृथ्वी आहेत. समस्त जगताचा आधार असणाऱ्या शेष नागाचे रूप धारण करणारेही तेच आहेत. (४५)

सर्व देव, सर्व समुद्र, काल, सूर्य, चंद्र, सूर्योदय, दिवस, रात्र, यम, वायू, अग्नी, इंद्र, मृत्यू , पर्जन्य, वसू (नावाचे देव), ब्रह्मदेव, रुद्र इत्यादी देव तसेच इतर देव आणि दानव हे सर्व त्या नारायणांचेच रूप आहेत . (४६-४७)

विश्व निर्माण करणारे विष्णू निर्विकार असूनसुद्धा आपल्या मायेच्या आश्रयाने नाना प्रकारच्या लीला करतात. वीज होऊन ते चमकतात, अग्नी होऊन ते प्रज्वलित होतात विष्णु-रूपाने ते रक्षण करतात आणि रुद्र- रूपाने ते सर्वांचे भक्षण करतात. (४८)

स्थावर-जंगमात्मक हे सर्व त्रैलोक्य त्यांनी व्यापलेले आहे. नील कमळदळाप्रमाणे ते श्याम वर्णाचे आहेत. विजेच्या वर्णाप्रमाणे असणारा पीतांबर ते परिधान करतात. (४९)

शुद्ध सोन्याप्रमाणे कांती असणाऱ्या, कधीही नष्ट न होणाऱ्या, आणि डाव्या मांडीवर बसलेल्या लक्ष्मीकडे पाहात पाहात ते तिला आलिंगन देऊन राहातात. (५०)

द्रष्टुं न शक्यते केश्चिद्देवदानवपन्नगैः ।
यस्य प्रसादं कुरुते स चैनं द्रष्टुमर्हति ॥ ५१ ॥

न च यज्ञतपोभिर्वा न दानाध्ययनादिभिः ।
शक्यते भगवान्द्रष्टुमुपायैरितरैरपि ॥ ५२ ॥

तद्भक्तैस्तद्गतप्राणैस्तच्चित्तैर्धूतकल्मषैः ।
शक्यते भगवान्विष्णुर्वेदान्तामलदृष्टिभिः ॥ ५३ ॥

अथवा द्रष्टुमिच्छा ते शृणु त्वं परमेश्वरम् ।
त्रेतायुगे स देवेशो भविता नृपविग्रहः ॥ ५४ ॥

हितार्थं देवमर्त्यानामिक्ष्वाकूणां कुले हरिः ।
रामो दाशरथिर्भूत्वा महासत्त्वपराक्रमः ॥ ५५ ॥

पितुर्नियोगात्स भ्रात्रा भार्यया दण्डके वने ।
विचरिष्यति धर्मात्मा जगन्मात्रा स्वमायया ॥ ५६ ॥

एवं ते सर्वमाख्यातं मया रावण विस्तरात् ।
भजस्व भक्तिभावेन सदा रामं श्रिया युतम् ॥ ५७ ॥

अगस्त्य उवाच

एवं श्रुत्वासुराध्यक्षो ध्यात्वा किञ्चिद्विचार्य च ।
त्वया सह विरोधेप्सुर्मुमुदे रावणो महान् ॥ ५८ ॥

युद्धार्थी सर्वतो लोकान् पर्यटन् समवस्थितः ।
एतदर्थं महाराज रावणोऽतीव बुद्धिमान् ।
हृतवान् जानकीं देवीं त्वयात्मवधकाङ्क्षया ॥ ५९ ॥

इमां कथां यः शृणुयात्पठेद्वा
संश्रावयेद्वा श्रवणार्थिनां सदा ।
आयुष्यमारोग्यमनन्तसौख्यं
प्राप्नोति लाभं धनमक्षयं च ॥ ६० ॥

देव, दानव आणि नाग यांपैकी कोणालाही ते दिसू शकत नाहीत. ते ज्याच्यावर कृपाप्रसाद करतात, तोच माणूस त्यांना पाहू शकतो. (५१)

यज्ञ, तप, दान, अध्ययन इत्यादींचे द्वारा किंवा अन्य कोणत्याही उपायांनी भगवान नारायणांना पाहता येत नाही. (५२)

परंतु जे त्यांचे भक्त आहेत, ज्यांचे प्राण मन त्यांच्या ठिकाणीच लागलेले आहे, ज्यांची पापे धुऊन गेलेली आहेत आणि वेदांताच्या विचाराने ज्यांची दृष्टी निर्मळ झाली आहे, अशा पुरुषांना भगवंतांचे दर्शन होऊ शकते. (५३)

आता हे रावणा, जर तुला (कोणत्याही उपायाविना) त्या परमेश्वराला पाहाण्याची इच्छा असेल, तर तू ऐक. देव आणि मानव यांच्या कल्याणासाठीच ते देवाधिदेव विष्णू त्रेतायुगात इक्ष्वाकू कुलातील दशरथाचे पुत्र बनून श्रीराम या महाबलवान अशा राजाच्या रूपात अवतार घेणार आहेत. (५४-५५)

पित्याच्या आज्ञेनुसार, आपला भाऊ लक्ष्मण आणि जगन्माता व स्वत:ची माया अशी जी आपली भार्या सीता यांच्यासह ते धर्मात्मा राम दंडकारण्यात संचार करतील. (५६)

हे रावणा, अशा प्रकारे हे सर्व काही मी तुला विस्ताराने सांगितले आहे. तेव्हा लक्ष्मीने युक्त अशा त्या रामांचे तू सदा भक्तिभावाने भजन कर." (५७)

अगस्त्य म्हणाले– "असे ऐकल्यावर, असुरराज रावणाने काही वेळ ध्यान-चिंतन केले आणि तुमच्याशी विरोध करावयाचा असा निश्चय करून तो फार आनंदित झाला. (५८)

हे महाराज रामा, मग युद्ध करण्याची इच्छा करीत तो सर्व लोकांत सगळीकडे फिरत राहिला आणि याचसाठी तुमच्याकडून आपला वध व्हावा, या इच्छेने त्या अतिशय बुद्धिमान रावणाने जानकी देवीचे अपहरण केले." (५९)

ही कथा जो कोणी पुरुष ऐकेल वा वाचेल अथवा श्रवणार्थी माणसांना सदा ऐकवेल तो दीर्घ आयुष्य, आरोग्य, अपरंपार सुख, इष्ट लाभ आणि अक्षय धन प्राप्त करून घेईल. (६०)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे उत्तरकाण्डे तृतीयः सर्गः ॥ ३ ॥

चतुर्थ सर्ग

रामराज्याचे वर्णन आणि सीतेचा वनवास

श्रीमहादेव उवाच

एकदा ब्रह्मणो लोकादायान्तं नारदं मुनिम् ।
पर्यटन् रावणो लोकान्दृष्ट्वा नत्वाब्रवीद्वचः ॥ १ ॥

भगवन्ब्रूहि मे योद्धुं कुत्र सन्ति महाबलाः ।
योद्धुमिच्छामि बलिभिस्त्वं ज्ञातासि जगत्त्रयम् ॥ २ ॥

मुनिर्ध्यात्वाह सुचिरं श्वेतद्वीपनिवासिनः ।
महाबला महाकायास्तत्र याहि महामते ॥ ३ ॥

विष्णुपूजारता ये वै विष्णुना निहताश्च ये ।
त एव तत्र सञ्जाता अजेयाश्च सुरासुरैः ॥ ४ ॥

श्रुत्वा तद्रावणो वेगान्मन्त्रिभिः पुष्पकेण तान् ।
योद्धुकामः समागत्य श्वेतद्वीपसमीपतः ॥ ५ ॥

तत्प्रभाहततेजस्कं पुष्पकं नाचलत्ततः ।
त्यक्त्वा विमानं प्रययौ मन्त्रिणश्च दशाननः ॥ ६ ॥

प्रविशन्नेव तद्द्वीपं धृतो हस्तेन योषिता ।
पृष्टश्च त्वं कुतः कोऽसि प्रेषितः केन वा वद ॥ ७ ॥

इत्युक्तो लीलया स्त्रीभिर्हसन्तीभिः पुनः पुनः ।
कृच्छ्राद्धस्तादिनिर्मुक्तस्तासां स्त्रीणां दशाननः ॥ ८ ॥

आश्चर्यमतुलं लब्ध्वा चिन्तयामास दुर्मतिः ।
विष्णुना निहतो यामि वैकुण्ठमिति निश्चितः ॥ ९ ॥

मयि विष्णुर्यथा कुप्येत्तथा कार्यं करोम्यहम् ।
इति निश्चित्य वैदेहीं जहार विपिनेऽसुरः ॥ १० ॥

जानन्नेव परात्मानं स जहारावनीसुताम् ।
मातृवत्पालयामास त्वत्तः काङ्क्षन्वधं स्वकम् ॥ ११ ॥

श्रीमहादेव म्हणाले– हे पार्वती, निरनिराळ्या लोकांत फिरत असताना रावणाने एकदा ब्रह्मलोकातून येणाऱ्या नारद मुनींना पाहिले आणि मग त्यांना नमन करून तो म्हणाला. (१)

"हे भगवन, बलवान लोकांबरोबर युद्ध करण्याची माझी इच्छा आहे. तुम्हांला तिन्ही लोकांची ओळख आहे. तेव्हा माझ्याबरोबर लढू शकतील, असे महाबलवान वीर कोठे आहेत, ते मला सांगा." (२)

पुष्कळ वेळ विचार करून मुनी म्हणाले, "हे महाबुद्धिमंता, श्वेतद्वीपात राहाणारे प्राणी महाबलवान आणि प्रचंड शरीराचे आहेत. तेथे तू जा. (३)

जे लोक विष्णूंच्या पूजेत रत आहेत किंवा जे विष्णूंकडून ठार केले गेले आहेत, ते प्राणीच तेथे उत्पन्न झालेले आहेत. देव आणि असुर त्यांना जिंकू शकत नाहीत." (४)

ते ऐकून रावण आपल्या मंत्र्यांसह पुष्पक विमानाने त्यांच्याशी युद्ध करण्याच्या इच्छेने सत्वर श्वेत द्वीपाजवळ गेला. (५)

त्या द्वीपाच्या प्रभेने तेजरहित झालेले ते पुष्पक विमान तेथून पुढे जाऊ शकले नाही. तेव्हा विमान आणि मंत्री यांना तेथेच सोडून देऊन रावण स्वतःच पुढे गेला. (६)

त्या द्वीपात प्रवेश करताच एका स्त्रीने रावणाला हाताने धरले आणि त्याला विचारले, "तू कोण आहेस ? आणि तुला येथे कोणी पाठविले आहे ? सांग." (७)

अशा प्रकारे अन्य अनेक स्त्रियांनी सहजपणे हसत हसत तीच गोष्ट त्याला पुनः पुनः विचारली. तेव्हा रावण मोठ्या कष्टाने त्या स्त्रियांच्या हातांतून निसटला. (८)

त्याला अतिशय आश्चर्य वाटले. दुष्ट बुद्धीचा रावण विचार करू लागला. विष्णूंकडून मारला गेल्यास मी निश्चितपणे वैकुंठाला जाईन. (९)

तेव्हा ज्यामुळे विष्णू माझ्यावर रागावतील, असे काही कार्य मी करेन. असा निश्चय करून त्यासाठी त्या असुर रावणाने वनातून वैदेहीचे अपहरण केले. (१०)

हे रामा, तुमच्या हातून आपला वध व्हावा या इच्छेने, तुम्ही परमात्मा आहात, हे माहीत असूनसुद्धा रावणाने भूमिकन्या सीतेचे अपहरण केले, आणि तिचे आपल्या मातेप्रमाणे पालन केले. (११)

राम त्वं परमेश्वरो ऽसि सकलं
जानासि विज्ञानदृग्
भूतं भव्यमिदं त्रिकालकलना-
साक्षी विकल्पोज्झितः ।
भक्तानामनुवर्तनाय सकलां
कुर्वन् क्रियासंहतिं
त्वं श्रृण्वन्मनुजाकृतिर्मुनिवचो
भासीश लोकार्चितः ॥ १२ ॥

हे रामा, तुम्ही परमेश्वर आहात. तुम्ही विकल्पांनी रहित आणि तिन्ही काळांत घडणाऱ्या गोष्टींचे साक्षी आहात. तुम्ही आपल्या विज्ञान-दृष्टीने भूत, भविष्य आणि वर्तमान कालातील सर्व काही जाणता. हे ईश्वरा, भक्तांना मार्ग दाखविण्यासाठी तुम्ही सर्व लीला करता, तसेच सर्व लोकांकडून पूजिले जाणारे तुम्ही मनुष्यरूपात माझ्यासारख्या मुनीचे वचन ऐकता, असे वाटते." (१२)

स्तुत्वैवं राघवं तेन पूजितः कुम्भसम्भवः ।
स्वाश्रमं मुनिभिः सार्धं प्रययौ हृष्टमानसः ॥ १३ ॥

अशा प्रकारे राघवांची स्तुती केली. श्रीरामांनी त्यांचा सत्कार केला. मग अगस्त्य आनंदित मनाने इतर मुनींसह स्वत:च्या आश्रमाकडे निघून गेले. (१३)

रामस्तु सीतया सार्धं भ्रातृभिः सह मन्त्रिभिः ।
संसारीव रमानाथो रममाणोऽवसद्गृहे ॥ १४ ॥

त्यानंतर सीता, बंधू आणि मंत्री यांच्यासह ते लक्ष्मीपती राम एखाद्या संसारी माणसाप्रमाणे घरात रममाण होत राहू लागले. (१४)

अनासक्तोऽपि विषयान्बुभुजे प्रियया सह ।
हनुमत्प्रमुखैः सद्भिर्वानरैः परिवेष्टितः ॥ १५ ॥

जरी ते अनासक्त होते, तरी आपल्या प्रिय पत्नीबरोबर ते विषयांचा भोग घेत असत. ते नेहमी हनुमानादी वानरांसमवेत असत. (१५)

पुष्पकं चागमद्रामामेकदा पूर्ववत्प्रभुम् ।
प्राह देव कुबेरेण प्रेषितं त्वामहं ततः ॥ १६ ॥

एकदा पुष्पक विमान पूर्वीप्रमाणे प्रभू रामांजवळ आले आणि त्यांना म्हणाले, "हे देवा, कुबेराने मला पुनः तुमच्या सेवेसाठी पाठविले आहे. (१६)

जितं त्वं रावणेनादौ पश्चाद्रामेण निर्जितम् ।
अतस्त्वं राघवं नित्यं वह यावद्वसेद्भुवि ॥ १७ ॥

कुबेराने मला सांगितले आहे की प्रथम तुला रावणाने जिंकले होते. नंतर तुला रामांनी जिंकले. म्हणून जोपर्यंत श्रीराम भूलोकावर असतील, तोपर्यंत तू नित्य त्यांना वाहून नेत जा. (१७)

यदा गच्छेद्रघुश्रेष्ठो वैकुण्ठं याहि मां तदा ।
तच्छ्रुत्वा राघवः प्राह पुष्पकं सूर्यसन्निभम् ॥ १८ ॥

रघुश्रेष्ठ जेव्हा वैकुंठाला परत जातील, तेव्हा तू माझ्याकडे परत ये." ते ऐकल्यावर सूर्याप्रमाणे देदीप्यमान असणाऱ्या पुष्पकाला राघव म्हणाले. (१८)

यदा स्मरामि भद्रं ते तदागच्छ ममान्तिकम् ।
तिष्ठान्तर्धाय सर्वत्र गच्छेदानीं ममाज्ञया ॥ १९ ॥

"तुझे कल्याण असो. जेव्हा तुझे स्मरण करीन, तेव्हा तू माझ्याजवळ ये. आता तू जा आणि माझ्या आज्ञेने गुप्तरूपाने सर्वत्र राहा." (१९)

इत्युक्त्वा रामचन्द्रोऽपि पौरकार्याणि सर्वशः ।
भ्रातृभिर्मन्त्रिभिः सार्धं यथान्यायं चकार सः ॥ २० ॥

अशा प्रकारे पुष्पकाला सांगून श्रीरामचंद्र आपले भाऊ आणि मंत्री यांच्यासह नगरवासियांची सर्व कार्ये योग्य रीतीने करू लागले. (२०)

राघवे शासति भुवं लोकनाथे रमापतौ ।
वसुधा सस्यसम्पन्ना फलवन्तश्च भूरुहाः ॥ २१ ॥

तीन लोकांचे स्वामी असे लक्ष्मीपती राघव पृथ्वीचे पालन करीत असताना, वसुधा धनधान्याने संपन्न झाली आणि वृक्ष फळांनी लगडून गेले. (२१)

जना धर्मपराः सर्वे पतिभक्तिपराः स्त्रियः ।
नापश्यत्पुत्रमरणं कश्चिद्राजनि राघवे ॥ २२ ॥

राघव राज्य करीत होते, तेव्हा सर्व लोक धर्म - परायण झाले, स्त्रिया पति-भक्ति-परायण बनल्या आणि कुणालाही आपल्या पुत्राचे मरण पाहावे लागले नाही. (२२)

समारुह्य विमानाग्र्यं राघवः सीतया सह ।
वानरैर्भ्रातृभिः सार्धं सञ्चरावनिं प्रभुः ॥ २३ ॥

अमानुषाणि कार्याणि चकार बहुशो भुवि ।
ब्राह्मणस्य सुतं दृष्ट्वा बालं मृतमकालतः ॥ २४ ॥

शोचन्तं ब्राह्मणं चापि ज्ञात्वा रामो महामतिः ।
तपस्यन्तं वने शूद्रं हत्वा ब्राह्मणबालकम् ॥ २५ ॥

जीवयामास शूद्रस्य ददौ स्वर्गमनुत्तमम् ।
लोकानामुपदेशार्थं परमात्मा रघूत्तमः ॥ २६ ॥

कोटिशः स्थापयामास शिवलिङ्गानि सर्वशः ।
सीतां च रमयामास सर्वभोगैरमानुषैः ॥ २७ ॥

शशास रामो धर्मेण राज्यं परमधर्मवित् ।
कथां संस्थापयामास सर्वलोकमलापहाम् ॥ २८ ॥

दशवर्षसहस्राणि मायामानुषविग्रहः ।
चकार राज्यं विधिवल्लोकवन्द्यपदाम्बुजः ॥ २९ ॥

एकपत्नीव्रतो रामो राजर्षिः सर्वदा शुचिः ।
गृहमेधीयमखिलमाचरन् शिक्षयन् जनान् ॥ ३० ॥

सीता प्रेम्णानुवृत्त्या च प्रश्रयेण दमेन च ।
भर्तुर्मनोहरा साध्वी भावज्ञा सा ह्रिया भिया ॥ ३१ ॥

एकदाक्रीडविपिने सर्वभोगसमन्विते ।
एकान्ते दिव्यभवने सुखासीनं रघूत्तमम् ॥ ३२ ॥

नीलमाणिक्यसंकाशं दिव्याभरणभूषितम् ।
प्रसन्नवदनं शान्तं विद्युत्पुञ्जनिभाम्बरम् ॥ ३३ ॥

सीता कमलपत्राक्षी सर्वाभरणभूषिता ।
राममाह कराभ्यां सा लालयन्ती पदाम्बुजे ॥ ३४ ॥

देवदेव जगन्नाथ परमात्मन्सनातन ।
चिदानन्दादिमध्यान्तरहिताशेषकारण ॥ ३५ ॥

देव देवाः समासाद्य मामेकान्तेऽब्रुवन्वचः ।
बहुशोऽर्थयमानास्ते वैकुण्ठागमनं प्रति ॥ ३६ ॥

कधी प्रभू राघव सीता, वानर आणि बंधू यांच्या सह श्रेष्ठ पुष्पक विमानात आरोहण करून पृथ्वीवर संचार करीत. (२३)

या पृथ्वीवर त्यांनी पुष्कळ अमानवी लीला केल्या. एका ब्राह्मणाचा लहान पुत्र अकाली मरण पावला. तो ब्राह्मण फार शोक करीत आहे, हे जाणून महाबुद्धिमान रामांनी वनात तप करणाऱ्या शूद्राला ठार केले आणि त्या ब्राह्मण बालकाला जिवंत केले. त्या शूद्राला अतिशय उत्तम स्वर्ग दिला. लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी परमात्मा रघूत्तमांनी सर्वत्र कोट्यवधी शिवलिंगांची स्थापना केली. तसेच सर्व अलौकिक भोगांनी ते सीतेला सर्व प्रकारे रमवीत असत. (२४-२७)

श्रेष्ठ धर्म जाणणाऱ्या रामांनी धर्मानुसार शासन केले. सर्व लोकांचे पाप दूर करणारी आपली कथा त्यांनी जगात स्थापन केली. (२८)

ज्यांच्या पदकमळांना तिन्ही लोक वंदन करीत होते, अशा त्या माया-मानव-रूप-धारी रामांनी दहा हजार वर्षे न्यायाने राज्य केले. (२९)

सर्वदा शुद्ध असणारे राजर्षी व एकपत्नीव्रत पाळणारे श्रीराम हे लोकशिक्षणासाठी गृहस्थाश्रमातील सर्व धर्मांचे पालन करीत होते. (३०)

पतीच्या मनाचा कल जाणणाऱ्या पतिव्रता सीतेने आपल्या प्रेमाने, आज्ञापालनाने, नम्रतेने, इंद्रियसंयमाने, लज्जेने आणि भीतीने पतीचे मन हरण करून घेतले होते. (३१)

एकदा क्रीडावनातील एकांत स्थानी असणाऱ्या, सर्व भोग-साधनांनी संपन्न असणाऱ्या, दिव्य मंदिरात श्रीराम सुखाने बसलेले होते. त्यांची कांती नीलमण्याच्या वर्णाची होती. ते दिव्य अलंकारांनी विभूषित होते. त्यांचे मुख प्रसन्न होते. ते भाव गंभीर होते. विजेप्रमाणे त्यांचा पीतांबर तेजस्वी होता. त्या वेळी कमलपत्रनयना, सर्व अलंकारांनी विभूषित आणि आपल्या दोन्ही हातांनी श्रीरामांची चरणकमळे चेपणारी सीता श्रीरामांना म्हणाली. (३२-३४)

"हे देवाधिदेवा, हे जगन्नाथा, हे सनातन परमात्मा, हे चिदानंद स्वरूपा, हे आदि-मध्य-अंत यांनी रहित असणाऱ्या, हे सर्वांचे कारण असणाऱ्या देवा, काही काळा पूर्वी देवांनी माझ्याजवळ येऊन, एकांतात पुष्कळ प्रकारे माझी प्रार्थना करून तुमच्या वैकुंठ-गमनाबाबत विचारले. (३५-३६)

त्वया समेतश्चिच्छक्त्या रामस्तिष्ठति भूतले ।
विसृज्यास्मान्स्वकं धाम वैकुण्ठं च सनातनम् ॥ ३७ ॥

आस्ते त्वया जगद्धात्रि रामः कमललोचनः ।
अग्रतो याहि वैकुण्ठं तथा चेद्रघूत्तमः ॥ ३८ ॥

आगमिष्यति वैकुण्ठं त्व सनाथान्नः करिष्यति ।
इति विज्ञापिताहं तैर्मया विज्ञापितो भवान् ॥ ३९ ॥

यद्युक्तं तत्कुरुष्वाद्य नाहमाज्ञापये प्रभो ।
सीतायास्तद्वचः श्रुत्वा रामो ध्यात्वाब्रवीत्क्षणम् ॥४० ॥

देवि जानामि सकलं तत्रोपायं वदामि ते ।
कल्पयित्वा मिषं देवि लोकवादं त्वदाश्रयम् ॥ ४१ ॥

त्यजामि त्वां वने लोकवादाद्धीत इवापरः ।
भविष्यतः कुमारौ द्वौ वाल्मीकेराश्रमान्तिके ॥ ४२ ॥

इदानीं दृश्यते गर्भः पुनरागत्य मेऽन्तिकम् ।
लोकानां प्रत्ययार्थं त्वं कृत्वा शपथमादरात् ॥ ४३ ॥

भूमेर्विवरमात्रेण वैकुण्ठं यास्यसि द्रुतम् ।
पश्चादहं गमिष्यामि एष एव सुनिश्चयः ॥ ४४ ॥

इत्युक्त्वा तां विसृज्याथ रामो ज्ञानैकलक्षणः ।
मन्त्रिभिर्मन्त्रतत्त्वज्ञैर्बलमुख्यैश्च संवृतः ॥ ४५ ॥

तत्रोपविष्टं श्रीरामं सुहृदः पर्युपासत ।
हास्यप्रौढकथासुज्ञा हासयन्तः स्थिता हरिम् ॥ ४६ ॥

कथाप्रसङ्गात्पप्रच्छ रामो विजयनामकम् ।
पौरा जानपदा मे किं वदन्तीह शुभाशुभम् ॥ ४७ ॥

सीतां वा मातरं वा मे भ्रातृन्वा कैकयीमथ ।
न भेतव्यं त्वया ब्रूहि शापितोऽसि ममोपरि ॥ ४८ ॥

इत्युक्तः प्राह विजयो देव सर्वे वदन्ति ते ।
कृतं सुदुष्करं सर्वं रामेण विदितात्मना ॥ ४९ ॥

ते म्हणाले, 'चित्- शक्ती असलेल्या तुमच्यासह राम आम्हांला सोडून आणि वैकुंठ हे स्वत:चे निवास- स्थान सोडून पृथ्वीतलावर राहात आहेत. (३७)

हे जगद्-धात्री, तुमच्यामुळे कमललोचन राम भूतलावर राहात आहेत. तेव्हा जर तुम्ही प्रथम वैकुंठाला निघून याल तर रघूत्तम तुमच्याप्रमाणेच वैकुंठात परत येतील आणि आम्हांला सनाथ करतील.' अशा प्रकारे देवांनी माझी प्रार्थना केली. ते मी आत्ता तुम्हांला सांगत आहे. (३८-३९)

हे प्रभो, मी काही आज्ञा करीत नाही. पण जे युक्त असेल ते तुम्ही आता करा." सीतेचे वचन ऐकल्यावर, क्षणभर विचार करून राम म्हणाले. (४०)

"हे देवी, मला हे सर्व माहीत आहे. त्या संदर्भात मी आता तुला एक उपाय सांगतो. हे देवी, तुझ्याविषयी लोकापवाद निर्माण झाला आहे असे निमित्त करून, लोकापवादाला भिणाऱ्या एकाद्या सामान्य माणसाप्रमाणे, मी तुला वनात वाल्मीकींच्या आश्रमाजवळ सोडतो. तेथे तुला दोन पुत्र होतील. (४१-४२)

आत्ता तुझ्या ठिकाणी गर्भावस्थेची लक्षणे दिसून येत आहेत. (मग पुत्र जन्माला आल्यानंतर) तू पुनः माझ्याजवळ ये आणि लोकांची खात्री पटावी म्हणून आदरपूर्वक शपथ घेऊन, मग दुभंगलेल्या धरणीच्या विवरातून तू लगेच वैकुंठाला जा. त्यानंतर मीसुद्धा वैकुंठात येईन. असे मी पक्के ठरविले आहे." (४३-४४)

तिला असे सांगून, ज्ञान हेच स्वरूप असणाऱ्या श्रीरामांनी तिला अंत:पुरात पाठवून दिले. नीति-शास्त्राचे तत्त्व जाणणारे मंत्री आणि मुख्य सेनापतींच्या समवेत श्रीराम एकदा राजसभेत बसले होते. सुहृदगण त्यांची सेवा करीत होते. भरपूर हास्य निर्माण करणाऱ्या कथा जाणणारे विदूषक श्रीरामांना हसवीत होते. (४५-४६)

बोलता बोलता रामांनी विजय नावाच्या एका दूताला विचारले, "मी, सीता, माझी माता, माझे भाऊ तसेच कैकेयी यांच्या बाबतीत नगरवासी तसेच ग्रामवासी लोक बरे-वाईट काय बोलत असतात ? तुला माझी शपथ आहे. तू सत्य सांग. मुळीच घाबरू नकोस." (४७-४८)

रामांनी असे विचारल्यावर विजय म्हणाला, "महाराज, सर्व लोक असे म्हणतात की आत्मज्ञानसंपन्न अशा रामांनी अतिशय दुष्कर असे कार्य केले आहे. (४९)

किन्तु हत्वा दशग्रीवं सीतामाहृत्य राघवः ।
अमर्षं पृष्ठतः कृत्वा स्वं वेश्म प्रत्यपादयत् ॥ ५० ॥

कीदृशं हृदये तस्य सीतासम्भोगजं सुखम् ।
या हृता विजनेऽरण्ये रावणेन दुरात्मना ॥ ५१ ॥

अस्माकमपि दुष्कर्म योषितां मर्षणं भवेत् ।
यादृग् भवति वै राजा तादृश्यो नियतं प्रजाः ॥ ५२ ॥

श्रुत्वा तद्वचनं रामः स्वजनान्पर्यपृच्छत ।
तेऽपि नत्वाब्रुवन् राममेवमेतन्न संशयः ॥ ५३ ॥

ततो विसृज्य सचिवान्विजयं सुहृदस्तथा ।
आहूय लक्ष्मणं रामो वचनं चेदमब्रवीत् ॥ ५४ ॥

लोकापवादस्तु महान्सीतामाश्रित्य मेऽभवत् ।
सीतां प्रातः समानीय वाल्मीकेराश्रमान्तिके ॥ ५५ ॥

त्यक्त्वा शीघ्रं रथेन त्वं पुनरायाहि लक्ष्मण ।
वक्ष्यसे यदि वा किञ्चित्तदा मां हतवानसि ॥ ५६ ॥

इत्युक्तो लक्ष्मणो भीत्या प्रातरुत्थाय जानकीम् ।
सुमन्त्रेण रथे कृत्वा जगाम सहसा वनम् ॥ ५७ ॥

वाल्मीकेराश्रमस्यान्ते त्यक्त्वा सीतामुवाच सः ।
लोकापवादभीत्या त्वां त्यक्तवान् राघवो वने ॥ ५८ ॥

दोषो न कश्चिन्मे मातर्गच्छाश्रमपदं मुनेः ।
इत्युक्त्वा लक्ष्मणः शीघ्रं गतवान् रामसन्निधिम् ॥ ५९ ॥

सीतापि दुःखसन्तप्ता विललापातिमुग्धवत् ।
शिष्यैः श्रुत्वाच वाल्मीकिः सीतां ज्ञात्वा स दिव्यदृक् ॥ ६० ॥

अर्घ्यादिभिः पूजयित्वा समाश्वास्य च जानकीम् ।
ज्ञात्वा भविष्यं सकलामर्पयन्मुनियोषिताम् ॥ ६१ ॥

तथापि रावणाला मारल्यावर, सीतेविषयी काही शंका न घेता तिला परत आणले व त्यांनी आपल्या घरी ठेवले (हे मात्र योग्य केले नाही). (५०)

निर्जन अरण्यात दुरात्म्या रावणाने जिचे अपहरण केले होते त्या सीतेच्या सहवासात रामांना कसले बरे सुख मिळत असणार ? (५१)

अशा स्थितीत आम्हांला आमच्या बायकांचे दुष्कर्म सहन करावे लागेल. कारण जसा राजा असतो, तशा प्रकारची प्रजा निश्चितपणे असते." (५२)

त्याचे ते वचन ऐकल्यावर रामांनी आपल्या स्वजनांकडे त्या बाबतीत पृच्छा केली. रामांना नमस्कार करून तेसुद्धा म्हणाले, "रामा, हे असेच आहे खरे, यात संशय नाही." (५३)

तेव्हा सचिव, विजय आणि आपले सुहृद यांना श्रीरामांनी निरोप दिला आणि लक्ष्मणाला बोलावून घेऊन राम त्याला म्हणाले. (५४)

"अरे लक्ष्मणा, सीतेमुळे माझ्यावर फार मोठा लोकापवाद आला आहे. तेव्हा उद्या सकाळी सीतेला रथात बसवून लगेच तिला वाल्मीकी-आश्रमाजवळ सोडून परत ये. या बाबतीत जर काही बोलशील तर मला मरणप्राय दुःख होईल." (५५-५६)

श्रीरामांनी असे सांगितल्यावर, लक्ष्मणाला भीती वाटली. सकाळी उठल्यावर सुमंत्राने सज्ज केलेल्या रथात जानकीला बसवून लक्ष्मण त्वरित वनाकडे निघून गेला. (५७)

वाल्मीकींच्या आश्रमाजवळ सीतेला सोडून तो तिला म्हणाला, "लोकापवादाच्या भीतीमुळे राघवांनी तुला वनात सोडून दिले आहे. (५८)

हे माते, यात माझा काही दोष नाही. तू वाल्मीकीच्या आश्रमस्थानी जा." असे सीतेला सांगून लक्ष्मण रामांजवळ शीघ्र परत आला. (५९)

दुःखाने संत्रस्त होऊन सीतासुद्धा एखाद्या अतिशय भोळ्या स्त्रीप्रमाणे विलाप करू लागली. एक स्त्री रडत आहे, असे शिष्यांच्या कडून ऐकल्यावर, ती स्त्री सीता आहे असे वाल्मीकींनी दिव्य दृष्टीने जाणले. भविष्यात काय होणार आहे, हे सर्व त्यांना माहीत होते. त्यांनी अर्घ्य इत्यादींनी जानकीचा सत्कार केला आणि तिचे सांत्वन केले आणि त्यांनी तिला मुनि-पत्नींच्या स्वाधीन केले. (६०-६१)

तास्तां सम्पूजयन्ति स्म सीतां भक्त्या दिने दिने ।
ज्ञात्वा परात्मनो लक्ष्मीं मुनिवाक्येन योषितः ।
सेवां चक्रुः सदा तस्या विनयादिभिरादरात् ॥ ६२ ॥

रामोऽपि सीतारहितः परात्मा
विज्ञानदृक्केवल आदिदेवः ।
सन्त्यज्य भोगानखिलान्विरक्तो
मुनिव्रतोऽभून्मुनिसेविताङ्घ्रिः ॥ ६३ ॥

वाल्मीकी मुनींच्या सांगण्यावरून सीता ही साक्षात परमात्म्याची लक्ष्मी आहे, असे कळल्यावर, त्या मुनिस्त्रिया दररोज भक्तीने सीतेची पूजा करीत. तसेच आदरपूर्वक विनय इत्यादी दाखवून सतत तिची सेवा करीत. (६२)

खरे म्हणजे राम हे परमात्मा, विज्ञानदृष्टी असणारे, केवळ एकमेवाद्वितीय, आदिदेव होते. मुनिजन त्यांच्या चरणांची सेवा करीत. पण सीतारहित झालेल्या श्रीरामांनी सर्व भोग सोडून दिले. ते विरक्त झाले आणि मुनिव्रताचे आचरण करून राहू लागले. (६३)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे उत्तरकाण्डे चतुर्थः सर्गः ॥ ४ ॥

पञ्चम सर्ग

श्रीरामगीता

श्रीमहादेव उवाच

ततो जगन्मङ्गलमङ्गलात्मना
विधाय रामायणकीर्तिमुत्तमाम् ।
चचार पूर्वाचरितं रघूत्तमो
राजर्षिवर्यैरभिसेवितं यथा ॥ १ ॥
सौमित्रिणा पृष्ट उदारबुद्धिना
रामः कथाः प्राह पुरातनीः शुभाः ।
शापः प्रमत्तस्य नृगस्य शापतो
द्विजस्य तिर्यक्त्वमथाह राघवः ॥ २ ॥
कदाचिदेकान्त उपस्थितं प्रभुं
रामं रमालालितपादपङ्कजम् ।
सौमित्रिरासादितशुद्धभावनः
प्रणम्य भक्त्या विनयान्वितोऽब्रवीत् ॥ ३ ॥
त्वं शुद्धबोधोऽसि हि सर्वदेहिना-
मात्मास्यधीशोऽसि निराकृतिः स्वयम् ।
तीयसे ज्ञानदृशां महामते
पादाब्जभृङ्गाहितसङ्गसङ्गिनाम् ॥ ४ ॥
महं प्रपन्नोऽस्मि पदाम्बुजं प्रभो
भवापवर्गं तव योगिभावितम् ।
थाऽज्ञसाज्ञानमपारवारिधिं
सुखं तरिष्यामि तथानुशाधि माम् ॥ ५ ॥

श्रीमहादेव म्हणाले– हे पार्वती, सीतेच्या त्यागानंतर जगाच्या कल्याणासाठी धारण केलेल्या आपल्या मंगल देहाने रामायणरूपी उत्तम कीर्ती स्थापन करून, पूर्वीच्या श्रेष्ठ राजर्षींच्याप्रमाणे श्रीराम स्वतःचे आचरण करू लागले. (१)

उदारबुद्धी लक्ष्मणाने कधी विचारले तर राम त्याला प्राचीन पुण्य-कथा सांगत असत. अपराध करणाऱ्या नृग राजाला एका ब्राह्मणाच्या शापाने तिर्यक् योनी प्राप्त झाली, ही कथा एकदा रामांनी सांगितली. (२)

ज्यांच्या चरण कमळांची सेवा लक्ष्मी करीत असे ते प्रभू राम एकदा एकांत स्थानी बसले होते. त्यावेळी शुद्ध मनाचा लक्ष्मण त्यांच्याजवळ आला, आणि प्रणाम करून, नम्रपणे भक्तिपूर्वक म्हणाला. (३)

"हे महाबुद्धिमंता, तुम्ही ज्ञानस्वरूप आहात. सर्व देहधारी प्राण्यांचे आत्मा तुम्ही आहात. तुम्ही स्वतः निराकार असूनही सर्वांचे नियंते आहात. तुमच्या चरणकमळांच्या ठिकाणी असणाऱ्या व ज्ञानदृष्टी प्राप्त झालेल्या लोकांनाच तुम्ही प्रतीत होता. (४)

हे प्रभो, तुमचे जे चरण संसाराची निवृत्ती करतात आणि योगी लोक ज्यांचे ध्यान करतात त्या तुमच्या चरणी मी शरण आलो आहे. मी अज्ञानरूपी अपार सागर सुखाने व सहजपणे तरून जाईन, असा उपदेश तुम्ही मला करा. (५)

श्रुत्वाथ सौमित्रिवचोऽखिलं तदा
प्राह प्रपन्नार्तिहरः प्रसन्नधीः ।
विज्ञानमज्ञानतमः प्रशान्तये
श्रुतिप्रपन्नं * क्षितिपालभूषणः ॥ ६ ॥

आदौ स्ववर्णाश्रमवर्णिताः क्रियाः
कृत्वा समासादितशुद्धमानसः ।
समाप्य तत्पूर्वमुपात्तसाधनः
समाश्रयेत्सद्गुरुमात्मलब्धये ॥ ७ ॥

क्रिया शरीरोद्भवहेतुराहता
प्रियाप्रियौ तौ भवतः सुरागिणः ।
धर्मेतरौ तत्र पुनः शरीरकं
पुनः क्रिया चक्रवदीर्यते भवः ॥ ८ ॥

अज्ञानमेवास्य हि मूलकारणं
तद्ज्ञानमेवात्र विधौ विधीयते ।
विद्यैव तन्नाशविधौ पटीयसी
न कर्म तज्जं सविरोधमीरितम् ॥ ९ ॥

नाज्ञानहानिर्न च रागसंक्षयो
भवेत्ततः कर्म सदोषमुद्भवेत् ।
ततः पुनः संसृतिरप्यवारिता
तस्माद्बुधो ज्ञानविचारवान्भवेत् ॥ १० ॥

ननु क्रिया वेदमुखेन चोदिता
तथैव विद्या पुरुषार्थसाधनम् ।
कर्तव्यता प्राणभृतः प्रचोदिता
विद्यासहायत्वमुपैति सा पुनः ॥ ११ ॥

कर्माकृतौ दोषमपि श्रुतिर्जगौ
तस्मात्सदा कार्यमिदं मुमुक्षुणा ।
ननु स्वतन्त्रा ध्रुवकार्यकारिणी
विद्या न किञ्चिन्मनसाप्यपेक्षते ॥ १२ ॥

लक्ष्मणाचे म्हणणे ऐकल्यावर, शरणागतांचे दुःख दूर करणारे प्रभू राम हे मनामध्ये प्रसन्न झाले. मग अज्ञानरूपी अंधकाराचा नाश करण्यासाठी, श्रुतीने सांगितलेले आत्मज्ञान त्या राजशिरोमणी श्रीरामांनी लक्ष्मणास सांगण्यास सुरुवात केली. (६)

प्रभू राम म्हणाले की, "सर्वात प्रथम आपापला वर्ण आणि आश्रम यासाठी शास्त्राने वर्णन केलेली कर्मे यथायोग्यपणे केल्यावर चित्ताची शुद्धी होते. चित्त शुद्ध झाल्यावर ती कर्मे सोडून द्यावीत, तत्पूर्वी शम, दम इत्यादी साधनांनी संपन्न होऊन, आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी माणसाने सद्गुरुंचा आश्रय घ्यावा. (७)

कर्म हेच पुनर्जन्माच्या प्राप्तीचे कारण आहे, असेच महात्म्याचे मत आहे. कारण कर्मांबद्दल फार आसक्ती बाळगणाऱ्या माणसाच्या बाबतीत इष्ट आणि अनिष्ट अशा क्रिया घडत असतात. त्या कर्मांमुळे धर्म व अधर्म घडतात, त्यामुळे पुनः शरीर प्राप्त होते; मग पुनः कर्मे घडतात, आणि अशा प्रकारे कर्मांपासून जन्म आणि जन्मामध्ये पुनः कर्म असा चक्राप्रमाणे हा संसार फिरत राहातो. (८)

अज्ञान हेच या संसाराचे मूळ कारण आहे. आणि त्या अज्ञानाचा नाश हाच संसारातून सुटण्याचा उपाय म्हणून शास्त्रात सांगितला आहे. अज्ञानाचा नाश करण्यास ज्ञान हेच समर्थ साधन आहे. त्या अज्ञानातून उत्पन्न होणारे कर्म अज्ञानाचा नाश करण्यास समर्थ नसते. (९)

सकाम कर्मामुळे अज्ञानाचा नाश होत नाही, तसेच आसक्तीचा नाश होत नाही. उलट त्या कर्मांपासून नवीन दोषयुक्त कर्म उत्पन्न होते आणि मग त्या नवीन कर्मांपासून संसाराची प्राप्ती होणे हे अनिवार्य ठरते. म्हणून शहाण्या माणसाने ज्ञान प्राप्त करून घेण्याचा विचार करावयास हवा. (१०)

काही लोक असेही म्हणतात की ज्या प्रमाणे वेदाने ज्ञान हे पुरुषार्थाचे साधन म्हणून सांगितले आहे, त्या प्रमाणेच माणसाला कर्म हे आवश्यक कर्तव्य आहे, असेही सांगितले आहे. म्हणून ते ज्ञानाला सहाय्यभूत ठरते. (११)

तसेच कर्म न केल्यास दोष उत्पन्न होतो, असे सुद्धा श्रुतीने सांगितले आहे. म्हणून मुमुक्षूने सदा कर्म करीत राहावयास हवे. आता जर कुणी असे म्हणेल की ज्ञान कर्मनिरपेक्ष आहे आणि निश्चितपणे आहे आणि म्हणून

१ श्रुतिप्रपन्न हे लक्ष्मणाचे विशेषण घेतल्यास, ऐकण्यास उत्सुक असणाऱ्या लक्ष्मणाला असा अर्थ होईल.

न सत्यकार्योऽपि हि यद्वदध्वरः
प्राङ्नक्तेऽन्यानपि कारकादिकान् ।
तथैव विद्या विधितः प्रकाशितै-
र्विशिष्यते कर्मभिरेव मुक्तये ॥ १३ ॥

केचिद्वदन्तीति वितर्कवादिन-
स्तदप्यसद्दृष्टविरोधकारणात् ।
देहाभिमानादभिवर्धते क्रिया
विद्या गताहङ्कृतितः प्रसिद्ध्यति ॥ १४ ॥

विशुद्धविज्ञानविरोचनाश्रिता
विद्यात्मवृत्तिश्चरमेति भण्यते ।
उदेति कर्माखिलकारकादिभि-
र्निहन्ति विद्याखिलकारकादिकम् ॥ १५ ॥

तस्मात्त्यजेत्कार्यमशेषतः सुधी-
र्विद्याविरोधान्न समुच्चयो भवेत् ।
आत्मानुसन्धानपरायणः सदा
निवृत्तसर्वेन्द्रियवृत्तिगोचरः ॥ १६ ॥

यावच्छरीरादिषु माययात्मधी-
स्तावद्विधेयो विधिवादकर्मणाम् ।
नेतीति वाक्यैरखिलं निषिध्य त-
ज्ज्ञात्वा परात्मानमथ त्यजेत्क्रियाः ॥ १७ ॥

यदा परात्मात्मविभेदभेदकं
विज्ञानमात्मन्यवभाति भास्वरम् ।
तदैव माया प्रविलीयतेऽञ्जसा
सकारका कारणमात्मसंसृतेः ॥ १८ ॥

श्रुतिप्रमाणाभिविनाशिता च सा
कथं भविष्यत्यपि कार्यकारिणी ।
विज्ञानमात्रादमलाद्वितीयत-
स्तस्मादविद्या न पुनर्भविष्यति ॥ १९ ॥

मनानेसुद्धा मुमुक्षूला कर्मांची अपेक्षा असत नाही. परंतु असे म्हणणे योग्य नाही. कारण वेदोक्त यज्ञ हा स्थिर कर्म असला तरीसुद्धा ज्या प्रमाणे त्याला अन्य कारक इत्यादींची अपेक्षा असते, त्या प्रमाणे वेदाने सांगितलेल्या कर्मांनी युक्त ज्ञानच मोक्षाला कारणीभूत होते.(म्हणून कर्मांचा त्याग करणे, हे मुळीच योग्य नव्हे. (१२- १३)

तेव्हा ज्ञानासाठी कर्म आवश्यक आहे, असा चुकीचा अर्थ करणारे काही लोक जे म्हणतात, तेसुद्धा खोटे आहे. कारण तेथे प्रत्यक्ष विरोध येतो. म्हणजेच देहाचा अभिमान असेल तर कर्म घडते आणि अहंकाराचा नाश झाला तरच ज्ञान प्राप्त होते. (१४)

(वेदांत वाक्यांच्या विचारामुळे) विशुद्ध विज्ञानाच्या प्रकाशाने युक्त अशी जी मनाची अंतिम वृत्ती, तीच विद्या. तिलाच आत्मज्ञान असे म्हटले जाते. उलट सर्व कारक इत्यादींच्या द्वारा कर्म होत असते. तर विद्या सर्व कारक इत्यादी अनित्य आहे, असे सांगून त्यांचा नाश करून टाकते. (१५)

म्हणून सर्व इंद्रियांच्या वृत्तींचे जे विषय त्या विषयांपासून निवृत्त होऊन आत्म्याच्या निरंतर अनुसंधानास लागलेल्या बुद्धिमान पुरुषाने सर्व कर्मे संपूर्णपणे टाकून द्यावीत. कारण कर्म हे विद्येला विरोधी असल्याने विद्या आणि कर्म यांचा समुच्चय कधीही होऊ शकत नाही. (१६)

मायेने मोहित झालेला माणूस जोपर्यंत शरीर इत्यादी अनात्म गोष्टींना आत्मा आहेत अशी बुद्धी ठेवतो, तोपर्यंतच त्याला वेदांनी विहित केलेली कर्मे करावी लागतात. उपनिषदातील 'नेति नेति' इत्यादी वाक्यांनी त्या सर्व अनात्म वस्तूंचा निषेध करून आणि त्यांचेपेक्षा परमात्मा वेगळा आहे, असे त्या परमात्म्याचे स्वरूप जाणून घेतल्यावर, मुमुक्षूने सर्व कर्मांचा त्याग करावा हवा. (१७)

परमात्मा आणि जीवात्मा यांमध्ये जो भेद मानला जातो त्याचा नाश करणारे प्रकाशमय विज्ञान जेव्हा अंतःकरणात स्पष्टपणे विलसू लागते, तेव्हाच जीवात्म्याच्या संसाराला कारणरूप असणारी माया (अविद्या) सहजपणे आपल्या कारकांसह लयाला जाते. वेद-प्रमाणाने उत्पन्न झालेल्या ज्ञानाने पूर्णपणे नष्ट झालेली माया पुनः जीवासाठी संसार कसा निर्माण करील ? कारण शुद्ध आणि अद्वितीय अशा परमात्म्याचे विज्ञान झाल्यानंतर पुनः अविद्या उत्पन्न होऊ शकत नाही. (१८-१९)

यदि स्म नष्टा न पुनः प्रसूयते
कर्ताहमस्येति मतिः कथं भवेत् ।
तस्मात्स्वतन्त्रा न किमप्यपेक्षते
विद्या विमोक्षाय विभाति केवला ॥ २० ॥

सा तैत्तिरीयश्रुतिराह सादरं
न्यासं प्रशस्ताखिलकर्मणां स्फुटम् ।
एतावदित्याह च वाजिनां श्रुति-
र्ज्ञानं विमोक्षाय न कर्म साधनम् ॥ २१ ॥

विद्यासमत्वेन तु दर्शितस्त्वया
क्रतुर्न दृष्टान्त उदाहृतः समः ।
फलैः पृथक्त्वाद्बहुकारकैः क्रतुः
संसाध्यते ज्ञानमतो विपर्ययम् ॥ २२ ॥

सप्रत्यवायो ह्यहमित्यनात्मधी-
रज्ञप्रसिद्धा न तु तत्त्वदर्शिनः ।
तस्मादबुधैस्त्याज्यमविक्रियात्मभि-
र्विधानतः कर्म विधिप्रकाशितम् ॥ २३ ॥

श्रद्धान्वितस्तत्त्वमसीति वाक्यतो
गुरोः प्रसादादपि शुद्धमानसः ।
विज्ञाय चैकात्म्यमथात्मजीवयोः
सुखी भवेन्मेरुरिवाप्रकम्पनः ॥ २४ ॥

आदौ पदार्थावगतिर्हि कारणं
वाक्यार्थविज्ञानविधौ विधानतः ।
तत्त्वम्पदार्थौ परमात्मजीवका-
वसीति चैकात्म्यमथानयोर्भवेत् ॥ २५ ॥

प्रत्यक् परोक्षादिविरोधमात्मनो-
र्विहाय सङ्गृह्य तयोश्चिदात्मताम् ।
संशोधितां लक्षणया च लक्षितां
ज्ञात्वा स्वमात्मानमथाद्वयो भवेत् ॥ २६ ॥

आणि जर एकदा नष्ट होऊन गेलेली माया पुनः जन्माला येत नसेल, तर 'मी कर्माचा कर्ता आहे,' अशी बुद्धी त्या माणसाला कशी बरे होईल ? म्हणून विद्या ही स्वतंत्र आहे; तिला कर्म इत्यादी अन्य कशाचीही अपेक्षा असत नाही. ती एकटीच मोक्षासाठी स्वतंत्रपणे तळपत असते. (२०)

तसेच तैत्तिरीय शाखेची श्रुती आग्रहपूर्वक स्पष्टपणे [१] म्हणते की, सर्व कर्मांचा त्याग करणे हेच प्रशस्त आहे. खेरीज वाजसनेय शाखेची श्रुतीसुद्धा 'एतावत' इत्यादी वाक्याद्वारा सांगते [२] की ज्ञान हेच मोक्षाचे साधन आहे, कर्म हे मोक्षाचे साधन नाही. (२१)

(हे ज्ञान-कर्म-समुच्चय-वादी पुरुषा) तू विद्येसमान यज्ञ आहे, असे श्रुतीच्या आधारे दाखविले होतेस; परंतु तो यज्ञाचा दृष्टांत योग्य नाही. कारण त्या दोहोंची फळे वेगवेगळी आहेत. तसेच होता, ऋत्विक्, यजमान इत्यादी पुष्कळ कारकांच्या द्वारा यज्ञ सिद्ध होतो; त्या यज्ञापेक्षा ज्ञान वेगळे आहे. (म्हणजे ज्ञान हे कारक इत्यादींनी सिद्ध होणारे नाही). कर्मांचा त्याग केल्याने 'मी दोषी होईन' अशी अनात्म-बुद्धी अज्ञानी माणसांच्या ठिकाणी होते; परंतु तशी बुद्धी आत्म-तत्त्व जाणणाऱ्या ज्ञानी माणसाच्या बाबतीत होत नाही. म्हणून विकाररहित चित्त असणाऱ्या ज्ञानी माणसांनी वेदांनी विहित केलेल्या कर्मांचासुद्धा विधिपूर्वक त्याग करावयास हवा. तेव्हा श्रद्धेने संपन्न असणाऱ्या व चित्त शुद्ध असणाऱ्या माणसाने गुरूच्या कृपाप्रसादाने 'तत्त्वमसि' वाक्याच्या अर्थाने परमात्मा आणि जीवात्मा यांचे ऐक्य अनुभवून मेरूप्रमाणे निश्चल आणि सुखी व्हावे. कोणत्याही वाक्याचा अर्थ जाणून घेण्याच्या पद्धतीत असा नियम आहे की प्रथम त्या वाक्यातील प्रत्येक पदाचा अर्थ कळणे आवश्यक असते. (आता तत्त्वमसि या वाक्यात) 'तत्' आणि 'त्वं' ही पदे परमात्मा आणि जीव असा अर्थ सांगतात आणि 'असि' हे पद त्या दोहोंचे एकत्व सांगणारे आहे. (२२-२५)

(जीवात्मा आणि परमात्मा या) दोन आत्म्यांचे बाबतीत जीवात्मा हा प्रत्यक् म्हणजे अंतःकरणाचा साक्षी आणि परमात्मा हा परोक्ष म्हणजे इंद्रियातीत आहे इत्यादी वाच्यार्थ रूप विरोध सोडून देऊन लक्षणेने लक्षित होणारे त्या दोघांचे चैतन्यस्वरूप लक्षात घेऊन, परमात्मा हाच आपला आत्मा आहे हे जाणून मुमुक्षूने एकीभावाने म्हणजे अद्वयरूपाने स्थिर व्हावे.* (२६)

१. 'न कर्मणा न प्रजया धनेन त्यागेनैके अमृतत्वमानशुः' (तै. आ. १०/१०) २. 'एतावदरे खल्वमृतत्वम्' (बृ.उ. ४/५/१५)

* जीवात्मा हा प्रत्यक् म्हणजे बुद्धीने कळणारा आहे.परमात्मा परोक्ष आहे; तो इंद्रियांना कळणारा नाही. परमात्मा हा सर्वज्ञ, सर्वशक्तिसंपन्न इत्यादी आहे. याउलट जीवात्मा हा अल्पज्ञ, अल्पशक्तियुक्त इत्यादी आहे. असा या दोन आत्म्यांत विरोध आहे.

एकात्मकत्वाज्जहती न सम्भवे-
त्तथाजहल्लक्षणता विरोधतः ।
सोऽयम्पदार्थाविव भागलक्षणा
युज्येत तत्त्वम्पदयोरदोषतः ॥ २७॥

रसादिपञ्चीकृतभूतसम्भवं
भोगालयं दुःखसुखादिकर्मणाम् ।
शरीरमाद्यन्तवदादिकर्मजं
मायामयं स्थूलमुपाधिमात्मनः ॥ २८ ॥

सूक्ष्मं मनोबुद्धिदशेन्द्रियैर्युतं
प्राणैरपञ्चीकृतभूतसम्भवम् ।
भोक्तुः सुखादेरनुसाधनं भवे-
च्छरीरमन्यद्विदुरात्मनो बुधाः ॥ २९ ॥

अनाद्यनिर्वाच्यमपीह कारणं
मायाप्रधानं तु परं शरीरकम् ।
उपाधिभेदात्तु यतः पृथक् स्थितं
स्वात्मानमात्मन्यवधारयेत्क्रमात् ॥ ३० ॥

तत् आणि त्वम् या पदांचे म्हणजे जीवात्मा आणि परमात्मा यांचे स्वरूप एकच असल्यामुळे (तत्त्वमसि वाक्यात) जहती लक्षणा घेऊन अर्थ करणे शक्य नाही. तसेच त्या दोहोंचा विरोध असल्यामुळे अजल्लक्षणेने अर्थ करणे शक्य होत नाही. म्हणून 'सः अयम्' (तो हा आहे) या वाक्यात ज्या प्रमाणे 'सः' आणि 'अयम्' या पदार्थांची भागलक्षणा घेतली जाते, त्याप्रमाणे 'तत्' आणि 'त्वम्' या पदांच्या बाबतीत निर्दोष भागलक्षणा घेऊन अर्थ करणे योग्य ठरते. * (२७)

पंचीकरणाने बनलेल्या पृथ्वी इत्यादी पाच भूतांपासून उत्पन्न होणारे, सुख-दुःख इत्यादी कर्माच्या भोगांचा आश्रय असणारे, उत्पत्ती आणि नाश असणारे, पूर्व जन्मातील कर्मानी निर्माण होणारे व मायेचे कार्य असणारे हे स्थूल शरीर ही आत्म्याची स्थूल उपाधी आहे, असे मानले जाते. तसेच मन, बुद्धी, दहा इंद्रिये आणि पंच प्राण यांनी युक्त, पाच अपंचीकृत भूतांपासून उत्पन्न होणारे, आणि भोक्त्या जीवाच्या सुख- दुःख इत्यादी भोगांचे साधन असणारे जे सूक्ष्म शरीर आहे, ते जीवात्म्याचे दुसरे शरीर आहे, असे विद्वान लोक जाणतात. (हे सूक्ष्म शरीर ही आत्म्याची आणखी एक उपाधी आहे.) (२८-२९)

या दोन शरीरांखेरीज अनादी, अनिर्वचनीय माया ही प्रधान असणारे असे आणखी एक कारण नावाचे तिसरे शरीर आहे. तेही आत्म्याची आणखी एक उपाधी आहे. अशा प्रकारे या तीन शरीरांच्या उपाधींपेक्षा संपूर्णपणे वेगळेपणाने असणारा आपला आत्मा आहे, असा क्रमाने उपाधीचा निरास करीत आपल्या मनात आत्मनिश्चय करावा. (३०)

* जेव्हा वाक्यात पदांचा वाच्यार्थ हा सुसंगत ठरत नाही, तेव्हा तेथे लक्षणा वृत्तीने लक्ष्यार्थ घ्यावा लागतो. 'तत्त्वमसि' वाक्यात 'तत्' व 'त्वं' पदांचा वाच्यार्थ विरोधामुळे सुसंगत ठरत नाही. म्हणून लक्षणा घेऊन त्यांचा अर्थ करावा लागतो. आणि भाग लक्षणेने दोन्ही पदांचा लक्ष्यार्थ 'चैतन्य' असा आहे, असे कळते. या भाग लक्षणेचा उल्लेख या श्लोकात आहे.

जेथे शब्दांचे वाच्यार्थ (म्हणजे त्या शब्दांच्या अभिधा शक्तीने कळणारे अर्थ) सोडून, दुसरा अर्थ घेतला जातो, तेथे तो लक्षणा वृत्तीने घेतला जातो. ती लक्षणा जहती, अजहती आणि जहत्यजहती या नावाची तीन प्रकारची आहे. जहती लक्षणेमध्ये शब्दांचे वाच्यार्थ संपूर्णपणे सोडून देऊन एकदम एक दुसरा अर्थ लक्ष्यार्थ घेतला जातो. जसे 'गंगायां घोषः' (म्हणजे गंगेवर पशुशाला आहे) या वाक्यात वाच्यार्थाने गंगेच्या प्रवाहावर पशुशाला आहे, असा अर्थ होतो. परंतु हा वाच्यार्थ संपूर्णपणे असंभवनीय आहे. म्हणून येथे गंगा शब्दाचा अर्थ गंगाप्रवाह असा न घेता गंगातीर असा घेतला जातो. 'तत्त्वमसि' वाक्यात अशी जहती लक्षणा घेतली तर 'तत्' आणि 'त्वं' पदाचे वाच्यार्थ (ईश्वर आणि जीव) हे संपूर्णपणे सोडून द्यावे लागतील; तसे केल्यावर त्या दोघांच्या वाच्यार्थातील चैतन्य हा अर्थसुद्धा सोडून दिला असे होते. परंतु या वाक्यात तर चैतन्याचे एकत्व हा अर्थ इष्ट आहे. म्हणून जहती लक्षणेने या दोन पदांच्या अर्थाची एकता सिद्ध होऊ शकत नाही. अजहती (अजल्लक्षणा) या लक्षणेत वाच्यार्थाचा त्याग न करता, त्या वाच्यार्थासह दुसरा एक अर्थ लक्ष्यार्थ म्हणून ग्रहण केला जातो. 'काकेभ्यो दधि रक्ष्यताम्' कावळ्यापासून दह्याचे रक्षण कर या वाक्याचा अभिप्राय केवळ कावळ्यापासून दह्याचे रक्षण करावे असा नाही, तर कावळ्याचे बरोबरच कुत्रा, मांजर इत्यादी अन्य प्राण्यांपासून दह्याचे रक्षण करावे, असा आहे. 'तत्त्वमसि' वाक्यात अजहती लक्षणा घेतली तर 'तत्' 'त्वं' पदाच्या वाच्यार्थाच्या जोडीने अन्य अर्थ वाच्यार्थ म्हणून घ्यावा लागेल. तरीसुद्धा 'तत्' व 'त्वं' पदाच्या वाच्यार्थात जो विरोध आहे, तो दूर होतच नाही. म्हणून अजहती लक्षणेने सुद्धा त्यांची एकता ही सिद्ध होत नाही, या दोन लक्षणांखेरीज तिसरी एक जहत्यजहती (भाग लक्षणा) आहे; तिच्यामध्ये काही वाच्यार्थ सोडला जातो आणि काही वाच्यार्थ ठेवला जातो. जसे 'सोऽयम्' (तो हा आहे) या वाक्यात 'अयम्' पदाने कळून येणाऱ्या पदार्थाची अपरोक्षता आणि 'सः' पदाच्या अर्थाने कळणाऱ्या पदार्थाची परोक्षता या दोहोंचाही त्याग करून, त्या दोन्ही अर्थांनी रहित असा जो निर्विशेष पदार्थ आहे, त्याची एकता सांगितली जाते. याच प्रकाराने 'तत्त्वमसि' वाक्यात 'तत्' पदाने वाच्य असणाऱ्या ईश्वराचे सर्वज्ञता, परोक्षता इत्यादी गुण आणि 'त्वं' पदाचा वाच्यार्थ असणाऱ्या जीवाचे अल्पज्ञता, प्रत्यक्षता इत्यादी गुण या दोहोंचा त्याग करून केवळ चेतन अंशाचे एकत्व घेणे हे योग्य ठरते. म्हणून 'तत्त्वमसि' वाक्यातून इष्ट अर्थ प्राप्त होण्यासाठी भाग लक्षणा घेणे आवश्यक ठरते.

कोशेष्वयं तेषु तु तत्तदाकृति-
र्विभाति सङ्गात्स्फटिकोपलो यथा ।
असङ्गरूपोऽयमजो यतोऽद्वयो
विज्ञायतेऽस्मिन्परितो विचारिते ॥ ३१ ॥

ज्या प्रमाणे स्फटिकाला जवळ असणाऱ्या पदार्थाचा रंग येतो, त्या प्रमाणे त्या अन्नमयादी कोशांच्या संगामुळे हा आत्मा त्या त्या कोशाच्या आकाराचा भासू लागतो.परंतु आत्मस्वरूपाचा नीट विचार केला असता, हा आत्मा अद्वितीय असल्यामुळे तो असंग आणि अजन्मा आहे, हे निश्चितपणे कळून येते. (३१)

बुद्धेस्त्रिधा वृत्तिरपीह दृश्यते
स्वप्नादिभेदेन गुणत्रयात्मनः ।
अन्योन्यतोऽस्मिन्व्यभिचारतो मृषा
नित्ये परे ब्रह्मणि केवले शिवे ॥ ३२ ॥

(सत्त्व, रज आणि तम हे) तीन गुण असणाऱ्या त्रिगुणात्मक बुद्धीच्या स्वप्न, जागृती आणि निद्रा या भेदांनी तीन वृत्तीसुद्धा मानवी जीवनात दिसून येतात. परंतु या तीन वृत्तींतील प्रत्येकीचा दुसऱ्या वृत्तीत अभाव होतो. यामुळे या तिन्ही अवस्था एकमात्र, कल्याणस्वरूप नित्य अशा परब्रह्माच्या दृष्टीने मिथ्या ठरतात. (३२)

देहेन्द्रियप्राणमनश्चिदात्मनां
सङ्घादजस्रं परिवर्तते धियः ।
वृत्तिस्तमोमूलतयाज्ञलक्षणा
यावद्भवेत्तावदसौ भवोद्भवः ॥ ३३ ॥

देह, इंद्रिये, प्राण, मन व चेतन आत्मा हे एकत्र आल्यामुळे बुद्धीची वृत्ती सतत बदलत राहाते. ही वृत्ती तमोगुणापासून उत्पन्न झालेली असल्यामुळे ती अज्ञान-रूप असते; आणि जोपर्यंत ही बुद्धी चालू राहाते, तोपर्यंत संसार चालूच राहातो. (३३)

नेतिप्रमाणेन निराकृताखिलो
हृदा समास्वादितचिद्घनामृतः ।
त्यजेदशेषं जगदात्तसद्रसं
पीत्वा यथाम्भः प्रजहाति तत्फलम् ॥ ३४ ॥

'न इति न इति' या वाक्यातील वेदप्रमाणाने संपूर्ण संसाराचे निराकरण करून आणि हृदयामध्ये चिद्घनामृताचा आस्वाद घेऊन, नंतर, ज्या प्रमाणे एखादा माणूस नारळातील पाणी पिऊन झाल्यावर त्याचे वरील कवच फेकून देतो, त्या प्रमाणे जगाचे सार असणारे सत् असे ब्रह्म प्राप्त करून घेऊन, साधक मुमुक्षूने संपूर्ण जगाचा त्याग करावा. (३४)

कदाचिदात्मा न मृतो न जायते
न क्षीयते नापि विवर्धतेऽनवः ।
निरस्तसर्वातिशयः सुखात्मकः
स्वयम्प्रभः सर्वगतोऽयमद्वयः ॥ ३५ ॥

आत्मा हा कधीही जन्माला येत नाही आणि तो कधीही मरत नाही. तो कधीही क्षीण होत नाही आणि तो कधीही वाढत नाही. तो पुरातन आत्मा सर्व विशेषणांनी रहित आहे. तो सुख- स्वरूप आहे. तो आत्मा स्वयंप्रकाशी, सर्वव्यापक आणि द्वैतरहित आहे. (३५)

एवंविधे ज्ञानमये सुखात्मके
कथं भवो दुःखमयः प्रतीयते ।
अज्ञानतोऽध्यासवशात्प्रकाशते
ज्ञाने विलीयेत विरोधतः क्षणात् ॥ ३६ ॥

येथे कुणी प्रश्न करील की अशा प्रकारच्या त्या ज्ञानस्वरूप आणि सुख-स्वरूप असणाऱ्या आत्म्यावर हा दुःखाने भरलेला संसार कसा बरे प्रचीतीला येतो ? तर या प्रश्नाचे उत्तर असे आहे की अज्ञानाच्या योगे आत्म्यावर अध्यास होऊन हा संसार अनुभवास येतो. परंतु आत्म्याचे ज्ञान होताच, संसार क्षणात लयाला जातो. कारण ज्ञान आणि अज्ञान हे संपूर्णपणे परस्पर विरोधी आहेत. (३६)

यदन्यदन्यत्र विभाव्यते भ्रमा-
दध्यासमित्याहुरमुं विपश्चितः ।
असर्पभूतेऽहिविभावनं यथा
रज्वादिके तद्वदपीश्वरे जगत् ॥ ३७ ॥

(हा अध्यास म्हणजे काय, या प्रश्नाचे उत्तर असे की) भ्रमामुळे एखाद्या ठिकाणी दुसराच पदार्थ भासतो, त्या गोष्टीला अध्यास असे विद्वान म्हणतात. ज्या प्रमाणे सर्प नसणाऱ्या रज्जू इत्यादींवर सर्प भासतो, त्या प्रमाणे ईश्वरावर जग भासते. (३७)

विकल्पमायारहिते चिदात्मके-
ऽहङ्कार एष प्रथमः प्रकल्पितः ।
अध्यास एवात्मनि सर्वकारणे
निरामये ब्रह्मणि केवले परे ॥ ३८ ॥

इच्छादिरागादिसुखादिधर्मिकाः
सदा धियः संसृतिहेतवः परे ।
यस्मात्प्रसुप्तौ तदभावतः परः
सुखस्वरूपेण विभाव्यते हि नः ॥ ३९ ॥

अनाद्यविद्योद्भवबुद्धिबिम्बितो
जीवः प्रकाशोऽयमितीर्यते चितः ।
आत्मा धियः साक्षितया पृथक् स्थितो
बुद्ध्यापरिच्छिन्नपरः स एव हि ॥ ४० ॥

चिद्बिम्बसाक्ष्यात्मधियां प्रसङ्गत-
स्त्वेकत्र वासादनलाक्तलोहवत् ।
अन्योन्यमध्यासवशात्प्रतीयते
जडाजडत्वं च चिदात्मचेतसोः ॥ ४१ ॥

गुरोः सकाशादपि वेदवाक्यतः
सञ्जातविद्यानुभवो निरीक्ष्य तम् ।
स्वात्मानमात्मस्थमुपाधिवर्जितं
त्यजेदशेषं जडमात्मगोचरम् ॥ ४२ ॥

प्रकाशरूपोऽहमजोऽहमद्वयो-
ऽसकृद्विभातोऽहमतीव निर्मलः ।
विशुद्धविज्ञानघनो निरामयः
सम्पूर्ण आनन्दमयोऽहमक्रियः ॥ ४३ ॥

सदैव मुक्तोऽहमचिन्त्यशक्तिमा-
नतीन्द्रियज्ञानमविक्रियात्मकः ।
अनन्तपारोऽहमहर्निशं बुधै-
र्विभावितोऽहं हृदि वेदवादिभिः ॥ ४४ ॥

विकल्प आणि माया यांनी रहित, चित्स्वरूप, सर्वांचे कारण, निरामय विकाररहित, अद्वितीय असणाऱ्या अशा परब्रह्मावर सर्वप्रथम अहंकार कल्पिला गेला. हा अध्यासच आहे. (३८)

इच्छा व अनिच्छा, राग आणि द्वेष, सुख व दुःख हे नेहमीचे धर्म असणाऱ्या बुद्धीच्या वृत्ती या संसाराचे कारण आहेत आणि त्या परमात्म्यावर आरोपित केल्या जातात. कारण निद्रा या अवस्थेत त्यांचा अभाव झाला असताना, सुखस्वरूप असा परमात्मा आपल्या अनुभवास येत असतो. (३९)

अनादी अविद्येपासून उत्पन्न झालेल्या बुद्धीत प्रतिबिंबित झालेला चैतन्याचा प्रकाश हा जीव आहे, असे म्हटले जाते. बुद्धीचा साक्षी या स्वरूपात आत्मा हा वेगळाच राहात असतो. बुद्धीमुळे मर्यादित होत नाही. कारण तो आत्मा हा पर म्हणजे सर्वव्यापक आहे. (४०)

अग्नीने तप्त झालेल्या लोखंडाप्रमाणे प्रतिबिंब म्हणजे चिदाभास, साक्षी असणारा आत्मा आणि बुद्धी यांच्या एकत्र राहाण्यामुळे, त्यांचा परस्पर अध्यास होतो; त्यामुळे चिदात्म्याचे चेतनत्व हे मनावर आणि मनाचे जडत्व हे चिदात्म्यावर भासू लागते. (४१)

गुरूजवळून किंवा वेदवाक्यावरून, आत्मज्ञानाचा अनुभव आल्यावर, आपल्या शरीरात असणाऱ्या उपाधिरहित अशा स्वतःच्या आत्म्याचा साक्षात्कार करून घेऊन, आत्म्यावर प्रतीत होणाऱ्या सर्व अनात्म गोष्टींचा त्याग करावा. (४२)

'मी प्रकाशरूप, अजन्मा, अद्वितीय, नित्य प्रकाशमान, अतिशय निर्मळ, शुद्ध विज्ञानघन, निरामय क्रियारहित आणि पूर्णपणे आनंदस्वरूप आहे. विकाररहित असणे हे माझे स्वरूप आहे. मी नेहमी मुक्त आहे. माझ्याजवळ अचिंत्य शक्ती आहे. मी अतींद्रिय, ज्ञानस्वरूप, अविकृतस्वरूप असणारा आहे. मी अनंत व अपार आहे. वेदांचा अभ्यास करणारे वेदवेत्ते रात्रंदिवस आपल्या हृदयात माझेच चिंतन करीत असतात.' (४३-४४)

एवं सदात्मानमखण्डितात्मना
विचारमाणस्य विशुद्धभावना ।
हन्यादविद्यामचिरेण कारकै
रसायनं यद्वदुपासितं रुजः ॥ ४५ ॥

अशा प्रकारे अखंड मनोवृत्तीने नेहमी आत्म्याचे चिंतन करणाऱ्याच्या मनात उत्पन्न होणारी विशुद्ध भावनाही त्वरित कारकांसह अविद्येचा नाश करून टाकते. जसे, योग्यप्रकारे सेवन केल्याने रसायन किंवा औषध हे रोगाचा नाश करते. (४५)

विविक्त आसीन उपारतेन्द्रियो
विनिर्जितात्मा विमलान्तराशयः ।
विभावयेदेकमनन्यसाधनो
विज्ञानदृक्केवल आत्मसंस्थितः ॥ ४६ ॥

इंद्रियांना आपल्या विषयांपासून दूर करून अंतःकरण जिंकून घ्यावे आणि आत्म्यामध्ये स्थित होऊन इतर कोणत्याही साधनाचा आधार न घेता शुद्ध चित्त होऊन विज्ञानदृष्टीने फक्त आत्म्याचे चिंतन करावे. (४६)

विश्वं यदेतत्परमात्मदर्शनं
विलापयेदात्मनि सर्वकारणे ।
पूर्णश्चिदानन्दमयोऽवतिष्ठते
न वेद बाह्यं न च किञ्चिदान्तरम् ॥ ४७ ॥

हे जे विश्व दिसते ते परमात्म्याचे स्वरूप आहे, असे जाणून, सर्वांचे कारण असणाऱ्या परमात्म्यामध्ये विश्वाचा लय करावा. असे केल्यावर, जो माणूस संपूर्णपणे आनंदस्वरूप होऊन जातो, त्याला बाहेरील अथवा आतील कोणतीच गोष्ट कळून येत नाही. (४७)

पूर्वं समाधेरखिलं विचिन्तये-
दोङ्कारमात्रं सचराचरं जगत् ।
तदेव वाच्यं प्रणवो हि वाचको
विभाव्यतेऽज्ञानवशान्न बोधतः ॥ ४८ ॥

समाधी प्राप्त होण्यापूर्वी, संपूर्ण चराचर जग हे केवळ ओंकारमात्र आहे, असा साधकाने विचार करावा. ते जगच ओंकाराने वाच्य होते आणि ओंकार हा जगाचा वाचक आहे. अज्ञानी अवस्थेतच जग हे ॐ काररूप आहे, अशी वाच्यवाचक भावाची प्रचीती येते. परंतु ज्ञान झाल्यावर फक्त एक ब्रह्मच उरते. (४८)

अकारसंज्ञः पुरुषो हि विश्वको
ह्युकारकस्तैजस ईर्यते क्रमात् ।
प्राज्ञो मकारः परिपठ्यतेऽखिलैः
समाधिपूर्वं न तु तत्त्वतो भवेत् ॥ ४९ ॥

ॐकारात अ, उ,म हे तीन वर्ण आहेत. यांतील अकार, विश्व म्हणजे जागृतीचा अभिमानी, असलेल्याचा वाचक आहे. उकार, तेजस म्हणजे स्वप्नाचा अभिमानी, असलेल्याचा वाचक आहे आणि मकार प्राज्ञ म्हणजे सुषुप्तीचा अभिमानी, असलेल्याचा वाचक आहे. (४९)

विश्वं त्वकारं पुरुषं विलापये-
दुकारमध्ये बहुधा व्यवस्थितम् ।
ततो मकारे प्रविलाप्य तैजसं
द्वितीयवर्णं प्रणवस्य चान्तिमे ॥ ५० ॥

नाना प्रकाराने स्थित असणाऱ्या अकाररूपी विश्व पुरुषाचा लय उकाराच्या मध्ये करावा. त्यानंतर ओंकाराच्या उकाररूपी द्वितीय वर्णस्वरूप असणाऱ्या तैजस पुरुषाला शेवटच्या मकाररूप वर्णात लीन करावे. (५०)

मकारमप्यात्मनि चिद्घने परे
विलापयेत्प्राज्ञमपीह कारणम् ।
सोऽहं परं ब्रह्म सदा विमुक्तिमद्-
विज्ञानदृङ्मुक्त उपाधितोऽमलः ॥ ५१ ॥

त्यानंतर येथे कारणरूप तसेच मकाररूप असणाऱ्या प्राज्ञ पुरुषालासुद्धा चिद्घन अशा परमात्म्यात लीन करावे. मग विज्ञान-दृष्टी असणाऱ्या, उपाधींपासून मुक्त झालेल्या अशा निर्मळ साधकाने नित्य मुक्त असणारे परब्रह्म म्हणजे मी आहे, अशी भावना करावी. (५१)

एवं सदा जातपरात्मभावनः
स्वानन्दतुष्टः परिविस्मृताखिलः ।
आस्ते स नित्यात्मसुखप्रकाशकः
साक्षाद्विमुक्तोऽचलवारिसिन्धुवत् ॥ ५२ ॥

एवं सदाभ्यस्तसमाधियोगिनो
निवृत्तसर्वेन्द्रियगोचरस्य हि ।
विनिर्जिताशेषरिपोरहं सदा
दृश्यो भवेयं जितषड्गुणात्मनः ॥ ५३ ॥

ध्यात्वैवमात्मानमहर्निशं मुनि-
स्तिष्ठेत्सदा मुक्तसमस्तबन्धनः ।
प्रारब्धमश्नन्नभिमानवर्जितो
मय्येव साक्षात्प्रविलीयते ततः ॥ ५४ ॥

आदौ च मध्ये च तथैव चान्ततो
भवं विदित्वा भयशोककारणम् ।
हित्वा समस्तं विधिवादचोदितं
भजेत्स्वमात्मानमथाखिलात्मनाम् ॥ ५५ ॥

आत्मन्यभेदेन विभावयन्निदं
भवत्यभेदेन मयात्मना तदा ।
यथा जलं वारिनिधौ यथा पयः
क्षीरे वियद्व्योम्न्यनिले यथानिलः ॥ ५६ ॥

इत्थं यदीक्षेत हि लोकसंस्थितो
जगन्मृषैवेति विभावयन्मुनिः ।
निराकृतत्वाच्छ्रुतियुक्तिमानतो
यथेन्दुभेदो दिशि दिग्भ्रमादयः ॥ ५७ ॥

यावन्न पश्येदखिलं मदात्मकं
तावन्मदाराधनतत्परो भवेत् ।
श्रद्धालुरत्यूर्जितभक्तिलक्षणो
यस्तस्य दृश्योऽहमहर्निशं हृदि ॥ ५८ ॥

अशा प्रकारे मी परमात्मा आहे, अशी भावना ज्याच्या ठिकाणी सतत निर्माण झाली आहे, जो स्वतःच्या म्हणजे आत्म्याच्या आनंदात मग्न झाला आहे, जो संपूर्ण संसार पूर्णपणे विसरून गेला आहे आणि नित्य आत्मसुखाचा प्रकाश हेच ज्याचे स्वरूप झाले आहे, असा तो साक्षात मुक्त पुरुष हा निश्चल जळाने भरलेल्या सागरासारखा स्थिर राहातो. (५२)

अशा प्रकारे जो पुरुष समाधियोगाचा नित्य अभ्यास करतो, सर्व इंद्रियांना गोचर असणारे विषय हे ज्याच्यापासून निवृत्त झाले आहेत, ज्याने काम, क्रोध इत्यादी सर्व शत्रू जिंकलेले आहेत, ज्याने सहा इंद्रियांना जिंकले आहे, अशा महात्म्या पुरुषाला माझा साक्षात्कार नेहमी होतो. (५३)

अशा प्रकारे रात्रंदिवस आत्म्याचे ध्यान करून, मुनीने नेहमी सर्व बंधनांतून मुक्त होऊन राहावे. मी कर्ता, मी भोक्ता या अभिमानाने रहित होऊन, प्रारब्ध भोगत राहाणारा माणूस नंतर साक्षात माझ्यामध्येच लीन होऊन जातो. (५४)

हा संसार आदी, मध्य आणि अंत या सर्व ठिकाणी भय व शोक यांचे कारण आहे, हे जाणून, आणि विधि-वाक्यांनी विहित केलेली सर्व कर्मे टाकून देऊन, मग सर्वांचा आत्मा असणारा असा जो आपला स्वतःचाही आत्मा आहे, त्याचा आश्रय घ्यावा. (५५)

ज्या प्रमाणे समुद्रात जल, दुधात दूध, महाकाशात घटाकाश इत्यादी आणि वायूमध्ये वायू मिसळून एक होतात, त्या प्रमाणे हा संपूर्ण संसार आत्म्याशी अभिन्न आहे, असे चिंतन केल्यास जीव हा मज परमात्म्याबरोबर अभिन्न भावनेने स्थित होतो. (५६)

हे जे जग आहे ते श्रुती व युक्ती आणि प्रमाण यांचे द्वारा निराकृत होत असल्याकारणाने, ते एका चंद्राऐवजी अनेक चंद्र, किंवा एका दिशेमध्ये होणारा दुसऱ्या दिशेचा भ्रम, या प्रमाणे मिथ्याच आहे, असा विचार करीत, लोकव्यवहारात राहून, मुनी जर ऐक्यच पाहात राहील तर त्याला जीव, जग आणि परमात्मा यांच्या ऐक्याचे ज्ञान होईल. (५७)

जोपर्यंत सर्व विश्व हे माझे स्वरूप आहे, हे माणसाला पाहाता येत नाही, तोपर्यंत त्याने माझी आराधना करण्यात तत्पर राहावे. जो पुरुष श्रद्धेने युक्त आणि उत्कट भक्तीने संपन्न आहे, त्यालाच स्वतःच्या हृदयात रात्रंदिवस माझाच साक्षात्कार होतो. (५८)

रहस्यमेतच्छ्रुतिसारसङ्ग्रहं
मया विनिश्चित्य तवोदितं प्रिय ।
यस्त्वेतदालोचयतीह बुद्धिमान्
स मुच्यते पातकराशिभिः क्षणात् ॥ ५९ ॥

भ्रातर्यदीदं परिदृश्यते जग-
न्मायैव सर्वं परिहृत्य चेतसा ।
मद्भावनाभावितशुद्धमानसः
सुखी भवानन्दमयो निरामयः ॥ ६० ॥

यः सेवते मामगुणं गुणात्परं
हृदा कदा वा यदि वा गुणात्मकम् ।
सोऽहं स्वपादाश्चितरेणुभिः स्पृशन्
पुनाति लोकत्रितयं यथा रविः ॥ ६१ ॥

विज्ञानमेतदखिलं श्रुतिसारमेकं
वेदान्तवेद्यचरणेन मयैव गीतम् ।
यः श्रद्धया परिपठेद् गुरुभक्तियुक्तो
मद्रूपमेति यदि मद्वचनेषु भक्तिः ॥ ६२ ॥

हे प्रिय लक्ष्मणा, सर्व श्रुतींचे सारसंग्रहरूप असे हे रहस्य मी निश्चित करून तुला सांगितले आहे. येथे या जगात जो बुद्धिमान् पुरुष याचे मनन करील, तो एका क्षणात सर्व पातकांतून मुक्त होईल. (५९)

हे बंधू लक्ष्मणा, हे जे जग दिसत आहे ते सर्व माया आहे, हे जाणून तू ते आपल्या मनातून काढून टाक. माझ्या चिंतनाने चित्त शुद्ध करून तू सुखी, आनंदमय आणि क्लेशरहित हो. (६०)

जो पुरुष आपल्या मनाने गुणांच्या पलीकडील, गुणरहित अशा माझे चिंतन करतो किंवा कधी माझ्या सगुण रूपाचे सेवन करतो, तो व मी एकरूप आहोत. ज्या प्रमाणे सूर्य आपल्या किरणांनी तिन्ही जगांना प्रकाशित करतो, त्या प्रमाणे हा महापुरुष आपल्या पायाच्या रज:कणाच्या स्पर्शाने तिन्ही लोकांना पवित्र करतो. (६१)

हे एकमेवद्वितीय व संपूर्ण असे श्रुतींचे सार विज्ञान आहे. वेदांतावरूनच ज्याच्या चरणांचे ज्ञान होते, अशा मीच तुला हे सांगितले आहे. गुरुवरील भक्तीने युक्त होऊन जो कोणी पुरुष श्रद्धापूर्वक हे पठण करील, त्याची जर माझ्या वचनांवर भक्ती असेल, तर तो पुरुष मद्रूप होऊन जातो." (६२)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे उत्तरकाण्डे पंचमः सर्गः ॥ ५ ॥

षष्ठ सर्ग

लवणाचा वध, भगवान रामांच्या यज्ञात कुश-लव यांच्यासह महर्षी वाल्मीकींचे आगमन आणि कुशाला परमार्थाचा उपदेश

श्रीमहादेव उवाच

एकदा मुनयः सर्वे यमुनातीरवासिनः ।
आजग्मू राघवं द्रष्टुं भयाल्लवणराक्षसः ॥ १ ॥

कृत्वाग्रे तु मुनिश्रेष्ठं भार्गवं च्यवनं द्विजाः ।
असङ्ख्याताः समायाता रामादभयकाङ्क्षिणः ॥ २ ॥

तान्पूजयित्वा परया भक्त्या रघुकुलोत्तमः ।
उवाच मधुरं वाक्यं हर्षयन्मुनिमण्डलम् ॥ ३ ॥

करवाणि मुनिश्रेष्ठाः किमागमनकारणम् ।
धन्योऽस्मि यदि यूयं मां प्रीत्या द्रष्टुमिहागताः ॥ ४ ॥

श्रीमहादेव म्हणाले– हे पार्वती, यमुनानदीच्या तीरावर राहाणारे सर्व मुनी एकदा लवण राक्षसाच्या भीतीमुळे राघवांना भेटण्यास आले. (१)

श्रीरामांकडून अभय मिळविण्याची इच्छा असणारे ते असंख्य ब्राह्मण भृगु-पुत्र च्यवन या मुनिश्रेष्ठांना पुढे करून आले होते. (२)

अतिशय भक्तीने त्यांचा सत्कार करून, त्या मुनिसमुदायाला आनंद देत, रघुकुलश्रेष्ठ श्रीराम मधुर शब्दांत बोलले. (३)

"हे मुनिश्रेष्ठांनो, तुमच्या आगमनाचे काय कारण आहे ? तुम्ही मला जशी आज्ञा कराल तसे मी करीन. जर तुम्ही प्रेमाने मला भेटण्यास आला असाल तर मी धन्य आहे. (४)

दुष्करं चापि यत्कार्यं भवतां तत्करोम्यहम् ।
आज्ञापयन्तु मां भृत्यं ब्राह्मणा दैवतं हि मे ॥ ५ ॥

तच्छ्रुत्वा सहसा हृष्टश्च्यवनो वाक्यमब्रवीत् ।
मधुनामा महादैत्यः पुरा कृतयुगे प्रभो ॥ ६ ॥

आसीदतीव धर्मात्मा देवब्राह्मणपूजकः ।
तस्य तुष्टो महादेवो ददौ शूलमनुत्तमम् ॥ ७ ॥

प्राह चानेन यं हंसि स तु भस्मीभविष्यति ।
रावणस्यानुजा भार्या तस्य कुम्भीनसी श्रुता ॥ ८ ॥

तस्यां तु लवणो नाम राक्षसो भीमविक्रमः ।
आसीदुरात्मा दुर्धर्षो देवब्राह्मणहिंसकः ॥ ९ ॥

पीडितास्तेन राजेन्द्र वयं त्वां शरणं गताः ।
तच्छ्रुत्वा राघवोऽप्याह मा भीर्वो मुनिपुङ्गवाः ॥ १० ॥

लवणं नाशयिष्यामि गच्छन्तु विगतज्वराः ।
इत्युक्त्वा प्राह रामोऽपि भ्रातॄन् को वा हनिष्यति ॥ ११ ॥

लवणं राक्षसं दद्याद् ब्राह्मणेभ्योऽभयं महत् ।
तच्छ्रुत्वा प्राञ्जलिः प्राह भरतो राघवाय वै ॥ १२ ॥

अहमेव हनिष्यामि देवाज्ञापय मां प्रभो ।
ततो रामं नमस्कृत्य शत्रुघ्नो वाक्यमब्रवीत् ॥ १३ ॥

लक्ष्मणेन महत्कार्यं कृतं राघव संयुगे ।
नन्दिग्रामे महाबुद्धिर्भरतो दुःखमन्वभूत् ॥ १४ ॥

अहमेव गमिष्यामि लवणस्य वधाय च ।
त्वत्प्रसादाद्रघुश्रेष्ठ हन्यां तं राक्षसं युधि ॥ १५ ॥

तच्छ्रुत्वा स्वाङ्कमारोप्य शत्रुघ्नं शत्रुसूदनः ।
प्राहाद्यैवाभिषेक्ष्यामि मथुराराज्यकारणात् ॥ १६ ॥

आनाय्य च सुसम्भाराँल्लक्ष्मणेनाभिषेचने ।
अनिच्छन्तमपि स्नेहादभिषेकमकारयत् ॥ १७ ॥

आपले जे काही दुष्कर कार्य असेल, तेसुद्धा मी करीन. मज सेवकाला तुम्ही आज्ञा द्या. कारण ब्राह्मण हेच माझे इष्ट दैवत आहे." (५)

ते श्रीरामांचे वचन ऐकल्यावर च्यवन आनंदित झाले आणि म्हणाले, "हे प्रभो, पूर्वी कृतयुगामध्ये मधू नावाचा एक महादैत्य अतिशय धर्मात्मा आणि देव व ब्राह्मण यांची पूजा करणारा होता. त्याच्यावर प्रसन्न झालेल्या भगवान महादेवांनी त्याला एक अतिशय उत्तम शूल दिला आणि त्याला सांगितले, 'या शूलाने तू ज्याला तडाखा देशील तो भस्मीभूत होऊन जाईल.' असे म्हणतात की रावणाची धाकटी बहीण कुंभीनसी ही त्याची भार्या होती. (६-८)

तिच्यापासून लवण नावाचा भयंकर पराक्रमी, दुष्ट मनाचा, दुर्जय आणि देव व ब्राह्मण यांची हिंसा करणारा राक्षस उत्पन्न झाला होता. (९)

हे राजेंद्रा, त्याच्याकडून त्रस्त होऊन आम्ही तुम्हांला शरण आलो आहोत. " ते ऐकल्यावर राघवसुद्धा म्हणाले, "हे मुनिश्रेष्ठांनो, तुम्ही कोणतीही भीती बाळगू नका. (१०)

मी लवणाचा नाश करतो. तुम्ही चिंता न करता जा. " असे सांगून श्रीराम आपल्या भावांना म्हणाले, "तुमच्यापैकी लवण राक्षसाचा वध कोण करील ? आणि ब्राह्मणांना मोठे अभय देईल ?" ते ऐकून हात जोडून भरत राघवांना म्हणाला. (११-१२)

"महाराज, मीच लवणाचा वध करीन. हे प्रभो, मला आज्ञा द्या." तेव्हा श्रीरामांना नमस्कार करून शत्रुघ्न म्हणाला . (१३)

"हे राघवा, युद्धामध्ये लक्ष्मणाने फार मोठे कार्य केले आहे. महाबुद्धिमान भरताने नंदिग्रामात राहून दुःख अनुभवले आहे. (१४)

तेव्हा आता लवणाचा वध करण्यास मीच जातो. हे रघुश्रेष्ठा, तुमच्या प्रसादाने मी त्या राक्षसाला युद्धामध्ये ठार करतो." (१५)

ते ऐकल्यावर शत्रुघातक श्रीरामांनी शत्रुघ्नाला आपल्याजवळ बसविले आणि म्हटले, "आजच मी तुला लवणाच्या मथुरा नगरीच्या राज्यावर अभिषेक करतो." (१६)

मग लक्ष्मणाकडून राज्याभिषेकाचे सर्व साहित्य आणवून घेऊन, शत्रुघ्नाची इच्छा नसतानाही, रामांनी प्रेमपूर्वक शत्रुघ्नावर अभिषेक करविला. (१७)

दत्त्वा तस्मै शरं दिव्यं रामः शत्रुघ्नमब्रवीत् ।
अनेन जहि बाणेन लवणं लोककण्टकम् ॥ १८ ॥

स तु सम्पूज्य तच्छूलं गेहे गच्छति काननम् ।
भक्षणार्थं तु जन्तूनां नानाप्राणिवधाय च ॥ १९ ॥

स तु नायाति सदनं यावद्वनचरो भवेत् ।
तावदेव पुरद्वारि तिष्ठ त्वं धृतकार्मुकः ॥ २० ॥

योत्स्यते स त्वया क्रुद्धस्तदा वध्यो भविष्यति ।
तं हत्वा लवणं क्रूरं तद्वनं मधुसंज्ञितम् ॥ २१ ॥

निवेश्य नगरं तत्र तिष्ठ त्वं मेऽनुशासनात् ।
अश्वानां पञ्चसाहस्रं रथानां च तदर्धकम् ॥ २२ ॥

गजानां षट् शतानीह पत्तीनामयुतत्रयम् ।
आगमिष्यति पश्चात्त्वमग्रे साधय राक्षसम् ॥ २३ ॥

इत्युक्त्वा मूर्ध्न्यवघ्राय प्रेषयामास राघवः ।
शत्रुघ्नं मुनिभिः सार्धमाशीर्भिरभिनन्द्य च ॥ २४ ॥

शत्रुघ्नोऽपि तथा चक्रे यथा रामेण चोदितः ।
हत्वा मधुसुतं युद्धे मथुरामकरोत्पुरीम् ॥ २५ ॥

स्फीतां जनपदां चक्रे मथुरां दानमानतः ।
सीतापि सुषुवे पुत्रौ द्वौ वाल्मीकेरथाश्रमे ॥ २६ ॥

मुनिस्तयोर्नाम चक्रे कुशो ज्येष्ठोऽनुजो लवः ।
क्रमेण विद्यासम्पन्नौ सीतापुत्रौ बभूवतुः ॥ २७ ॥

उपनीतौ च मुनिना वेदाध्ययनतत्परौ ।
कृत्स्नं रामायणं प्राह काव्यं बालकयोर्मुनिः ॥ २८ ॥

शङ्करेण पुरा प्रोक्तं पार्वत्यै पुरहारिणा ।
वेदोपबृंहणार्थाय तावग्राहयत प्रभुः ॥ २९ ॥

कुमारौ स्वरसम्पन्नौ सुन्दरावश्विनाविव ।
तन्त्रीतालसमायुक्तौ गायन्तौ चेरतुर्वने ॥ ३० ॥

नंतर त्या शत्रुघ्नाला एक दिव्य बाण देऊन श्रीराम त्याला म्हणाले, "लोकांना काट्याप्रमाणे सलणाऱ्या त्या लवणाला तू या बाणाने ठार कर. (१८)

तो शंकरांनी दिलेल्या शूलाची पूजा घरातच करतो व जीवजंतूंना खाण्यासाठी आणि नाना प्रकारच्या प्राण्यांचा वध करण्यासाठी अरण्यात जात असतो. (१९)

तेव्हा जोपर्यंत तो घरी परत येत नाही आणि वनातच फिरत असतो, तोपर्यंत तू हातात धनुष्य घेऊन, त्याच्या नगराच्या द्वारात उभा रहा. (२०)

तो परत आल्यावर रागाने तो त्रिशूळाशिवाय तुझ्याशी युद्ध करील आणि त्याचवेळी त्याचा वध करणे योग्य होईल. त्या क्रूर लवणाला ठार केल्यावर, तू त्याच्या मधू नावाच्या वनात एक नगर वसव आणि माझ्या आज्ञेनुसार तू तेथेच राहू लाग. तू प्रथम पुढे जाऊन त्या राक्षसाचा वध कर. त्यानंतर तुझ्या मागोमाग पाच हजार घोडे, अडीच हजार रथ, सहाशे हत्ती आणि तीस हजार पायदळ सैन्य तेथे येईल." (२१-२३)

श्रीरामांनी असे सांगून त्याच्या मस्तकाचे अवघ्राण केले व अनेक आशीर्वाद देऊन त्याचे अभिनंदन केले आणि मुनींच्याबरोबर शत्रुघ्नाला पाठवून दिले. (२४)

श्रीरामांनी आज्ञा केली होती त्या प्रमाणे शत्रुघ्नाने केले. युद्धामध्ये मधुपुत्र लवणाचा वध करून त्याने मथुरा नगरी वसविली. (२५)

नंतर लोकांना दान आणि मान देऊन शत्रुघ्नानेसुद्धा मथुरा नगरीला एक समृद्धशाली नगर बनविले. त्या सुमारास वाल्मीकीच्या आश्रमात सीतेने दोन पुत्रांना जन्म दिला. (२६)

ज्येष्ठ पुत्राला कुश आणि धाकट्याला लव अशी नावे वाल्मीकी मुनींनी ठेवली. ते सीतेचे पुत्र क्रमाने विद्यासंपन्न झाले. (२७)

वाल्मीकी मुनींनी त्यांचे उपनयन केले. मग ते वेदाच्या अध्ययनात तत्पर झाले. त्या दोन बालकांना वाल्मीकी मुनींनी संपूर्ण रामायण काव्य शिकविले. (२८)

जे रामायण पूर्वी त्रिपुरनाशक शंकराने पार्वतीला कथन केले होते, तेच रामायण वेदाचा अर्थ विस्तृतपणे तपशीलवार कळावा म्हणून वाल्मीकी ऋषींनी त्या दोघांना शिकविले. (२९)

अश्विनीकुमाराप्रमाणे सुंदर आणि गोड आवाजाने ते दोघे कुमार वीणेच्या तालावर रामायण गात वनात फिरत असत. (३०)

तत्र तत्र मुनीनां तौ समाजे सुरूपिणौ ।
गायन्तावभितो दृष्ट्वा विस्मिता मुनयोऽब्रुवन् ॥ ३१ ॥

गन्धर्वेष्विव किन्नरेषु भुवि वा देवेषु देवालये
पातालेष्वथवा चतुर्मुखगृहे लोकेषु सर्वेषु च ।
अस्माभिश्चिरजीविभिश्चिरतरं दृष्टा दिशः सर्वतो
नाज्ञायीदृशगीतवाद्यगरिमा नादर्शि नाश्रावि च ॥ ३२ ॥

एवं स्तुवद्भिरखिलैर्मुनिभिः प्रतिवासरम् ।
आसाते सुखमेकान्ते वाल्मीकेराश्रमे चिरम् ॥ ३३ ॥

अथ रामोऽश्वमेधादींश्चकार बहुदक्षिणान् ।
यज्ञान् स्वर्णमयीं सीतां विधाय विपुलद्युतिः ॥ ३४ ॥

तस्मिन्विताने ऋषयः सर्वे राजर्षयस्तथा ।
ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः समाजग्मुर्दिदृक्षवः ॥ ३५ ॥

वाल्मीकिरपि सङ्गृह्य गायन्तौ तौ कुशीलवौ ।
जगाम ऋषिवाटस्य समीपं मुनिपुङ्गवः ॥ ३६ ॥

तत्रैकान्ते स्थितं शान्तं समाधिविरमे मुनिम् ।
कुशः पप्रच्छ वाल्मीकिं ज्ञानशास्त्रं कथान्तरे ॥ ३७ ॥

भगवञ्छ्रोतुमिच्छामि सङ्क्षेपाद्ब्रह्मतोऽखिलम् ।
देहिनः संसृतिर्बन्धः कथमुत्पद्यते दृढः ॥ ३८ ॥

कथं विमुच्यते देही दृढबन्धाद्भवाभिधात् ।
वक्तुमर्हसि सर्वज्ञ मह्यं शिष्याय ते मुने ॥ ३९ ॥

वाल्मीकिरुवाच

शृणु वक्ष्यामि ते सर्वं सङ्क्षेपाद्बन्धमोक्षयोः ।
स्वरूपं साधनं चापि मत्तः श्रुत्वा यथोदितम् ॥ ४० ॥

तथैवाचर भद्रं ते जीवन्मुक्तो भविष्यसि ।
देह एव महागेहमदहस्य चिदात्मनः ॥ ४१ ॥

तस्याहङ्कार एवास्मिन्मन्त्री तेनैव कल्पितः ।
देहगेहाभिमानं स्वं समारोप्य चिदात्मनि ॥ ४२ ॥

जागोजाग मुनींच्या समाजात देवांप्रमाणे सुंदर रूप असणाऱ्या त्या दोघांना सर्वत्र रामायण गात असताना पाहून विस्मित झालेले मुनी म्हणत की, (३१)

"आम्ही पुष्कळ काळ जगलो. पुष्कळ काळपर्यंत आम्ही सर्व दिशा पाहिल्या. तथापि अनेक गंधर्व व किन्नर, पृथ्वी, स्वर्ग, अनेक पाताळे, नागलोक अथवा ब्रह्मलोक इत्यादी ठिकाणी अशा प्रकारचे गायन व वादन यांतील कौशल्य आम्हांला कुठेच पाहाण्यास अथवा ऐकण्यास मिळाले नाही." (३२)

अशा प्रकारे दररोज सर्व मुनी त्यांची स्तुती करीत असताना, ते दोघे वाल्मीकीच्या एकांत आश्रमात सुखाने राहात होते. (३३)

इकडे सुवर्णमय सीता तयार करवून घेऊन, अत्यंत तेजस्वी रामांनी पुष्कळ दक्षिणेने युक्त असे अश्वमेध इत्यादी यज्ञ केले. (३४)

त्या वेळी सर्व ऋषी, राजर्षी, ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य हा यज्ञोत्सव पाहाण्याच्या इच्छेने यज्ञमंडपात आले होते. (३५)

मुनिश्रेष्ठ वाल्मीकीसुद्धा गायन करणाऱ्या कुश-लवांना घेऊन तेथे आले आणि ऋषींच्यासाठी तयार केलेल्या निवास-स्थानी उतरले. (३६)

एके दिवशी तेथे एकांतस्थानी शांतपणे बसलेल्या वाल्मीकी मुनींना त्यांची समाधी उतरल्यावर, बोलता बोलता, कुशाने ज्ञानशास्त्राविषयी पृच्छा केली. (३७)

तो म्हणाला, "हे भगवन, तुमच्याकडून सर्व काही मी संक्षेपाने ऐकू इच्छितो. देहधारी जीवाच्या बाबतीत संसाराचा हा दृढ बंध कसा बरे उत्पन्न होतो ? आणि संसार हे नाव असणाऱ्या या दृढ बंधनापासून तो देहधारी जीव कसा बरे सुटतो ? हे मुनी, तुम्ही सर्वज्ञ आहात. तुमचा शिष्य म्हणून मला तुम्ही हे सर्व सांगा." (३८-३९)

वाल्मीकी म्हणाले– "ऐक. बंध आणि मोक्ष यांचे स्वरूप तसेच बंधनातून सुटण्याचे साधन हे सर्व मी तुला संक्षेपाने सांगतो. ते माझ्याकडून ऐकल्यावर, मी जसे सांगेन त्या प्रमाणे तू आचार कर. त्यामुळे तुझे कल्याण होईल. तू जीवन्मुक्त होशील. मूलतः देहहीन असणाऱ्या चेतन आत्म्याचे हा देह हेच एक मोठे घर आहे. (४०-४१)

या देहामध्ये जीवाने अहंकारालाच आपला मंत्री केले आहे. हा अहंकार त्यानेच कल्पिलेला आहे. देह आणि घर यांवरील स्वतःचा अहंकार तो चिदात्म्यावर आरोपित

तेन तादात्म्यमापन्नः स्वचेष्टितमशेषतः ।
विदधाति चिदानन्दे तद्वासितवपुः स्वयम् ॥ ४३ ॥

तेन सङ्कल्पितो देही सङ्कल्पनिगडावृतः ।
पुत्रदारगृहादीनि सङ्कल्पयति चानिशम् ॥ ४४ ॥

सङ्कल्पयन्स्वयं देही परिशोचति सर्वदा ।
त्रयस्तस्याहमो देहा अधमोत्तममध्यमाः ॥ ४५ ॥

तमः सत्त्वरजःसंज्ञा जगतः कारणं स्थितेः ।
तमोरूपाद्धि सङ्कल्पान्नित्यं तामसचेष्टया ॥ ४६ ॥

अत्यन्तं तामसो भूत्वा कृमिकीटत्वमाप्नुयात् ।
सत्त्वरूपो हि सङ्कल्पो धर्मज्ञानपरायणः ॥ ४७ ॥

अदूरमोक्षसाम्राज्यः सुखरूपो हि तिष्ठति ।
रजोरूपो हि सङ्कल्पो लोके स व्यवहारवान् ॥ ४८ ॥

परितिष्ठति संसारे पुत्रदारानुरञ्जितः ।
त्रिविधं तु परित्यज्य रूपमेतन्महामते ॥ ४९ ॥

सङ्कल्पं परमाप्नोति पदमात्मपरिक्षये ।
दृष्टीः सर्वाः परित्यज्य नियम्य मनसा मनः ॥ ५० ॥

सबाह्याभ्यन्तरार्थस्य सङ्कल्पस्य क्षयं कुरु ।
यदि वर्षसहस्राणि तपश्चरसि दारुणम् ॥ ५१ ॥

पातालस्थस्य भूस्थस्य स्वर्गस्थस्यापि तेऽनघ ।
नान्यः कश्चिदुपायोऽस्ति सङ्कल्पोपशमाद्दते ॥ ५२ ॥

अनाबाधेऽविकारे स्वे सुखे परमपावने ।
सङ्कल्पोपशमे यत्नं पौरुषेण परं कुरु ॥ ५३ ॥

सङ्कल्पतन्तौ निखिला भावाः प्रोताः किलानघ ।
छिन्ने तन्तौ न जानीमः क्व यान्ति विभवाः पराः ॥ ५४ ॥

निःसङ्कल्पो यथाप्राप्तव्यवहारपरो भव ।
क्षये सङ्कल्पजालस्य जीवो ब्रह्मत्वमाप्नुयात् ॥ ५५ ॥

करतो; मग त्याच्याशी तादात्म्य होऊन, तो आपल्या सर्व क्रिया चिदानंद आत्म्यावर आरोपित करतो. त्या अहंकारामुळे व्याप्त झालेला देहधारी जीव हा त्या अहंकाराने प्रेरित होऊन, संकल्परूपी बेडीने बद्ध होतो आणि तो रात्रंदिवस पुत्र, पत्नी, घर इत्यादींचा संकल्प करीत राहातो. (४२-४४)

असा संकल्प करणारा देहधारी जीव स्वतःच सर्वदा शोक करीत राहातो. त्या अहंकाराचे उत्तम, मध्यम आणि अधम असे तीन प्रकारचे देह आहेत. त्यांना अनुक्रमाने सत्त्व, रज आणि तम अशी नावे आहेत. हे तिन्ही देह जगाच्या स्थितीचे कारण आहेत. तामस संपल्पामुळे तामस क्रिया केल्याने तमोगुणी जीव कृमी, किडे इत्यादी योनींमध्ये पडतो. सात्त्विक संकल्पाचा जीव हा धर्म व ज्ञान यांमध्ये तत्पर असल्यामुळे सहजपणे मोक्ष-साम्राज्याजवळ राहतो आणि राजस संकल्प असलेला जीव लोकव्यवहार सांभाळत पुत्र व स्त्री यांचेमध्ये अनुरक्त असतो. हे महान बुद्धिमंता, जेव्हा पुरुष संकल्पाच्या त्रिविध रूपांचा त्याग करतो, त्या वेळी चित्ताचा लय झाल्यावर त्याला परमपद प्राप्त होते. म्हणून विषयासंबंधीचे सर्व विचार टाकून आणि मनानेच मनाचे नियमन करून, तू बाह्य व अंतर अशा विषयांबद्दलच्या संकल्पांचा नाश कर. हे वत्सा, पाताळ, पृथ्वी आणि स्वर्ग येथे राहून जरी तू हजारो वर्षे कठोर तप केलेस तरी संसाराच्या बंधनातून सुटण्यास संकल्पाच्या नाशाखेरीज अन्य कोणताही उपाय तुला सापडणार नाही. (४५-५२)

म्हणून बाधारहित, स्वानंद-स्वरूप आणि परम पावन अशा संकल्प-नाशासाठी तू धैर्यपूर्वक खूप प्रयत्न कर. (५३)

हे तात, सर्व भाव हे संकल्परूपी तंतूने विणलेले असतात, असे म्हटले जाते. हा तंतू तुटताच संसारातील अन्य भौतिक ऐश्वर्य कुठे जाते, हे आपणास कळत नाही. (५४)

म्हणून संकल्परहित होऊन, प्रारब्धाने जसा प्राप्त झाला आहे, तसा व्यवहार करण्यात तू तत्पर राहा. संकल्पाचे जाळे नष्ट झाल्यावर, जीव हा ब्रह्मत्व प्राप्त करून घेतो. (५५)

अधिगतपरमार्थतामुपेत्य
प्रसभमपास्य विकल्पजालमुच्चैः ।
अधिगमय पदं तदद्वितीयं
विततसुखाय सुषुप्तचित्तवृत्तिः ॥ ५६ ॥

परमार्थाचे ज्ञान प्राप्त करून घेऊन, फार मोठे असे विकल्पाचे जाळे तू बळजबरीने दूर सार आणि सतत आनंद मिळविण्यासाठी, चित्तवृत्ती संपूर्णपणे लीन करून, तू ते अद्वितीय पद प्राप्त करून घे." (५६)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे उत्तरकाण्डे षष्ठः सर्गः ॥ ६ ॥

सप्तम सर्ग

भगवान रामांच्या यज्ञात कुश-लवाचे आगमन, सीतेचा पृथ्वीमध्ये प्रवेश, रामचंद्रांचा मातेला उपदेश

श्रीमहादेव उवाच

वाल्मीकिना बोधितोऽसौ कुशः सद्यो गतभ्रमः ।
अन्तर्मुक्तो बहिः सर्वमनुकुर्वंश्चचार सः ॥ १ ॥

वाल्मीकिरपि तौ प्राह सीतापुत्रौ महाधियौ ।
तत्र तत्र च गायन्तौ पुरे वीथिषु सर्वतः ॥ २ ॥

रामस्याग्रे प्रगायेतां शुश्रूषुर्यदि राघवः ।
न ग्राह्यं वै युवाभ्यां तद्यदि किञ्चित्प्रदास्यति ॥ ३ ॥

इति तौ चोदितौ तत्र गायमानौ विचेरतुः ।
यथोक्तमृषिणा पूर्वं तत्र तत्राभ्यगायताम् ॥ ४ ॥

तां स शुश्राव काकुत्स्थः पूर्वचर्यां ततस्ततः ।
अपूर्वपाठजातिं च गेयेन समभिप्लुताम् ॥ ५ ॥

बालयो राघवः श्रुत्वा कौतूहलमुपेयिवान् ।
अथ कर्मान्तरे राजा समाहूय महामुनीन् ॥ ६ ॥

राज्ञश्चैव नरव्याघ्रः पण्डितांश्चैव नैगमान् ।
पौराणिकान् शब्दविदो ये च वृद्धा द्विजातयः ॥ ७ ॥

एतान्सर्वान्समाहूय गायकौ समवेशयत् ।
ते सर्वे हृष्टमनसो राजानो ब्राह्मणादयः ॥ ८ ॥

रामं तौ दारकौ दृष्ट्वा विस्मिताः ह्यनिमेषणाः ।
अवोचन् सर्व एवैते परस्परमथागताः ॥ ९ ॥

श्रीमहादेव म्हणाले– हे पार्वती, वाल्मीकींनी असा उपदेश करताच, कुशाची भ्रांती तत्काळ दूर झाली आणि अंतःकरणातील संकल्पांपासून मुक्त होऊन, तो बाहेरील सर्व व्यवहार करीत वावरू लागला. (१)

एकदा त्या दोघा महाबुद्धिमान सीतापुत्रांना वाल्मीकींनी असे सांगितले की, "या नगरीत जेथे तेथे रस्त्यांवर, सर्वत्र रामकथेचे गायन करीत तुम्ही फिरा. जर राघवांना ते ऐकावयाची इच्छा असेल तर तुम्ही त्यांच्याही पुढे गायन करा. पण ते जर तुम्हाला काही देऊ लागले, तर तुम्ही घेऊ नका." (२-३)

अशा प्रकारे मुनींची आज्ञा मिळाल्यावर ते दोघे गायन करीत करीत फिरू लागले. ज्या प्रमाणे ऋषींनी पूर्वी शिकविले होते त्या प्रमाणे ते दोघे जागोजागी गायन करू लागले. (४)

आपले पूर्व चरित्र गाईले जात आहे, असे प्रभू रामांनी ऐकले. तसेच ते गाणाऱ्या दोन मुलांची गायन करण्याची पद्धत अपूर्व आहे आणि ती स्वर-तालाने युक्त आहे, हे कानी येताच, राघवांना कुतूहल वाटले. तेव्हा यज्ञकर्माच्या मधल्या विश्रांतीच्या वेळी, नरशार्दूल राजा रामांनी महामुनी, राजे लोक, पंडित, वेदशास्त्र जाणणारे, पौराणिक, शब्दवेत्ते आणि ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य जातीतील वृद्ध लोक या सर्वांना एकत्र बोलावले व त्या दोन गायक बालकांनाही बोलावून घेतले. ब्राह्मण इत्यादी सर्व लोक मनात आनंदित झाले. राम आणि ते दोन बालक यांना पाहिल्यावर सर्वजण विस्मित झाले. त्यांची पापणीही हलेनाशी झाली. ते सर्व जण परस्परांत बोलू लागले की,

इमौ रामस्य सदृशौ बिम्बाद्बिम्बमिवोदितौ ।
जटिलौ यदि न स्यातां न च वल्कलधारिणौ ॥ १० ॥

विशेषं नाधिगच्छामो राघवस्यानयोस्तदा ।
एवं संवदतां तेषां विस्मितानां परस्परम् ॥ ११ ॥

उपचक्रमतुर्गातुं तावुभौ मुनिदारकौ ।
ततः प्रवृत्तं मधुरं गान्धर्वमतिमानुषम् ॥ १२ ॥

श्रुत्वा तन्मधुरं गीतमपराह्णे रघूत्तमः ।
उवाच भरतं चाभ्यां दीयतामयुतं वसु ॥ १३ ॥

दीयमानं सुवर्णं तु न तज्जगृहतुस्तदा ।
किमनेन सुवर्णेन राजन्नौ वन्यभोजनौ ॥ १४ ॥

इति सन्त्यज्य सन्दत्तं जग्मतुर्मुनिसन्निधिम् ।
एवं श्रुत्वा तु चरितं रामः स्वस्यैव विस्मितः ॥ १५ ॥

ज्ञात्वा सीताकुमारौ तौ शत्रुघ्नं चेदमब्रवीत् ।
हनूमन्तं सुषेणं च बिभीषणमथाङ्गदम् ॥ १६ ॥

भगवन्तं महात्मानं वाल्मीकिं मुनिसत्तमम् ।
आनयध्वं मुनिवरं ससीतं देवसम्मितम् ॥ १७ ॥

अस्यास्तु पर्षदो मध्ये प्रत्ययं जनकात्मजा ।
करोतु शपथं सर्वे जानन्तु गतकल्मषाम् ॥ १८ ॥

सीतां तद्वचनं श्रुत्वा गताः सर्वेऽतिविस्मिताः ।
ऊचुर्यथोक्तं रामेण वाल्मीकिं रामपार्षदाः ॥ १९ ॥

रामस्य हृद्गतं सर्वं ज्ञात्वा वाल्मीकिरब्रवीत् ।
श्वः करिष्यति वै सीता शपथं जनसंसदि ॥ २० ॥

योषितां परमं दैवं पतिरेव न संशयः ।
तच्छ्रुत्वा सहसा गत्वा सर्वे प्रोचुर्मुनेर्वचः ॥ २१ ॥

राघवस्यापि रामोऽपि श्रुत्वा मुनिवचस्तथा ।
गजानो मनयः सर्वे शृणुध्वमिति चाब्रवीत् ॥ २२ ॥

'बिंबापासून प्रतिबिंब निर्माण व्हावे, त्या प्रमाणे हे दोन बालक अगदी श्रीरामांसारखेच आहेत. जर या दोघा बालकांना जटा नसत्या आणि जर त्या दोघांनी वल्कले धारण केली नसती तर ते दोघे आणि राघव यातील काहीच फरक आपणास कळला नसता.' आश्चर्यचकित झालेले लोक अशा प्रकारे परस्परांशी बोलत असतानाच, त्या दोन मुनिकुमारांनी गाण्यास प्रारंभ केला आणि तेथे एक अलौकिक मधुर गीत सुरू झाले. (५-१२)

ते मधुर गीत ऐकल्यावर अपरान्ह काळी रघूत्तम भरताला म्हणाले, "या दोघांना दहा हजार सुवर्ण मुद्रा दे." (१३)

त्या दोघांनी त्या घेतल्या नाहीत. ते म्हणाले, "हे राजा, आम्ही दोघे वनातील फळे-मुळे खाणारे आहोत. आम्हांला या सुवर्णाचा काय उपयोग ?" (१४)

असे म्हणून दिलेले धन न घेता ते दोघे वाल्मीकी मुनींच्याजवळ गेले. स्वत:चेच चरित्र गाईले गेलेले ऐकून श्रीराम विस्मयचकित झाले. (१५)

ते दोघे बालक सीतेचे पुत्र आहेत, हे कळल्यावर राम हे शत्रुघ्न, हनुमंत, सुषेण, बिभीषण आणि अंगद यांना म्हणाले. "देवासमान असणाऱ्या महात्मा, भगवान मुनिश्रेष्ठ वाल्मीकी मुनींना सीतेसह इकडे घेऊन या. (१६-१७)

या सभेमध्ये सर्व सभासदांचा विश्वास बसावा म्हणून जनककन्या सीतेने शपथ घ्यावी. त्यामुळे सीता ही निष्कलंक आहे, हे सर्व लोकांना कळून येईल." ते वचन ऐकून सर्वजण अतिशय विस्मित झाले. रामांचे दूत मग वाल्मीकींकडे गेले आणि श्रीरामांनी जसे सांगितले होते तसे त्यांनी वाल्मीकींना सांगितले. (१८-१९)

श्रीरामांचे सर्व हृद्गत जाणून वाल्मीकी म्हणाले, "उद्या लोकांच्या सभेत सीता शपथ घेईल. स्त्रियांच्या बाबतीत पती हाच श्रेष्ठ देव असतो, यात संशय नाही." ते ऐकून सेवक परत आले आणि त्यांनी मुनींचे वचन राघवाला सांगितले. ते ऐकल्यावर श्रीरामसुद्धा म्हणाले, "हे राजे लोकहो आणि मुनिहो, तुम्ही सर्व लोकांनी सीतेची शपथ ऐका आणि त्यावरून ती शुद्ध आहे किंवा अशुद्ध

सीताया: शपथं लोका विजानन्तु शुभाशुभम् ।
इत्युक्ता राघवेणाथ लोका: सर्वे दिदृक्षव: ॥ २३ ॥

ब्राह्मणा: क्षत्रिया वैश्या: शूद्राश्चैव महर्षय: ।
वानराश्च समाजग्मु: कौतूहलसमन्विता: ॥ २४ ॥

ततो मुनिवरस्तूर्णं ससीत: समुपागमत् ।
अग्रतस्तमृषिं कृत्वायान्ती किञ्चिदवाङ्मुखी ॥ २५ ॥

कृताञ्जलिर्बाष्पकण्ठा सीता यज्ञं विवेश तम् ।
दृष्ट्वा लक्ष्मीमिवायान्तीं ब्रह्माणमनुयायिनीम् ॥ २६ ॥

वाल्मीके: पृष्ठत: सीतां साधुवादो महानभूत् ।
तदा मध्ये जनौघस्य प्रविश्य मुनिपुङ्गव: ॥ २७ ॥

सीतासहायो वाल्मीकिरिति प्राह च राघवम् ।
इयं दाशरथे सीता सुव्रता धर्मचारिणी ॥ २८ ॥

अपापा ते पुरा त्यक्ता ममाश्रमसमीपत: ।
लोकापवादभीतेन त्वया राम महावने ॥ २९ ॥

प्रत्ययं दास्यते सीता तदनुज्ञातुमर्हसि ।
इमौ तु सीतातनयाविमौ यमलजातकौ ॥ ३० ॥

सुतौ तु तव दुर्धर्षौ तथ्यमेतद्ब्रवीमि ते ।
प्रचेतसोऽहं दशम: पुत्रो रघुकुलोद्वह ॥ ३१ ॥

अनृतं न स्मराम्युक्तं तथेमौ तव पुत्रकौ ।
बहून्वर्षगणान् सम्यक्तपश्चर्या मया कृता ॥ ३२ ॥

नोपाश्नीयां फलं तस्या दुष्टेयं यदि मैथिली ।
वाल्मीकिनैवमुक्तस्तु राघव: प्रत्यभाषत ॥ ३३ ॥

एवमेतन्महाप्राज्ञ यथा वदसि सुव्रत ।
प्रत्ययो जनितो मह्यं तव वाक्यैरकिल्बिषै: ॥ ३४ ॥

लङ्कायामपि दत्तो मे वैदेह्या प्रत्ययो महान् ।
देवानां पुरतस्तेन मन्दिरे सम्प्रवेशिता ॥ ३५ ॥

आहे, हे जाणून घ्या." असे राघवांनी म्हटल्यावर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य तसेच शूद्र, महर्षी आणि वानर हे सर्व जण कुतूहलाने पाहाण्यासाठी सभेला आले. (२०-२४)

त्यानंतर मुनिश्रेष्ठ वाल्मीकी सीतेला घेऊन त्वरित तेथे आले. त्या ऋषींच्या मागोमाग येणाऱ्या किंचित खाली पाहात असलेल्या, हात जोडलेल्या, गद्गद कंठ झालेल्या सीतेने यज्ञमंडपात प्रवेश केला. ब्रह्मदेवांच्या मागोमाग येणाऱ्या लक्ष्मीप्रमाणे, वाल्मीकींच्या मागोमाग येणाऱ्या सीतेला पाहून लोक 'धन्य, धन्य' असे म्हणू लागले. तेव्हा सीतेला बरोबर घेऊन मुनिश्रेष्ठ वाल्मीकी लोकांच्या समुदायात शिरले आणि राघवांना म्हणाले, "हे दशरथपुत्र रामा, ही सीता पतिव्रता, धर्माचे आचरण करणारी, निष्पाप अशी असूनसुद्धा, हे रामा, लोकापवादाला भिऊन तुम्ही तिला भयंकर अरण्यात माझ्या आश्रमाच्याजवळ सोडून दिले होते. (२५-२९)

आता ही आपल्या शुद्धतेची खात्री देईल. त्यास तुम्ही अनुज्ञा द्या. हे दोन सीतेचे पुत्र असून दोघे जुळे जन्मलेले होते. (३०)

हे दोघे दुर्जय वीर तुमचे पुत्र आहेत, हे सत्य आहे, तेच मी सांगतो. हे रघुकुलश्रेष्ठा, मी प्रजापतीचा दहावा पुत्र आहे. (३१)

मी कधी खोटे बोललो आहे, असे मला आठवत नाही. हे दोघे तुमचेच दोन पुत्र आहेत, हे सत्यच मी तुम्हाला सांगितले आहे. मी अनेक वर्षे खूप तपश्चर्या केलेली आहे. (३२)

ही मैथिली जर अपवित्र आचरणाची असेल तर मला माझ्या त्या तपश्चर्येचे कोणतेही फळ मिळणार नाही." वाल्मीकींनी अशा प्रकारे सांगितल्यावर राघवांनी प्रत्युत्तर दिले. (३३)

"हे महाज्ञानी सुव्रता, तुम्ही सांगितले ते तसेच आहे. तुमच्या सत्य वाक्यांनी मला सीतेविषयी विश्वास निर्माण झाला आहे. (३४)

लंकेमध्येसुद्धा सर्व देवांच्या समोर वैदेहीने अग्निप्रवेश करून शुद्धतेची खात्री दिली होती. म्हणूनच मी तिला माझ्या घरात प्रवेश दिला होता. (३५)

लोकभयाद् ब्रह्मन्नपापापि सती पुरा ।
मया परित्यक्ता भवांस्तत्क्षन्तुमर्हति ॥ ३६ ॥

जातौ जानामि पुत्रावेतौ कुशीलवौ ।
ां जगतीमध्ये सीतायां प्रीतिरस्तु मे ॥ ३७ ॥

र्वे परिज्ञाय रामाभिप्रायमुत्सुकाः ।
मग्रतः कृत्वा समाजग्मुः सहस्रशः ॥ ३८ ॥

समागमन्हृष्टाः सीता कौशेयवासिनी ।
खी ह्यधोदृष्टिः प्राञ्जलिर्वाक्यमब्रवीत् ॥ ३९ ॥

यं यथाहं वै मनसापि न चिन्तये ।
ा धरणी देवी विवरं दातुमर्हति ॥ ४० ॥

पन्त्याः सीतायाः प्रादुरासीन्महाद्भुतम् ।
हेव्यमत्यर्थं सिंहासनमनुत्तमम् ॥ ४१ ॥

ध्रियमाणं च दिव्यदेहै रविप्रभम् ।
जानकीं दोर्भ्यां गृहीत्वा स्नेहसंयुता ॥ ४२ ॥

तामुवाचैनामासने संन्यवेशयत् ।
स्थां वैदेहीं प्रविशन्तीं रसातलम् ॥ ४३ ॥

पुष्पवृष्टिर्दिव्या सीतामवाकिरत् ।
दश्च सुमहान् देवानां परमाद्भुतः ॥ ४४ ॥

बहुधा वाचो ह्यन्तरिक्षगताः सुराः ।
ते च भूमौ च सर्वे स्थावरजङ्गमाः ॥ ४५ ॥

महाकायाः सीताशपथकारणात् ।
न्तापरास्तस्य केचिद्ध्यानपरायणाः ॥ ४६ ॥

नं निरीक्षन्तः केचित्सीतामचेतसः ।
त्रं तत्सर्वं तूष्णीभूतमचेतनम् ॥ ४७ ॥

शनं दृष्ट्वा सर्वं सम्मोहितं जगत् ।
सर्वं ज्ञात्वैव भविष्यत्कार्यगौरवम् ॥ ४८ ॥

तथापि, हे ब्रह्मन्, लोकापवादामुळे सती सीता निर्दोष असूनसुद्धा मी पूर्वी तिचा त्याग केला होता. तुम्ही माझ्या या अपराधाची मला क्षमा करा. (३६)

हे कुश आणि लव हे दोन पुत्र सीतेला माझ्यापासून झाले आहेत, हेही मला माहीत आहे. येथे सभेमध्ये शुद्धी सिद्ध झाल्यावर या सीतेवर माझी प्रीती राहीलच." (३७)

त्या वेळी श्रीरामांचा अभिप्राय जाणून सर्व देव अतिशय उत्सुक होऊन, ब्रह्मदेवांना पुढे करून, हजारोंच्या संख्येने तेथे एकत्र आले. तसेच हजारो प्रजाननसुद्धा आनंदित मनाने तेथे एकत्र जमले. त्या वेळी रेशमी वस्त्र धारण केलेल्या, उत्तरेकडे तोंड करून परंतु दृष्टी खाली केलेल्या सीतेने हात जोडले आणि ती म्हणाली.(३८-३९)

"जर मी मनानेसुद्धा रामाखेरीज अन्य पुरुषाचा विचार केलेला नसेल तर, पृथ्वी देवी आपल्या पोटात मला आश्रय देवो." (४०)

सीतेने अशी शपथ घेताच, तेथे भूमीच्या आतून एक अतिशय अद्भुत, दिव्य आणि उत्तम असे सिंहासन प्रकट झाले. (४१)

सूर्याप्रमाणे तेजस्वी असणारे ते सिंहासन दिव्य शरीर धारण करणाऱ्या नागराजांनी उचलून धरलेले होते. (त्या सिंहासनावर बसलेल्या) भूदेवीने आपल्या दोन्ही हातांनी जानकीला मोठ्या प्रेमाने धरले, तिचे स्वागत केले आणि शेजारी आसनावर बसविले. नंतर सिंहासनावर बसलेली सीता जेव्हा रसातळात प्रवेश करू लागली, तेव्हा तिच्यावर सतत दिव्य फुलांची वृष्टी होऊ लागली आणि देवांच्या मुखांतून अतिशय अद्भुत आणि फार मोठे 'धन्य, धन्य' असा शब्द बाहेर पडू लागला. (४२-४४)

सीतेने शपथ घेतल्यामुळे प्रचंड देह असणारे काही वानर चिंताग्रस्त झाले. आकाशात असलेले देव, अंतरिक्ष आणि पृथ्वी यांवरील सर्व स्थावर-जंगम प्राणी, नाना प्रकारचे शब्द उच्चारू लागले. त्या शपथेमुळे काही जण चिंताग्रस्त झाले, तर काही जण ध्यान-परायण झाले. काही जण श्रीरामांकडे पाहात राहिले, तर काही जण सीतेकडे पाहून गोंधळून गेले. काही काळपर्यंत सर्व लोक स्तब्ध आणि निश्चेष्ट होऊन गेले. (४५-४७)

सीतेने भूमीमध्ये प्रवेश केलेला पाहून सर्व जग संभ्रमित झाले. भविष्यात घडणाऱ्या घटनांचे सर्व महत्त्व जरी श्रीरामांना माहीत होते, तरी ते माहीत नसल्याप्रमाणे

अजानन्निव दुःखेन शुशोच जनकात्मजाम् ।
ब्रह्मणा ऋषिभिः सार्धं बोधितो रघुनन्दनः ॥ ४९ ॥

दुःखाने सीतेविषयी शोक करू लागले. त्या वेळी ऋषींसहित ब्रह्मदेवांनी रघुनंदनांना बोध केला. (४८-४९)

प्रतिबुद्ध इव स्वप्नाच्चकारानन्तराः क्रियाः ।
विससर्ज ऋषीन् सर्वानृत्विजो ये समागताः ॥ ५० ॥

स्वप्नातून जागे झालेल्या माणसाप्रमाणे, भानावर आलेल्या श्रीरामांनी यज्ञाच्या उरलेल्या क्रिया समाप्त केल्या. नंतर एकत्र आलेल्या सर्व ऋषींना आणि ऋत्विजांना त्यांनी निरोप दिला. (५०)

तान् सर्वान् धनरत्नाद्यैस्तोषयामास भूरिशः ।
उपादाय कुमारौ तावयोध्यामगमत्प्रभुः ॥ ५१ ॥

त्या सर्वांना पुष्कळ धन, रत्ने इत्यादी देऊन श्रीरामांनी संतुष्ट केले. नंतर लव आणि कुश या दोघा कुमारांना बरोबर घेऊन, प्रभू राम अयोध्येत आले. (५१)

तदादि निःस्पृहो रामः सर्वभोगेषु सर्वदा ।
आत्मचिन्तापरो नित्यमेकान्ते समुपस्थितः ॥ ५२ ॥

तेव्हापासून श्रीराम सर्व भोगांपासून विरक्त होऊन, सतत आत्मचिंतन करीत एकांतात राहू लागले. (५२)

एकान्ते ध्याननिरते एकदा राघवे सति ।
ज्ञात्वा नारायणं साक्षात्कौसल्या प्रियवादिनी ॥ ५३ ॥

एकदा एकांतात प्रभू राम ध्यानामध्ये निमग्न असताना, राम हे साक्षात नारायण आहेत हे जाणून, मधुर भाषिणी कौसल्या भक्तीने रामांजवळ आली आणि आनंदित मनाने नमस्कार करून, प्रसन्न असणाऱ्या रामांना ती म्हणाली, "हे रामा, तू सर्व जगांचे आदिकारण आहेस. तू आदि, मध्य आणि अंत यांनी रहित आहेस. (५३-५४)

भक्त्यागत्य प्रसन्नं तं प्रणता प्राह हृष्टधीः ।
राम त्वं जगतामादिरादिमध्यान्तवर्जितः ॥ ५४ ॥

परमात्मा परानन्दः पूर्णः पुरुष ईश्वरः ।
जातोऽसि मे गर्भगृहे मम पुण्यातिरेकतः ॥ ५५ ॥

तू परमात्मा, परमानंद, पूर्ण व जीव रूपाने शरीररूपी नगरीत शयन करणारा आणि सर्वांचा ईश्वर आहेस. तरीसुद्धा माझ्या प्रबल पुण्यामुळे तू माझ्या गर्भात जन्माला आला आहेस. (५५)

अवसाने ममाप्यद्य समयोऽभूद्रघूत्तम ।
नाद्याप्यबोधजः कृत्स्नो भवबन्धो निवर्तते ॥ ५६ ॥

हे रघूत्तमा, आता माझ्या वृद्धापकाळी तुला काही विचारण्यास संधी मिळाली आहे. अजूनसुद्धा माझा अज्ञानजन्य संसारबंध संपूर्णपणे तुटलेला नाही. (५६)

इदानीमपि मे ज्ञानं भवबन्धनिवर्तकम् ।
यथा सङ्क्षेपतो भूयात्तथा बोधय मां विभो ॥ ५७ ॥

तेव्हा हे विभो, ज्यामुळे या स्थितीत माझ्या संसार बंधनाचा नाश करणारे ज्ञान मला प्राप्त होईल त्याचा तू मला संक्षेपाने बोध कर." (५७)

निर्वेदवादिनीमेवं मातरं मातृवत्सलः ।
दयालुः प्राह धर्मात्मा जराजर्जरितां शुभाम् ॥ ५८ ॥

अशा प्रकारे वैराग्यपूर्ण वचन बोलणाऱ्या शुभलक्षणसंपन्न वृद्ध मातेला मातृभक्त, दयाळू आणि धर्मात्मा श्रीराम म्हणाले. "मोक्षाच्या प्राप्तीला साधनभूत होणारे तीन सनातन मार्ग मी पूर्वी सांगितले होते, ते म्हणजे कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तियोग. हे माते, सत्त्व इत्यादी गुणांच्या भेदामुळे भक्तीचे तीन प्रकार होतात. ज्याचा जसा स्वभाव असेल, त्या प्रमाणे त्या प्रकाराची त्याची भक्ती वेगळी असते. जो माणूस हिंसा, दंभ आणि मत्सर यांचा उद्देश मनात धरून भक्ती करतो, तसेच ज्याची भेद- दृष्टी असते आणि जो क्रोधी किंवा आग्रही असतो, अशा माझ्या भक्ताला तामस भक्त म्हणतात. (५८-६१)

मार्गास्त्रयो मया प्रोक्ताः पुरा मोक्षाप्तिसाधकाः ।
कर्मयोगो ज्ञानयोगो भक्तियोगश्च शाश्वतः ॥ ५९ ॥

भक्तिर्विभिद्यते मातस्त्रिविधा गुणभेदतः ।
स्वभावो यस्य यस्तेन तस्य भक्तिर्विभिद्यते ॥ ६० ॥

यस्तु हिंसां समुद्दिश्य दम्भं मात्सर्यमेव वा ।
भेददृष्टिश्च संरम्भी भक्तो मे तामसः स्मृतः ॥ ६१ ॥

फलाभिसन्धिर्भोगार्थी धनकामो यशस्तथा ।
अर्चादौ भेदबुद्ध्या मां पूजयेत्स तु राजसः ॥ ६२ ॥

परस्मिन्नर्पितं यस्तु कर्म निर्हरणाय वा ।
कर्तव्यमिति वा कुर्याद्भेदबुद्ध्या स सात्त्विकः ॥ ६३ ॥

मद्गुणाश्रयणादेव मय्यनन्तगुणालये ।
अविच्छिन्ना मनोवृत्तिर्यथा गङ्गाम्बुनोऽम्बुधौ ॥ ६४ ॥

तदेव भक्तियोगस्य लक्षणं निर्गुणस्य हि ।
अहैतुक्यव्यवहिता या भक्तिर्मयि जायते ॥ ६५ ॥

सा मे सालोक्यसामीप्यसार्ष्टिसायुज्यमेव वा ।
ददात्यपि न गृह्णन्ति भक्ता मत्सेवनं विना ॥ ६६ ॥

स एवात्यन्तिको योगो भक्तिमार्गस्य भामिनि ।
मद्भावं प्राप्नुयात्तेन अतिक्रम्य गुणत्रयम् ॥ ६७ ॥

महता कामहीनेन स्वधर्माचरणेन च ।
कर्मयोगेन शस्तेन वर्जितेन विहिंसनात् ॥ ६८ ॥

मद्दर्शनस्तुतिमहापूजाभिः स्मृतिवन्दनैः ।
भूतेषु मद्भावनया सङ्गेनासत्यवर्जनैः ॥ ६९ ॥

बहुमानेन महतां दुःखिनामनुकम्पया ।
स्वसमानेषु मैत्र्या च यमादीनां निषेवया ॥ ७० ॥

वेदान्तवाक्यश्रवणान्मम नामानुकीर्तनात् ।
सत्सङ्गेनार्जवेनैव ह्यहमः परिवर्जनात् ॥ ७१ ॥

काङ्क्षा मम धर्मस्य परिशुद्धान्तरो जनः ।
मद्गुणश्रवणादेव याति मामञ्जसा जनः ॥ ७२ ॥

यथा वायुवशाद्गन्धः स्वाश्रयाद्घ्राणमाविशेत् ।
योगाभ्यासरतं चित्तमेवमात्मानमाविशेत् ॥ ७३ ॥

जो पुरुष फळाची इच्छा बाळगतो, जो भोगांची इच्छा करतो, तसेच जो द्रव्य आणि कीर्ती यांची इच्छा धरतो, आणि भेद-बुद्धीने स्वतःला व मला वेगळा समजून माझी पूजा करतो, तो राजस भक्त होय. (६२)

जो पुरुष परमात्म्याला समर्पण करण्याच्या भावनेने कर्म करतो, अथवा कर्मांचा क्षय करण्यासाठी निष्काम भावनेने किंवा हे माझे कर्तव्य आहे, या भावनेने सगुण भगवंताची उपासना मानून भेदबुद्धीने कर्म करतो, तो सात्त्विक भक्त होय. (६३)

ज्या प्रमाणे गंगेचे पाणी हे अखंडपणे समुद्रात लीन होत असते, त्याप्रमाणे माणसाची मनोवृत्ती माझ्या गुणांच्या आश्रयानेच अनंत गुणांचे घर असणाऱ्या माझ्या ठिकाणी अविच्छिन्नपणे लागून राहाते, तेव माझ्या निर्गुण भक्तियोगाचे लक्षण आहे. तेव्हा माझ्या ठिकाणी निष्कामपणाने आणि सातत्याने जी भक्ती उत्पन्न होते, ती भक्ती भक्ताला माझी सालोक्य, सामीप्य, सार्ष्टी आणि सायुज्य* अशी चार प्रकारची मुक्ती मिळवून देते. तथापि माझे भक्त माझ्या सेवेऐवजी अन्य काहीही ग्रहण करीत नाहीत. हे माते, भक्तिमार्गाचा हाच आत्यंतिक योग आहे. भक्तियोगाने माझा भक्त तीन गुणांचे पलीकडे जाऊन, माझे स्वरूप प्राप्त करून घेतो. (६४-६७)

ज्याला कोणतीही इच्छा नसते, जो हिंसेने रहित आहे, जो स्वधर्माचे आचरण करतो, अशा प्रशस्त कर्मयोगाच्याद्वारा माझे दर्शन, माझी स्तुती, माझी महापूजा करून, माझे स्मरण आणि मला वंदन करून, भूतांचे ठिकाणी मी म्हणजे ईश्वर आहे अशी भावना धरतो, आसक्ती सोडून, असत्याचा त्याग करतो, महापुरुषांना अथवा वडीलधाऱ्या माणसांना बहुमान देतो, दुःखी लोकांवर दया दाखवितो, स्वतःशी समान असणाऱ्या माणसाशी मैत्री करून, यम-नियम इत्यादींचे पालन करतो, वेदांत वाक्यांचे श्रवण करतो, माझ्या नावाचे गुणगान करतो, सत्संग करतो, सर्वांशी सरळपणाने वागतो, अहंकाराचा त्याग करतो, माझ्या भागवत धर्माची इच्छा धरतो आणि ज्याचे चित्त शुद्ध झाले आहे, असा माणूस माझ्या गुणांचे श्रवण करूनच अनायासे माझ्याप्रत येतो. (६८-७२)

ज्या प्रमाणे वायूच्या मार्फत गंध आपला आश्रय सोडून घ्राणेंद्रियात प्रवेश करतो, त्याप्रमाणे योगाच्या अभ्यासात निमग्न झालेले चित्त आत्म्यामध्येच लीन होऊन जाते. (७३)

* भगवंताचे वैकुंठ इत्यादी लोक प्राप्त करून घेणे ही सालोक्य मुक्ती आहे. सतत भगवंताचेच समीप राहाणे म्हणजे सामीप्य मुक्ती. भगवंताप्रमाणे ऐश्वर्य प्राप्त करून घेणे म्हणजे सार्ष्टी आणि भगवंतात लीन होणे ही सायुज्य मुक्ती होय.

सर्वेषु प्राणिजातेषु ह्यहमात्मा व्यवस्थितः ।
तमज्ञात्वा विमूढात्मा कुरुते केवलं बहिः ॥ ७४ ॥

क्रियोत्पन्नैर्नेकभेदैर्द्रव्यैर्मे नाम्ब तोषणम् ।
भूतावमानिनार्चायामर्चितोऽहं न पूजितः ॥ ७५ ॥

तावन्मामर्चयेद्देवं प्रतिमादौ स्वकर्मभिः ।
यावत्सर्वेषु भूतेषु स्थितं चात्मनि न स्मरेत् ॥ ७६ ॥

यस्तु भेदं प्रकुरुते स्वात्मनश्च परस्य च ।
भिन्नदृष्टेर्भयं मृत्युस्तस्य कुर्यान्न संशयः ॥ ७७ ॥

मामतः सर्वभूतेषु परिच्छिन्नेषु संस्थितम् ।
एकं ज्ञानेन मानेन मैत्र्या चार्चेदभिन्नधीः ॥ ७८ ॥

चेतसैवानिशं सर्वभूतानि प्रणमेत्सुधीः ।
ज्ञात्वा मां चेतनं शुद्धं जीवरूपेण संस्थितम् ॥ ७९ ॥

तस्मात्कदाचिन्नेक्षेत भेदमीश्वरजीवयोः ।
भक्तियोगो ज्ञानयोगो मया मातरुदीरितः ॥ ८० ॥

आलम्ब्यैकतरं वापि पुरुषः शुभमृच्छति ।
ततो मां भक्तियोगेन मातः सर्वहृदि स्थितम् ॥ ८१ ॥

पुत्ररूपेण वा नित्यं स्मृत्वा शान्तिमवाप्स्यसि ।
श्रुत्वा रामस्य वचनं कौसल्यानन्दसंयुता ॥ ८२ ॥

रामं सदा हृदि ध्यात्वा छित्त्वा संसारबन्धनम् ।
अतिक्रम्य गतीस्तिस्त्रोऽप्यवाप परमां गतिम् ॥ ८३ ॥

कैकेयी चापि योगं रघुपतिगदितं
पूर्वमेवाधिगम्य
श्रद्धाभक्तिप्रशान्ता हृदि रघुतिलकं
भावयन्ती गतासुः ।
गत्वा स्वर्गं स्फुरन्ती दशरथसहिता
मोदमानावतस्थे
माता श्रीलक्ष्मणस्याप्यतिविमलमतिः
प्राप भर्तुः समीपम् ॥ ८४ ॥

सर्व प्राणिजातामध्ये आत्म्याच्या रूपाने मीच आहे, हे त्या (आत्म्या)ला न जाणता मूढ मनाचा माणूस केवळ बाह्य गोष्टींत रमून जातो. (७४)

हे माते, कर्मानी उत्पन्न होणाऱ्या अनेक प्रकारच्या पदार्थांनी मला संतोष होत नाही. प्राण्यांचा अपमान करणाऱ्या माणसाने जरी माझी पूजा केली, तरी त्याने मी पूजिला जातो, असे मात्र होत नाही. (७५)

जोपर्यंत सर्व भूतांमध्ये तसेच स्वतःच्या देहात मी ईश्वर आहे, ही गोष्ट लक्षात येत नाही, तोपर्यंत माणसाने स्वतःच्या कर्मांनी प्रतिमा इत्यादींमध्ये देव म्हणून माझी पूजा करावी. (७६)

जे कोणी स्वतःचा जीवात्मा आणि परमात्मा यांमध्ये भेद करतात, त्या भेदबुद्धीच्या सर्व माणसांना मृत्यू हा भय दाखवितो, यांत संशय नाही. (७७)

म्हणून देहधारी सर्व भूतांमध्ये मी एकटाच वास करीत असतो, असे जाणून अभेद-बुद्धी बाळगून माणसाने ज्ञान, मान आणि मैत्री या रूपांनी माझी पूजा करावी.(७८)

अशा प्रकारे चेतन, शुद्ध असा मीच सर्व प्राण्यांचे ठायी जीवरूपाने राहात असतो, हे जाणून बुद्धिमान पुरुषाने अंतःकरणपूर्वक सर्व भूतांना सतत प्रणाम करावा. म्हणून जीव आणि ईश्वर यांत भेद आहे, असे कधीही मानू नये. हे माते, भक्तियोग आणि ज्ञानयोग मी तुला सांगितला. यां पैकी कोणत्याही एकाचा अवलंब करून, माणूस आत्यंतिक कल्याण प्राप्त करून घेतो. म्हणून हे माते सर्वांच्या हृदयात मीच राहातो किंवा मी तुझा पुत्र आहे, हे लक्षात घेऊन, भक्तियोगाचेद्वारा जर तू सतत माझे स्मरण करशील, तर तुला शांती प्राप्त होईल. " श्रीरामांचे हे असे वचन ऐकल्यावर कौसल्या आनंदित झाली. हृदयात श्रीरामांचे सदा ध्यान केल्याने, संसाराचे बंधन तोडून आणि तिन्ही प्रकारच्या गतींचे उल्लंघन करून, ती परम गतीला गेली. रघुपतींनी सांगितलेला योग कैकेयीला अगोदरच चित्रकूट पर्वतावर प्राप्त झालेला होता. श्रद्धा आणि भक्ती यांनी अत्यंत शांत झालेली कैकेयी रघुतिलक श्रीरामांचे चिंतन करीत असे. पुढे मृत्यूनंतर स्वर्गात गेल्यावर तिला दिव्य कांती प्राप्त झाली व तेथे ती दशरथांसह आनंदाने राहू लागली. याच प्रमाणे अतिशय निर्मळ मन असणारी, लक्ष्मणाची माता सुमित्रासुद्धा आपल्या पतीच्याजवळ पोचली. (७९-८४)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे उत्तरकाण्डे सप्तमः सर्गः ॥ ७ ॥

अष्टम सर्ग

कालाचे आगमन, लक्ष्मणाचा त्याग आणि त्याचे स्वर्गगमन

श्रीमहादेव उवाच

अथ काले गते कस्मिन् भरतो भीमविक्रमः ।
युधाजिता मातुलेन ह्याहूतोऽगात्ससैनिकः ॥ १ ॥

रामाज्ञया गतस्तत्र हत्वा गन्धर्वनायकान् ।
तिस्रः कोटीः पुरे द्वे तु निवेश्य रघुनन्दनः ॥ २ ॥

पुष्करं पुष्करावत्यां तक्षं तक्षशिलाह्वये ।
अभिषिच्य सुतौ तत्र धनधान्यसुहृद्वृतौ ॥ ३ ॥

पुनरागत्य भरतो रामसेवापरोऽभवत् ।
ततः प्रीतो रघुश्रेष्ठो लक्ष्मणं प्राह सादरम् ॥ ४ ॥

उभौ कुमारौ सौमित्रे गृहीत्वा पश्चिमां दिशम् ।
तत्र भिल्लान्विनिर्जित्य दुष्टान् सर्वापकारिणः ॥ ५ ॥

अङ्गदश्चित्रकेतुश्च महासत्त्वपराक्रमौ ।
द्वयोर्द्वे नगरे कृत्वा गजाश्वधनरत्नकैः ॥ ६ ॥

अभिषिच्य सुतौ तत्र शीघ्रमागच्छ मां पुनः ।
रामस्याज्ञां पुरस्कृत्य गजाश्वबलवाहनः ॥ ७ ॥

गत्वा हत्वा रिपून् सर्वान् स्थापयित्वा कुमारकौ ।
सौमित्रिः पुनरागत्य रामसेवापरोऽभवत् ॥ ८ ॥

ततस्तु काले महति प्रयाते
रामं सदा धर्मपथे स्थितं हरिम् ।
द्रष्टुं समागादृषिवेषधारी
कालस्ततो लक्ष्मणमित्युवाच ॥ ९ ॥

निवेदयस्वातिबलस्य दूतं
मां द्रष्टुकामं पुरुषोत्तमाय ।
रामाय विज्ञापनमस्ति तस्य
महर्षिमुख्यस्य चिराय धीमन् ॥ १० ॥

तस्य तद्वचनं श्रुत्वा सौमित्रिस्त्वरयान्वितः ।
आचचक्षेऽथ रामाय स सम्प्राप्तं तपोधनम् ॥ ११ ॥

श्रीमहादेव म्हणाले– हे पार्वती, नंतर काही काळ गेला असता प्रचंड पराक्रम असणाऱ्या भरताला त्याच्या युधाजित मामाकडून बोलावणे आले. श्रीरामांच्या आज्ञेने सैनिकांसह भरत तिकडे गेला. तेथे गेल्यावर रघुनंदन भरताने तीन कोटी गंधर्व- नायकांचा वध केला आणि तेथेच त्याने दोन नगरे वसविली. (१-२)

त्या दोन नगरींपैकी पुष्करावती नगरीत पुष्कर आणि तक्षशिला नावाच्या नगरात तक्ष अशा आपल्या दोन पुत्रांना भरताने राज्याभिषेक केला. तेथे ते धन- धान्यसंपन्न होऊन मित्रांसह राहू लागले. भरत परत आला आणि श्रीरामांच्या सेवेत तत्पर झाला. नंतर आनंदित झालेले रघुश्रेष्ठ श्रीराम आदरपूर्वक लक्ष्मणाला म्हणाले. (३-४)

" हे लक्ष्मणा, तू तुझ्या दोन कुमारांना घेऊन पश्चिम दिशेला जा. तेथे सर्वांवर अपकार करणाऱ्या दुष्ट भिल्लांचा पराभव कर. नंतर तुझे महाबलवान आणि महापराक्रमी अंगद आणि चित्रकेतू हे पुत्र आहेत, त्या दोघांसाठी दोन नगरे वसव. मग हत्ती, घोडे, द्रव्य, रत्ने या साधनांनी त्या दोन पुत्रांचा तेथे राज्याभिषेक करून, तू सत्वर परत ये." श्रीरामांची आज्ञा शिरोधार्थ मानून हत्ती, घोडे, सैन्य व वाहने यांच्यासह लक्ष्मण गेला आणि सर्व शत्रूंचा वध करून, त्याने दोन्ही कुमारांना राज्यावर बसविले आणि मग परत येऊन लक्ष्मण श्रीरामांची सेवा करण्यात तत्पर झाला. (५-८)

त्यानंतर पुष्कळ काळ निघून गेला. धर्माच्या मार्गाचा अवलंब करणाऱ्या हरिरूपी रामांना भेटण्यासाठी, ऋषीचा वेष धारण केलेला काळ आला. तो काळ लक्ष्मणाला म्हणाला. (९)

"हे बुद्धिमान लक्ष्मणा, अतिबल ऋषींचा दूत म्हणून मी श्रीरामांना भेटण्यास आलो आहे. त्या श्रेष्ठ महर्षींचा निरोप प्रभू रामचंद्रांना सांगण्यास मला बराच वेळ लागणार आहे. ही गोष्ट तू पुरुषोत्तम रामांना जाऊन निवेदन कर." (१०)

त्याचे ते वचन ऐकल्यावर, लक्ष्मण त्वरेने श्रीरामांकडे गेला आणि तपस्वी ऋषी आले आहेत, असे त्याने सांगितले. (११)

एवं ब्रुवन्तं प्रोवाच लक्ष्मणं राघवो वचः ।
शीघ्रं प्रवेश्यतां तात मुनिः सत्कारपूर्वकम् ॥ १२ ॥

लक्ष्मणस्तु तथेत्युक्त्वा प्रावेशयत तापसम् ।
स्वतेजसा ज्वलन्तं तं घृतसिक्तं यथानलम् ॥ १३ ॥

सोऽभिगम्य रघुश्रेष्ठं दीप्यमानः स्वतेजसा ।
मुनिर्मधुरवाक्येन वर्धस्वेत्याह राघवम् ॥ १४ ॥

तस्मै स मुनये रामः पूजां कृत्वा यथाविधि ।
पृष्ट्वानामयमव्यग्रो रामः पृष्टोऽथ तेन सः ॥ १५ ॥

दिव्यासने समासीनो रामः प्रोवाच तापसम् ।
यदर्थमागतोऽसि त्वमिह तत्प्रापयस्व मे ॥ १६ ॥

वाक्येन चोदितस्तेन रामेणाह मुनिर्वचः ।
द्वन्द्वमेव प्रयोक्तव्यमनालक्ष्यं तु तद्वचः ॥ १७ ॥

नान्येन चैतच्छ्रोतव्यं नाख्यातव्यं च कस्यचित् ।
शृणुयाद्वा निरीक्षेद्वा यः स वध्यस्त्वया प्रभो ॥ १८ ॥

तथेति च प्रतिज्ञाय रामो लक्ष्मणमब्रवीत् ।
तिष्ठ त्वं द्वारि सौमित्रे नायात्वत्र जनो रहः ॥ १९ ॥

यथागच्छति को वापि स वध्यो मे न संशयः ।
ततः प्राह मुनिं रामो येन वा त्वं विसर्जितः ॥ २० ॥

यत्ते मनीषितं वाक्यं तद्वदस्व ममाग्रतः ।
ततः प्राह मुनिर्वाक्यं शृणु राम यथातथम् ॥ २१ ॥

ब्रह्मणा प्रेषितोऽस्मीश कार्यार्थे तेऽन्तिकं प्रभो ।
अहं हि पूर्वजो देव तव पुत्रः परन्तप ॥ २२ ॥

मायासङ्गमजो वीर कालः सर्वहरः स्मृतः ।
ब्रह्मा त्वामाह भगवान् सर्वदेवर्षिपूजितः ॥ २३ ॥

रक्षितुं स्वर्गलोकस्य समयस्ते महामते ।
पुरा त्वमेक एवासीर्लोकान् संहृत्य मायया ॥ २४ ॥

असे कथन करणाऱ्या लक्ष्मणाला राघव म्हणाले की, "बंधो, सत्कारपूर्वक त्या मुनींना लवकर आत घेऊन ये." "ठीक आहे" असे म्हणून लक्ष्मणाने त्या तापसाला आत नेले. तुपाचा शिडकाव केलेला अग्नी ज्या प्रमाणे प्रज्वलित झालेला असतो, त्या प्रमाणे तो तापस स्वतःच्या तेजाने देदीप्यमान होता. स्वतःच्या तेजाने दीप्तिमान असणारे ते मुनी रघुश्रेष्ठांजवळ गेले आणि मधुर शब्दांनी म्हणाले, "तुमचा उत्कर्ष होवो." (१२-१४)

त्या मुनींची विधिवत पूजा करून श्रीरामांनी शांतपणे त्या मुनींना त्यांचे क्षेमकुशल विचारले. मग मुनींनीही त्यांचे कुशल विचारले. (१५)

दिव्य आसनावर बसलेल्या श्रीरामांनी त्या तपस्व्यांना म्हटले, "ज्यासाठी तुम्ही येथे आला आहात तो निरोप सांगा." (१६)

रामांकडून अनुज्ञा मिळाल्यावर मुनी रामांना म्हणाले, "मी सांगतो ते अन्य कुणालाही कळू नये, ते आपणा दोघांमध्येच राहावयास हवे. (१७)

हे वचन दुसऱ्या कोणी ऐकावयाचे नाही, तसेच ते दुसऱ्या कुणालाही सांगावयाचे नाही. हे प्रभो, जर कुणी ऐकले किंवा बोलताना आपणास पाहिले, तर प्रभू, तुम्ही त्याचा वध करावयास हवा." (१८)

"ठीक आहे" असे प्रतिज्ञापूर्वक सांगून श्रीराम लक्ष्मणाला म्हणाले, "अरे लक्ष्मणा, तू येथे दाराशी उभा राहा. येथे एकांत स्थानी कुणाही माणसाला येऊ देऊ नकोस. जर कोणी येथे आला तर मी त्याला ठार मारीन, यात संशय नाही." नंतर राम त्या मुनींना म्हणाले, "ज्या कुणी तुम्हांला येथे पाठविले आहे, तसेच तुमच्या मनात जे काही सांगावयाचे आहे, ते आता मला सांगा." तेव्हा मुनी म्हणाले, "हे रामा, मी तुम्हांला खरी गोष्ट आता सांगतो. (१९-२१)

हे प्रभू ईश्वरा, विशिष्ट कार्यासाठी ब्रह्मदेवाने मला तुमच्याकडे पाठविले आहे. हे शत्रुदमना देवा, खरोखर मी तुमचा ज्येष्ठ पुत्र आहे. (२२)

हे वीरा, मायेशी झालेल्या तुमच्या संयोगातून मी उत्पन्न झालो आहे. मी तुमचा पुत्र काल या नावाने प्रसिद्ध आहे. सर्वांचा नाश करणारा म्हणून मी प्रख्यात आहे. सर्व देवर्षींकडून पूजिले गेलेले भगवान ब्रह्मदेव, त्यांनी तुम्हाला सांगितले आहे, (२३)

"हे महाबुद्धिमंता, स्वर्गलोकाचे रक्षण करण्यासाठी तुम्ही परत येण्याची वेळ आली आहे. पूर्वी

भार्यया सहितस्त्वं मामादौ पुत्रमजीजनः ।
तथा भोगवतं नागमनन्तमुदकेशयम् ॥ २५ ॥

मायया जनयित्वा त्वं द्वौ ससत्त्वौ महाबलौ ।
मधुकैटभकौ दैत्यौ हत्वा मेदोऽस्थिसञ्चयम् ॥ २६ ॥

इमां पर्वतसम्बद्धां मेदिनीं पुरुषर्षभ ।
पद्मे दिव्यार्कसङ्काशे नाभ्यामुत्पाद्य मामपि ॥ २७ ॥

मां विधाय प्रजाध्यक्षं मयि सर्वं न्यवेदयत् ।
सोऽहं संयुक्तसम्भारस्त्वामवोचं जगत्पते ॥ २८ ॥

रक्षां विधत्स्व भूतेभ्यो ये मे वीर्यापहारिणः ।
ततस्त्वं कश्यपाज्जातो विष्णुर्वामनरूपधृक् ॥ २९ ॥

हतवानसि भूभारं वधाद्रक्षोगणस्य च ।
सर्वासूत्सार्यमाणासु प्रजासु धरणीधर ॥ ३० ॥

रावणस्य वधाकाङ्क्षी मर्त्यलोकमुपागतः ।
दशवर्षसहस्राणि दशवर्षशतानि च ॥ ३१ ॥

कृत्वा वासस्य समयं त्रिदशेष्वात्मनः पुरा ।
स ते मनोरथः पूर्णः पूर्णे चायुषि ते नृषु ॥ ३२ ॥

कालस्तापसरूपेण त्वत्समीपमुपागमत् ।
ततो भूयश्च ते बुद्धिर्यदि राज्यमुपासितुम् ॥ ३३ ॥

तत्तथा भव भद्रं ते एवमाह पितामहः ।
यदि ते गमने बुद्धिर्देवलोकं जितेन्द्रिय ॥ ३४ ॥

सनाथा विष्णुना देवा भवन्तु विगतज्वराः ।
चतुर्मुखस्य तद्वाक्यं श्रुत्वा कालेन भाषितम् ॥ ३५ ॥

हसन् रामस्तदा वाक्यं कृत्स्नस्यान्तकमब्रवीत् ।
श्रुतं तव वचो मेऽद्य ममापीष्टतरं तु तत् ॥ ३६ ॥

सन्तोषः परमो ज्ञेयस्त्वदागमनकारणात् ।
त्रयाणामपि लोकानां कार्यार्थं मम सम्भवः ॥ ३७ ॥

सर्व लोकांचा संहार करून तुम्ही एकटेच राहिला होता. नंतर आपली पत्नी माया हिच्याशी संयोग पावून तुम्ही प्रथम मला ब्रह्मदेवास पुत्र म्हणून जन्माला घातले. तसेच पाण्यात शयन करणाऱ्या फणाधारी अनंत नावाच्या शेष नागाला तुम्ही निर्माण केले. (२४-२५)

अशा प्रकारे मायेच्याद्वारा आम्हाला उत्पन्न करून तुम्ही पराक्रमी आणि अतिशय बलवान अशा मधू व कैटभ नावाच्या दोन दैत्यांचा वध करून, त्या दोघांच्या मेद व अस्थि-समूह यांच्यापासून पर्वतांनी युक्त अशी पृथ्वी निर्माण केली. हे पुरुषश्रेष्ठा, नंतर तुमच्या नाभीतील दिव्य सूर्याप्रमाणे तेजस्वी असणाऱ्या अशा कमलात तुम्ही मलासुद्धा उत्पन्न केले आणि मला प्रजापती बनवून तुम्ही विश्वोत्पत्ती करण्याचा सर्व भार माझ्यावर सोपवलात. तेव्हा जगत्पते, तो सर्व भार स्वीकारून मी तुम्हाला म्हणालो. (२६-२८)

माझ्या वीर्याचा म्हणजे प्रजेचा नाश करणारे जे कोणी असतील त्या प्राण्यांपासून तुम्ही माझ्या प्रजेचे रक्षण करा. तेव्हा तुम्ही विष्णू-वामनाचे रूप धारण करून कश्यपापासून जन्माला आलात. (२९)

आणि राक्षस समुदायाचा नाश करून तुम्ही पृथ्वीचा भार हरण केला. हे धरणी धारण करणाऱ्या विष्णो, या काळी सर्व प्रजांचा नाश होत असताना, रावणाचा वध करण्याच्या इच्छेने तुम्ही मर्त्य लोकात गेला होता. पूर्वी देवांजवळ अकरा हजार वर्षे पृथ्वीवर राहाण्याचा स्वतःचा कालावधी तुम्ही निश्चित केला होता. आता तुमचे मनोरथ पूर्ण झाले आहेत आणि मृत्युलोकातील माणसांमध्ये राहाण्याचा तुमचा समयही आता संपला आहे. (३०-३२)

आता तापसरूपाने काल हा तुमच्याजवळ आलेला आहे. जर आणखी काही काळ राज्याचा उपभोग घेण्याची तुमची इच्छा असेल तर तुम्ही तसे ठरवा. तुमचे कल्याण असो.' असे ब्रह्मदेवांनी तुम्हांला सांगितले आहे. या उलट हे जितेंद्रिया, जर देवलोकी परत जाण्याचा तुमचा विचार असेल, तर विष्णूंकडून सनाथ होऊन देव निश्चिंत होऊ देत." कालाने सांगितलेले ते ब्रह्मदेवाचे वचन ऐकल्यावर, त्या वेळी सर्वांचा अंत करणाऱ्या त्या कालाला हसत हसत राम म्हणाले, "आता मी तुझे वचन ऐकले आहे. मलासुद्धा हेच अधिक इष्ट वाटत आहे. (३३-३६)

तुझे आगमन येथे झाले यामुळे मला संतोष झाला आहे. कारण तिन्ही लोकांचे कार्य करण्यासाठी माझा अवतार असतो. (३७)

भद्रं तेऽस्त्वागमिष्यामि यत एवाहमागतः ।
मनोरथस्तु सम्प्राप्तो न मेऽत्रास्ति विचारणा ॥ ३८ ॥

मत्सेवकानां देवानां सर्वकार्येषु वै मया ।
स्थातव्यं मायया पुत्र यथा चाह प्रजापतिः ॥ ३९ ॥

एवं तयोः कथयतोर्दुर्वासा मुनिरभ्यगात् ।
राजद्वारं राघवस्य दर्शनापेक्षया द्रुतम् ॥ ४० ॥

मुनिर्लक्ष्मणमासाद्य दुर्वासा वाक्यमब्रवीत् ।
शीघ्रं दर्शय रामं मे कार्यं मेऽत्यन्तमाहितम् ॥ ४१ ॥

तच्छ्रुत्वा प्राह सौमित्रिर्मुनिं ज्वलनतेजसम् ।
रामेण कार्यं किं तेऽद्य किं तेऽभीष्टं करोम्यहम् ॥ ४२ ॥

राजा कार्यान्तरे व्यग्रो मुहूर्तं सम्प्रतीक्ष्यताम् ।
तच्छ्रुत्वा क्रोधसन्तप्तो मुनिः सौमित्रिमब्रवीत् ॥ ४३ ॥

अस्मिन् क्षणे तु सौमित्रे न दर्शयसि चेद्विभुम् ।
रामं सविषयं वंशं भस्मीकुर्यां न संशयः ॥ ४४ ॥

श्रुत्वा तद्वचनं घोरमृषेर्दुर्वाससो भृशम् ।
स्वरूपं तस्य वाक्यस्य चिन्तयित्वा स लक्ष्मणः ॥ ४५ ॥

सर्वनाशाद्वरं मेऽद्य नाशो ह्येकस्य कारणात् ।
निश्चित्यैवं ततो गत्वा रामाय प्राह लक्ष्मणः ॥ ४६ ॥

सौमित्रेर्वचनं श्रुत्वा रामः कालं व्यसर्जयत् ।
शीघ्रं निर्गम्य रामोऽपि ददर्शात्रेः सुतं मुनिम् ॥ ४७ ॥

रामोऽभिवाद्य सम्प्रीतो मुनिं पप्रच्छ सादरम् ।
किं कार्यं ते करोमीति मुनिमाह रघूत्तमः ॥ ४८ ॥

तच्छ्रुत्वा रामवचनं दुर्वासा राममब्रवीत् ।
अद्य वर्षं सहस्राणामुपवाससमापनम् ॥ ४९ ॥

अतो भोजनमिच्छामि सिद्धं यत्ते रघूत्तम ।
रामो मुनिवचः श्रुत्वा सन्तोषेण समन्वितः ॥ ५० ॥

स सिद्धमन्नं मुनये यथावत्समुपाहरत् ।
मुनिर्भुक्त्वान्नममृतं सन्तुष्टः पुनरभ्यगात् ॥ ५१ ॥

तुझे कल्याण होवो. आता परत येईन. माझे मनोरथ पूर्ण झाले आहेत. आता या बाबतीत मला आणखी विचार करण्याचे काहीच कारण नाही. (३८)

हे पुत्रा, प्रजापती ब्रह्मदेवाने म्हटले आहे, त्या प्रमाणे माझे सेवक असणाऱ्या देवांच्या सर्व कार्यात सहाय्य करण्यास मी मायेच्या द्वारे उपस्थित राहाणे, हे योग्यच आहे." (३९)

अशा प्रकारे ते श्रीराम व काल दोघे बोलत असताना, राघवांचे दर्शन घेण्याच्या इच्छेने दुर्वास मुनी लगबगीने राजद्वारी आले. (४०)

लक्ष्मणाजवळ येऊन दुर्वास मुनी म्हणाले, "माझी रामांशी त्वरित भेट करवून दे. त्यांच्याकडे माझे एक अतिशय महत्त्वाचे काम आहे. " ते ऐकल्यावर अग्नीप्रमाणे तेजस्वी असणाऱ्या मुनींना लक्ष्मण म्हणाला, "श्रीरामांबरोबर आत्ताच तुमचे काय काम आहे? तुमचे काय अभीष्ट आहे ? मी ते पूर्ण करतो. राजाराम हे दुसऱ्या एका कार्यात व्यग्र आहेत. तेव्हा थोडा वेळ तुम्ही वाट पाहावी. "ते ऐकताच क्रोधाने संतप्त झालेले मुनी लक्ष्मणाला म्हणाले. "अरे लक्ष्मणा, जर तू याच क्षणी माझी प्रभू रामचंद्रांशी भेट घडवून आणली नाहीस, तर संपूर्ण देशासह तुमचा वंश मी भस्म करून टाकीन, हे नक्की समज." (४१-४४)

दुर्वास ऋषींचे ते भयंकर वाक्य ऐकल्यावर, त्याच्या परिणामाचा लक्ष्मणाने विचार केला. आणि मग एकामुळे सर्वांचा नाश होण्यापेक्षा, आत्ता माझ्या एकट्याचाच नाश होणे हे अधिक श्रेयस्कर आहे, असा निश्चय करून, लक्ष्मण श्रीरामांजवळ गेला आणि श्रीरामांना त्याने सर्व वृत्तांत सांगितला. (४५-४६)

लक्ष्मणाचे वचन ऐकल्यावर, रामांनी कालाला निरोप दिला आणि चट्दिशी बाहेर येऊन रामांनीसुद्धा त्या अत्रि- पुत्र दुर्वास मुनींची भेट घेतली. संतुष्ट मनाने मुनींना अभिवादन करून रामांनी आदरपूर्वक मुनींना प्रश्न केला, "मी तुमचे कोणते कार्य करू?" ते रामांचे वचन ऐकून दुर्वास मुनी रामांना म्हणाले, "हजारो वर्षे केलेल्या माझ्या उपवासाची आज समाप्ती आहे. म्हणून हे रघूत्तमा, तुमच्याकडे जे काही तयार असेल ते भोजन करण्याची माझी इच्छा आहे." मुनींचे वचन ऐकल्यावर रामांना संतोष वाटला. तयार असलेले अन्न श्रीरामांनी मुनींना यथायोग्यपणे खाऊ घातले. ते अमृततुल्य अन्न खाऊन संतुष्ट झालेले मुनी तेथून परत निघून गेले. (४७-५१)

स्वमाश्रमं गते तस्मिन् रामः सस्मार भाषितम् ।
कालेन शोकदुःखार्तो विमनाश्चातिविह्वलः ॥ ५२ ॥

अवाङ्मुखो दीनमना न शशाकाभिभाषितुम् ।
मनसा लक्ष्मणं ज्ञात्वा हतप्रायं रघूद्वहः ॥ ५३ ॥

अवाङ्मुखो बभूवाथ तूष्णीमेवाखिलेश्वरः ।
ततो रामं विलोक्याह सौमित्रिर्दुःखसम्प्लुतम् ॥ ५४ ॥

तूष्णीम्भूतं चिन्तयन्तं गर्हन्तं स्नेहबन्धनम् ।
मत्कृते त्यज सन्तापं जहि मां रघुनन्दन ॥५५॥

गतिः कालस्य कलिता पूर्वमेवेदृशी प्रभो ।
त्वयि हीनप्रतिज्ञे तु नरको मे ध्रुवं भवेत् ॥ ५६ ॥

मयि प्रीतिर्यदि भवेद्यद्यनुग्राह्यता तव ।
त्यक्त्वा शङ्कां जहि प्राज्ञ मा मा धर्मं त्यज प्रभो ॥ ५७ ॥

सौमित्रिणोक्तं तच्छ्रुत्वा रामश्चलितमानसः ।
आहूय मन्त्रिणः सर्वान् वसिष्ठं चेदमब्रवीत् ॥ ५८ ॥

मुनेरागमनं यत्तु कालस्यापि हि भाषितम् ।
प्रतिज्ञामात्मनश्चैव सर्वमावेदयत्प्रभुः ॥ ५९ ॥

श्रुत्वा रामस्य वचनं मन्त्रिणः सपुरोहिताः ।
ऊचुः प्राञ्जलयः सर्वे राममक्लिष्टकारिणम् ॥ ६० ॥

पूर्वमेव हि निर्दिष्टं तव भूभारहारिणः ।
लक्ष्मणेन वियोगस्ते ज्ञातो विज्ञानचक्षुषा ॥ ६१ ॥

त्यजाशु लक्ष्मणं राम मा प्रतिज्ञां त्यज प्रभो ।
प्रतिज्ञाते परित्यक्ते धर्मो भवति निष्फलः ॥ ६२ ॥

धर्मे नष्टेऽखिले राम त्रैलोक्यं नश्यति ध्रुवम् ।
त्वं तु सर्वस्य लोकस्य पालकोऽसि रघूत्तम ॥ ६३ ॥

त्यक्त्वा लक्ष्मणमेवैकं त्रैलोक्यं त्रातुमर्हसि ।
रामो धर्मार्थसहितं वाक्यं तेषामनिन्दितम् ॥ ६४ ॥

मुनी गेल्यावर, कालाशी झालेले भाषण रामांना आठवले. ते शोक व दुःख यांमुळे खिन्न, विमनस्क, उदास आणि अतिशय व्याकूळ झाले. (५२)

आता लक्ष्मण मेल्यातच जमा आहे, हे मनाने कळल्यावर, रघुश्रेष्ठ श्रीराम लक्ष्मणाला काही बोलू शकले नाहीत. (५३)

त्यानंतर सर्वांचे ईश्वर राम खाली मान घालून गप्प बसून राहिले. दुःखाने मौन, चिंतित आणि स्नेहबंधनाची निंदा करणाऱ्या श्रीरामांना पाहून लक्ष्मण म्हणाला, "हे रघुनंदना, माझ्यासाठी तुम्ही त्रास करून घेऊ नका. माझा खुशाल वध करा. (५४-५५)

हे प्रभो, मला पूर्वीच असे वाटले होते की कालाची गती अशीच आहे. तुमच्या प्रतिज्ञेचा भंग झाला तर मला निश्चितपणे नरक मिळेल. (५६)

हे प्रभो, जर तुमचे माझ्यावर प्रेम असेल, जर मी तुमच्या अनुग्रहास पात्र असेन, तर तुम्ही शंका सोडून माझा वध करा. हे प्रभो, तुम्ही धर्माचा त्याग करू नका." (५७)

लक्ष्मणाने उच्चारलेले वचन ऐकल्यावर रामांचे मन चंचल झाले आणि त्यांनी सर्व मंत्र्यांना आणि वसिष्ठांना बोलावून घेतले आणि (५८)

दुर्वास मुनींचे आगमन, कालाचे भाषण आणि स्वतः केलेली प्रतिज्ञा हे सर्व प्रभू रामांनी त्यांना सांगितले. (५९)

श्रीरामांचे वचन ऐकल्यावर वसिष्ठांच्यासह सर्व मंत्र्यांनी हात जोडले आणि अनायास कोणतेही कार्य करणाऱ्या श्रीरामांना ते म्हणाले. (६०)

"पृथ्वीचा भार हरण करणारे तुम्ही. तुमचा लक्ष्मणाशी वियोग होणार हे पूर्वीच ठरले होते. ही गोष्ट अंतर्ज्ञानाने आम्हांला कळलेली आहे. (६१)

तेव्हा हे रामा, आता तुम्ही त्वरित लक्ष्मणाचा त्याग करा. हे प्रभो, तुम्ही आपल्या प्रतिज्ञेचा भंग करू नका. प्रतिज्ञेचा भंग केला असता, धर्म निष्फळ होऊन जातो. (६२)

आणि हे रामा, संपूर्ण धर्म नष्ट झाला तर, त्रैलोक्याचा नाश नक्कीच होईल. हे रघूत्तमा, तुम्ही तर सर्व लोकांचे रक्षक आहात. (६३)

तेव्हा एकट्या लक्ष्मणाचा त्याग करून तुम्ही त्रैलोक्याचे रक्षण करावे." सभेमध्ये त्या लोकांनी उच्चारलेले, धर्म व अर्थ यांनी युक्त असणारे आणि निर्विवाद

सभामध्ये समाश्रुत्य प्राह सौमित्रिमञ्जसा ।
यथेष्टं गच्छ सौमित्रे मा भूद्धर्मस्य संशयः ॥ ६५ ॥

परित्यागो वधो वापि सतामेवोभयं समम् ।
एवमुक्ते रघुश्रेष्ठे दुःखव्याकुलितेक्षणः ॥ ६६ ॥

रामं प्रणम्य सौमित्रिः शीघ्रं गृहमगात्स्वकम् ।
ततोऽगात्सरयूतीरमाचम्य स कृताञ्जलिः ॥ ६७ ॥

नव द्वाराणि संयम्य मूर्ध्नि प्राणमधारयत् ।
यदक्षरं परं ब्रह्म वासुदेवाख्यमव्ययम् ॥ ६८ ॥

पदं तत्परमं धाम चेतसा सोऽभ्यचिन्तयत् ।
वायुरोधेन संयुक्तं सर्वे देवाः सहर्षयः ॥ ६९ ॥

साग्नयो लक्ष्मणं पुष्पैस्तुष्टुवुश्च समाकिरन् ।
अदृश्यं विबुधैः कैश्चित्सशरीरं च वासवः ॥ ७० ॥

गृहीत्वा लक्ष्मणं शक्रः स्वर्गलोकमथागमत् ।
ततो विष्णोश्चतुर्भागं तं देवं सुरसत्तमाः ।
सर्वे देवर्षयो दृष्ट्वा लक्ष्मणं समपूजयन् ॥ ७१ ॥

लक्ष्मणे हि दिवमागते हरौ
सिद्धलोकगतयोगिनस्तदा ।
ब्रह्मणा सह समागमन्मुदा
द्रष्टुमाहितमहाहिरूपकम् ॥ ७२ ॥

असे ते शब्द ऐकून श्रीराम लगेच लक्ष्मणाला म्हणाले, "हे लक्ष्मणा, जिकडे जायची इच्छा असेल, तिकडे तू जा. म्हणजे धर्माचा लोप होण्याची शंका येणार नाही.(६४-६५)

त्याग आणि वध हे दोन्हीही सत्पुरुषांचे बाबतीत समान असतात." रघुश्रेष्ठांनी असे म्हटल्यावर लक्ष्मणाचे डोळे दुःखाश्रूंनी डबडबून गेले. (६६)

मग श्रीरामांना प्रणाम करून लक्ष्मण त्वरित आपल्या घरी गेला. तेथून तो सरयूच्या तीरावर गेला. मग आचमन करून, त्याने दोन्ही हात जोडले आणि आपल्या शरीरातील नवद्वारांचा संयम करून, आपला प्राण मस्तकात धारण केला. नंतर वासुदेव हे नाव असणारे जे अव्यय आणि अविनाशी असे परब्रह्म पद आहे, त्या परमधामाचे त्याने मनाने ध्यान सुरू केले. अशा प्रकारे प्राणनिरोध करणाऱ्या लक्ष्मणावर ऋषी व अग्नी यांच्यासह सर्व देवांनी पुष्प-वृष्टी केली आणि त्याची स्तुती केली. त्या वेळी कोणत्याही देवाला दिसणार नाही, अशा पद्धतीने इंद्राने लक्ष्मणाला स्वर्गात सदेह घेतले आणि इंद्र स्वर्गलोकी निघून गेला. नंतर विष्णूचा चतुर्थ भागरूप असणाऱ्या लक्ष्मणाला पाहून सर्व देवश्रेष्ठ आणि सर्व देवर्षी यांनी लक्ष्मणाचे पूजन केले. (६७-७१)

लक्ष्मणरूपी हरी स्वर्गाला गेल्यावर, सिद्धलोकात राहाणारे योगीजन ब्रह्मदेवांसह महासर्प (शेष) रूपधारी लक्ष्मणाला पाहाण्यास आनंदाने आले. (७२)

इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे उत्तरकाण्डे ऽष्टमः सर्गः ॥ ८ ॥

नवम सर्ग

महाप्रयाण

श्रीमहादेव उवाच

लक्ष्मणं तु परित्यज्य रामो दुःखसमन्वितः ।
मन्त्रिणो नैगमांश्चैव वसिष्ठं चेदमब्रवीत् ॥ १ ॥

अभिषेक्ष्यामि भरतमधिराज्ये महामतिम् ।
अद्य चाहं गमिष्यामि लक्ष्मणस्य पदानुगः ॥ २ ॥

एवमुक्ते रघुश्रेष्ठे पौरजानपदास्तदा ।
द्रुमा इव च्छिन्नमूला दुःखार्ताः पतिता भुवि ॥ ३ ॥

श्रीमहादेव म्हणाले– हे पार्वती, लक्ष्मणाचा त्याग केल्यावर दुःखी झालेले श्रीराम मंत्री, वेदवेत्ते लोक आणि वसिष्ठ यांना म्हणाले. (१)

"आजच महाबुद्धिमान भरताला राज्यावर अभिषेक करून, मी लक्ष्मणाच्या पाठोपाठ जातो." (२)

रघुश्रेष्ठांनी असे म्हटल्यावर, नगरवासी व देशवासी लोक दुःखाने कळवळले, आणि मुळे तुटलेले वृक्ष ज्या प्रमाणे जमिनीवर पडतात, त्या प्रमाणे ते उन्मळून पडले. (३)

मूर्च्छितो भरतो वापि श्रुत्वा रामाभिभाषितम् ।
गर्हयामास राज्यं स प्राहेदं रामसन्निधौ ॥ ४ ॥

सत्येन च शपे नाहं त्वां विना दिवि वा भुवि ।
काङ्क्षे राज्यं रघुश्रेष्ठ शपे त्वत्पादयोः प्रभो ॥ ५ ॥

इमौ कुशलवौ राजन्नभिषिञ्चस्व राघव ।
कोशलेषु कुशं वीरमुत्तरेषु लवं तथा ॥ ६ ॥

गच्छन्तु दूतास्त्वरितं शत्रुघ्ननयनाय हि ।
अस्माकमेतद्गमनं स्ववार्साय शृणोतु सः ॥ ७ ॥

भरतेनोदितं श्रुत्वा पतितास्ताः समीक्ष्य तम् ।
प्रजाश्च भयसंविग्ना रामविश्लेषकातराः ॥ ८ ॥

वसिष्ठो भगवान् राममुवाच सदयं वचः ।
पश्य तातादरात्सर्वाः पतिता भूतले प्रजाः ॥ ९ ॥

तासां भावानुगं राम प्रसादं कर्तुमर्हसि ।
श्रुत्वा वसिष्ठवचनं ताः समुत्थाप्य पूज्य च ॥ १० ॥

सस्नेहो रघुनाथस्ताः किं करोमीति चाब्रवीत् ।
ततः प्राञ्जलयः प्रोचुः प्रजा भक्त्या रघूद्वहम् ॥ ११ ॥

गन्तुमिच्छसि यत्र त्वमनुगच्छामहे वयम् ।
अस्माकमेषा परमा प्रीतिर्धर्मोऽयमक्षयः ॥ १२ ॥

तवानुगमने राम हृद्गता नो दृढा मतिः ।
पुत्रदारादिभिः सार्धमनुयामोऽद्य सर्वथा ॥ १३ ॥

तपोवनं वा स्वर्गं वा पुरं वा रघुनन्दन ।
ज्ञात्वा तेषां मनोदार्ढ्यं कालस्य वचनं तथा ॥ १४ ॥

भक्तं पौरजनं चैव बाढमित्याह राघवः ।
कृत्वैवं निश्चयं रामस्तस्मिन्नेवाहनि प्रभुः ॥ १५ ॥

प्रस्थापयामास च तौ रामभद्रः कुशीलवौ ।
अष्टौ रथसहस्राणि सहस्रं चैव दन्तिनाम् ॥ १६ ॥

षष्टिं चाश्वसहस्राणामेकैकस्मै ददौ बलम् ।
बहुरत्नौ बहुधनौ हृष्टपुष्टजनावृतौ ॥ १७ ॥

श्रीरामांचे भाषण ऐकून भरतसुद्धा मूर्च्छित पडला. श्रीरामांच्यापुढे राज्याची घृणा वाटून तो असे म्हणाला. (४)

"हे रघुश्रेष्ठा, सत्याची शपथ घेऊन आणि तुमच्या पायांची शपथ घेऊन सांगतो की तुमच्याविना स्वर्गलोकातील किंवा पृथ्वीलोकातील राज्याची मला मुळीच इच्छा नाही. (५)

हे महाराज, या कुश व लव यांना राज्याचा अभिषेक करा. वीर कुशाला कोशल देशावर आणि वीर लवाला उत्तरेमध्ये अभिषेक करा. (६)

शत्रुघ्नाला आणण्यासाठी दूत त्वरेने जाऊ देत. आपले हे स्वर्गगमन त्यालाही कळू दे." (७)

भरताने उच्चारलेले वचन ऐकल्यावर, त्याच्याकडे पाहून समस्त प्रजाजन भयाने उद्विग्न झाले आणि श्रीरामांच्या वियोगाने व्याकूळ होऊन पडले. (८)

तेव्हा भगवान वसिष्ठांनी प्रभू रामांना उद्देशून कारुण्यपूर्ण शब्द उच्चारले, "सारी प्रजा पृथ्वीवर पडली आहे, तिच्याकडे कृपादृष्टीने पाहा. (९)

प्रभू रामचंद्रा, लोकांच्या प्रेमभावानुसार तुम्ही यांच्यावर कृपाप्रसाद करावयास हवा." वसिष्ठांचे वचन ऐकल्यावर, श्रीरामांनी त्या सर्व प्रजाजनांना उठवले, त्यांचा सत्कार केला, मग स्नेहपूर्वक त्यांना विचारले, "मी तुमच्यासाठी काय करू ?" तेव्हा सर्व प्रजाजन हात जोडून भक्तीने रघुश्रेष्ठांना म्हणाले. (१०-११)

"तुम्ही जेथे जाऊ इच्छिता तेथे आम्ही मागोमाग येऊ. यातच आम्हांला आनंद आहे आणि यातच आमचा अक्षय धर्म आहे. (१२)

हे प्रभू रामा, तुमच्या मागोमाग येण्याचा आमच्या मनातील विचार अगदी पक्का आहे. हे रघुनंदना, तुम्ही तपोवन, नगर अथवा स्वर्ग येथे कुठेही जा. आम्ही आमचे पुत्र, पत्नी इत्यादींसह आज तुमच्या मागोमाग येणार." त्यांच्या मनाचा तो दृढ निश्चय, तसेच कालाचे वचन लक्षात घेऊन "ठीक आहे" असे राघव त्या भक्तियुक्त नागरिकांना म्हणाले. मग प्रभू रामांनी तसा निश्चय केला आणि त्याच दिवशी त्यांनी कुश व लवाची स्वानगी त्यांच्या राज्यांत केली. प्रत्येकाला त्यांनी आठ हजार रथ, एक हजार हत्ती, साठ हजार घोडे आणि बलवान सैन्य दिले, तसेच पुष्कळ रत्ने , पुष्कळ द्रव्य आणि आनंदी व बलसंपन्न सेवक त्यांना प्रदान केले. मग श्रीरामांना अभिवादन करून कुश आणि

अभिवाद्य गतौ रामं कृच्छ्रेण तु कुशीलवौ ।
शत्रुघ्नानयने दूतान्प्रेषयामास राघवः ॥ १८ ॥

ते दूतास्त्वरितं गत्वा शत्रुघ्नाय न्यवेदयन् ।
कालस्यागमनं पश्चादत्रिपुत्रस्य चेष्टितम् ॥ १९ ॥

लक्ष्मणस्य च निर्याणं प्रतिज्ञां राघवस्य च ।
पुत्राभिषेचनं चैव सर्वं रामचिकीर्षितम् ॥ २० ॥

श्रुत्वा तद् दूतवचनं शत्रुघ्नः कुलनाशनम् ।
व्यथितोऽपि धृतिं लब्ध्वा पुत्रावाहूय सत्वरः ।
अभिषिच्य सुबाहुं वै मथुरायां महाबलः ॥ २१ ॥

यूपकेतुं च विदिशानगरे शत्रुसूदनः ।
अयोध्यां त्वरितं प्रागात्स्वयं रामदिदृक्षया ॥ २२ ॥

ददर्श च महात्मानं तेजसा ज्वलनप्रभम् ।
दुकूलयुगसंवीतं ऋषिभिश्चाक्षयैर्वृतम् ॥ २३ ॥

अभिवाद्य रमानाथं शत्रुघ्नो रघुपुङ्गवम् ।
प्राञ्जलिर्धर्मसहितं वाक्यं प्राह महामतिः ॥ २४ ॥

अभिषिच्य सुतौ तत्र राज्ये राजीवलोचन ।
तवानुगमने राजन्विद्धि मां कृतनिश्चयम् ॥ २५ ॥

त्यक्तुं नार्हसि मां वीर भक्तं तव विशेषतः ।
शत्रुघ्नस्य दृढां बुद्धिं विज्ञाय रघुनन्दनः ॥ २६ ॥

सज्जीभवतु मध्याह्ने भवानित्यब्रवीद्वचः ।
अथ क्षणात्समुत्पेतुर्वानराः कामरूपिणः ॥ २७ ॥

ऋक्षाश्च राक्षसाश्चैव गोपुच्छाश्च सहस्रशः ।
ऋषीणां देवतानां च पुत्रा रामस्य निर्गमम् ॥ २८ ॥

श्रुत्वा प्रोचू रघुश्रेष्ठं सर्वे वानरराक्षसाः ।
तवानुगमने विद्धि निश्चितार्थान्हि नः प्रभो ॥ २९ ॥

एतस्मिन्नन्तरे रामं सुग्रीवोऽपि महाबलः ।
यथावदभिवाद्याह राघवं भक्तवत्सलम् ॥ ३० ॥

लव मोठ्या कष्टाने निघून गेले. शत्रुघ्नाला आणण्यासाठी राघवांनी दूत पाठविले. (१३-१८)

दूत त्वरित गेले आणि त्यांनी शत्रुघ्नाला कालाचे आगमन, नंतर अत्रिपुत्र दुर्वासाचे कृत्य, लक्ष्मणाचे महानिर्वाण, श्रीरामांची प्रतिज्ञा, कुश व लव या पुत्रांचा राज्याभिषेक आणि आता श्रीराम काय करू इच्छितात, हे सर्व निवेदन केले. (१९-२०)

कुळाच्या नाशाविषयीचे ते दूतांचे वचन ऐकल्यावर शत्रुघ्न अतिशय व्यथित झाला. तथापि त्याने धैर्य धारण केले आणि सत्वर आपल्या दोन पुत्रांना बोलावून घेतले. मग त्या महाबलवान शत्रुघ्नाने सुबाहूला मथुरा नगरीत अभिषेक केला, तसेच त्याने यूपकेतूला विदिशा नगरीत अभिषेक केला आणि रामांना भेटण्यासाठी तो स्वतः त्वरेने अयोध्येकडे निघाला. (२१-२२)

स्वतःच्या तेजाने अग्नीप्रमाणे प्रभा असणाऱ्या व दोन रेशमी वस्त्रे परिधान केलेल्या आणि चिरंजीव अशा ऋषींसमवेत महात्म्या श्रीरामांना शत्रुघ्नाने पाहिले.(२३)

नंतर लक्ष्मीपती रघुश्रेष्ठाला अभिवादन करून, महाबुद्धिमान शत्रुघ्न हात जोडून धर्माने युक्त असे वचन बोलला. (२४)

"हे कमलनयन श्रीरामा, तेथे राज्यावर माझ्या दोन पुत्रांना अभिषेक करून मी आलो आहे. हे राजन्, तुमच्या मागोमाग येण्याचा मीसुद्धा निश्चय केला आहे, हे लक्षात घ्या. (२५)

हे वीर रामा, मी तुमचा भक्त आहे. विशेषतः माझा त्याग करणे तुम्हांला शोभणार नाही. " शत्रुघ्नाचा दृढ निश्चय कळल्यावर, श्रीराम बोलले, "आज दुपारी तू तयार हो." त्याच वेळी एका क्षणात इच्छेप्रमाणे रूप धारण करणारे वानर, अस्वले, राक्षस आणि गोपुच्छ जातीचे वानर हजारोंच्या संख्येने उड्या मारत तेथे आले. ऋषी तसेच देवतांचे अंशभूत पुत्र-रूप असे सर्व वानर आणि राक्षसांचे समूह हे सर्वजण श्रीरामांचे निर्याणाविषयी ऐकल्यावर रघुश्रेष्ठ श्रीरामांना म्हणाले, "हे प्रभो, तुमच्या मागोमाग येण्याचा आम्हीसुद्धा निश्चय केला आहे, असे समजा." (२६-२९)

दरम्यानच्या काळात महाबलवान सुग्रीवसुद्धा तेथे आला आणि अभिवादन करून, तो भक्तवत्सल राघवांना म्हणाला. (३०)

अभिषिच्याङ्गदं राज्ये आगतोऽस्मि महाबलम् ।
तवानुगमने राम विद्धि मां कृतनिश्चयम् ॥ ३१ ॥

श्रुत्वा तेषां दृढं वाक्यं ऋक्षवानररक्षसाम् ।
बिभीषणमुवाचेदं वचनं मृदु सादरम् ॥ ३२ ॥

धरिष्यति धरा यावत्प्रजास्तावत्प्रशाधि मे ।
वचनाद्राक्षसं राज्यं शापितोऽसि ममोपरि ॥ ३३ ॥

न किञ्चिदुत्तरं वाच्यं त्वया मत्कृतकारणात् ।
एवं बिभीषणं तूक्त्वा हनूमन्तमथाब्रवीत् ॥ ३४ ॥

मारुते त्वं चिरञ्जीव ममाज्ञां मा मृषा कृथाः ।
जाम्बवन्तमथ प्राह तिष्ठ त्वं द्वापरान्तरे ॥ ३५ ॥

मया सार्धं भवेद्युद्धं यत्किञ्चित्कारणान्तरे ।
ततस्तान् राघवः प्राह ऋक्षराक्षसवानरान् ।
सर्वानेव मया सार्धं प्रयातेति दयान्वितः ॥ ३६ ॥

ततः प्रभाते रघुवंशनाथो
विशालवक्षाः सितकञ्जनेत्रः ।
पुरोधसं प्राह वसिष्ठमार्यं
यान्त्वग्निहोत्राणि पुरो गुरो मे ॥ ३७ ॥

ततो वसिष्ठोऽपि चकार सर्वं
प्रास्थानिकं कर्म महद्विधानात् ।
क्षौमाम्बरो दर्भपवित्रपाणि-
र्महाप्रयाणाय गृहीतबुद्धिः ॥ ३८ ॥

निष्क्रम्य रामो नगरात्सिताभ्रा-
च्छशीव यातः शशिकोटिकान्तिः ।
रामस्य सव्ये सितपद्महस्ता
पद्मा गता पद्मविशालनेत्रा ॥ ३९ ॥

पार्श्वेऽथ दक्षेऽरुणकञ्जहस्ता
श्यामा ययौ भूरपि दीप्यमाना ।
शास्त्राणि शस्त्राणि धनुश्च बाणा
जग्मुः पुरस्ताद् धृतविग्रहास्ते ॥ ४० ॥

"महाबलवान अंगदाचा राज्यावर अभिषेक करून मी आलो आहे. तुमच्या मागोमाग येण्याचा माझासुद्धा निश्चय आहे, हे लक्षात असू द्या." (३१)

त्या वेळी ती अस्वले, वानर आणि राक्षस यांचा दृढ निश्चय ऐकल्यावर, श्रीरामांनी आदरपूर्वक बिभीषणाला उद्देशून मृदू भाषेत सांगितले. (३२)

"अरे बिभीषणा, जोपर्यंत धरतीवर प्रजा असेल तोपर्यंत माझ्या सांगण्याप्रमाणे तू राक्षस-राज्याचे शासन कर. माझी तुला शपथ आहे. (३३)

मी केलेल्या या योजनेवर तू आता मला कोणतीही सबब सांगू नकोस " अशा प्रकारे बिभीषणाला सांगिल्यावर, मग श्रीराम हनुमंताला म्हणाले. (३४)

"हे मारुती, तू चिरकाल जिवंत राहा. माझी आज्ञा मोडू नकोस." नंतर ते जांबवंताला म्हणाले "तू द्वापर युगाच्या शेवटपर्यंत राहा. त्या वेळी काही तरी कारणाने तुझे माझ्याशी युद्ध होईल." त्यानंतर सर्व अस्वले, राक्षस आणि वानर यांना राघव दयावंत होऊन म्हणाले, "तुम्ही सर्व जण माझ्याबरोबरच चला." (३५-३६)

दुसरे दिवशी प्रभात काळी, विशाल वक्षःस्थळाच्या आणि श्वेत कमळाप्रमाणे नेत्र असलेल्या रघुवंशनाथांनी पूज्य पुरोहित वसिष्ठांना म्हटले, "हे गुरो, अग्निहोत्राचे आहवनीय इत्यादी अग्नी माझ्यापुढे असू देत." (३७)

तेव्हा वसिष्ठांनीसुद्धा मोठ्या शास्त्रविधीने प्रस्थानाला योग्य असणारी सर्व धर्म-कर्मे केली. ज्या प्रमाणे पांढऱ्या ढगातून चंद्र बाहेर पडतो, त्याप्रमाणे रेशमी वस्त्रे परिधान केलेले, हातात दर्भाचे पवित्रक असणारे कोट्यवधी चंद्राप्रमाणे कांती असणारे आणि महाप्रयाणाचे बाबतीत निश्चय केलेले श्रीराम नगरातून बाहेर पडले. रामांच्या डाव्या बाजूने, हातात श्वेत कमळ घेतलेली आणि कमळाप्रमाणे विशाल नेत्र असणारी लक्ष्मी चालत होती. त्याच वेळी त्यांच्या उजव्या बाजूला, हातात लाल कमळ घेतलेली देदीप्यमान श्याम वर्णाची पृथ्वीदेवीसुद्धा चालली होती, शास्त्रे, शस्त्रे, धनुष्य आणि बाण हे देह धारण करून रामांच्या पुढे चालत होते. (३९-४०)

वेदाश्च सर्वे धृतविग्रहाश्च
ययुश्च सर्वे मुनयश्च दिव्याः ।
माता श्रुतीनां प्रणवेन साध्वी
ययौ हरिं व्याहृतिभिः समेता ॥ ४१ ॥

गच्छन्तमेवानुगता जनास्ते
सपुत्रदाराः सह बन्धुवर्गैः ।
अनावृतद्वारमिवापवर्गं
रामं व्रजन्तं ययुराप्तकामाः ।
सान्तःपुरः सानुचरः सभार्यः
शत्रुघ्नयुक्तो भरतोऽनुयातः ॥ ४२॥

गच्छन्तमालोक्य रमासमेतं
श्रीराघवं पौरजनाः समस्ताः ।
सबालवृद्धाश्च ययुर्द्विजाग्र्याः
सामात्यवर्गाश्च समन्त्रिणो ययुः ॥ ४३ ॥

सर्वे गताः क्षत्रमुखाः प्रहृष्टा
वैश्याश्च शूद्राश्च तथा परे च ।
सुग्रीवमुख्या हरिपुङ्गवाश्च
स्नाता विशुद्धाः शुभशब्दयुक्ताः ॥ ४४ ॥

न कश्चिदासीद्भवदुःखयुक्तो
दीनोऽथवा बाह्यसुखेषु सक्तः ।
आनन्दरूपानुगता विरक्ता
ययुश्च रामं पशुभृत्यवर्गैः ॥ ४५ ॥

भूतान्यदृश्यानि च यानि तत्र
ये प्राणिनः स्थावरजङ्गमाश्च ।
साक्षात्परात्मानमनन्तशक्तिं
जग्मुर्विरक्ताः परमेकमीशम् ॥ ४६ ॥

नासीदयोध्यानगरे तु जन्तुः
कश्चित्तदा राममना न यातः ।
शून्यं बभूवाखिलमेव तत्र
पुरं गते राजनि रामचन्द्रे ॥ ४७॥
ततोऽतिदूरं नगरात्स गत्वा
दृष्ट्वा नदीं तां हरिनेत्रजाताम् ।
ननन्द रामः स्मृतपावनोऽतो
ददर्श चाशेषमिदं हृदिस्थम् ॥ ४८ ॥

याचप्रमाणे शरीर धारण करून सर्व वेद आणि सर्व दिव्य मुनी रामांबरोबर निघाले होते. तसेच वेदांची साध्वी माता गायत्री देवीही प्रणव आणि व्याहृती यांच्यासह रामांबरोबर निघाली होती. (४१)

अशा प्रकारे राम जात असताना, ते सर्व प्रजाजन आपले पुत्र, पत्नी आणि बंधु- बांधवांचा समाज यांचेसह श्रीरामांच्या मागोमाग निघाले. इच्छा नष्ट झालेले लोक ज्या प्रमाणे दार उघडलेल्या मोक्षाकडे जातात, त्या प्रमाणे ते लोक श्रीरामांच्या मागोमाग जात होते. तसेच अंतःपुरातील स्त्रिया, सेवक, पत्नी आणि शत्रुघ्न यांच्यासह भरतसुद्धा मागे चालला होता. (४२)

लक्ष्मीसह जाणाऱ्या श्रीराघवांना पाहून, बालक आणि वृद्ध यांचेसह सर्व नगरवासी लोक निघाले होते. तसेच अमात्यांचा समूह आणि मंत्री यांच्यासह श्रेष्ठ ब्राह्मणही मागोमाग निघाले होते. (४३)

प्रमुख क्षत्रिय, वैश्य, शूद्र तसेच इतर सर्व लोक मोठ्या आनंदाने चालले होते. खेरीज सुग्रीवादी श्रेष्ठ वानर स्नान करून, शुद्ध होऊन 'श्रीरामांचा जय असो' असे शुभ शब्द उच्चारीत मागोमाग चालले होते. (४४)

संसारदुःखाने दुःखी, दीन किंवा बाह्य विषयांच्या सुखांमध्ये आसक्त असा कोणीही त्यांमध्ये नव्हता. उलट संसारातून विरक्त झालेले ते सर्व जण आपापले पशू व सेवक वर्ग यांच्यासह आनंदरूप असणाऱ्या श्रीरामांच्या मागे निघाले होते. (४५)

तेथे जे भूत-प्रेतादी अदृश्य प्राणी होते, तसेच जे स्थावर जंगम प्राणी होते ते सर्व विरक्त होऊन त्या एकमेवाद्वितीय परम ईश्वर, अनंत शक्ति-संपन्न अशा साक्षात परमात्म्याचे मागे निघाले होते. (४६)

त्या वेळी अयोध्या नगरीत श्रीरामांच्याबरोबर मनःपूर्वक निघाला नव्हता, असा एकही प्राणी नव्हता. महाराज रामचंद्र बाहेर पडल्यावर, ते संपूर्ण नगर सुनेसुने झाले. (४७)

त्यानंतर नगरातून बरेच दूर गेल्यावर, विष्णूंच्या नेत्रांपासून उत्पन्न झालेली सरयू नदी श्रीरामांनी पाहिली. स्मरण करताच पावन करणारे श्रीराम त्या नदीस पाहून आनंदित झाले आणि हे संपूर्ण जग आपल्या हृदयातच सामावलेले आहे, असे त्यांना दिसले. (४८)

अथागतस्तत्र पितामहो महान्
देवाश्च सर्वे ऋषयश्च सिद्धाः ।
विमानकोटीभिरपारपारं
समावृतं खं सुरसेविताभिः ॥ ४९ ॥
रविप्रकाशाभिरभिस्फुरत्स्वं
ज्योतिर्मयं तत्र नभो बभूव ।
स्वयम्प्रकाशैर्महतां महद्भिः
समावृतं पुण्यकृतां वरिष्ठैः ॥ ५० ॥
ववुश्च वातास्च सुगन्धवन्तो
ववर्ष वृष्टिः कुसुमावलीनाम् ।
उपस्थिते देवमृदङ्गनादे
गायत्सु विद्याधरकिन्नरेषु ॥ ५१ ॥
रामस्तु पद्भ्यां सरयूजलं सकृत्
स्पृष्ट्वा परिक्रामदनन्तशक्तिः ।
ब्रह्मा तदा प्राह कृताञ्जलिस्तं
रामं परात्मन् परमेश्वरस्त्वम् ॥ ५२ ॥
विष्णुः सदानन्दमयोऽसि पूर्णो
जानासि तत्त्वं निजमैशमेकम् ।
तथापि दासस्य ममाखिलेश
कृतं वचो भक्तपरोऽसि विद्वन् ॥ ५३ ॥
त्वं भ्रातृभिर्वैष्णवमेकमाद्यं
प्रविश्य देहं परिपाहि देवान् ।
यद्वा परो वा यदि रोचते तं
प्रविश्य देहं परिपाहि नस्त्वम् ॥ ५४ ॥
त्वमेव देवाधिपतिश्च विष्णु-
र्जानन्ति न त्वां पुरुषा विना माम् ।
सहस्रकृत्वस्तु नमो नमस्ते
प्रसीद देवेश पुनर्नमस्ते ॥ ५५ ॥
पितामहप्रार्थनया स रामः
पश्यत्सु देवेषु महाप्रकाशः ।
मुष्णंश्च चक्षूंषि दिवौकसां तदा
बभूव चक्रादियुतश्चतुर्भुजः ॥ ५६ ॥
शेषो बभूवेश्वरतल्पभूतः
सौमित्रिरत्यद्भुतभोगधारी ।
बभूवतुश्चक्रदरौ च दिव्यौ
कैकेयिसूनूर्लवणान्तकश्च ॥ ५७ ॥
सीता च लक्ष्मीरभवत्पुरेव
रामो हि विष्णुः पुरुषः पुराणः ।
सहानुजः पूर्वशरीरकेण
बभूव तेजोमयदिव्यमूर्तिः ॥ ५८ ॥

तितक्यात तेथे श्रेष्ठ पितामह ब्रह्मदेव, सर्व देव, ऋषी आणि सिद्ध हेही आले. त्या वेळी देव विराजमान असलेल्या कोट्यवधी विमानांनी अपरंपार आकाश गच्च भरून गेले होते. सूर्याप्रमाणे असणाऱ्या त्या विमानांच्या प्रकाशांनी ते प्रकाशमान झाले. पुण्यवानांतील श्रेष्ठ, महात्म्यांमधील महान अशा स्वयंप्रकाशी पुरुषांमुळे आकाश भरून गेले होते. (४९-५०)

त्या वेळी सुगंधी वारे वाहू लागले. कुसुम-समूहाची सतत वृष्टी होऊ लागली आणि देवांच्या मृदंगाचा नाद कानी पडत असताना आणि विद्याधर व किन्नर गात असताना, अनंतशक्ती असणाऱ्या श्रीरामांनी सरयूच्या जलाचे एकदा आचमन केले. मग सरयू जलाला पायांनी स्पर्श करून ते त्या पाण्यातून चालू लागले. त्या वेळी हात जोडून ब्रह्मदेव श्रीरामांना म्हणाले, "हे परमात्मन्, तुम्ही परमेश्वर आहात, नित्य आनंदमय आणि सर्वांशी पूर्ण असे साक्षात विष्णू आहात. आपले स्वतःचे एकमेव ईश्वरी तत्त्व तुम्हीच जाणता, तथापि हे सर्वांच्या स्वामी असलेल्या तुमचा मी दास आहे. माझी प्रार्थना तुम्ही पूर्ण केली आहे. हे विद्वाना, तुम्ही भक्तवत्सल आहात. (५१-५३)

आता आपल्या भावांसह तुम्ही आद्य विष्णूंच्या शरीरातच प्रवेश करा आणि देवांचे रक्षण करा, किंवा जर तुम्हाला दुसरा एकादा देह पसंत असेल, तर त्या देहात प्रवेश करून तुम्ही आम्हा सर्वांचे पालन करा. (५४)

तुम्हीच देवांचे अधिपती विष्णू आहात. ही गोष्ट माझ्याखेरीज इतर कोणी पुरुष जाणत नाहीत. हे देवेश्वरा, तुम्हांला हजार वेळा माझा नमस्कार असो. तुम्ही प्रसन्न व्हा. पुनः तुम्हांला माझा नमस्कार असो." (५५)

पितामह ब्रह्मदेवाने अशी प्रार्थना केली असता आणि सर्व देव पाहात असताना, स्वर्गात राहाणाऱ्या सर्व देवांची दृष्टी दिपवीत, महातेजस्वी प्रभू रामचंद्रांनी चक्र इत्यादींनी युक्त चतुर्भुज रूप धारण केले. (५६)

लक्ष्मण अतिशय अद्भुत फणा धारण करून विष्णूची शय्या असणारा शेष नाग झाला. तसेच कैकेयीचा पुत्र भरत आणि लवणाचा वध करणारा शत्रुघ्न हे अनुक्रमे दिव्य असे चक्र आणि शंख झाले. (५७)

सीता ही तर अगोदरच लक्ष्मी झाली होती. राम हे साक्षात पुराण पुरुष विष्णूच. आपल्या कनिष्ठ बंधूंसह आपले पूर्वीचे शरीर धारण करून श्रीरामचंद्र तेजोमय दिव्य स्वरूपी विष्णू बनून शोभू लागले. (५८)

विष्णुं समासाद्य सुरेन्द्रमुख्या
देवाश्च सिद्धा मुनयश्च यक्षाः ।
पितामहाद्याः परितः परेशं
स्तवैर्गृणन्तः परिपूजयन्तः ॥ ५९ ॥
आनन्दसम्प्लावितपूर्णचित्ता
बभूविरे प्राप्तमनोरथास्ते ।
तदाह विष्णुर्दुहिणं महात्मा
एते हि भक्ता मयि चानुरक्ताः ॥ ६० ॥
यान्तं दिवं मामनुयान्ति सर्वे
तिर्यक्शरीरा अपि पुण्ययुक्ताः ।
वैकुण्ठसाम्यं परमं प्रयान्तु
समाविशस्वाशु ममाज्ञया त्वम् ॥ ६१ ॥
श्रुत्वा हरेर्वाक्यमथाब्रवीत्कः
सान्तानिकान्यान्तु विचित्रभोगान् ।
लोकान्मदीयोपरि दीप्यमानां-
स्त्वद्भावयुक्ताः कृतपुण्यपुञ्जाः ॥ ६२ ॥
ये चापि ते राम पवित्रनाम
गृणन्ति मर्त्या लयकाल एव ।
अज्ञानतो वापि भजन्तु लोकां-
स्तानेव योगैरपि चाधिगम्यान् ॥ ६३ ॥
ततोऽतिहृष्टा हरिराक्षसाद्याः
स्पृष्ट्वा जलं त्यक्तकलेवरास्ते ।
प्रपेदिरे प्राक्तनमेव रूपं
यदंशजा ऋक्षहरीश्वरास्ते ॥ ६४ ॥
प्रभाकरं प्राप हरिप्रवीरः
सुग्रीव आदित्यजवीर्यवत्त्वात् ।
ततो विमग्नाः सरयूजलेषु
नराः परित्यज्य मनुष्यदेहम् ॥ ६५ ॥
आरुह्य दिव्याभरणा विमानं
प्रापुश्च ते सान्तनिकाख्यलोकान् ।
तिर्यक्प्रजाता अपि रामदृष्टा
जलं प्रविष्टा दिवमेव याताः ॥ ६६ ॥
दिदृक्षवो जानपदाश्च लोका
रामं समालोक्य विमुक्तसङ्गाः ।
स्मृत्वा हरिं लोकगुरुं परेशं
स्पृष्ट्वा जलं स्वर्गमवापुरञ्जः ॥ ६७ ॥

त्या वेळी इंद्रादी देव, सिद्ध, मुनी, यक्ष, ब्रह्मदेव इत्यादी परमेश्वर विष्णूजवळ येऊन, सर्व प्रकारे स्तोत्रांनी त्यांची स्तुती करू लागले आणि त्यांनी त्यांची पूजा केली. आपला मनोरथ पूर्ण झाल्यामुळे त्या सर्वांची मने आनंदाने संपूर्णपणे भरून गेली. त्या वेळी भगवान विष्णू ब्रह्मदेवांना म्हणाले, "हे सर्व जण माझे भक्त आहेत आणि ते माझ्यावर प्रेम करणारे आहेत. (५९-६०)

मी स्वर्गाला येण्यास निघालो असताना, हे सर्व जण माझ्या मागोमाग येथे आले आहेत. यांमध्ये जे तिर्यक् शरीरधारी आहेत, तेसुद्धा फार पुण्यवंत आहेत. हे सर्वजण वैकुंठसदृश उत्तम लोकांप्रत जाऊ देत. तेव्हा माझ्या आज्ञेने तुम्ही यांना ताबडतोब प्रवेश द्या." (६१)

हरीचे वचन ऐकल्यावर ब्रह्मदेव म्हणाले, "माझ्या ब्रह्मलोकाच्याही वर असणारे, देदीप्यमान, विचित्र भोग साधनांनी संपन्न असे जे सांतानिक लोक आहेत, त्या लोकांप्रत तुमच्या भक्तीने युक्त असणारे आणि ज्यांनी पुण्याचा संचय केला आहे, असे हे लोक जाऊ देत. (६२)

आणि हे श्रीरामा, आणखी सांगतो की मरणकाळी जे मानव 'राम' हे तुमचे पवित्र नाम उच्चारतील, तसेच अजाणता का होईना जे कोणी तुम्हांला भजतील, त्या लोकांनासुद्धा, योगीजनांना प्राप्त होण्यास योग्य असे ते सांतानिक लोक प्राप्त होतील." (६३)

त्या वेळी वानर, राक्षस इत्यादी अतिशय आनंदित झाले. सरयूच्या जलाला स्पर्श करून त्यांनी आपल्या शरीराचा त्याग केला. त्यानंतर ती अस्वले व वानरश्रेष्ठ ज्या अंशापासून उत्पन्न झाले होते, त्या देवांची पूर्वीची रूपे त्यांना प्राप्त झाली. (६४)

वानरांतील श्रेष्ठ वीर सुग्रीव हा आदित्याच्या वीर्यापासून उत्पन्न झाला असल्यामुळे तो सूर्यात विलीन होऊन गेला. त्यानंतर इतर माणसांनी सरयूच्या पाण्यात बुडी मारली; त्यांनी आपल्या मनुष्य-देहांचा त्याग केला; मग दिव्य अलंकारांनी विभूषित होऊन ते विमानात चढले आणि त्यांनी सांतानिक नावाचे लोक प्राप्त करून घेतले. तिर्यक् योनीत जन्मलेले प्राणीसुद्धा श्रीरामांची दृष्टी पडल्यावर सरयूच्या पाण्यात शिरले आणि तेही स्वर्गलोकीच गेले . (६५-६६)

जे देशवासी लोक हा प्रसंग पाहाण्याच्या इच्छेने आलेले होते, तेसुद्धा श्रीरामांचे दर्शन झाल्यावर, संसाराच्या आसक्तीतून मुक्त झाले आणि लोकगुरू व परमेश्वर अशा श्रीहरींचे स्मरण करून, त्यांनी सरयूच्या जलाला स्पर्श करताच, त्यांनासुद्धा अनायासे स्वर्गाची प्राप्ती झाली.(६७)

एतावदेवोत्तरमाह शम्भुः
श्रीरामचन्द्रस्य कथावशेषम् ।
यः पादमप्यत्र पठेत्स पापा-
द्विमुच्यते जन्मसहस्रजातात् ॥ ६८ ॥
दिने दिने पापचयं प्रकुर्वन्
पठेन्नरः श्लोकमपीह भक्त्या ।
विमुक्तसर्वाघचयः प्रयाति
रामस्य सालोक्यमनन्यलभ्यम् ॥ ६९ ॥
आख्यानमेतद्रघुनायकस्य
कृतं पुरा राघवचोदितेन ।
महेश्वरेणाप्तभविष्यदर्थं
श्रुत्वा तु रामः परितोषमेति ॥ ७० ॥
रामायणं काव्यमनन्तपुण्यं
श्रीशङ्करेणाभिहितं भवान्यै ।
भक्त्या पठेद्यः शृणुयात्स पापै-
र्विमुच्यते जन्मशतोद्भवैश्च ॥ ७१ ॥
अध्यात्मरामं पठतश्च नित्यं
श्रोतुश्च भक्त्या लिखितुश्च रामः ।
अतिप्रसन्नश्च सदा समीपे
सीतासमेतः श्रियमातनोति ॥ ७२ ॥
रामायणं जनमनोहरमादिकाव्यं
ब्रह्मादिभिः सुरवरैरपि संस्तुतं च ।
श्रद्धान्वितः पठति यः शृणुयात्तु नित्यं
विष्णोः प्रयाति सदनं स विशुद्धदेहः ॥ ७३ ॥

श्रीरामचंद्रांच्या कथेचा उरलेला इतकाच भाग शंकरांनी पार्वतीला उत्तरकांड रूपात सांगितला. जो कुणी माणूस यातील एक पाद (चौथा भाग) सुद्धा पठण करील, तो हजारो जन्मात झालेल्या पापांतून मुक्त होऊन जाईल. (६८)

दररोज पापाचा संचय करणारा पुरुष जर भक्तीने या अध्यात्मरामायणातील एक तरी श्लोक पठण करील, तो पापांच्या सर्व संचयातून मुक्त होऊन, इतरांना अलभ्य अशा रामाच्या सालोक्यपदाप्रत जाईल. (६९)

ज्यामध्ये भविष्यकालीन गोष्टी वर्णिल्या आहेत, असे हे रघुनायकांचे आख्यान, त्यांच्या प्रेरणेनेच महेश्वराने पूर्वी रचले. ते ऐकून श्रीराम अतिशय संतुष्ट होतात. (७०)

अनंत पुण्य देणारे हे अध्यात्म रामायण नावाचे काव्य पूर्वी श्रीशंकरांनी पार्वतीला सांगितले. जो पुरुष हे भक्तीने पठण करील अथवा श्रवण करील, तो शेकडो जन्मांत निर्माण झालेल्या पापांतून मुक्त होऊन जातो. (७१)

या अध्यात्मरामायणाचे नित्य पठण जो पुरुष भक्तीने करतो, वा श्रवण करतो अथवा त्याचे लेखन करतो, त्याच्यावर श्रीराम अतिशय प्रसन्न होतात आणि सीतेसह सदा त्याच्या समीप राहून त्याला भोगमोक्ष देतात. (७२)

ब्रह्मदेव इत्यादी श्रेष्ठ देवांनी प्रशंसा केलेले आणि माणसांच्या मनाचे हरण करणारे हे आदिकाव्य असे अध्यात्म रामायण जो कोणी भक्तिसंपन्न होऊन नित्य पठण करतो किंवा नित्य श्रवण करतो, त्याचे शरीर शुद्ध होते (व मन निर्मळ होते) आणि तो विष्णूच्या परमधामास जातो. (७३)



इति श्रीमदध्यात्मरामायणे उमामहेश्वरसंवादे उत्तरकाण्डे नवमः सर्गः ॥ ९ ॥

समाप्तमिदमुत्तरकाण्डम्

पार्वत्यै परमेश्वरेण गदिते ह्यध्यात्मरामायणे
काण्डैः सप्तभिरन्वितेऽतिशुभदे सर्गाश्चतुःषष्टिकाः ।
श्लोकानां तु शतद्वयेन सहितान्युक्तानि चत्वारि वै
साहस्राणि समाप्तितः श्रुतिशतान्युक्तानि तत्त्वार्थतः ॥

श्रीशंकरांनी पार्वतीला सांगितलेल्या, आणि सात कांडांनी युक्त असणाऱ्या या अतिशय शुभप्रद अध्यात्मरामायणात चौसष्ट सर्ग आहेत. याच्या अंतापर्यंत एकूण चार हजार दोनशे श्लोक सांगितलेले आहेत. तसेच तत्त्वार्थाचे विवेचन करणाऱ्या शेकडो श्रुतींची वचने सांगितली आहेत.

श्रीजानकीजीवनाष्टकम्

आलोक्य यस्यातिललामलीलां सद्भाग्यभाजौ पितरौ कृतार्थौ ।
तमर्भकं दर्पकदर्पचौरं श्रीजानकीजीवनमानतोऽस्मि ॥ १ ॥
श्रुत्वैव यो भूपतिमात्तवाचं वनं गतस्तेन न नोदितोऽपि ।
तं लीलयाह्लादविषादशून्यं श्रीजानकीजीवनमानतोऽस्मि ॥ २ ॥
जटायुषो दीनदशां विलोक्य प्रियावियोगप्रभवं च शोकम् ।
यो वै विसस्मार तमार्द्रचित्तं श्रीजानकीजीवनमानतोऽस्मि ॥ ३ ॥
यो वालिना ध्वस्तबलं सुकण्ठं न्ययोजयद्राजपदे कपीनाम् ।
तं स्वीयसन्तापसुतप्तचित्तं श्रीजानकीजीवनमानतोऽस्मि ॥ ४ ॥
यद्ध्याननिर्धूतवियोगवह्निर्विदेहबाला विबुधारिवन्याम् ।
प्राणान्दधे प्राणमयं प्रभुं तं श्रीजानकीजीवनमानतोऽस्मि ॥ ५ ॥
यस्यातिवीर्याम्बुधिवीचिराजौ वंश्यैरहो वैश्रवणो विलीनः ।
तं वैरिविध्वंसनशीललीलं श्रीजानकीजीवनमानतोऽस्मि ॥ ६ ॥
यद्रूपराकेशमयूखमालानुरञ्जिता राजरमापि रेजे ।
तं राघवेन्द्रं विबुधेन्द्रवन्द्यं श्रीजानकीजीवनमानतोऽस्मि ॥ ७ ॥
एवं कृता येन विचित्रलीला मायामनुष्येण नृपच्छलेन ।
तं वै मरालं मुनिमानसानां श्रीजानकीजीवनमानतोऽस्मि ॥ ८ ॥

ज्यांच्या अतिशय ललामभूत बाललीला पाहून भाग्यशाली माता-पिता कृतार्थ झाले आणि ज्यांनी आपल्या सौंदर्याने मदनाचा अभिमान हरण केला त्या श्रीजानकीजीवनरूप श्रीरामांना मी नमस्कार करतो. (१)

दशरथ राजांचे वचन ऐकताच, त्यांचे वचन मान्य करून, त्यांनी प्रेरणा दिली नसतानाही जे लीलेने वनामध्ये गेले त्या आनंद व विषाद यांनी रहित अशा श्रीजानकीजीवनरूप रामांना मी नमस्कार करतो. (२)

जटायूची दीन अवस्था पाहिल्यावर आपल्या प्रिया सीतेच्या वियोगामुळे निर्माण झालेला शोक जे विसरून गेले, अशा आर्द्रचित्त असणाऱ्या त्या श्रीजानकीजीवनरूप रामांना मी नमस्कार करतो. (३)

वालीने पराभूत केलेल्या आपल्या प्रिय मित्र सुग्रीवाला त्याचे दुःख दूर करून त्याला वानरांच्या राज्यपदावर बसविले. अशा श्रीजानकीजीवनरूप श्रीरामांना मी नमस्कार करतो. (४)

श्रीरामांचे ध्यान केल्यामुळे सीतेचा विरहरूपी अग्नी विझून गेला, ती विदेहकन्या सीता देवांचा शत्रू असलेल्या रावणाच्या अशोकवनांत प्राण धारण करून राहिली. अशा त्या सीतेचा प्राण असणाऱ्या श्रीजानकीजीवनरूप प्रभू श्रीरामांना मी नमस्कार करतो. (५)

काय आश्चर्य! ज्यांच्या अतिशय सामर्थ्यरूपी सागराच्या तरंगांमध्ये रावण आपल्या वंशासह विलीन झाला, आणि वैऱ्यांचा नाश करणे हा ज्यांची लीला होती, अशा त्या श्रीजानकीजीवनरूप श्रीरामांना मी नमस्कार करतो. (६)

ज्यांच्या रूपाच्या चंद्रकिरणांनी रंगलेली राजलक्ष्मी हीसुद्धा शोभू लागली, जे रघुकुळातील पुरुषांमध्ये श्रेष्ठ होते, जे ब्रह्मादिकांना वंद्य होते, अशा श्रीजानकीजीवनरूप श्रीरामांना मी नमस्कार करतो. (७)

अशा प्रकारे मायेने मनुष्यरूप धारण केलेल्या श्रीरामांनी राजा बनून विचित्र लीला केल्या आणि जे मुनींच्या मानसरूपी मानस सरोवरातील हंस आहेत, अशा त्या श्रीजानकीजीवनरूप श्रीरामांना नमस्कार करतो. (८)

****

पारायणानंतरचे श्लोक

ॐ स्वस्ति प्रजाभ्यः परिपालयन्तां
न्याय्येन मार्गेण महीं महीशाः।
गो ब्राह्मणेभ्यः शुभमस्तु नित्यं
लोकाः समस्ताः सुखिनो भवन्तु॥
काले वर्षतु पर्जन्यः पृथिवी सस्यशालिनी।
देशोऽयं क्षोभरहितो ब्राह्मणाः सन्तु निर्भयाः॥
मङ्गलं कोसलेन्द्राय महनीयगुणात्मने।
चक्रवर्तितनूजाय सार्वभौमाय मङ्गलम्॥
कायेन वाचा मनसेन्द्रियैर्वा
बुद्ध्याऽऽत्मना वा प्रकृतिस्वभावात्।
करोमि यद् यत् सकलं परस्मै
नारायणायेति समर्पयामि॥
ॐ सर्वेषां स्वस्तिर्भवतु सर्वेषां शान्तिर्भवतु
सर्वेषां पूर्णं भवतु सर्वेषां मंगलं भवतु
सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखभाग्भवेत्॥
ॐ असतो मा सद्गमय
तमसो मा ज्योतिर्गमय
मृत्योर्मा अमृतं गमय॥
ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते॥

❀❀❀

श्रीभगवंतांची प्रार्थना

श्री अनंता मधुसूदना। पद्मनाभा नारायणा।
जगव्यापका जनार्दना। आनंदघना अविनाशा॥ १॥
सकळदेवाधिदेवा। कृपाळुवाजी केशवा।
महानंदा महानुभवा। सदाशिवा सहजरूपा॥ २॥
चक्रधरा विश्वंभरा। गरुडध्वजा करुणाकरा।
सहस्त्रपादा सहस्त्रकरा। क्षीरसागरा शेषशयना॥ ३॥
कमलनयना कमलापति। कामिनि मोहना मदनमूर्ति।
भवतारका धारित्या क्षिती। वामनमूर्ती त्रिविक्रमा॥ ४॥
अगा ये सगुणा निर्गुणा। जगज्जनित्या जगज्जीवना।
वसुदेव देवकी नंदना। बाळरांगणा बाळकृष्णा॥ ५॥
तुका आला लोटांगणी। मज ठाव द्यावा जी चरणी।
हेचि करीतसे विनवणी। भवबंधनी सोडवावे॥ ६॥

❀❀❀